सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

# सांस्कृतिक कार्य विभाग





# सांस्कृतिक धोरण २०२४

# फेरआढावा समितीचा अहवाल



# अनुक्रम


| | | |
|---|---|---|
| | प्रस्तावना | ०४ |
| प्रकरण १ | पार्श्वभूमी | ०७ |
| प्रकरण २ | २०१० मधील सांस्कृतिक धोरणावर दृष्टिक्षेप | १४ |
| प्रकरण ३ | समितीने आपापल्या उपसमित्यांसह अवलंबिलेली कार्यपद्धती | २० |
| प्रकरण ४ | निरिक्षणे | २६ |
| प्रकरण ५ | धोरणापलीकडची दृष्टी | ३२ |
| प्रकरण ६ | धोरणात्मक आणि कार्यात्मक शिफारशी | ३७ |
| प्रकरण ७ | अन्य महत्त्वाच्या  शिफारशी | ५६ |
| प्रकरण ८ | उपसंहार | ६० |
| जोडपत्र | १० उपसमित्यांच्या मूळ शिफारशी | ६२ |



# प्रस्तावना

## प्रस्तावना

संस्कृती आणि सांस्कृतिक विषयांची स्थिती काहीशी 'अति-परिचयात अवज्ञा' अशी झाल्याचा अनुभव अनेकदा येतो. त्यामुळे अनेकदा संस्कृतीशी संबंधित विषयांकडे पुरेशा प्रगल्भतेने बघितले जात नाही किंवा व्यावहारिक आणि अंमलबजावणीच्या बाबतीत या विषयाचे महत्त्वच लक्षात घेतले जात नाही. त्यात पुन्हा याप्रकारच्या कोणत्याही विषयगटांच्या संदर्भात जर मूलभूत धोरण-दृष्टिकोन विकसित झालेला नसेल, तर अशा विषयांचे सामान्यतः किरकोळीकरणच होते आणि दृष्टीकोनातील गांभीर्यच संपुष्टात येते.

या सर्व पार्श्वभूमीवर, महाराष्ट्र शासनाने सुमारे १४ वर्षांपूर्वी सांस्कृतिक धोरण ठरविण्यासाठी एका समितीची नियुक्ती करणे आणि त्या समितीच्या त्याच अहवालात नमूद केल्याप्रमाणे २०१० मध्ये तयार झालेल्या त्या धोरणाचा, बदलत्या काळाच्या संदर्भात फेरआढावा घेऊन नव्याने धोरणआखणी करण्यासाठी एका समितीची नियुक्ती करणे, हे विशेष उल्लेखनीय म्हणता येईल.

महाराष्ट्राच्या सांस्कृतिक धोरणाचा फेरआढावा घेऊन नव्याने धोरणआखणी करण्यासाठी २०२२ मध्ये प्रस्तुत समितीचे गठन करण्यात आले. नंतर त्यात काही अधिक सदस्यांची नियुक्ती करुन समितीचे स्वरूप आणखी सर्व-समावेशी केले गेले. भटक्या-विमुक्तांच्या प्रश्नांचे जाणकार लेखक गिरीश प्रभुणे, ज्येष्ठ साहित्यिक नामदेव कांबळे, दृश्यकलेतील मातब्बर चित्रकार सुहास बहुलकर, नृत्यांगना आणि ललित कला अकादमीच्या अध्यक्ष संध्या पुरेचा, ज्येष्ठ शिक्षणतज्ञ बाबा नंदनपवार, आदिवासी समाजातील भक्ती-परंपरांचे जाणकार आणि ज्येष्ठ कलावंत सोनुदादा म्हसे, प्रयोगशील संगीतकार कौशल इनामदार, रंगकर्मी दीपक करंजीकर, आदिवासी लोककलांच्या संदर्भात प्रदीर्घ व्यावहारिक अनुभव गाठीशी असलेले जगन्नाथ हिलीम, चित्रपट दिग्दर्शक-निर्मातेद्वय गजेंद्र अहिरे आणि मिलिंद लेले आणि कार्याध्यक्ष या नात्याने मी स्वत: अशा १२ जणांच्या या समितीने विशिष्ट विषयांसाठी एकेका सदस्याच्या जोडीला एकेक उपासमिती गठित करुन सांस्कृतिक विषयांच्या विविध पैलूंचा आजच्या संदर्भात विस्तृत आढावा घेतला आणि सुमारे सव्वा वर्षाच्या काळात हे धोरण तयार केले आहे.

या अहवालात सुरूवातीस धोरण-निश्चितीच्या या रचनाबद्ध प्रयत्नांमागील पार्श्वभूमीचे विवेचन आहे आणि नंतर अनुसरलेल्या कार्यपद्धतीचा तपशील आहे. त्यानंतर, हे काम करताना ध्यानात आलेल्या आणि धोरण-निश्चितीसाठी काही प्रमाणात आधारभूत ठरलेल्या काही बाबींचा आढावा घेणारे 'निरीक्षणे' हे प्रकरण आहे आणि अखेरीस समितीने आपल्या विविध उपसमित्यांच्या मदतीने काढलेल्या निष्कर्षांवर आधारित शिफारशी आहेत. शिफारशींच्या विषय-निहाय सूचीत निखळ धोरणात्मक शिफारशींना प्राधान्य देण्यात आले आहे.

शिफारशींमध्ये ठोस, करणीय कामांच्या संदर्भातील शिफारशी मोठ्या संख्येने आहेत आणि त्याचे तसेच खास कारणही आहे. ते कारण असे, की मुदलातच सामान्यत: धोरणात्मक दृष्टिकोनासंदर्भात फारसे काही मतभेद आढळत नाहीत. अडचणी येतात व राजकीय इच्छाशक्ती कधी- कधी कमी पडताना दिसते, ती अंमलबजावणीच्या संदर्भात. परिणामी समितीवर मुख्यत्वे अंमलबजावणीच्या संदर्भातील सूचनांचा अक्षरश: इतका वर्षाव झाला, की त्या सूचनांचा समावेश करणे न्यायाचे तर होतेच पण व्यवहार्यही!

वस्तुत: हा अहवाल दिलेल्या मुदतीत, म्हणजे नोव्हेंबर-२०२३ अखेरीस तयार झाला होता. परंतु कृत्रिम बुद्धिमत्तेसारख्या काही नव्या आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या अनेक क्षेत्रांवर होऊ घातलेल्या परिणामांची

चिकित्सा करुन काही ठोस शिफारशी करणे आवश्यक आहे, असे मत अनेक सदस्यांनी मांडले. त्यामुळे समितीने कार्यकाळ वाढवून मागितला आणि या नव्या तंत्रज्ञानांशी संबंधित मुद्द्यांचा आढावा घेऊन, या अहवालाला अंतिम रूप देण्यात आले.

कार्याध्यक्ष या नात्याने, हा अहवाल समितीचे माननीय अध्यक्ष आणि राज्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री श्री. सुधीर मुनगंटीवार यांना सुपूर्द करतांना मनात समाधानाची भावना आहे. समितीच्या सर्व माननीय सदस्यांनी अतिशय प्रामाणिकपणे, परिश्रमपूर्वक आणि शिस्तबद्ध काम करून, तसेच उपसमित्यांच्या सर्व सदस्यांशी समन्वय राखून हे काम पूर्ण केले आहे. अनेकदा प्रवास आणि निवासाच्या संदर्भात समिती/ उपसमिती सदस्यांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागले. पण या अडचणींचा बाऊ न करता या सर्वांनीच आपण महाराष्ट्राच्या सांस्कृतिक चळवळीतील एक कार्यकर्ते आहोत असा दृष्टिकोन ठेऊन आणि हे आपले कर्तव्यच आहे या भावनेने काम केले. या सर्व सदस्यांचे आणि उपसमिती सदस्यांचेही मनापासून आभार.

सांस्कृतिक कार्य मंत्री श्री.सुधीर मुनगंटीवार यांनीही समितीला सर्व ते मार्गदर्शन आणि प्रोत्साहनही दिले. सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव श्री विकास खरगे, सांस्कृतिक कार्य संचालक आणि समितीचे सदस्य सचिव श्री बिभीषण चवरे आणि अन्य सर्व संबंधित अधिकाऱ्यांनीही प्रसंगी रूढ कार्यपद्धतीच्या पलीकडे जाऊन सर्व ते सहकार्य केले, त्याबद्दल त्यांचेही आभार. अहवालाला अंतिम रुप देण्याच्या प्रक्रियेत माध्यम क्षेत्रातील एक जाणकार कार्यकर्ते केतन जोशी तसेच मसुदालेखन आणि संपादन प्रक्रियेत महत्त्वाचे योगदान देणारे शासकीय अधिकारी सर्वश्री संतोष गोसावी, संतोष खामकर आणि मीनल जोगळेकर यांनी जी मदत केली, त्याबद्दल त्यांनाही मनापासून धन्यवाद !

सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे, सांस्कृतिक क्षेत्रातील विविध मान्यवर, विविध संघटना, प्रत्यक्ष कलाकार/ कारागीर, संशोधक आणि अभ्यासक तसेच त्या-त्या क्षेत्रातील वास्तवाची जाणकारी असलेल्या व्यक्ती आणि संस्था यांनी आमच्या आवाहनाला मान देऊन, प्रत्यक्ष भेटून अथवा आपल्या निवेदनाच्या माध्यमातून आपले विचार, आपल्या सूचना मोठ्या प्रमाणात आमच्यापर्यंत पोहोचविल्या. त्या सर्वांचे अतिशय मनापासून आभार. सर्वांच्या अशा सहभागामुळेच समितीचे काम पुढे जाऊ शकले आणि समितीच्या शिफारशी सर्व-समावेशी होऊ शकल्या. या अहवालात एकूण ७ प्रकरणे आहेत. सगळ्यात शेवटी जोडपत्रात विविध दहा उप-समित्यांच्या मूळ शिफारशीही जश्याच्यातश्या देण्यात आल्या आहेत. तसेच सर्व उपसमित्यांचे मूळ अहवाल संस्कृतिक कार्य विभागाच्या संकेतस्थळावरही उपलब्ध करून देण्यात येतील.

समितीतील आम्हा सर्व सदस्यांची अशी ठाम धारणा आहे की सांस्कृतिक धोरणा-२०१० चा आढावा घेऊन व आजच्या संदर्भातील, तसेच पुढील दशकभरातील आवश्यकता लक्षात घेऊन या अहवालात शिफारशी केल्या आहेत. मराठी भाषा, महाराष्ट्राची संस्कृती आणि आपला सांस्कृतिक वारसा भविष्यातील नव्या पिढ्यांकडे सोपवणे आणि त्याचे संवर्धन, हे दोन्ही अतिशय महात्त्वाचे आहे. त्या दृष्टीने या अहवालातील शिफारशी शासनाला उपयुक्त ठरून महाराष्ट्र शासन लवकरच **सांस्कृतिक धोरण-२०२४** जाहीर करू शकेल.

**विनय सहस्रबुद्धे**

**कार्याध्यक्ष,**

**महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक धोरण फेर-आढाव**

# प्रकरण १



# पार्श्वभूमी

# <u>प्रकरण -१</u>

**पार्श्वभूमी:**

भारत आणि मुख्य म्हणजे भारताची संकल्पना आणि भारतीय संस्कृती हे एक शाश्वत, सनातन समीकरणच होय. "भारत" संकल्पेनच्या केंद्र स्थानी आहे, ती भारतीय संस्कृती. भारतीय संस्कृतीचा विषय वगळून "भारत" संकल्पनेची चर्चाच आपण करू शकणार नाही, इतके भारत आणि भारतीय संस्कृती यांचे विलक्षण घट्ट नाते आहे. परंतु असे असूनही संस्कृती किंवा एकूणच संस्कृतीशी संबंधित अनेकविध विषयांची अनेकदा आणि अनेक पद्धतीने उपेक्षाच होताना दिसते. यामागे तीन प्रमुख कारणे दिसतात. पहिले म्हणजे, इतर अनेक सभ्यता (Civilizations) आणि सभ्यतामूलक देशांप्रमाणेच भारतीयत्व म्हणजे भारतीय संस्कृतीचा जो गाभा आहे, त्याचा थेट वा अप्रत्यक्ष संबंध इथल्या आध्यात्मिक संस्कृतीशी आहे. इथल्या आध्यात्मिक संस्कृतीची जी मुख्य धारा आहे, तिची अभिव्यक्ती साहजिकच ठळकपणे आणि प्रामुख्याने होणे स्वाभाविकच आहे. असे होण्याने अन्य आध्यात्मिक प्रवाहांच्या मंडळींना काय वाटेल, याच प्रश्नाने पछाडलेल्या लोकांनी एका काल्पनिक भीतीतून निर्माण झालेल्या संकोचापोटी इथल्या सांस्कृतिक संचिताची उपेक्षा केली, असे म्हणणे अतिशयोक्तीचे होणार नाही. उपेक्षेचे दुसरे कारण अति-परिचयातील अवज्ञेचे आहे. आपल्या भारतीय संस्कृतीचे अनेक घटक आपल्या इतक्या घट्ट परिचयाचे आहेत ,की त्याबाबतीत चर्चा आणि विचार-विमर्श तो काय कारायचा? असाही एक दृष्टिकोन असतो आणि त्यामुळेदेखील आपल्या सांस्कृतिक संचिताचा पुरेसा सांभाळ आपण केला नसावा/नाही. तिसरे महत्वाचे कारण म्हणजे, आपली संस्कृती आणि सांस्कृतिक व्यवहार यांच्याकडे पाहण्याचा समकालीन समाजातील दृष्टिकोन दुर्दैवाने पुरेसा प्रगल्भ नाही. त्यामुळेच सांस्कृतिक कार्यक्रम म्हणजे फक्त संगीत आणि नाटक अथवा नृत्य अशी एक संकुचित व्याख्या आपल्या मनात घर करुन आहे. मनोरंजन अथवा करमणूक हे एक महत्त्वाचे क्षेत्र आहे, हे खरेच. पण संस्कृती आणि सांस्कृतिक कार्यक्रमाचा संबंध केवळ करमणुकीशी जोडणे अत्यंत उथळ विचारांचे लक्षण असल्याने ते अत्यंत चुकीचे आणि आक्षेपार्ह आहे, यात शंका नाही.

निदान भारताच्याबाबतीत तरी, आपण एक सांस्कृतिक समाज म्हणजेच Civilizational Society आहोत आणि त्यामुळे आपल्या एकूणच व्यक्तिगत, कौटुंबिक, आणि सार्वजनिक जीवनाचा पाया आपल्या संस्कृतीत आहे. त्यामुळेच शासनाचे सांस्कृतिक धोरण हे आपल्या संस्कृतीची समग्र आणि सखोल जाण विकसित करण्याच्या आपल्या सामूहिक प्रयत्नांचा एक महत्वाचा भाग ठरते आणि त्याच दृष्टीने या धोरणाकडे बघायला हवे. त्यातही, केंद्रापेक्षा राज्याच्या सांस्कृतिक धोरणाचे व्यवहारिकदृष्ट्या विशेष महत्त्व आहे. प्रादेशिक भाषा, प्रादेशिक संस्कृती आणि तत्सम गोष्टींचा सांस्कृतिक धोरणाशी असलेला सख्खा संबंध ध्यानात घेतला, तर राज्याच्या सांस्कृतिक धोरणाचे महत्त्व वेगळे विशद करावे लागणार नाही. या सर्व पार्श्वभूमीवर, २०१० मध्ये राज्याने स्वीकारलेल्या सांस्कृतिक धोरणाच्या फेरआढाव्याचा निर्णय २०२२ मध्ये घेऊन सांस्कृतिक धोरण फेर-आखणी समिती स्थापन करणे, सर्व प्रकारे तर्क-संगत आणि समयोचित ठरते.

सांस्कृतिक धोरण-निश्चितीतील गुंतागुंत आणि एकूणच या विषयीचे वाढते महत्त्व ध्यानात घेऊनच महाराष्ट्र सरकारने पूर्वी म्हणजे २०१० मध्ये तयार केलेल्या महाराष्ट्राच्या अधिकृत सांस्कृतिक धोरणाचा, आजच्या काळाच्या संदर्भात आढावा घेऊन नव्याने धोरण-आखणी करावी, असा विचार केला आणि

त्यासाठी मा. सांस्कृतिक कार्य मंत्री श्री. सुधीर मुनगंटीवार यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नियुक्त केली. माजी राज्यसभा सदस्य आणि भारतीय सांस्कृतिक संबंध परिषदेचे तत्कालीन अध्यक्ष डॉ. विनय सहस्त्रबुद्धे यांची या समितीचे कार्याध्यक्ष म्हणून नियुक्ती झाली. सुरुवातीस या समितीत आठ सदस्यांचा समावेश होता.

समितीचे अध्यक्ष आणि कार्याध्यक्ष वगळता सर्व माननीय सदस्यांना एका-एका उपसमितीचे अध्यक्षपद देण्यात आले होते. खालील सूचीत नावांच्या पुढे त्यांच्या उपसमितीचाही उल्लेख करण्यात आला आहे :-

१. मा. मंत्री, सांस्कृतिक कार्य, महाराष्ट्र (श्री. सुधीर मुनगंटीवार), अध्यक्ष
२. डॉ. विनय सहस्त्रबुद्धे, ठाणे; कार्याध्यक्ष
३. श्री. गिरीश प्रभुणे, पिंपरी-चिंचवड (कारागिरी)
४. श्री. बाबा नंदनपवार, नागपूर (गड, किल्ले आणि पुरातत्त्व)
५. श्री. सुहास बहुलकर,मुंबई ( दृश्यकला)
६. श्री. कौशल इनामदार, मुंबई (संगीत)
७. श्री नामदेव कांबळे, वाशीम (भाषा,साहित्य, वाचन संस्कृती आणि ग्रंथ व्यवहार )
८. श्री जगन्नाथ हिलीम, पालघर (लोककला)
९. श्री. सोनुदादा म्हसे, जव्हार (भक्तिसंस्कृती)

नंतर या समितीत आणखी चार सदस्यांची नियुक्ती करण्यात आली. त्यांची नावे खालीलप्रमाणे:-

१. श्रीमती संध्या पुरेचा, मुंबई (नृत्य)
२. श्री. दीपक करंजीकर, नाशिक-मुंबई (रंगभूमी)
३. श्री. गजेंद्र अहिरे, नाशिक (चित्रपट)
४. श्री. मिलिंद लेले, पुणे (चित्रपट)

आपल्या प्रारंभिक बैठकीपासूनच समितीच्या सदस्यांचे एकमत होते, की संस्कृतीच्या व्यापक परिघातील ज्या मुद्यांना ठळक सामाजिक संदर्भ आहेत आणि भविष्याच्या दृष्टीने संस्कृतीच्या संवर्धनाच्या संदर्भात ज्यांच्या बाबतीत काही मुद्दे विचारात घेणे आवश्यक आहे, अशाच विषयांचा या धोरण-निश्चितीच्या प्रयत्नात प्रामुख्याने आढावा घेण्यात यावा.

सांस्कृतिक धोरण हे केवळ संगीत, रंगभूमी, चित्रपट आणि तत्सम विषयात शासनाचा दृष्टिकोन काय असावा आणि त्या दृष्टीकोनातून शासनाने कोणती पाऊले उचलावीत याबद्दलच्या सूचनांची वा शिफारशींची जंत्री असू शकत नाही! या मागचे पहिले महत्त्वाचे कारण म्हणजे ‘संस्कृती’ या विषयाची व्याप्ती. संस्कृती हा मनुष्यमात्रांच्या अस्मितेचा पाया आहे. मी कोण आहे? या माणसाला पडलेल्या प्रश्नाचे उत्तर खूप मोठ्या प्रमाणात तो ज्या संस्कृतीत वाढतो, ती देत असते. सध्याच्या पाश्चात्य किंवा विदेशी संस्कृतीच्या वाढत्या प्रभावाच्या कालखंडात अस्मितेचे सपाटीकरण होऊ नये, यासाठीही प्रत्येक समूहाला आपली अस्मिता आणि त्यायोगे आपली संस्कृती जपणे, तिचे अस्तित्व आणि त्याचे प्रकटीकरण जीवंत ठेवणे, हे ही आवश्यकच आहे.

अस्मिता आणि संस्कृती यांच्या या अन्योन्य संबंधांमुळे ‘संस्कृती’ या संकल्पनेचा परिघ स्वाभाविकच खूप विस्तृत होत गेला आहे. माणूस ज्या वातावरणात वाढतो, त्या वातावरणाशी संबंधित अनेकविध घटक

"संस्कृती" या संकल्पनेत अनुस्यूत आहेत आणि तेच संस्कृतीचा आकार-उकारही ठरवितात. साहजिकच, नैसर्गिक पर्यावरणापासून ते सामाजिक चाली-रिती, सण-उत्सव साजरे करण्याच्या पद्धती, करमणुकीच्या संकल्पना आणि मनोरंजनाची साधने, जीवनशैली तसेच आहार -विहार, भाषा, लिपी तसेच टंकलेखन आणि भावचिन्हे (इमोजी) तसेच संवादाच्या व बोलण्याच्या पद्धती, सार्वजनिक वक्तृत्व, इतिहास आणि पुरातत्त्व, प्राणिजीवन, वनस्पती, घरे, गृहनिर्माण, वास्तूरचना आणि गृहसजावटीच्या पद्धती, खाद्यजीवन आणि पाकक्रिया, भक्ती आणि आध्यात्म, व्यक्ती-व्यक्ती आणि व्यक्ती-समाज संबंधांच्या अभिव्यक्तीच्या शैली, शिक्षण आणि त्याअंतर्गत पाठ्यक्रम, समारंभ नियोजन (इवेंट मॅनेजमेंट), प्रवास-साधने आणि पर्यटन, आधुनिक तंत्रज्ञान आणि कृत्रिम प्रज्ञेसारखे नवे विषय, बैठे अथवा मैदानी खेळ, शिवाय सर्वप्रकारची रूढ तसेच उदयोन्मुख  माध्यमे, ज्यात वृत्तपत्रे, नियतकालिके तसेच दृक-श्राव्य (इलेक्ट्रॉनिक) आणि डिजिटल माध्यमे, समाजमाध्यमे समाविष्ट होतात, असे अनेकविध घटक संस्कृतीचे दृश्य आणि अदृश्य स्वरूप साकारत असतात. त्यामुळेच सांस्कृतिक धोरणाचा मसुदा ठरविताना इतक्या मोठ्या अवकाशाला गवसणी घालणे ओघानेच येते. परंतु यातील अनेक विषय व्यक्तिगत जीवनशैलीशी आणि त्यामुळेच आभिरुचीशी जोडलेले आहेत आणि काहींचे स्वरुप इतके व्यक्तीसापेक्ष आहे की त्याबाबत धोरणात्मक असे काहीही शासनाने ठरवावे काय? अशाप्रकारचे प्रश्नही स्वाभाविकपणेच उपस्थित होतात.

जुन्या, म्हणजे २०१० मध्ये तयार झालेल्या सांस्कृतिक धोरणाच्या मसुद्याची समीक्षा अथवा आढावा आणि त्या आढाव्याच्या फल-स्वरूपात निर्माण झालेल्या या दस्तावेजाच्या निर्मितीप्रक्रियेचा केंद्रबिंदू सर्व प्रकारची सर्व-समावेशकता हा ठेवण्यात आला. भौगोलिकदृष्ट्या महाराष्ट्राचे सर्व भाग, समाजातील सर्व घटक आणि त्या-त्या विषयातील सर्व शाखा, यांचा सर्वंकष विचार आणि समावेश या बाबत विशेष काळजी घेण्यात आली. त्यादृष्टीनेच समितीने सांस्कृतिकतेच्या गाभ्यातील १० प्रमुख विषयांवर भर देण्याचा निर्णय घेतला आणि त्यासाठी उपसमित्यांचीही रचना केली. मूळ समितीतील एकेका माननीय सदस्याला या उपसमित्यांचे नेतृत्व करण्यास सांगितले गेले. उपसमित्यांच्या सदस्यांची निवड करताना सर्वसमावेशकतेची वर उल्लेख केलेली सर्व सूत्रे पाळली जातील, हे ही बघितले गेले.

या दहा उपासमित्या खालील प्रमाणे: -

१. कारागिरी
२. भाषा, साहित्य आणि ग्रंथव्यवहार व वाचनसंस्कृती
३. दृश्यकला
४. गड-किल्ले आणि पुरातत्त्व
५. लोककला
६. संगीत
७. रंगभूमी
८. नृत्य
९. चित्रपट
१०. भक्तिसंस्कृती

मुख्य समितीप्रमाणेच या सर्व उप-समित्यांवर काम करण्यासाठी तज्ञ तसेच प्रत्यक्ष कामाचा प्रदीर्घ अनुभव असणाऱ्या आणि समितीच्या कामासाठी वेळ देऊ शकणाऱ्या सदस्यांची आवश्यकता होती. व्यापक सामाजिक आणि सांस्कृतिक जाणीव बाळगणाऱ्या अनेकांनी समिती आणि तिच्या उप-समित्यांमध्ये उल्लेखनीय योगदान दिले आणि या सर्वांच्या परिश्रमाचे फळ म्हणजे हा अहवाल होय.

या दहा विषयांव्यतिरिक्त सदर अहवालाच्या शिफारशींमध्ये मराठी खाद्यसंस्कृती तसेच पोशाख आणि आभूषणे यांच्या काही शिफारशी करण्यात आल्या आहेत. त्याचबरोबर कृत्रिम प्रज्ञेसह काही नव्या तंत्रज्ञानांच्या, सांस्कृतिक जीवनावर होऊ घातलेल्या परिणामांचा आढावा घेऊन काही शिफारशी करण्यात आल्या आहेत.

आणखी एक म्हणजे, हा दस्तावेज धोरणाबाबत आहे. ही नुसती सूचना आणि शिफारसींची यादी नाही. अनेकविध विषय आणि उपविषयांच्या संदर्भात आकलनाच्या आधारे मांडलेले विश्लेषण, त्यातून साकारणारे धोरण-दिशेचे काही मुद्दे आणि त्या मुद्द्यांच्या अनुषंगाने कृति आराखड्यात समाविष्ट कण्याच्या बाबी, असे या अहवालाच्या मांडणीचे टप्पे आहेत. या रचनेत निखळ धोरण-दिशेचे मुद्दे वेगळे काढून मांडणे हे नेहमीच काहीसे आव्हानात्मक असते कारण विचार करतांना आपण कार्यवाहीचा किंवा करणीय गोष्टींचा विचार आधी करतो. पण सर्वच कामे शासनाने करायची नसतात किंवा शासन ती करूही शकत नाही. किंबहुना आपल्या संस्कृतीतील स्वायत्त समाज संकल्पनेच्या संदर्भात विचार कारायचा तर समाजाचा सांस्कृतिक अभ्युदय हा आपल्या सामजिकतेतून अधिक होतो. त्यात शासनाची भूमिका कमी असते. एकेकाळी महाविद्यालयात ज्यांचा दबदबा होता, ती वाद-विवाद मंडळे असोत अथवा आता सर्वव्यापी झालेले दही-हंडी उत्सव असोत, झुणका- भाकर, वडा-पाव अथवा पांढऱ्या-तांबड्या रश्याची खाद्यसंस्कृती असो अथवा हल्ली गावोगाव निघणाऱ्या नव-वर्ष स्वागतयात्रा असोत... हे सर्व समकालीन मराठी संस्कृतीचा अविभाज्य भाग असूनसुद्धा हे कोणतेही घटक शासनामुळे निर्माण झालेले नाहीत वा त्यांच्या विकासातही शासनाची अशी खास काही भूमिका होती, असे म्हणता येत नाही.

संस्कृती ही एक जीवमान संकल्पना आहे आणि त्यामुळेच ती काहीशी प्रवाही असणे स्वाभाविक आहे. लोकांचे स्थलांतरण होते, तसे त्यांच्या मागोमाग संस्कृतीचेही या-ना त्या प्रकारे, या-ना त्या स्वरूपात स्थलांतरण होतेच. वसाहतवादाच्या काळात ज्यांनी जिथे-जिथे वसाहती उभारल्या, तिथे-तिथे त्यांनी आपली संस्कृतीही नेली. इंग्रजी भाषेच्या जागतिकीकरणला ब्रिटिश वसाहतवादच मुख्यत्वे कारणीभूत म्हणता येईल. अर्थात भारताच्या बाबतीत, भारतीयांनी वसाहती निर्माण केल्या नाहीत आणि तरीही आपल्या अंगभूत सामर्थ्याच्या बळावर भारतीय संस्कृतीचा जगभरात अनेक देशांमध्ये प्रसार झाला किंवा प्रभाव निर्माण झाला, ही वास्तव आहे. याचे श्रेय जाते, ते आपल्या बहुआयामी सांस्कृतिक संचिताला. ज्यामध्ये आपली महाकाव्ये, आपली ज्ञानसंपदा आणि आपली भाषा किंवा आपले व्याकरणशास्त्र इत्यादींचा समावेश होतो. आज अर्वाचीन काळात मुख्यत्वे प्रवासी किंवा अनिवासी मराठीजनांमुळे/ भारतीयांमुळे भारतीय संस्कृती आणि तिचा अविभाज्य भाग अशी मराठी संस्कृती साता समुद्रापार गेली आहे. सांस्कृतिक धोरणाचा विचार करताना, महाराष्ट्राबाहेरील या मराठी माणसांचा विचारही करायला हवा. त्यादृष्टीने, या समितीने दिल्लीत एक बैठक घेतली, दिल्लीकर मराठी माणसांशी विचारविनिमय केला आणि देशातील आणि देशाबाहेरील मराठीजनांच्या सूचनाही मागविल्या, या गोष्टींचा आवर्जून उल्लेख करायला हवा.

संस्कृतीचे स्वरूप प्रवाही असते, याचे कारण संस्कृती हा काल-प्रवाहाचाच एक भाग असतो. त्यामुळे बदलत्या काळाचे परिणाम भाषेवर आणि संस्कृतीवर पडणे स्वाभाविकच. नवे तंत्रज्ञान आले, तशी त्या तंत्रांना अभिव्यक्त करणारी नवी शब्दरचना आली आणि नवी भाषासुद्धा. आता बदलत्या काळात कृत्रिम प्रज्ञेसह अनेक नवी तंत्रज्ञानेही आली आहेत. या नव्या तंत्रज्ञानांचा भाषा, साहित्य, वाचन-व्यवहार, ग्रंथनिर्मिती यांसह रंगभूमी, संगीत, चित्रपट या सर्वच क्षेत्रांवर कमी-अधिक, बरे-वाईट परिणाम होणे ओघानेच येते. समितीने या परिणामांचाही विचार करुन काही शिफारशी सुचविल्या आहेत, हे नमूद केले पाहिजे.

सांस्कृतिक धोरणाचा हा विशाल पट (कॅनवास) एका अहवालाच्या चौकटीत बसविणे सोपे नाही आणि आवश्यकही नाही. शिवाय, एवढा विशाल पट असलेल्या संस्कृतीच्या संदर्भातील सर्वच गोष्टी धोरणाच्या अनुषंगाने विचारात घ्यायलाच हव्यात, याचीही आवश्यकता नाही.

या सर्व पार्श्वभूमीवर, संस्कृतीच्या जोपासनेत जरी शासनाची भूमिका महत्त्वाची आणि मोठी असली, तरी सृजनात शासनाची भूमिका महत्त्वाची पण सीमित असते हे सर्वमान्य व्हायला हरकत नाही. परिणामी, सांस्कृतिक धोरणात महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनातले जे-जे घटक क्षीण होत चालले आहेत, त्यांचा ऱ्हास ना होता ते टिकून रहावेत, याला प्राधान्य मिळणे क्रमप्राप्त आहे. त्यामुळेच शतकानुशतके टिकून राहिलेली महाराष्ट्राची संस्कृती तिच्या सर्व शाश्वत आणि कालजयी वैशिष्ट्यांसह टिकून राहावी, आधुनिक काळात एकीकडे नव्या तंत्रज्ञानाचा आणि जीवनशैलींचा अंगीकार करीत असतानासुद्धा तिचे मूळ स्वरूप विनाकारण बदलू नये आणि ती कालसुसंगत राहूनही तिच्य संपन्नतेत आणखी भर पडत जावी, ही दृष्टी ठेऊन विचार केला, हे नमूद करणे आवश्यक आहे. त्यामुळेच, जुन्या सांस्कृतिक धोरणाचा आढावा घेऊन प्रस्तावित केलेल्या नव्या सांस्कृतिक धोरणाच्या आराखड्याचा दस्तावेज एका विशिष्ट पद्धतीने रचनाबद्ध केला आहे.


समितीला याची जाणीव आहे, की आपल्या सांस्कृतिक जीवनावर ज्यांची गडद छाया आहे, असे आपल्या सामाजिक जीवनातील आणि जन-चर्चेतही वारंवार येणारे असे अनेक मुद्दे आहेत, की ज्याबद्दल अनेकजण चिंतित आहेत. स्मार्टफोनचा अविवेकी वापर, एखादे निमित्त साजरे करण्याच्या आपल्या दृष्टीकोनात होत चाललेले बदल, मानवी जीवनातील वाढती औपचारिकता, असण्यापेक्षा दिसण्याला आलेले अधिकचे महत्त्व, सामाजिक प्रतिष्ठेच्या कल्पनांमधील बदल, नाते-संबंधांचे बदलते स्वरूप, व्यक्तिगतता आणि सामूहिकता यातील नवे ताण आणि त्यामुळे आपल्या कुटुंबव्यवस्थेवर होत असलेले परिणाम, इत्यादी अनेक मुद्द्यांची चर्चा जरी करता आली तरी शिफारशी करणे जवळ-जवळ अशक्य आहे. याचे कारण, हे सर्व विषय गंभीर असले तरी त्यातील बहुसंख्य विषय शासकीय धोरण चौकटींमध्ये बसविणे ना व्यवहार्य आहे, ना संभवनीय. यापैकी अनेक मुद्दे वादग्रस्तदेखील ठरू शकतात आणि त्याबद्दलच्या शिफारशींकडे, ‘शासनाचा अनावश्यक हस्तक्षेप’ यापद्धतीने देखील बघितले जाऊ शकते. साहजिकच, या सर्व मुद्द्यांच्या आपल्या सांस्कृतिक जीवनावरील परिणामांबद्दल बहुसंख्यांना वाटतं असलेली चिंता जरी वाजवी असली तरी अनेक मुद्द्यांच्या बाबतीत त्या चिंतेचे प्रतिबिंब शिफारसींमध्ये उमटेल, हे सुनिश्चित करणे शक्य झालेले नाही.

अशा सर्व मर्यादा असतानादेखील या समितीने आपल्या उपसमित्यांसह सुमारे १५ महिन्यांच्या काळात अक्षरश: डझनावारी बैठका घेऊन शेकडो नागरिकांच्या सूचना स्वीकारल्या, त्यांच्याशी चर्चा केल्या, अनेक संस्थांच्या पदाधिकाऱ्यांशी बातचीत केली, आलेल्या सूचनांची वर्गवारी केली आणि त्यानंतरच या

अहवालाला अंतिम रूप देऊन एका रचनाबद्ध पद्धतीने शिफारशी केल्या आहेत. यातील काही शिफारशी भूतकाळातील उणीवा दूर करण्याबाबत आणि चुका दुरुस्त करण्याबाबत आहेत, काही वर्तमानातील स्थितीत आणखी सुधारणा करून मूल्यवर्धन करण्याबाबत आहेत तर उरलेल्या अनेक शिफारशी या भविष्यातील आव्हानांचा समर्थपणे मुकाबला करण्यासाठी केलेल्या आहेत.

विविध १० उप-समित्यांच्या सर्वंकष कार्यातून तयार झालेल्या या अहवालाची ही पार्श्वभूमी आहे.

# प्रकरण २



# २०१० मधील सांस्कृतिक धोरणावर दृष्टिक्षेप

## प्रकरण -२

**२०१० मधील सांस्कृतिक धोरणावर दृष्टिक्षेप:**

धोरण ही एक टप्प्या-टप्प्याने साकारणारी, परंतु निरंतर उत्क्रांत होणारी प्रक्रिया आहे. त्यामुळे २०१० मध्ये महाराष्ट्रातील त्यावेळच्या सरकारने एका समितीमार्फत तयार केलेल्या आणि स्वीकारलेला महाराष्ट्र राज्याच्या सांस्कृतिक धोरणाचा फेरआढावा घेऊन नव्याने धोरणाची आखणी करणे हे क्रमप्राप्तच होते.

सांस्कृतिक धोरण-२०१० चा आढावा घेताना धोरणात नमूद केलेल्या ज्या शिफारशींवर कार्यवाही झाली, त्याचा उल्लेख करणेही क्रमप्राप्त आहे. त्यात उल्लेखनीय म्हणजे, मराठी भाषा विभागाची स्थापना, भाषा भवनाची निर्मिती, भाषा सल्लागार मंडळाची स्थापना, अन्य भाषांसाठी अकादमी, सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या विभागीय कार्यालयांची स्थापना, लुप्त होणाऱ्या कलांचे दस्तावेजीकरण, शास्त्रीय संगीत प्रोत्साहन योजना या शिफारशींची अंमलबजावणी झाली असल्याबाबत त्या- त्या वेळच्या शासनाचे अभिनंदन यानिमित्ताने करायला हवे.

२०१०च्या धोरणतील ज्या महत्त्वाच्या शिफारशींवर अद्याप कोणतीही कार्यवाही झालेली नाही, त्याचाही उल्लेख करणे आवश्यक वाटते. सार्क राष्ट्रांचा विविधांगी अभ्यास करणारी एखादी संस्था महाराष्ट्रात निर्माण करावी, राज्यात दृश्यात्मक कलेसाठी महाराष्ट्र ललित कला अकादमी स्थापन करण्याच्या निर्णयाची तातडीने अंमलबजावणी करण्यात यावी, साहित्य व सांस्कृतिक क्षेत्रासाठी कार्य करणाऱ्या राज्य शासनाच्या व केंद्र शासनाच्या विविध समित्या, मंडळे, महामंडळे, संचालनालय यांच्या कार्यात एकवाक्यता आणि समन्वय असावा यासाठी या संस्था आणि कार्यालये यांच्या प्रमुखांची राज्य सांस्कृतिक समन्वय समिती स्थापन करण्यात यावी, विविध कलांच्या आकलन- आस्वादनाचे प्रशिक्षण देणारे अभ्यासक्रम, कार्यशाळा इत्यादींचे आयोजन करण्यात यावे, व्यंगचित्र क्षेत्रातील कलावंतांना प्रोत्साहन मिळावे यासाठी व्यंगचित्रकारांकरिता पुरस्काराची योजना सुरू करावी, पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीला स्वायत्तता देण्यात यावी, पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीमार्फत प्रयोगात्मक व चित्रपट कला क्षेत्रासाठी आणि ललित कला अकादमीमार्फत दृश्यात्मक कला क्षेत्रासाठी संशोधन वृत्ती देण्याची योजना राबविण्यात यावी, या काही प्रमुख प्रलंबित शिफारशींवर कार्यवाही करण्याची शिफारस सदर समितीही करत आहे. २०१० मध्ये तयार करण्यात आलेल्या धोरणात नृत्य विषयक मुद्दे तसेच भक्तीसंस्कृती, खाद्य संस्कृती, आभूषण आणि पोशाखसंस्कृती, महाराष्ट्राबाहेरची मराठी संस्कृती व तिचे टिकून राहणे, ग्रामीण पारंपरिक सण- समारंभ साजरे करण्याची संस्कृती तसेच शालेय आणि महाविद्यालयीन शिक्षणाच्या अनुषंगाने संस्कृतीचा विचार, हे मुद्दे जवळपास पूर्णतः दुर्लक्षिले गेले होते. सदरच्या धोरण-आराखड्यात ही उणीव भरून काढण्याचा प्रयत्न केला गेला आहे. या अहवालाच्या शेवटच्या प्रकरणात या सर्व बाबींचा ऊहापोह करुन,त्याबद्दल योग्य त्या शिफारशीही करण्यात आल्या आहेत.

२०१०च्या धोरणाचा फेरआढावा घेऊन आवश्यकतेनुसार धोरणात बदल सुचविण्यासाठी नियुक्त झालेल्या सदरील समितीने आपल्या उपसमित्यांमार्फत जुन्या धोरणाचा फेरआढावा घेताना समीक्षात्मक अशा काही बाबी ठळकपणे नोंदविल्या आहेत.

विषयश: या बाबी खालीलप्रमाणे आहेत:-

१. कारागिरी : २०१० च्या धोरणात कारागिरीसंबंधी जे तपशिलात येणे गरजेचे होते, त्या मुद्यांचा अवघ्या एक-दोन ओळीतच उल्लेख आला आहे व परिणामी या विषयाला जसा आणि जेवढा न्याय मिळायला हवा होता, तो मिळालेला नाही. राज्याचे वैभव असणारी कारागिरी कला, कौशल्य अशा अनेक उपयोजित कला प्रकारांवर समाज विकसित झाला होता. त्याच्या विकासासंबधी कोशनिर्मितीवरच्या उल्लेखावरच केवळ थांबलेले दिसते. त्यामुळे फेरआढावा घेताना खेदाने असे म्हणावे लागते, की भटके-विमुक्त, आदिवासी जनजाती, इतर मागासवर्गीय यांना सांस्कृतिक विकासाचा मोठा वारसा लाभूनही २०१० च्या धोरणात त्याचा केवळ पुसटसा उल्लेख आलेला दिसतो.

२. भाषा, साहित्य आणि ग्रंथव्यवहार व वाचनसंस्कृती :- महाराष्ट्रात नोकरी-व्यवसायानिमित्त येणाऱ्या अमराठी लोकांना महाराष्ट्रीय संस्कृतीची अधिक ओळख होण्यासाठी व त्यांना मराठी भाषेत संवाद साधणे सोपे होण्यासाठी सोप्या शब्दांत पुस्तके तयार करायला हवीत, २०१० सालच्या धोरणात समाविष्ट होते. ती एक उत्तम शिफारस असल्याचे म्हणता येईल. मात्र या शिफारशीचा अंमलबजावणीबाबत कोणताही तपशील आज उपलब्ध नाही. ग्रंथोत्सव, वाङ्मयपुरस्कार, अनुवाद यांचा केवळ उल्लेख केला आहे. जीर्ण पण महत्त्वपूर्ण ग्रंथांचे डिजिटायझेशन आणि दर्जेदार मराठी साहित्याचा इतर भारतीय भाषांमध्ये अनुवाद, यासंबंधी अधिक चर्चा झालेली दिसत नाही. या बाबींचे महत्त्व लक्षात घेणे आवश्यक आहे. बोलीभाषेबद्दल आणि आदिवासी भागातील मुलांना बोलीभाषेतून प्राथमिक शिक्षण देण्याबद्दल धोरणात काही उल्लेखनीय दिसून येत नाही.

३. दृश्यकला :- **सांस्कृतिक धोरण-२०१०** हे महाराष्ट्र शासनाने राज्याच्या स्थापनेच्या सुवर्णमहोत्सवाच्या निमित्ताने प्रथमच उचलेले एक स्वागतार्ह पाऊल होते. त्यातील दृश्यकला विषयाचा आढावा घेताना अनेक महत्त्वाच्या गोष्टी निदर्शनास आल्या. धोरणविषयक सर्व सूचनांचा अभ्यास करताना त्यात प्रामुख्याने एक मोठीच त्रुटी लक्षात आली, की सांस्कृतिक धोरण-२०१० च्या मसुदा-समितीत एकही सदस्य दृश्यकला विषयाशी संबंधित नव्हता. त्यामुळे या विषयाबाबत धोरणविषयक सूचना करताना अनेक बाबींना स्पर्शच झाला नसल्याचे जाणवते. शिवाय, या समितीने "महाराष्ट्र शासनाच्या आधीपासून चालत आलेल्या ज्या उपक्रमांध्ये कोणतेही बदल सुचवायचे नाहीत, ते उपक्रम अबाधित स्वरुपात पुढेही चालू राहणार असल्यामुळे या मसुद्यात त्यांचा निर्देश नाही, ते गृहीत धरण्यात आले आहेत", असा निर्णय घेतल्यामुळे शासनाशी संबंधित अशा गोष्टींबाबत या धोरणात विचारच झाला नाही. परिणामी, त्यावेळी दृश्यकलेबाबत जी धोरणे राबवावित असे सांगितले गेले त्यात ब-याच त्रुटी राहिल्या आहेत.

४. गड-किल्ले आणि पुरातत्त्व :- गड-किल्ले, प्राचीन मंदिरे, उत्खननात सापडलेल्या वस्तू, मूर्ती, लेणी असा ऐतिहासिक व सांस्कृतिक वारसा आपल्याला लाभला आहे. आपला गौरवशाली इतिहास व समृध्द संस्कृती याचं स्मरण हा वारसा करुन देत असतो. २०१० च्या सांस्कृतिक धोरणात मात्र या महत्त्वाच्या विषयाला पुरेसा न्याय दिलेला दिसून येत नाही. २०१० च्या सांस्कृतिक धोरणात शिवनेरी, तोरणा, सिंहगड, रायगड, प्रतापगड या किल्ल्यांवर शिवरायांच्या जीवनातील रोमहर्षक प्रसंगांची आठवण करुन देणारी आभास सृष्टी निर्माण केली जाईल. या किल्ल्यांना जोडणारी शिवकिल्ले

मालिका विकसित करण्यात येईल, अशा केवळ दोन धोरणात्मक बाबी समाविष्ट आहेत. राज्यातील समग्र गड- किल्ले या संदर्भात विचार केलेला नाही.

५. लोककला :- २०१० च्या सांस्कृतिक धोरणात लोककला संवर्धन या दृष्टिकोनातून विविध बाबी समाविष्ट करण्यात आल्या होत्या. मात्र त्यांची पूर्तता झाली नाही असे सदरील समितीच्या प्रवासादरम्यान ज्या अनेकांशी चर्चा झाल्या त्या कलावंतांनी निदर्शनास आणून दिले. २०१० च्या धोरणात लोककलांच्या अभ्यासासाठी शिष्यवृत्ती, लोककलाकारांना मुंबईत निवासाची सोय, आदिवासी कलांचे दस्तऐवजी करण, पालकांसाठी व बालकांसाठी लोककला प्रशिक्षण, लोककलावंतांना शासकीय सेवेत आरक्षण, लोककला प्रशिक्षण केंद्र, विद्यापीठाच्या विभागांना लोककलांसाठी विशेष अनुदान, संत-साहित्य कला प्रशिक्षण केंद्र, ग्रामीण कलावंतांना संधी यासारख्या अनेक बाबी धोरणात अधोरेखित करण्यात आल्या होत्या. मात्र; अनेक जुने, जाणते लोककलाकार काळाच्या पडद्याआड जात असताना अशा अंतर्धान पावणाऱ्या लोककलांचे संरक्षण आणि पुनरुज्जीवन करण्यासंदर्भात काही ठोस निर्णय आवश्यक होते, मात्र जुन्या धोरणांत त्या बाबत उल्लेख आढळत नाहीत.

६. संगीत :- २०१० साली महाराष्ट्राचे सांस्कृतिक धोरण निश्चित करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने मा. श्री. आ. ह. साळुंखे यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठित केली. या समितीच्या मूळ १२ सदस्यांमध्ये संगीताचे प्रतिनिधित्व मा. पं. हृदयनाथ मंगेशकर करत होते. परंतु काही कारणाने पं. हृदयनाथजी यांना समितीच्या पहिल्या बैठकीनंतर हजर राहता आले नाही. समितीने त्यांच्या प्रास्ताविकामध्येच अशी नोंद केली आहे की त्यांच्या अनुपस्थितितही त्यांच्या “कार्यक्षेत्राशी संबंधित विषयांना न्याय देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.” या धोरणात संगीतासंबंधी काही आश्वासक बाबी आहेत. त्या खालीलप्रमाणे:-

१) कला आस्वादनाच्या प्रशिक्षणाचा उल्लेख या धोरणात झालेला दिसतो.
२) शालेयस्तरावर कला शिक्षण असा या धोरणात उल्लेख आहे. यात संगीत कलेचा वेगळा उल्लेख नसला तरी तो तत्कालीन समितीला अपेक्षित असावा. हे शिक्षण कसे अमलात आणता येईल, त्याबद्दल सांस्कृतिक धोरण २०१० काहीसे धूसर आहे.
३) संगीतठेव्यांचे श्रवणसत्र आयोजित करणे हा या धोरणातला एक आश्वासक भाग आहे परंतु संगीतठेवा जतन करण्याबाबत ठोस पावलं उचलण्याबाबत या धोरणात काही उल्लेख नाही.
४) या धोरणात संगीतविषयक बाबींकडे काही प्रमाणात दुर्लक्ष झाल्याचे आणि काही त्रुटी राहिल्याचे आढळून येते. त्या थोडक्यात पुढीलप्रमाणे:-

१. **संगीत या विषयाला या धोरणात स्वतंत्र स्थान नाही-** प्रयोगात्मक कलांमध्येच संगीताचा समावेश केला आहे. नाटक, नृत्य, आदिवासी कला यांच्या श्रेणीतच संगीताचाही समावेश केला आहे. परंतु नाटक जशी १०० % प्रयोगात्मक कला आहे, तसे संगीताचे नाही. संगीताचे उपयोजन अनेक क्षेत्रांमध्ये होत असते. चित्रपट, दूरदर्शन, माहितीपट, जाहिराती तसेच ध्वनिमुद्रित संगीत अशा विविध रूपात संगीत समोर येत असते. म्हणूनच संगीतातील समस्या इतर प्रयोगात्मक कलांपेक्षा वेगळ्या आहेत याची दखल २०१० सालच्या धोरणात घेतली गेलेली दिसत नाही.

२. **संगीत शिक्षणाच्या मुद्द्याकडे दुर्लक्ष-** समाजावर संगीताचा संस्कार घडावा, असा विचार असेल तर संगीताच्या शिक्षणाचा, शिक्षणपद्धतीचा सखोल विचार होणे आवश्यक आहे. संगीताच्या शिक्षणाबद्दल या धोरणात भिन्न व सखोल धोरणात्मक सूचना आढळत नाहीत.

३. **अभिजात संगीत व परंपरांकडे दुर्लक्ष-** अभिजात संगीत संवर्धनासाठी व समाजात त्याची मूल्ये रुजण्यासाठी बैठक परंपरा, मंदिर परंपरा, गुरु शिष्य परंपरा, प्राचीन वाद्य परंपरा, ध्रुपद गायन परंपरा, ख्याल गायन परंपरा, संगीतातील घराणी परंपरा, उपशास्त्रीय संगीत, नाट्य व सुगम संगीत परंपरा.

४.**चित्रपट संगीताबद्दल तरतूदी**- चित्रपटांमध्ये संगीत आणि गीते असली तरी चित्रपटापासून वेगळे असेही संगीताचे अस्तित्व महाराष्ट्रात कायम दिसून आले आहे. महाराष्ट्राला चित्रपटसंगीताची ९१ वर्षांची परंपरा आहे. चित्रपटसंगीताचा वेगळा उल्लेख या धोरणात आपल्याला आढळत नाही.

५. **भावसंगीत आणि नाट्यसंगीतसंबंधी तरतूदी-** मराठी भावसंगीत आणि नाट्यसंगीत हे दोन प्रकार महाराष्ट्रीय संस्कृतीची अद्वितीय अशी प्रतिके आहेत. या दोन परंपरांचा वेगळा विचार कुठल्याही सांस्कृतिक धोरणात होणे अपरिहार्य आहे परंतु २०१० च्या धोरणामध्ये तो झालेला दिसत नाही.

६. **संगीत, भाषा, आणि इतर कलांचा समन्वय-** संगीत, भाषा आणि इतर प्रयोगात्मक कला यांचा परस्पर संबंध ओळखून त्यामधला समन्वय वाढवण्यासाठी २०१० च्या धोरणात कुठल्याही शिफारशी केल्याचे आढळत नाही.

७.**काळ बदलला आहे, तंत्रज्ञान बदलले आहे-** २०१० सालच्या सांस्कृतिक धोरणाचे पुनरावलोकन करण्याचे एक महत्त्वाचे कारण म्हणजे हे धोरण जाहीर करून आता एक तप उलटून गेले आहे. या एका तपामध्ये तंत्रज्ञानात आणि सांस्कृतिक जीवनशैलीमध्ये इतके बदल झाले आहेत, जे गेल्या एका शतकातही झाले नसतील. संगीतजगतातही ही तंत्रज्ञानाची क्रांती झाली आहे. संगीत, जीवनशैली, आणि तंत्रज्ञान यामधल्या नात्याचा उहापोह २०१० च्या सांस्कृतिक धोरणात आपल्याला पहावयास मिळत नाही.

७)रंगभूमी :- सांस्कृतिक धोरणाशी संबंधित इतर अनेक विषयांच्या तुलनेत रंगभूमीच्या संदर्भात सांस्कृतिक धोरण २०१० मध्ये अनेक महत्त्वाच्या मुद्द्यांचा साकल्याने विचार केलेला दिसतो. राज्याच्या विविध भागांतील तसेच सांस्कृतिक जगतातील विविध क्षेत्रांतील मान्यवरांच्या सूचना विचारात घेवून राज्याचे सांस्कृतिक धोरण निश्चित करण्यात आले आहे. रंगभूमीशी संबंधित विविध अग्रक्रमही निश्चित करण्यात आले असल्याचा उल्लेख त्यात आहे. नाट्य संहितांचे संगणकीय जतन, प्रत्येक तालुक्यात एक खुले नाटयगृह ( ॲम्फी थिएटर) आणि जिल्हा पातळीवर खाजगी सहभागाने एक नाटयगृह, नाटयगृहांसाठी रंगभूमीशी संबंधित तज्ज्ञांचा सल्ला घेतला जाण्याचा आग्रह, समांतर नाटयचळवळीच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या विविध विभागांत हौशी तसेच बालरंगभूमीवर कार्य करणा-या मराठी नाटय संस्थाच्या प्रयोगासाठी मुंबईत रंगप्रयोगशाळा उभारणे, मराठी रंगभूमीच्या इतिहासाचे लेखन आणि अव्यावसायिक अशा समांतर नाटकांचा महोत्सव, अशा अनेक विषयांचा आढावा घेऊन त्यांच्या संदर्भात बाबींचा समावेश करण्यात आला आहे.

८) नृत्यः- कला या शीर्षकाखाली प्रयोगात्मक, दृष्यात्मक आणि चित्रपट या तीन ही कलाक्षेत्रासाठी वेगवेगळया योजना जसे ज्येष्ठांसाठी सन्मानवृत्ती, कलावंतासाठी शासकीय सेवेत आरक्षण,

कलाशिक्षणासाठी शिष्यवृत्ती, आंतरराष्ट्रीय/ राष्ट्रीय सादरीकरणासाठी सहाय्य, आदिवासी कलावंताचे दस्तावेजीकरण व विशेष बालकांसाठी कलाप्रशिक्षण इत्यादी गोष्टीचा समावेश करण्यात आलेला आहे.

९) चित्रपट :- महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक धोरण, २०१० मध्ये भाग ई, पृष्ठ क्रमांक ४१ वर चित्रपटविषयक धोरण समाविष्ट करण्यात आले आहे. त्यात नमूद घटक मुद्दे खालीलप्रमाणे:-

१. लघुपट निर्मिती व प्रदर्शन साह्य - महाराष्ट्राला अभिमानास्पद असणाऱ्या, तसेच महत्त्वाच्या व्यक्तींवर, संस्थांवर आणि सामाजिक विषयांवर दर्जेदार लघुपट/ अनुबोधपट/ माहितीपट तयार करण्यासाठी शासनाकडून अर्थसाह्य देण्यात येईल. हे लघुपट/ अनुबोधपट/ माहितीपट महाराष्ट्रातील सर्व चित्रपटगृहांत दाखविणे बंधनकारक करण्यात येईल. तसेच ते अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी त्यांचे खेळ आयोजित करणाऱ्या संस्थांना प्रोत्साहन देण्यात येईल.
२. आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव - मुंबई आणि पुणे या शहरांमध्ये आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवांच्या आयोजनासाठी आर्थिक साह्य दिले जाते. हे दोन्ही महोत्सव राज्य शासनाचे महोत्सव असल्याने या महोत्सवांची ख्याती आंतरराष्ट्रीय पातळीवर पोहोचविण्यासाठी प्रयत्न केले जातील.
३. फिल्म सोसायटींना मदत - जास्तीत जास्त लोकांमध्ये चित्रपटकलेच्या आस्वादनाची क्षमता वाढावी याकरिता अस्तित्वात असलेल्या फिल्म सोसायट्यांना आर्थिक मदत/प्रोत्साहन देण्यात येईल.
४. चित्रपटकथांच्या स्पर्धा
५. मराठी चित्रपटांचे जतन
६. कोल्हापूर चित्रनगरीचा विकास
७. नागपूर येथे चित्रनगरी - मुंबईतील चित्रनगरीत चित्रपटांच्या निर्मितीसाठी असलेल्या सुविधांसारख्या सोयी नागपूर येथे उपलब्ध करून देण्यात येतील.

१०) भक्तिसंस्कृती:- महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक धोरण, २०१० मध्ये शिफारस केल्यानुसार पैठण येथे संतपीठाची स्थापना करण्यात आलेली आहे. परंतु संतपीठ पूर्णक्षमतेने सुरु झाल्याचे दिसून येत नाही, संतपीठासाठी आवश्यक निधीची पुरेशी तरतूद नाही, संतपीठाच्या प्रमाणपत्रास अधिकृत मान्यता नाही, संतपीठात पुरेसा तज्ञ अध्यापक वर्ग नसल्याचे दिसते. त्याचप्रमाणे संतवचनांचे अनुवाद, महिला संत अध्यासन या शिफारशींवरही संबंधित विभागाकडून काहीही कार्यवाही झाल्याचे दिसून येत नाही.

# प्रकरण ३



# समितीने आपापल्या उपसमित्यांसह अवलंबिलेली कार्यपद्धती

## प्रकरण- ३

**समितीने आपापल्या उप-समित्यांसह अवलंबिलेली कार्यपद्धती:**

राज्याच्या 'सांस्कृतिक धोरण-२०१०' च्या अंमलबजावणीचा फेरआढावा घेणे, तसेच काळाच्या ओघात बदलत असणा-या सांस्कृतिक बाबीचे स्वरुप व या बदलत्या परिस्थितीनुसार सांस्कृतिक धोरणात आवश्यक असणारा बदल, फेरफार सुचविण्यासाठी राज्यशासनाने विविध सांस्कृतिक क्षेत्रातील तज्ञाची समिती गठीत केली होती. या विविध सांस्कृतिक क्षेत्रांकरीता पुरेसे प्रतिनिधित्व देण्यासाठी तसेच मुख्य धोरण समितीचे कामकाज व्यापक व परिणामकारक होण्याकरीता मूळ समितीला सहकार्य करण्यासाठी धोरणातील सर्व क्षेत्रांचा विचार करुन अनुक्रमे कारागिरी समिती, भाषा, साहित्य आणि ग्रंथव्यवहार व वाचनसंस्कृती समिती , दृश्य कला समिती, गड, किल्ले व पुरातत्त्व समिती, लोककला समिती, संगीत समिती, रंगभूमी समिती, नृत्य समिती, चित्रपट समिती, व भक्तिसंस्कृती समिती अशा एकूण दहा विषय-निहाय उपसमित्यांचे गठन करण्यात आले होते.

आकडेवारी सांगायची झाल्यास, नोव्हेंबर २०२२ ते मार्च २०२४ या काळात मूळ समितीच्या एकूण १८ बैठका झाल्या. मुंबईबाहेर पुणे, ठाणे, नाशिक आणि महाराष्ट्राबाहेर दिल्ली येथे ही मूळ समितीने प्रवास केला. या तीनही ठिकाणी पत्रकार परिषदा घेऊन प्रसारमाध्यमांच्याद्वारे जनतेला समितीच्या कामकाजाची माहिती दिली गेली आणि समितीकडे सूचना पाठविण्याचे आवाहनही केले गेले.

सर्वच्यासर्व म्हणजे १० उप-समित्यांनी उप-समितीश: एकूण किती बैठका घेतल्या आणि त्यात किती संस्था/संघटनांची आणि व्यक्तींची निवेदने स्वीकारली गेली, या संदर्भात तपशीलवार माहिती देणारा तक्ता खालीलप्रमाणे आहे:-

| उपसमिती | उप-समितीच्या एकूण बैठका | समितीकडे व्यक्ती/संस्था/संघटना/ यांचेकडून विचारार्थ आलेली निवेदने |
|---|---|---|
| कारागिरी | १३ बैठका | १) व्यक्ती - २५<br>२) संस्था /संघटना - ५ |
| भाषा, साहित्य आणि ग्रंथव्यवहार व वाचनसंस्कृती | १५ बैठका | १) व्यक्ती - ५<br>२) संस्था/ संघटना - ३ |
| दृश्य कला | ११ बैठका | १) व्यक्ती - २१<br>२) संस्था/ संघटना - ६ |
| गड, किल्ले व पुरातत्त्व | ०७ बैठका | १) व्यक्ती - २५<br>२) संस्था/संघटना - १२ |
| लोककला समिती | २४ बैठका | १) व्यक्ती -<br>२) संस्था/ संघटना - |

| | | |
|---|---|---|
| रंगभूमी | ७ बैठका | १) व्यक्ती - ४५<br>२) संस्था/संघटना - ६ |
| नृत्य | ६ बैठका (ऑनलाईन) | १) व्यक्ती - ६<br>२) संस्था/ संघटना - ६ |
| चित्रपट | २ बैठका | १) व्यक्ती -<br>२) संस्था/संघटना - |
| भक्तिसंस्कृती | २३ बैठका | १) व्यक्ती - १०<br>२) संस्था/ संघटना - ५ |

सांस्कृतिक क्षेत्राशी संबंधित विविध बाबी सर्वसमावेशकपणे जाणून घेण्यासाठी सदर १० उपसमित्यांमधील निमंत्रक, अशासकीय सदस्य,शासकीय सदस्य, यांनी महाराष्ट्रातील सर्व ३६ जिल्हयांमध्ये केलेल्या अभ्यास दौ-यांमध्ये आपापल्या क्षेत्रातील संबंधित संस्था, संघटना, तज्ञ व्यक्ती, कामगार, कलाकार, कारागीर, विविध समाज घटक, यांच्या प्रत्यक्ष भेटी व मुलाखती घेतल्या. अशा भेटी आणि मुलाखती घेतांना महाराष्ट्राचे सर्व भौगोलिक विभाग, सर्व समाजघटक आणि त्या-त्या विषयाच्या विविध शाखा-उपशाखा हे सर्व समाविष्ट होईल याची विशेष काळजी घेतली गेली. समाजातील अनेक व्यक्ती, संस्था, संघटना, यांचेकडून निवेदनेही प्राप्त झाली आणि त्यातील मुद्द्यांचा साकल्याने विचारही केला गेला.

उपसमित्यांनी सांस्कृतिक क्षेत्रांशी निगडीत विषयनिहाय माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी पुढीलप्रमाणे कार्यपध्दती अनुसरली. :-

१) कारागिरी समिती :- कारागिरी विषयाशी संबंधित विशिष्ट कला, कौशल्य, उद्योग या विषयी धोरणाच्या अनुषंगाने माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी सदर समितीने विदर्भ, मराठवाडा; इत्यादी ठिकाणी जवळ जवळ, १३ जिल्हयांमध्ये कारागिरांच्या वस्त्या, गावे व कारागिरीसंबधी उद्योग असलेल्या जिल्हात, तालुक्यात प्रवास केला. जवळ जवळ १३ बैठकांमधून व समूहांसोबत चर्चा, विविध समाज घटकांशी चर्चा, प्रमुख नेत्यासमवेत, प्रमुख संघटनांसमवेत चर्चा, तसेच विविध पातळींवर मुलाखतींसह निवेदने स्वीकारण्यात आली. प्रत्यक्ष अडचणी समजून घेण्यात आल्या. या माहितीचे संकलन फोटो तसेच व्हिडीओ स्वरूपात करण्यात आले आहे.

आधुनिक काळात गावगाडा, गावातील उद्योग, कारीगिरी यांची पर्यावरणाशी सांगड घालून कसा उत्कर्ष करता येईल, तसेच आधुनिक काळातील वास्तुशास्त्राची कारीगीरीशी कशी सांगड घालता येईल यासाठी संबंधित तज्ञांच्या मुलाखती घेण्यात आल्या. गडचिरोली येथील गोंडवणा जनजाती विद्यापीठ

येथे कारागिरीच्या प्रशिक्षण अभ्यासक्रम चालविण्या-या विद्यापीठाच्या कुलगुरूंशी चर्चा करुन विविध कौशल्यपूर्ण कारागिरांच्या शिक्षणाबदल माहिती घेण्यात आली.

काही विशिष्ट कारागिरी व्यवसाय असलेल्या ठिकाणांना जसे हुपरी जि. कोल्हापूर येथील चांदी व्यवसाय निर्मिती केंद्र, येवला येथील रेशीमउद्योग, पैठणी उद्योग अशा वेगवेगळया स्वरुपातील कारागिरीची माहितीचे प्रत्यक्ष भेट देऊन संकलन करण्यात आले. बुरूड समाजाच्या विविध संस्था, वस्तूंची निर्मिती व त्यांच्या विक्री केद्रांबद्दल चर्चा करण्यात आली. संपूर्ण बांबू केंद्र लवादा, मेळघाट येथे आदीवासींच्या कारागिरीची व त्यासंबंधी व्यवसायाची माहीती घेण्यात आली.

२) भाषा, साहित्य आणि ग्रंथव्यवहार व वाचन संस्कृती समिती:- भाषासंवर्धन-जतन, ग्रंथव्यवहार, वाचनसंस्कृती व साहित्यनिर्मिती यांचा विचार करताना, प्रस्तुत उपसमितीने मराठी साहित्य महामंडळाच्या मुंबई मराठी साहित्य संघ, विदर्भ साहित्य संघ महाराष्ट्र साहित्य परिषद आणि मराठवाडा साहित्य मंडळ या चार महत्त्वाच्या घटक साहित्य संस्था तसेच राज्य मराठी विकास संस्था, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, विश्वकोश निर्मिती मंडळ व भाषा संचालनालय या घटकसंस्थांतील पदाधिका-यांचे अनुभव जाणून घेण्यासाठी त्यांच्या गाठी-भेटी घेत त्यांच्याशी चर्चा केली. त्यांची मते व सूचना मागवल्या. आपल्या संस्कृतीच्या प्रगतीसाठी मूलाधार असणारी मराठी भाषा अधिकाधिक संपन्न, निर्दोष व सर्वसमावेशक व्हावी यासाठी काम करणा-या लोकांशी चर्चा केल्या. या भेटींमध्ये काही ज्येष्ठ विचारशील कार्यकर्ते, प्रथितयश संपादक, प्रकाशक संघाचे पदाधिकारी, मान्यवर साहित्यिक, अनेक वर्षे आकाशवाणी, दूरदर्शन यांसारख्या श्राव्य व दृश्य माध्यमांमध्ये मराठी विभाग सांभाळणारे अधिकारी, शतकाहून अधिक वर्षे वाचनसंस्कृतीचा प्रसार करत असलेल्या ग्रंथालयांचे ग्रंथपाल व सेवाभावी कार्यकर्ते यांचे काम पाहण्यासाठी, त्यांच्याशी संवाद साधण्यासाठी त्या-त्या ठिकाणी जाऊन प्रत्यक्ष भेटी दिल्या.

३ ) दृश्य कला समिती :- दृश्यकला विषयाच्या उपसमितीने १७ ते ३ जुलै, २०२३ पर्यंत महाराष्ट्राच्या सर्व महसूली विभागात सुमारे १२ ठिकाणी दौरे करून त्या त्या ठिकाणाच्या कला शिक्षण संस्था, कलाविषयक कार्य करणा-या संस्था, संग्रहालये, राजवाडे, वाडे, प्राचिन मंदिरे अशा अनेक ठिकाणी भेटी दिल्या. समितीस अनेक सूचना व निवेदने प्राप्त झाली.

४) गड- किल्ले व पुरातत्त्व समिती :- गड-किल्ले, पुरातत्त्व, संग्रहालय या विषयांच्या संदर्भात धोरणात्मक सूचना, शिफारसी करण्यासाठी काही आधार असावा लागतो. यासाठी ज्यांनी या विषयावर संशोधन, लेखन केलेलं आहे अशा गड किल्ले पुरातत्त्व उपसमिती सदस्य, आज अस्तित्त्वात असलेल्या गड संरक्षण संवर्धन समितीचे सदस्य, राज्य व केंद्रीय पुरातत्त्व विभागाचे अधिकारी / अभ्यासक, शासकीय संग्रहालयाचे आजी माजी अधिकारी, इतिहास प्रेमी अभ्यासक व गड-किल्ले विषयावरसंशोधन करून आचार्य पदवी प्राप्त करणारे, गड-किल्ल्यांची स्वच्छता राखणाऱ्या, गडावर विविध उत्सव साजरे करण्यात पुढाकार घेणाऱ्या स्वयंसेवी संस्थाचे पुढारी/पदाधिकारी, शिवकालीन युद्धकला व शस्त्र यांचे प्रशिक्षण व प्रात्यक्षिके सादर करीत असलेल्या संस्थाचे पदाधिकारी अशा मान्यवरांच्या उपसमितीने क्षेत्रभेटी घेतल्या. विदर्भ, मराठवाडा, नाशिक, पश्चिम महाराष्ट्र, कोल्हापूर या परिसरातील काही गड-किल्ले, प्राचीन मंदिरे, संग्रहालये यांना भेट देऊन उपसमितीने वर्तमान स्थिती जाणून घेतली. संबधित अधिकाऱ्यांच्या समस्या, अडचणी व त्यांनी केलेल्या सूचना उपसमितीने नोंदवून घेतल्या.

महाराष्ट्रातील नागपूर, नाशिक, पुणे, छत्रपती संभाजी नगर, कोल्हापूर अशा ६ ठिकाणी उपसमितीने सुमारे ४० संवाद भेटी, मुलाखती घेतल्या. मते, सूचना, साक्षी नोंदवल्या. जवळपास १२० सदस्यांचा यात सहभाग होता.

५)लोककला समिती :- सदर समितीने लोककलावंत, कला अभ्यासक, लोककला संस्था यांना भेटी दिल्या.. पश्चिम महाराष्ट्र, कोकण, विदर्भ, मराठवाडा, खानदेश या प्रादेशिक भागांतील लोककलांविषयी कलावंत अभ्यासक व संस्था पदाधिकारी यांच्याशी भेट, बैठक घेऊन पश्चिम महाराष्ट्रातील तमाशा, शाहिरी, जलसे, गोंधळ, ललित, नमन, खेळे, तर कोकणातील दशावतार, नमन, चित्रकथी, कळसूत्री ,बाहुल्या, जाखडीनृत्य, कलगीतुरा, मराठवाड्यातील झाडीपट्टीनायक, खडी गंमत, दंडार, गोंधळ, विदर्भामधील वाघ्यामुरळी, शाहिरी, प्रबोधनात्मक जलसे अशा विविध लोककलांमधील कलावंताच्या समस्या जाणून घेण्यासाठी एकूण २४ बैठका घेतल्या.

६) संगीत समिती :- राज्याचे सांस्कृतिक धोरण आखत असताना समाजात संगीताचे स्थान, दर्जा व प्रसार कसा असावा यांच्या मूळाशी जाण्यासाठी तसेच संगीत विषय धोरण परिणामकारकरित्या तयार करण्याच्या हेतूने, त्यातल्या भागीदारांशी चर्चा करण्याच्या अनुषंगाने राज्यातल्या विविध क्षेत्रांना भेट देऊन संगीतक्षेत्रातील वेगवेगळया विषयांचा एक सर्वकष वेध घेण्यासाठी संगीत उपसमितीने राज्यभरात जवळजवळ १० दौरे केले. या दौऱ्यामध्ये संपूर्ण राज्यातील २ २ ते २ ३ संस्था सहभागी झाल्या.

दौ-यात ठिकठिकाणच्या संगीत क्षेत्रातील मान्यवरांबरोबरच विद्यार्थी, संगीत शिक्षक, कलाकार, गुरु, तंत्रज्ञ, कौशल्य प्रशिक्षक, संगीत संस्था चालक, आंतरपूरक अभ्यासक, ग्रंथतज्ञ, भाषातज्ञ, शास्त्रज्ञ, विद्वान, विचारवंत, संगीतकार, आकाशवाणी संचालक, प्रयोगशील कलाकार, आयोजक, संयोजक, वादयनिर्माते, कारागीर, रसिक श्रोते, सामान्य श्रोते, अशा विविध घटकांशी संपर्क साधून त्यांचे विचार समितीने जाणून घेण्याची योजना आखली व प्रत्यक्ष अंमलबजावणी केली. प्रत्येक अभ्यास दौऱ्यादरम्यान, जिल्ह्यातील आजूबाजूच्या गावातील संगीत क्षेत्रातील मान्यवरांची एकत्रित बैठकही घेण्यात आली. समितीतर्फे धोरणामागची भूमिका स्पष्ट करताना प्रत्येक बैठकीत सांगीतिक, सामाजिक आणि सांस्कृतिक विषयांचा, परीणामांचा आणि अपेक्षित उपाययोजनांचा आढावा घेण्याचे ठरविले व त्याप्रमाणे अंमलबजावणी करण्यात आली.

७) रंगभूमी समिती :- रंगभूमी ही मिश्र किंवा सामुदायिक स्वरूपाची कला आहे. नाट्यसंहिता, नाट्यदिग्दर्शक, नाट्यप्रयोगात भाग घेणारे कलावंत, त्यांची रंगभूषा व वेशभूषा, रंगमंदिर, त्यातील रंगमंच आणि त्यावरील नेपथ्य, प्रकाशयोजना तसेच नाट्यप्रयोगाचा प्रेक्षक आणि समीक्षक असे अनेक घटक या कलेत अंतर्भूत आहेत.


महाराष्ट्रातील रंगभूमीचे काळानुसार बदलणारे स्वरुप, रंगभूमी आणि रंगभूमीशी संबंधित प्रत्येक घटकांस येणा-या अडचणी इत्यादींबाबत सर्वसमावेशक माहिती उपलब्ध करुन घेण्यासाठी व या क्षेत्रातील तज्ञ व सर्वसामान्य नागरिक यांच्याकडून रंगभूमीशी संबंधित सूचना/ मते प्राप्त करुन घेण्यासाठी राज्याच्या ६ महसुल मुख्यालय ठिकाणी, रंगभूमी उपसमितीने ७ बैठका घेतल्या. सदर बैठकांमध्ये सुमारे ३ ५० रंगकर्मींनी आपली मते, विचार मांडले. रंगभूमीशी संबंधित काळानुरुप आवश्यक असणा-या बदलाबाबत जवळजवळ २० विविध नाटयसंस्थांचे प्रतिनिधी, नाटय निर्माते, नाटय कलाकार, लेखक यांनी आपले विचार /सूचना प्रत्यक्षात तसेच लेखी निवेदन स्वरुपात मांडल्या.

८) नृत्य समिती :- नृत्य समितीने संगीत कार्यक्षेत्रातील अनेक कलाकार तसेच जेष्ठ गुरू, विविध नृत्य प्रकाराचे प्रशिक्षण देणाऱ्या जळगाव, धुळे, नागपूर, येथील काही संस्था यांच्या भेटी घेऊन त्यांची मते जाणून घेतली. तसेच ६ ऑनलाईन बैठकाव्दारे सुमारे ४३० कलाकारांशी चर्चा व संवादामार्फत सांस्कृतिक धोरणाविषयी अनेक महत्त्वपूर्ण सूचना व मते जाणून घेतली.

९) चित्रपट समिती :- चित्रपट समितीने राज्य शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत कार्यरत चित्रनगरी, गोरेगाव, मुंबई व चित्रनगरी, कोल्हापूर या दोन्ही ठिकाणी भेटी देऊन तेथील कार्यपद्धती, येणाऱ्या अडचणी, आवश्यक सुधारणा इ. बाबींची माहिती घेतली. मराठी चित्रपटक्षेत्रासाठीच्या शासनाच्या सध्याच्या योजनांची माहिती घेतली. तसेच याठिकाणी चित्रपट क्षेत्रातील अनेक जाणकार व्यक्ती, चित्रपटक्षेत्रातील कलाकार, दिग्दर्शक, तंत्रज्ञ, निर्माते, अभ्यासक यांच्या समवेत बैठक आयोजित करुन धोरणामध्ये समाविष्ट करावयाच्या बाबींविषयी त्यांची मते जाणून घेतली. अखिल भारतीय चित्रपट महामंडळ, अखिल भारतीय चित्रपट निर्माता महामंडळ, मराठी चित्रपट अनुदान समितीमधील सदस्य, राष्ट्रवादी काँग्रेस चित्रपट आघाडी, महाराष्ट्र नवनिर्माण सेना चित्रपट आघाडी, शिवसेना चित्रपट आघाडी, भारतीय जनता पक्ष चित्रपट आघाडी, काँग्रेस चित्रपट आघाडी, ज्युनियर आर्टिस्ट असोसिएशन, कला दिग्दर्शक संघटना, मानाची लेखक संघटना, माहितीपट निर्माता संघटना, मे. यूएफओ, थिएटर ओनर्स असोसिएशन (सिंगल स्क्रीन आणि मल्टीप्लेक्स), इंडियन मोशन पिक्चर्स डिस्ट्रब्युटर्स असोसिएशन, इंडियन मोशन पिक्चर्स प्रोड्युसर असोसिएशन, इत्यादी मुंबई महानगर प्रदेशातील सर्व संस्थांशी संलग्न निर्माते, दिग्दर्शक, कलाकार, तंत्रज्ञ आणि चित्रपट क्षेत्राशी संबंधित संस्थांचे सदस्य चर्चेत सहभागी झाले होते. त्यानंतर सर्वंकष आढावा घेऊन, प्रदीर्घ चर्चेनंतर चित्रपट क्षेत्रासाठीच्या शिफारसी करण्यात आल्या आहेत.

१०) भक्तिसंस्कृती समिती :- महाराष्ट्रातील संत, वारकरी या गौरवशाली परंपरेतील अडीअडचणी समजून घेण्यासाठी, भक्ती संस्कृती उपसमितीने राज्यभरात विविध ठिकाणी दौरे करुन भक्तीसंस्कृति क्षेत्रातील विविध मान्यवर, संत-महंत आखाडा प्रतिनिधी, आळंदी पालखी प्रस्थान सोहळा, दिंडीवरी, तसेच संत निवृत्ती महाराष्ट्र संस्थान त्र्यंबकेश्वर अशा विविध ठिकाणी प्रत्यक्ष २३ बैठका घेऊन या क्षेत्रातील सुमारे ११० कलावंत व वारकरी यांच्या समस्या व मते जाणून घेतली.

# प्रकरण ४



# निरिक्षणे

# प्रकरण- ४

## निरिक्षणे:

धोरण फेरआढावा समितीने तिच्या उपसमित्यांच्या मार्फत संबंधित क्षेत्रातील सांस्कृतिक वातावरणावर दृष्टिक्षेप टाकून, परिस्थितीचे विश्लेषण करून काही निरीक्षणे नोंदवली. या निरीक्षणांमधून त्या त्या क्षेत्राचा, मुख्यत्वे भूतकाळ आणि वर्तमानकाळ यांचा आढावा घेण्याचा प्रयत्न झाला. सध्याच्या परिस्थितीची काहीशी समीक्षादेखील समोर आली. ही निरीक्षणे हा एकप्रकारे पुढे प्रस्तुत केलेल्या शिफारशींचा पाया म्हणता येईल. या निरीक्षणांचा मुदलातला परीघ मोठा आहे, परंतु अहवाल आटोपशीर करण्याच्या अनुषंगाने ही निरीक्षणे थोडक्यात आणि मुद्द्यांच्या स्वरूपात इथे मांडण्यात आली आहेत.

१.कारागिरी:- कारागिरी म्हणजे महाराष्ट्राचा कारागिरांनी पूर्णपणे हातांनी किंवा पारंपरिक साधनांद्वारे बनविलेल्या कलाकुसरयुक्त दैनंदिन जीवनातील कलावस्तूंचा किंवा शोभेच्या विविध वस्तूंचा निर्मिती व्यवसाय, जो हस्तव्यवसाय या प्रकारात मोडतो. भारताच्या आणि अर्थातच महाराष्ट्रातील पारंपरिक व्यवसायांपैकी हा एक महत्त्वाचा व्यवसाय असून कारागीर आपली कल्पकता व कौशल्ये वापरून आकर्षक पण उपयोगी वस्तूंची निर्मिती करत असतो.
भारताला हस्तव्यवसायाची ऐतिहासिक पार्श्वभूमी आहे. सिंधू संस्कृतीत (इ. स. पू. २७५० –१७५०) तिची पाळेमुळे दिसून येतात. हस्तकलेच्या वस्तुनिर्मितीतून उपजीविका करणारे असंख्य लोक या व्यवसायात कार्यरत असल्याचे दिसून येते. परकीय आक्रमणे व सामाजिक स्थित्यंतरे होऊनही हस्तव्यवसायात खंड पडलेला नाही. माती, धातू, दगड, कापड व तत्सम वस्तूंच्या सायाने कलाकुसरीच्या वस्तू बनविण्याची हातोटी व प्रावीण्यहे सिंधू संस्कृतीचे वैशिष्ट्य मानले जाते. हडप्पा, मोहें-जो-दडो येथील उत्खननांत सापडलेल्या अनेक वस्तू याची साक्ष देतात.
महाराष्ट्राचा पण कारागिरीचा इतिहास हा प्राचीन आणि संपन्न आहे. अनेक शतकांपूर्वी जगाच्या व्यापाराच्या नकाशावर महाराष्ट्राचं अतिशय महत्त्वाचे स्थान होते. महाराष्ट्रातील प्रत्येक गाव हे स्वावलंबी, स्वयंपूर्ण असे होते. पंशक्रोशीत आठवडे बाजार होते. आठवडे बाजारामध्ये गावागावात तयार होणारा माल अन्नधान्य, वस्त्र, औषधी, स्वयंपाकाची भांडी, अवजारे, रोपे, मिरची, टोमॅटो, कुंकू, हळद, भाजीपाला याशिवाय मिठाई असे विक्रीस येत असे. शेतकरी, कारागीर आपला माल विक्रीसाठी नेत असत त्यामुळे बारा महीने आठवडा बाजारामध्ये ताजा माल उपलब्ध होत असे. या आठवडी बाजारातून लमाण, बंजारा यासारख्या व्यापार करणाऱ्या जात-जमाती माल खरेदी करून गाढवावर, बैलगाडीवर, उंटावरून, खेचरे, घोडे यांच्या सहायाने भारताच्या कानाकोपऱ्यात पोहचवत असत त्या ठिकाणाहून इतर माल आणत असत. इंग्रज भारतात येण्यापूर्वी आणि मोगल काळात ही व्यवस्था भारतभर होती. त्यामुळे खैबरखिंडीतून जमिनीच्या मार्गे सूरत, मुंबई, रत्नागिरी, चेन्नई, कलकत्ता अशा विविध बंदरातून जगाशी व्यापार केला जात असे. जगभरातून डच, फ्रेंच, इंग्रज, पोर्तुगीज आणि चीनी असे व्यापारी खरेदी करण्यासाठी भारतात येत असत आणि लमाण हा जगभर विशेषत: युरोपात औषध, वस्तू मसाल्याचे पदार्थ व रेशमी सुती लोकरीची वस्त्रे ह्यांची महाराष्ट्रातून तत्कालीन युरोपातील विविध देशांना निर्यात होत असे. तो काळ कारागिरी आणि कला ह्यांचा परमोच्च बिंदू होता. पैठण, येवला, नाशिक, पंढरपूर, कोल्हापूर, अथणी, इंचलकरजी, नागपूर, अमरावती, धाराशिव, पुणे अशी शहरे व गावे आणि त्यांच्या परिसरात कारागिरी आणि कला ह्यांचा परमोच्च बिंदू गाठला होता. राज्यात वेळोवेळी झालेल्या उत्खननांमध्ये याचे ढळढळीत पुरावे आढळतात. तेर, जोरवे, इनामगाव येथील उत्खननात सापडलेल्या वस्तूंमधून जागतिक व्यापाऱ्यातील महाराष्ट्राच्या ऐश्वर्याचे अनेक पुरावे सापडतात.

महाराष्ट्रातील न्हावी, लोहार, सोनार, कुंभार, पारधी, पाथरवट, वडार, कैकाडी, कोष्टी, रंगारी, बेलदार, लमाण, बजारा, बेरड, रामोशी, मांतग, बौध्द असे असंख्य समुदाय या विविध कौशल्यांशी परंपरेने निगडीत आहेत. त्यामुळे महाराष्ट्राचे सांस्कृतिक धोरण ठरवताना, भटके विमुक्तं, आदिवासी, जनजाती, इतर मागासवर्गीय जनजातींमुळे महाराष्ट्राच्या जो सांस्कृतिक वारसा टिकला, वृद्धिंगत झाला आणि महाराष्ट्राला ज्याने ओळख मिळवून दिली, त्या हस्तकलांचा आणि कारागिरांचा विचार हा व्हायलाच हवा.

२०१८ मध्ये तत्कालीन उत्तरप्रदेश सरकारने 'वन डिस्ट्रिक्ट वन प्रॉडक्ट' योजनेचा शुभारंभ केला. उत्तरप्रदेशातील हस्तकला आणि कारागिरीला प्रोत्साहन मिळावं, त्यांच्या उत्पादनांना बाजारपेठ मिळावी आणि यातून कारागिरांचा आर्थिक उत्कर्ष साधला जावा आणि एकूणच सामाजिक-सांस्कृतिक वीण घट्ट व्हावी हा या योजनेचा उद्देश होता. या योजनेला मिळालेले यश पाहून पुढे केंद्र सरकारने देशातील सर्व राज्यांमध्ये ही योजना राबवली. उत्तरप्रदेशातील 'गौरहारी' ही 'गौरा' नावाच्या दगडातून मूर्ती घडवण्याची पारंपरिक कारागिरी असू दे, की आंधरप्रदेशातील कुर्नुल येथील हातमागावर विणलेल्या साड्या असू देत की सोलापुरातील टेरी टॉवेल्स असू देत, या आणि असंख्य पारंपरिक उत्पादनांना पुनर्जीवन मिळालं. त्यामुळेच राज्याच्या सांस्कृतिक धोरणाचा विचार करताना इतक्या मोठ्या समूहाच्या हातातील पिढीजात कलेला व्यासपीठ मिळवून देणं, या कला नष्ट न होऊ देणं आणि त्या वृद्धिंगत करण्यासाठी सर्वंकष प्रयत्न करणं अत्यावश्यक आहे.

कारागिरी किंवा हस्तकौशल्याच्या बाबतीत महाराष्ट्राचा इतिहास हा जरी अतिशय गौरवशाली होता तरी यंत्रयुगाच्या आगमनापासून मात्र त्याला बऱ्यापैकी उतरती कळा लागली आहे. कारागिरी आणि विशेषतः हस्तकौशल्याशी संबंधित व्यवसायांना टिकवणे, त्यांना ताकद देणे हे जसे महाराष्ट्राच्या सांस्कृतिक संचितासाठी आवश्यक आहे तसेच ते राज्यातील एका मोठा जनसमुदायाच्या दैनंदिन अर्थकारणाशी, त्यांच्या उदरनिर्वाहाशी पण निगडित आहे. त्यामुळे कसबी कौशल्य हाती असलेल्या समाजाची विस्कटलेली आर्थिक घडी बसवण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे, कारण त्यातूनच महाराष्ट्राच्या सांस्कृतिक संचिताला पुढे नेणे शक्य होईल.

**२.भाषा,साहित्य आणि ग्रंथ व्यवहार व वाचनसंस्कृती:-** मराठी भाषेपुढे जी आव्हाने आहेत, ती या देशातील २ २ प्रमुख मान्यताप्राप्त भाषांपुढे पण आहेत. कमी-जास्त फरकाने अगदी प्रत्येक राज्यातील समाजतज्ज्ञांना त्यांच्या भाषेवर होणारे इंग्रजीचं आक्रमण आणि नवी पिढ्यांमध्ये झपाट्याने कमी होत जाणारे मातृभाषेतील शिक्षणाचं प्रमाण याची चिंता भेडसावत आहे. त्यात पुन्हा रोजच्या बोलण्याच्या भाषेत आणि शालेय शिक्षणाच्या भाषेवरच फक्त इंग्रजीचे आक्रमण झालेले आहे असे नाही तर रंजन जी मानवी मनाची महत्त्वाची गरज असते ते मनोरंजन हे पण इंग्रजी किंवा इतर भाषांमधून जेंव्हा होताना दिसते, तेंव्हा मराठीचे काय होणार असे वाटणे स्वाभाविक आहे. पण यासाठी के-पॉप कल्चर म्हणजे जगावर गारुड घातलेल्या के-पॉप कल्चरचं उदाहरण डोळ्यासमोर ठेवायला हरकत नाही. अगदी दक्षिण आणि उत्तर कोरियाची एकत्र लोकसंख्या ही ८ कोटींच्या वर जात नाही. म्हणजे महाराष्ट्राहून कमी. पण कोरियन संगीताने आधी जगभरातील तरुणाईला वेड लावले, आणि मग पुढे त्यातून त्यांची खाद्यसंस्कृती, त्यांची नृत्यशैली याची जगावर इतकी भुरळ पडली की जगातल्या सातही खंडातील तरुणाईच्या मनात कोरियन भाषा शिकण्याची ओढ निर्माण झाली आहे. आणि हे घडले अवघ्या ३० वर्षांच्या काळात. पण भाषा टिकवणे यापेक्षा ती ज्ञानाची, विचारांची, कल्पनांची आणि रंजनाची भाषा होणार असेल, तर ती आपोआपच संवर्धित, संपन्न होईल. यादृष्टीने प्रयत्न होणे अतिशय गरजेचे आहे.

**३.दृश्यकला:-** दृश्यकला विषयाच्या उपसमितीने राज्याच्या सर्व महसूली विभागांमध्ये दौरे करून त्या-त्या ठिकाणच्या कलाशिक्षण संस्था, कलाविषयक कार्य करणा-या संस्था, संग्रहालये, राजवाडे, वाडे, प्राचीन मंदिरे अशा अनेक ठिकाणी भेटी दिल्या.

या सर्व ठिकाणी कलाविषयक कार्य करणाऱ्या संस्था, त्या संस्थाचे संस्थाचालक, कला विद्यार्थी, कलाशिक्षक, कलावंत, कलासमिक्षक, अभ्यासक, कलारसिक व मान्यवरांशी चर्चा केल्या. त्यातून महाराष्ट्रातील दृश्यकला विषयक परिस्थितीचे वास्तव स्पष्ट होण्यास मदत झाली. अभ्यासाअंती त्यात प्रामुख्याने पुढील धोरणात्मक विषयांचा विचार केला आहे:-

१. कलाशिक्षण
२. प्रोत्साहन, प्रचार व प्रसार
३. महाराष्ट्राच्या कलावैभवाचे जतन, संवर्धन, संशोधन व संग्रहालये
४. महापुरुषांची स्मारके
५. दृश्यकला क्षेत्रातील कलावंताना पुरस्कार
६. ज्येष्ठ कलावंतांना पुरस्कार आणि वयोवृद्ध व गरजू कलाकारांना पेन्शन.

**४.गड-किल्ले आणि पुरातत्त्व:-** आज गडकिल्ल्यांच्या संवर्धनाचा हेतू मनात ठेवून योजना आखल्या जातात पण त्यातल्या बऱ्याचशा वास्तवात न येता फक्त सरकारी कागदपत्रांच्या जंत्रीत अडकून पडतात. हे गडकिल्ले किंवा पुरातत्त्व विभागाकडून संरक्षित केल्या जाणाऱ्या वास्तू, हे ज्या परिस्थितीत बांधले गेले त्या काळातील उपलब्ध संसाधनं लक्षात घेता ती आपल्या वैज्ञानिक आणि सामाजिक प्रगतीची साक्ष देतात. आज जगभरातील पर्यटक युरोपमध्ये जातो तो त्यांनी जतन केलेला त्यांचा प्राचीन आणि समृद्ध इतिहासच. आपल्या महाराष्ट्राकडे पण दाखवण्यासारखं खूप आहे, ते जगाने बघावं यासाठी धोरण आखलं जात नाही. अशा वास्तूंच्या ओढीने होणारं पर्यटन हे त्या प्रांताची मृदूसत्ता (सॉफ्ट पॉवर) जगभर बनवत असतात, याचा पुरेसा विचार होताना आढळत नाही.

**५. लोककला:-** १) राज्याच्या विविध प्रादेशिक भागांतील परंपरागत चालत आलेल्या काही दुर्मिळ लोककला लोप पावत चालल्या असून काही लोप पावण्याच्या मार्गावर आहेत.

२) प्रादेशिक भागानुसार काही महत्त्वाच्या लोककला आहेत. या लोककलांना आणि कलावंतांना मानसन्मान न दिल्याने कलेची आणि कलावंतांची उपेक्षा होते.

३) आधुनिक तंत्रज्ञानामुळे विविध करमणुकीची साधने आणि प्रसार माध्यमे आली आहेत. यामुळे लोककलांकडे दुर्लक्ष होत आहे.

४) कलाक्षेत्रातील नाटक, चित्रपट, मालिका कलावंतांना, अभिनेते याना जो मानसन्मान दिला जातो, तो मानसन्मान लोकलेतील ज्येष्ठ कलावंताला दिला जात नाही.

५) शासनाच्या विविध योजना, अनुदाने, सवलती, पुरस्कार यांना निकषानुसार पात्र असलेले ग्रामीण आणि आदिवासी कलावंत लाभापासून वंचित राहत आहेत.

६) शासनाकडून लोककलावंतांना दिले जाणारे मानधन निवडीमध्ये राजकीय हस्तक्षेप होत असल्याने खऱ्या कलावंतांना त्याचा लाभ मिळत नाही.

७) लोप पावत असलेल्या महत्त्वपूर्ण कलेच्या संवर्धनासाठी योग्य त्या उपाययोजनांची गरज आहे.

८) लोकगीते, विधगीते, यासारख्या लोकसाहित्याच्या संवर्धनासाठी प्रयत्न होणे गरजेचे आहे.

९) नवीन पिढीमध्ये लोककलेविषयी आवड निर्माण होण्यासाठी लोककलेच्या संवर्धनासाठी उपाययोजना, कार्यक्रमाच्या आखणीची गरज जाणवते.

**६.संगीत:-** १) संगीताचा संस्कार लहान वयापासूनच व्हायला हवा आणि त्यासाठी शालेय शिक्षणात संगीताला स्थान मिळायला हवे. पण त्यासाठी चांगले शिक्षकच मिळत नाहीत.

२) सध्याच्या टीव्हीवरील कार्यक्रमातून सांगीतिक संस्कार लहान मुलांवर होत आहेत. त्यामुळे प्रगल्भ श्रोते तयार होणं कठीण आहे त्यामुळेच प्रगल्भ कलाकार घडणे पण कठीण आहे.

३) संगीताच्या कार्यक्रमांसाठी चांगली सभागृहे नाहीत.

४) संस्थांसाठी, कलाकारांसाठी अनेक कार्यक्रम, सवलती, अनुदाने, योजना वेळोवेळी शासन आपल्या विविध खात्यांतर्फे करत असले तरी याची माहिती भागधारकांपर्यंत पोहोचत नाहीत.

५) संगीतविषयक धोरण बनवताना रसिककेंद्रित धोरणाचा विचार कधी होत नाही, त्यामुळे संगीताची परिस्थितिक व्यवस्था (इको सिस्टम ) ही स्वयंचलित, स्वावलंबी आणि स्वायत्त होऊ शकली नाही.

६) कलाकाराच्या प्रतिष्ठेची आणि आत्मसन्मानाची बूज राखणारी व्यवस्था असायला हवी.

**७.रंगभूमी:-** **१**) अनुदान देणे हा कलाक्षेत्र बळकट करण्याचा मार्ग नाही. शासनाने गेली अनेक वर्षे रंगभूमीवर येणाऱ्या नव्या नाटकांना अनुदान देण्याचे धोरण स्वीकारले आहे, परिणामतः नवी नाटके रंगभूमीवर येण्याचा क्रम अबाधित राहिला असला तरी अशा नाटकांची गुणवत्ता आणि प्रेक्षकांना आकर्षित करून घेण्याची क्षमता याविषयीची प्रश्नचिन्हे कायमच आहेत.

२) नाट्य क्षेत्रासाठी 'एक खिडकी' सारखी योजना नाही, त्यामुळे कलावंतांना आपल्या कामांसाठी सगळीकडे फिरत राहावे लागते.

३)अलीकडच्या काळात मराठी नाटकांचा वैश्विक संदर्भाशी जोडून घेण्याचा प्रयत्न काहीसा थिटा पडल्यासारखा दिसतो. शिवाय विविध विद्यापीठांच्या नाट्यशास्त्र विभागात होणाऱ्या संशोधनाचे प्रतिबिंब मराठी रंगभूमीवर पडल्याचे सहसा आढळत नाही.

**८.नृत्य:-** अगदी आदिम काळापासून नृत्य हे माणसाच्या आनंदाचे आणि अभिव्यक्तीचे ते एक साधन आहे. यातूनच भारतात आणि जगभरात काही शे ते हजार वर्षांपूर्वी नृत्यशैली निर्माण झाल्या, त्याचे एक शास्त्र बनले, त्यातून अनेक प्रयोग घडत, परंपरा निर्माण झाल्या. असे असून देखील एकूणच समाजजीवनात या विषयीची उदासीनता जाणवते आणि त्याचे एक प्रमुख कारण म्हणजे, नृत्यासारख्या अत्यंत आदिम आणि आनंद देणाऱ्या अभिव्यक्तीला शैक्षणिक अभ्यासक्रमात स्थान नाही. नृत्याचे शिक्षण हे शैक्षणिक अभ्यासक्रमाच्या पलीकडचा भाग म्हणून बघितले जाते आणि त्यामुळे एक मोठा वर्ग या कलेशी परिचितच होऊ शकत नाही. आनंदाचा सोपा मार्ग कुठला असेल तर तो नृत्य आहे आणि यातूनच व्यक्तिमत्व विकास आणि पुढे जाऊन आध्यात्मिक पातळीवरची अनुभूती मिळणं शक्य आहे. पण नृत्य या विषयाला ना शालेय पातळीवर, ना महाविद्यालय पातळीवर कुठेच गांभीर्याने घेतले जात नाही असे जाणवले.


**९.चित्रपट:-** भारतीय चित्रपटसृष्टीचे जनक चित्रमहर्षी दादासाहेब फाळके निर्मित 'राजा हरिश्चंद्र' हा संपूर्ण भारतीय बनावटीचा मुकपट ३ मे १९१३ रोजी प्रदर्शित आणि भारतीय चित्रपटसृष्टीची मुहूर्तमेढ रोवली गेली, तेव्हापासूनच चित्रपटविषयक कला आणि तंत्रज्ञान तसेच चित्रपटक्षेत्राचा प्रसार, चित्रपट रसास्वाद, चित्रपट

अभ्यास, चित्रपटविषयक चळवळी अशा सर्वच अंगांनी भारतीय चित्रपटसृष्टीच्या वाढ आणि विकासात महाराष्ट्रानेअमूल्य योगदान दिले आहे. तसेच याच काळात भारतीय स्तरावरील व अन्य प्रादेशिक चित्रपटांबरोबरच मराठी चित्रपटसृष्टीनेही आपली सशक्त परंपरा निर्माण केली. निखळ मनोरंजन आणि कलात्मकतेबरोबरच 'आशयघन चित्रपट' ही मराठी चित्रपटसृष्टीची ओळख बनली आहे. मराठी चित्रपट आता राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरही नावलौकिक मिळवत आहेत. चित्रपटनिर्मिती तंत्रातील आणि एकूणच तंत्रज्ञानातील बदल आत्मसात करत मराठी चित्रपट आपला पैसा विस्तारत आहे. आजच्या घडीला मराठी चित्रपट क्षेत्राची आर्थिक उलाढाल राज्याच्या व देशाच्या सकल उत्पन्नात भर घालत आहे. अन्य कुठल्याही कलांप्रमाणेच चित्रपट हीदेखील भाषिक, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक परिमाण असणारी बाब आहे. त्यामुळेच सांस्कृतिक धोरणात तिचा सहभाग अतिशय महत्त्वाचा ठरतो. चित्रपट कला व तंत्र ही व्यापक संकल्पना आहे. चित्रपटक्षेत्रात कलाकारांपासून तंत्रज्ञापर्यंत तसेच सृजनशील कामापासून कौशल्याधारित कामापर्यंत अनेक बाबींचा समावेश होतो. शिवाय, चित्रपट क्षेत्राला भाषिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक परिमाण आहेत. त्यामुळे चित्रपटक्षेत्राशी संबंधित सर्व संबंधित आणि सर्व घटकांचा साकल्याने विचार करून, समितीने धोरणात्मक आणि कार्यात्मक सूचना केल्या आहेत.

**१०.भक्तिसंस्कृती:-** महाराष्ट्राच्या सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय आणि आध्यात्मिक लोकजीवनाचा विचार करता या लोकजीवनाला वळण देणाऱ्या महत्वाच्या प्रवाहांमधला महत्त्वाचा प्रवाह म्हणजे संतपरंपरा, असे असले तरी संतसाहित्याचा, भक्तिसंस्कृतीचा शैक्षणिक पातळीवर पुरेसा अंतर्भाव झालेला दिसत नाही. शासनाने जरी संतपीठाची स्थापना केली असली, तरी त्याला एक आकार यावा म्हणून तज्ज्ञ प्राध्यापक ते कुशल कर्मचारी या सगळ्यांची वानवा जाणवते. शालेय शिक्षणात देखील संतसाहित्याचा समावेश पुरेसा आढळला नाही. एकूणच शालेय शिक्षणापासून जर संतसाहित्याची गोडी लागली, त्याबद्दलची एक समज तयार झाली, तर सुजाण नागरिक घडवण्याची ताकद या शिक्षणात आहे याचा विसर शासनव्यवस्थेला पडला आहे असे जाणवले.

आपले संतसाहित्य हे वैश्विक भान देणारे आहे, त्याचा प्रचार आणि प्रसार करायचा असेल तर दृक्श्राव्य माध्यमांचा वापर व्हायलाच हवा. पण सरकारी वगळता इटकर कोणीतही दृक्श्राव्य माध्यमे याचा विचार करतील अशी शक्यता कमी आहे, त्यामुळे शासनानेच पुढाकार घेऊन यासाठी योग्य निधी उपलब्ध करून द्यायला हवा. पण हे देखील फार गांभीर्याने होताना आढळत नाही. थोडक्यात, भक्तिसंस्कृती हे महाराष्ट्राचे अमूल्य संचित आहे, ते राखणे, त्याचे संवर्धन करणे हे शासनाचे काम आहे याची जाणीव तयार होणे आणि त्यातून कृती घडणे, हे शासन पातळीवर अपेक्षित आहे.

# प्रकरण ५



# धोरणापलीकडची दृष्टी

## प्रकरण- ५

**धोरणापलीकडची दृष्टी:**

**१. एकरस समाजासाठी वर्गभेदांना नकार:** प्राचीन काळापासून भारतात कला, कौशल्ये आणि त्यातूनच पुढे निर्माण झालेली कारागिरी यांची अतिशय जिवंत आणि रसरशीत परंपरा अस्तित्वात होती. मात्र वसाहतवादाच्या काळात यात आर्ट आणि क्राफ्ट असा वर्गभेद निर्माण केला गेला. ज्या कलकौशल्यांमधून काहीशा पारंपारिक, एकसाची पद्धतीच्या कलावस्तू /कलाकृती निर्माण होतात त्यांना क्राफ्ट आणि कलाकरांना क्राफ्ट्समन म्हणण्याची आणि शहरी, आधुनिक कलकौशल्ये आत्मसात करणाऱ्यांना आर्टिस्ट व त्यांच्या कलावस्तूंना आर्ट म्हणण्याची प्रथा वसाहतकाळात सुरु झाली असे अनेक जाणकारांचे म्हणणे आहे. यातून एक प्रकारचा अनावश्यक आणि त्यामुळेच अन्यायकारक वर्गभेद निर्माण झाला. पट्टचित्रे, मधुबनी शैलीची चित्रे, वारली चित्रे हे सर्व प्रतिभाविष्कार हे क्राफ्ट्स गटात समाविष्ट केले गेले तर आधुनिक चित्रकला तेवढी आर्ट प्रकारात समाविष्ट केली गेली. हीच प्रवृत्ती शिल्पकला, धातुकाम, भरतकाम इत्यादी प्रकारातही विकसित झाली आणि त्यातून मुख्यत्वे पारंपरिक, ग्रामीण कलाकौशल्यांना काहीसे कमी लेखण्याची पद्धत रूढ होत गेली. संगिताच्या क्षेत्रातही लोक संगीत, सुगम संगीत आणि शास्त्रीय संगीत अशी वर्गवारी करताना एक प्रकारची मूल्य-निर्णय (Value Judgment) करण्याची प्रवृत्ती दिसून येते आणि त्यातून एक शाखा वरिष्ठ आणि दुसरी कनिष्ठ अशी समजूतही पसरते अथवा पसरवली जाते. सांस्कृतिक धोरणाचा आणि त्याच्या अंमलबजावणीचा विचार करताना कला-कौशल्यांच्या क्षेत्रात ठाण मांडून बसलेली ही वर्ग-भेद प्रवृत्ती कशी नष्ट होईल किंवा किमान कशी आणखी वाढीस लागणार नाही याची दृष्टी या क्षेत्राचे नेतृत्त्व आणि प्रशासन करणाऱ्या सर्वांमध्ये असायला हवी.

**२. कलेच्या आविष्कारांमधील सर्व-समावेशकता:** प्रकाशित होणारे चित्रपट, रंगभूमीवर येणारी नाटके, प्रकाशित होणाऱ्या कथा -कादंबऱ्या, कविता यातून समाजाचे चित्रण लोकांसमोर येत असते. पण या चित्रणात जर एकारलेपणा असेल तर त्यातून समाजाची कधी कधी हानी होण्याची शक्यता निश्चितच असते. हा एकारलेपणा दोन प्रकारचा असतो. पहिला म्हणजे समाजाच्या सर्व घटकांच्या अवस्थेचे चित्रण समोर येण्याऐवजी फक्त एका अथवा काही समाजघटकांचेच चित्रण वारंवार समोर येणे. यातून अन्य घटकांमध्ये आपणास मुख्य-प्रवाहातून वगळल्याची भावना निर्माण होण्याची शक्यता असते. दुसरे एकारलेपण म्हणजे विशिष्ट समाजाचे विशिष्ट पद्धतीचे सरधोपटीकरण. राजकारणी म्हणजे भ्रष्टच, नोकरशहा म्हणजे संवेदनशून्यच, अमुक एक समज म्हणजे आळशी, तमुक एक समाज म्हणजे वाचाळ इत्यादी. असे सरधोपटीकरण त्या त्या समाज-घटकांवर अन्याय तर करतेचा पण त्यातून एकुण सामाजिक समिलीकरणालाही धक्का बसतो, त्या प्रक्रियेची विलक्षण हानी होते. त्यातूनच बहुजन विरुद्ध अभिजन असा वर्गभेदही निर्माण होतो. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी समिलीकरणावर (Assimilation) दिलेला विशेष भर लक्षात घेता अविष्कार आणि अभिव्यक्ती क्षेत्रातील सर्वांनीच जाणीवपूर्वक सर्वसमावेशी दृष्टी बाळगायला हवी.

अमेरिकेत हॉलिवूड चित्रपटांमध्ये अशी सर्वसमावेशकता असायला हवी, या साठी ऑस्कर चित्रपट पुरस्कारांच्या व्यवस्थापनानेही अलीकडे पुरस्कार मिळवू इच्छिणाऱ्यांसाठी काही अटी-शर्ती लागू केल्या आहेत.

**३. व्यावसायिक आणि हौशी यातील संतुलन:-** सर्वच कला प्रकार मुख्यत: हौसे खातर सुरु झालेले असावेत/असतील असे ढोबळमानाने म्हणता येईल. त्यामुळे एक प्रकारे हौशी कलावंत आणि त्यांचे आविष्कार ही व्यावसायिकतेची गंगोत्री आहे. कोणत्याही नदीला जसे उगमस्थानाशीच थबकून राहता येत नाही तसेच उगमस्थानाला विसरून त्याची उपेक्षाही करता येत नाही. महाराष्ट्र शासनाने रंगभूमीच्या संदर्भात हौशी आणि व्यावसायिक या दोन्ही प्रवाहांना योग्य ते स्थान दिले आहे. हीच संतुलित दृष्टी कलेच्या विविध क्षेत्रांमधील स्थापित दिग्गजांनी ठेवायला हवी. असे झाले तरच हौशी क्षेत्रातील कलावंत व्यावसायिक सफाईदारपणाची कास धरू शकतील आणि व्यावसायिक क्षेत्रातील कलावंत आपली उर्मी आणि उर्जा प्रारंभकाळात हौशीपणातून आली आहे याचे भान राखून हौशी कलावंतांचाही सन्मान करण्याची भूमिका घेतील.

**४. प्रस्थापित कलाकारांकडून उदयोन्मुख आणि संघर्षरत कलाकारांचे मेंटरिंग:-** चित्रकला असो अथवा रंगभूमी, सर्वच क्षेत्रात धडपडणाऱ्या तरुण आणि उदयोन्मुख कलावंतांना सुरुवातीचा संघर्ष हा चुकलेला नाही. आजचे प्रस्थापित कलाकार कधी ना कधी संघर्षातूनच वर आलेले असतात. पण कालचे धडपडे कलाकार आज प्रस्थापित झाल्यानंतर नव्या संघर्षशील /संघर्षरत कलावंतांना खूप काही मदत करतात, त्यांचे मेंटरिंग करतात असे सहसा आढळत नाही. प्रस्थापित कलाकारांकडून असे मेंटरिंग व्हावे, यासाठी अधिकृत किंवा शासकीय पातळीवर खूप काही करता येण्याची शक्यता कमी असते. हे काम सरकारी जी.आर. काढून होणार नाही. त्यासाठी प्रस्थापित आणि संघर्षरत कलाकरांनाही एक दृष्टीकोन आत्मसात करावा लागेल. मेंटरिंगसाठी मेंटी म्हणजे मेंटरशी जोडले जाण्याची उत्सुकता असलेले कलाकारही आवश्यक असतातच. त्यामुळेच प्रस्थापित आणि धडपड्या अशा दोन्ही कलाकारांनी हा दृष्टिकोन बाळगावा एवढेच येथे नमूद करता येईल.

**५. भावनादुखापतींचे मुद्दे:** अविष्कार आणि अभिव्यक्तींच्या सर्वच क्षेत्रात काही वेळा त्या आविष्कारांमुळे एखाद्या समाजाच्या भावना दुखावल्या गेल्याचे आणि त्यामुळे मोठा गदारोळ उडून अभिव्यक्ती स्वातंत्र्यावरच काही मर्यादा येण्याचे प्रसंग अनेकदा आले आहेत. असे प्रसंग केवळ भारतातच येतात असे नाही. जगात अनेक देशांमध्ये या विषयावरून मोठे वादंग झाल्याची अनेक उदाहरणे आहेत. भावना दुखापत होते म्हणजे नेमके काय होते? कशामुळे होते? ही भावना-दुखापत त्या विशिष्ट समाजातील सर्वांचिच होते की तसा दावा करणाऱ्या काही जणांची होते? अशा एका दुखापतग्रस्त समाजाला जो न्याय दिला जातो तोच अन्य दुखापतग्रस्त समाज समुहांना मिळतो काय? असे कैक प्रश्न यातून पुढे येतात. या इतक्या नाजूक विषयाच्या संदर्भात संदर्भात धोरण आखणी जरी अवघड असली तरी निदान काही मार्गदर्शक सूत्रे तयार करता येतील काय याचा विचार शासकीय आणि अ-शासकीय अशा दोन्ही पातळींवर होण्याची आवश्यकता आहे.

**६) पुनरावृत्ती टाळणे आणि पोकळी राहू न देणे:-** सांस्कृतिक विषयांचा परीघ खूप मोठा आहे. शिवाय संस्कृतीशी जोडलेले विषय केवळ सांस्कृतिक खात्यापुरतेच मर्यादित आहेत असे नाही. अशा स्थितीत

अनेकदा एखादा विषय दोन वेगवेगळ्या खात्यांकडून हाताळला जातो किंवा हाताळल्या जाण्याची त्यामुळे अन्वायशक पुनरावृत्ती होण्याची अनेक उदाहरणे आहेत. दुसऱ्या बाजूने काही विषय असे आहेत त्यांचा रूढ शासकीय कार्यविभागणीत कोणत्याच विभागात समावेश झालेला आढळत नाही. यातूनच काही विषयांची पुनरावृत्ती आणि काही विषयांच्या बाबतीत धोरणे आणि अंमलबजावणी यांच्या ठार अभावामुळे निर्माण झालेली पोकळी असे विपरीत दृश्य दिसते. हे टाळण्यासाठी प्रशासनाने आणि सांस्कृतिक विषयातील जाणकारणांनी देखील अधिक दक्ष रहायला हवे.

**७) आस्वादनशास्त्र विषयाचा शालेय शिक्षणक्रमात समावेश** :- पुस्तकांसाठी वाचक, संगीतासाठी श्रोते आणि नाटक, चित्रपटांसाठी प्रेक्षक, हे अपरिहार्य आहेत. त्याचबरोबर वाचक, श्रोते आणि प्रेक्षक यांच्या अभिरुचीचीही जोपासना होण्याची गरज आहे. जुन्या काळात हे काम कुटुंबांमधून, घरांमधून आणि शाळा-महाविद्यालयातील अभ्यासेतर उपक्रमांमधून घडत असे. परंतु आता बदललेल्या जीवनशैलीत अशी रसिकतेची/आस्वादकतेची जोपासना स्वाभाविकरीत्या घडून येणे, जिकिरीचे झाले आहे. समूहाने नाटक, संगीत व चित्रपटाचा आस्वाद घेणे, साहित्याविषयी चर्चा करणे, इत्यादी बाबी अपवादानेच घडताना आढळतात. त्यामुळे घराच्या चार भिंतीआड जे आस्वादनशास्त्र पूर्वीच्या पिढ्या सहजगत्या आत्मसात करत होत्या, ते बदलत्या काळात घडून येण्यासाठी आता आस्वादनशास्त्र हा विषय शाळांमधून शिकवला जाण्याची गरज आहे. चांगला चित्रपट कसा पाहावा, चांगलं संगीत कसं ऐकावं, हे शास्त्रोक्त पद्धतीने शिकवण्याची गरज यासाठीही आहे की त्यातूनच या कलांचा ग्राहक/उपभोक्ता/आस्वादक वर्ग तयार होऊ शकेल. सध्याच्या बाजारकेंद्री अर्थव्यवस्थेत असा जाणकार रसिकवर्ग तयार होणे अतिशय आवश्यक आहे.

**८) नाटके आणि चित्रपटांच्या निर्मितीला नव्हे तर आस्वादनाला अनुदान**:- राज्यसरकारने मराठी नाटक आणि चित्रपटांना अनुदान देण्याची पद्धत सुरु केल्यापासून, चित्रपट आणि नाटकांची निर्मिती मोठ्या प्रमाणावर होत आहे. परंतु असे असूनही, प्रेक्षागृहे पुरेशी भरत नाही आणि चित्रपट, नाटक प्रदीर्घकाळ चालू शकत नाही ही वस्तुस्थिती आहे. आणि असे अनुदान घेऊन तयार झालेले चित्रपट आणि नाटके यांच्या गुणवत्तेसंबंधी अनेक प्रश्न निर्माण होतातच. अशा स्थितीत दर्जेदार चित्रपट आणि नाटकांसाठी दर्जेदार प्रेक्षकवर्ग यावा हे सुनिश्चित करण्यासाठी प्रेक्षकांना अनुदान दिल्यास, प्रेक्षकांची संख्या वाढेल आणि ग्राहकवर्ग तयार झाल्यावर नाटक आणि चित्रपट यांची निर्मितीही किफायतशीर पद्धतीने होईल. त्यामुळेच सरकारने निर्मितीच्या टप्प्यावर नाटक चित्रपटांना अनुदान न देता, ते प्रदर्शनाच्या टप्प्यावर म्हणजेच रसिक/प्रेक्षक/ग्राहक यांच्याकरिता उपलब्ध करून देण्याचा विचार गांभीर्याने केला पाहिजे.

**९) सांस्कृतिक उपक्रमांच्या संयोजनात इव्हेन्ट मॅनेजमेंटच्या पलीकडची दृष्टी** :- सध्याच्या काळात शाळा, महाविद्यालयातील स्नेहसंमेलने, गणेशोत्सव, नवरात्रौत्सवात, योजल्या जाणाऱ्या सांस्कृतिक कार्यक्रमांच्या बाबतीत हौशी आणि स्वयंस्फूर्त कलाकार/ संयोजकांच्या ऐवजी, व्यावसायिक/ शुल्क वा मोबदला आकारून कलाप्रस्तुती/संयोजन करणाऱ्या मंडळींचा वरचष्मा आहे. यामुळे उद्याच्या सफाईदारपणासाठी आज धडपडणारी कलाकार मंडळी/संयोजक यांना चुका करण्याची आणि चुकत चुकत शिकण्याची संधीच नाकारली जात आहे. परिणामतः स्वयंस्फूर्तीने अतिशय प्रबळ इच्छाशक्तीपोटी कलाक्षेत्रात वावरणाऱ्या/उमेदवारी करणाऱ्या कलाकार/संयोजकांची कुचंबणा होते आहे. ही स्थिती एकूणच सांस्कृतिक क्षेत्राच्या विकासाला अतिशय हानिकारक आहे. त्यामुळेच व्यावसायिक/शुल्क किंवा मोबदला

करणाऱ्यांऐवजी हौशी संयोजकांना कसे प्रोत्साहन द्यायचे याबाबत प्रशासनातील आणि कलाक्षेत्रातील दिग्गजांनी विचार करायला हवा.

**१०) ओटीटी आणि इंटरनेटवरील आशयनिर्मितीला प्रोत्साहनपर पुरस्कार :-** नव्या तंत्रज्ञानाच्या सध्याच्या काळात, विशेषतः माहिती-तंत्रज्ञानामुळे ओटीटीसारखे नवे मंच आणि स्टँडअप कॉमेडी, रिल्स व तत्सम प्रकार आभासी माध्यमांमध्ये आपला प्रभाव निर्माण करत आहेत. यासर्व प्रकारांमधूनही अनेकांच्या प्रतिभेची चमक दिसू लागली आहे. त्या पार्श्वभूमीवर या नव-तंत्रज्ञानाधिष्ठित उपक्रमांची योग्य दखल घेऊन त्यांच्यातील प्रतिभाशाली कलाकारांना प्रोत्साहन देण्यासाठी पुरस्कार स्थापित करण्याबरोबरच इतर अनेक उपक्रम राज्यशासनाने विचारात घेण्याची आवश्यकता आहे.

# प्रकरण ६



# धोरणात्मक आणि कार्यात्मक शिफारसी

## प्रकरण ६

### धोरणात्मक आणि कार्यात्मक शिफारशी

**कारागिरी:-**

१. कारागिरीचे कौशल्य हे जरी पिढीजात असले तरी आत्ताच्या स्पर्धेच्या युगात टिकण्यासाठी जो व्यावसायिक सफाईदारपणा हवा, त्यासाठी या कारगिरांसाठी कौशल्यविकासाची वेगवेगळी प्रशिक्षणे असायला हवीत आणि ही प्रशिक्षणे अत्यंत माफक दरात उपलब्ध करून द्यायला  हवीत. आणि या कौशल्य विकासाच्या कोर्सेसची गरज का आहे याबद्दल या समाजघटकांचं प्रबोधन घडवून आणलं जावं.

२. महाराष्ट्रातील बहुसंख्य पारंपरिक कारागिरी उद्योगांना एकतर कच्च्या मालाचा पुरवठा पुरेसा न होणे किंवा तो महाग मिळणे, परिणामतः त्यांच तयार उत्पादन हे खूप महाग विकावं लागण्याची मोठी समस्या आहे. यासाठी अशा कारागिरांना सरकारने स्वस्तात आणि राखीव स्वरूपात कच्चा माल उपलब्ध करून द्यावा.

३. कारागिरांना खेळत्या भांडवलासाठी आर्थिक मदत मिळेल याची व्यवस्था शासनाने करून द्यावी. यातून हे कारागिरांचा प्रवास उद्योजक होण्याकडे होईल. यासाठी केंद्र सरकारच्या विश्वकर्मा योजनेचा लाभ सर्वदूर पोहचेल, हे पहावे.

४. कारागिरांची वेगळी जनगणना करून, त्यांना कारागीर कार्ड द्यावीत. यामुळे या ओळखपत्रधारकांना कच्च्या मालाच्या पुरवठ्यापासून ते त्यांच्या मालाला बाजारपेठ मिळवून देण्यापर्यंत सरकारला निश्चित पाऊले टाकणे शासनाला शक्य होईल.

५. कारागिरांनी तयार केलेला पक्का माल विकण्याकरिता स्वतंत्र सरकारमान्य विक्री केंद्रे उभारण्यात यावीत. ही विक्री केंद्रे तालुका, जिल्ह्यांच्या ठिकाणी तसेच तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी उभारावीत. तसेच प्रत्येक मॉलमध्ये कारागिरांनी बनवलेल्या वस्तू विक्रीचे केंद्र असावे.

६. कारागिरांचा माल फक्त महाराष्ट्रात नाही तर देशभरात आणि परदेशात देखील पोहोचावा आणि तिथल्या बाजारपेठांमध्ये पोहोचावा यासाठी सरकारने प्रत्येक जिल्ह्यात कारागीर संकुल उभे करावे.. या ठिकाणी प्रशिक्षण शिबिरे, कारागिरीच्या पलीकडे जात स्वतःच्या गृहोद्योगाचा विस्तार लघुउद्योग ते मोठा उद्योग कसा करावा याचं प्रशिक्षण, आणि त्यांच्या उद्योगजकतेला प्रोत्साहन देणारी 'इन्क्युबेशन सेंटर्स' या संकुलांमध्ये उभी करावीत. यामुळे कारागिरी म्हणजे हातावर पोट जगणे ही संकल्पना हळूहळू मोडीत निघून आपल्या हस्तकौशल्याच्या जीवावर अनेकांचं भरणे शक्य करणे इथपर्यंतचा प्रवास शक्य होईल.

७. परंपरागत कुटुंब-अर्जित कौशल्यांना अधिकृत मान्यता द्यावी.

८. कोष्टी, लोकर उत्पादन करणारा धनगर समाज, ओतकाम करणारा ओतारी समाज, लोहारकाम करणारा समाज, अशा समाजांचे पारंपरिक व्यवसाय अस्तंगतला आले आहेत. त्यांच्या हातांमध्ये पिढ्यांपिढ्यांच कसब आहे. अशा समाजांना आधुनिक व्यवसायांमध्ये येण्यासाठी प्रशिक्षित करावे. उदाहरणार्थ कोष्टी समाजाला आधुनिक वस्त्र व्यवसायात येण्यासाठी प्रशिक्षित करावे किंवा लोकर उत्पादन करणाऱ्या धनगर समाजाला लोकरीपासून उत्पादनं बनवण्याच्या व्यवसायात शिरकाव करता यावा म्हणून प्रशिक्षित करावे.

९. कारागीर समाजातील तरुण पिढी त्यांच्या पारंपरिक व्यवसायांमध्ये तेंव्हाच टिकेल जेंव्हा त्यांना त्यात त्यांना आर्थिक लाभ दिसेल. यासाठी वर म्हणल्याप्रमाणे या नव्या पिढीला आकृष्ट करण्यासाठी कला-कौशल्य-कारागिरी विश्वविद्यालयाची स्थापना करण्यात यावी. यामध्ये परंपरागत ज्ञानावर आधारित शिक्षण तथा

प्रशिक्षण देण्यात यावे. हे एक मुक्त विद्यापीठ असावे. या विश्वविद्यालयाचे उपकेंद्र प्रत्येक जिल्ह्यात किंवा जेथे कारागीर वस्त्या मोठ्या प्रमाणावर आहेत अशा तालुक्याच्या ठिकाणी असावे.

१०. शासनातर्फे महाराष्ट्रात विभागवार कारागीर मेळावे आयोजित करण्यात यावेत. यामध्ये कारांगिरातर्फे निर्मित वस्तूंचे प्रदर्शन व विक्री व्हावी.

**२.भाषा, साहित्य आणि ग्रंथव्यवहार व वाचनसंस्कृती:-**

१) मराठी भाषेच्या संवर्धनासाठी आणि ती ज्ञानाची, विचारांची, कल्पनांची भाषा कशी होईल यासाठी पुढील २५ वर्षांसाठीचा एक बृहद आराखडा तयार करावा. सध्याच्या साहित्य संस्कृती मंडळ, राज्य मराठी विकास संस्था, भाषा संचालनालय, मराठी भाषा विभाग, विश्वकोश मंडळ, ग्रंथालय संचालनालय वगैरे सहा-सात संदर्भित शासकीय संस्था त्याच्याशी संलग्न कराव्यात. संबंधित संस्थांच्या सदस्यांनी हे पूर्णवेळचे काम मानावे आणि त्यासाठी आवश्यक ती आर्थिक आणि व्यवस्थापकीय तरतूद शासनाने करावी. त्यांची नेमणूक किमान पाच वर्षांसाठी असावी. समितीच्या शिफारशींवर जाहीर चर्चा व्हावी, आणि त्यातून वेगवेगळे कृतिगट तयार व्हावेत.

२) मराठी ही आपली राजभाषा आहे. तिला आपल्या राज्यात लोकव्यवहार, राज्यकारभार, न्याययंत्रणा अशा सर्व ठिकाणी अनिवार्य असे मानाचे स्थान मिळावे. त्यासाठी महाराष्ट्रात सर्व स्तरांवर व सर्व प्रसंगी मराठी भाषेचा व लेखनपद्धतीचा योग्य व अचूक वापर करण्यासाठी आग्रह धरला जावा.

३) मातृभाषेत शिक्षण ही नव्या युगाची नांदी आहे. ते नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणही आहे. त्यामुळे मराठी-हिंदी-इंग्रजी असे त्रिभाषासूत्र सर्व पातळ्यांवर लागू करणे. त्यासाठी मराठी भाषा विभागाला मनुष्यबळ आणि अधिकार देणे व ते धोरण कणखरपणे राबवले जावे.

४) राज्यातील सर्व पातळीवरील विविध शैक्षणिक बोर्डांच्या, इंग्रजी वा अन्य कोणत्याही माध्यमाच्या, अनुदानित अथवा विनाअनुदानित अशा सर्व शाळांमध्ये मराठी शिक्षण किमान चार वर्षे सक्तीचे करावे. यात कोणतीही सवलत, सूट वा पळवाट ठेऊ नये, अशी तजवीज असावी.

५) भाषेची, वाचनाची गोडी लागेल अशी क्रमिक पाठ्यपुस्तकांची रचना असावी. तसेच मराठी ही ज्ञानभाषा व्हावी म्हणून जसे अभियांत्रिकी शिक्षण आता मराठीत घेणे शक्य झाले आहे, तसेच अनेक शाखांमधील ज्ञान मराठीत आणून, त्या ज्ञानशाखांचं शिक्षण मराठीत घेणं शक्य करण्यासाठी धोरण आखल पाहिजे.

६) बोली नामशेष होवू नयेत, त्यांचे संवर्धन व्हावे म्हणून सरकारने सर्वतोपरि प्रयत्न करावेत. मात्र त्याचबरोबर बोलीभाषांच्या आग्रहात दिसून येणाऱ्या स्थानिक अस्मिता आणि प्रमाणभाषेची आवश्यकता ह्यांच्यातील संतुलन सांभाळणेही अतिशय गरजेचे आहे.

७) राज्यकर्ते आणि वरिष्ठ अधिकारी यांनी आवर्जून मराठीचाच वापर करावा. विशेषत: माध्यमांसमोर जाताना मराठीतच बोलावे, यासाठी शासनाने आदेश काढायला हवा.

८) शासकीय कामकाजात वापरले जाणारे मराठी फार अवघड आणि क्लिष्ट असते. शासकीय कामकाजात सोप्या मराठी भाषेचा वापर व्हावा. त्यासाठी काही नवीन संज्ञा, लेखनकोश तयार करावा. सामान्य जनता व अमराठी अधिकारी अशा मराठीला अधिकच बिचकतात, त्यांना मराठी न शिकण्याची एक सबबही मिळते. अमराठी लोकांचे मराठी भाषा शिकणे सुलभ व्हावे, यासाठी साधने, कार्यशाळा, अभ्यासक्रम उपलब्ध करून देण्यात यावे.

९) राज्यातील केंद्रशासनाच्या कार्यालयांमध्ये मराठीचा वापर कमी असतो. तो वाढावा यासाठी राज्यशासनानेच केंद्र शासनाच्या विविध कार्यालयामंध्ये हिंदी, इंग्रजीसोबत मराठी भाषांमध्ये अर्ज, माहितीपत्रके मिळतील यासाठी विशेष प्रयत्न करावेत. केंद्रसरकारच्या आस्थापानांमध्ये मराठीचा वापर अधिकाधिक व्हावा यासाठी शासनाने मराठी भाषेचे प्रशिक्षण आणि त्याचा वापर याकडे विशेष लक्ष द्यावे.

१०) देशभरातील विविध विद्यापीठांत, शाळांत मराठी शिकवण्यासाठी शिक्षक मिळत नाहीत, अशी तक्रार आहे. देशभरात जिथे- जिथे मराठी शिकवण्यासाठी प्रशिक्षित मराठी शिक्षकांची गरज लागेल, त्या ठिकाणी ते मिळावेत यासाठी एक संकेतस्थळ उपलब्ध करावे, जिथे मराठी भाषेचे शिक्षक आपली माहिती देऊ शकतील.

११) डिजिटल जगात मराठी यासाठी शासनाकडून विशेष प्रयत्न होताना दिसत नाहीत. आज मराठीचे संगणीकरण आणि संगणकाचे मराठीकरण होणे अतिशय आवश्यक आहे. आज मराठीचे अनेक टंक (फॉन्ट्स) वापरले जातात, त्याच्याऐवजी महाराष्ट्र शासनाने प्रमाणित केलेली एक लिपी आणि तिचे अनेक टंक शासनानेच संगणकधारकांना उपलब्ध करून द्यावेत आणि राज्यात विकल्या जाणाऱ्या प्रत्येक संगणकासोबत ही लिपी प्रविष्ट केलेली असावी, अशी सक्ती शासनाने करावी. तसेच इंग्रजीत जशी 'स्पेलचेकर' सारखी व्यवस्था आहे, तशी व्यवस्था किंवा तशी आज्ञावली (सॉफ्टवेअर) विकसित करण्यासाठी प्रोत्साहित करावे.

१२) परभाषांतून आलेले, पण आता लोकांच्या बोलण्यात रुजलेले शब्दही समाविष्ट करणारा महाशब्दकोश तयार करावा आणि शासनाने तो महाजालावर उपलब्ध करून द्यावा. उदाहरणार्थ रिपोर्ट, स्टेशन, ट्रेन, टॅक्सी, बस, टेन्शन, सर्जरी किंवा मोबाइल यांसारखे शब्द. असा शब्दकोश एकदा करून पुरेसे नसते, तर त्यात दर चार-पाच वर्षांनी भर घालावी लागते. त्यासाठी एखादी कायमस्वरूपी यंत्रणा उभारायला हवी. या बाबतीत ऑक्सफर्ड किंवा वेबस्टर यांचे उदाहरण अभ्यासावे.

१३) राज्यातील शासकीय, निमशासकीय, राज्यात नोंदणीकृत झालेल्या सर्व खाजगी संस्था, संघटना ह्यांची संकेतस्थळं मराठीत देखील असावीत असा शासन निर्णय निर्गमित करून, या निर्णयाची कठोरपणे अंमलबजावणी करावी.

१४) राज्यातील दूरदर्शन / आकाशवाणी अशा सर्व केंद्रावर मराठी अधिकारी असावेत. यासाठी राज्य सरकारने केंद्राकडे सतत पाठपुरावा करावा.

१५) नॅशनल बुक ट्रस्ट, राज्यसभा, संसद भवन, लोकसभा, राष्ट्रपती भवन येथील सचिवालयात मराठी संपादक, अनुवादक अशी पदे रिकामी राहणार नाहीत, याकडे राज्य सरकारने लक्ष ठेवणे अतिशय आवश्यक आहे.

१६) २७ फेब्रुवारी हा दरवर्षी जागतिक मराठी भाषा दिवस म्हणून साजरा केला जातो, पण त्या दिवशी शासनाने दरवर्षी एक देवनागरी टंक (फॉन्ट) प्रकाशित करावा.

१७) महाराष्ट्र शासन दरवर्षी संपादक, पत्रकारांना विविध पुरस्कारांनी सन्मानित करत असते. पण त्याच्या जोडीला मराठी भाषेत नवीन शब्दांची निर्मिती करणाऱ्या आणि इंग्रजी आणि इतर भाषांमधील जे शब्द सर्रास वापरले जातात, त्या शब्दांना पर्यायी शब्द निर्माण करणाऱ्या शब्द्प्रभुना, 'स्वातंत्र्यवीर सावरकर शब्द्सेवक' पुरस्काराने सन्मानित करावे.

**मराठी साहित्य प्रसार:**

१) उत्तम साहित्यनिर्मितीसाठी सर्वतोपरी प्रयत्न करणे. मराठीतील साहित्य केवळ मराठी भाषिकांपुरते मर्यादित न ठेवता त्याचा इतर भारतीय भाषांमध्ये प्रसार करण्यासाठी प्रयत्न करावे. दर वर्षी निवडक शंभर उत्तम मराठी पुस्तकांचा निदान हिंदी आणि इंग्रजीत अनुवाद करून घ्यावेत. राज्यसरकारचा पुरस्कार मिळालेल्या पुस्तकांचा अनुवाद सरकारने हिंदी व इंग्रजी भाषेत करून करून घ्यावा. आणि ही भाषांतरित पुस्तके देशभरातील पुस्तक प्रदर्शनांमध्ये उपलब्ध असतील आणि त्यांचं अचूक विपणन (मार्केटिंग) होईल, यासाठी व्यावसायिक संस्थांची मदत घ्यावी.

२) एकाच साहित्य संमेलनाला भरघोस मदत करण्यापेक्षा विभागीयस्तरावर होणाऱ्या संमेलनांना आर्थिक मदत करावी.

३) मराठी भाषा विभागांतर्गत चार संस्था काम करीत आहेत. त्यांच्यात सुसूत्रता आणणे आणि त्यांच्या कारभारात नोकरशाहीचा हस्तक्षेप कमीत कमी राहील हे पाहावे.

४) शासकीय संस्थांनी प्रकाशित केलेली विविध पुस्तके, विश्वकोश, परिभाषा कोश, बोलीभाषा कोश असे सर्व साहित्य अधिकाधिक लोकांपर्यंत पोहचेल, असे पहावे. यातील काही प्रकल्प अपूर्ण असल्यास ते त्वरेने पूर्ण करावेत.

५) सर्वप्रकारचे कोश शक्यतो पीडीएफ स्वरूपात प्रकाशित करून डाउनलोड स्वरूपात सर्वांना विनामूल्य उपलब्ध करावेत.

६) मोडी लिपीत लिहिलेले हजारो कागद आहेत त्यांचे मराठीकरण कधीच झालेले नाही. पूर्वी काही काम करून झाले आहे पण ९० टक्के काम अजून बाकी आहे. अशी लाखो कागदपत्रे पुणे, सातारा, कोल्हापूर, नागपूर, इंदूर, ग्वाल्हेर, तंजावर, हैद्राबाद येथे आणि भारतातील अनेक अन्य ठिकाणीही उपलब्ध आहेत. निजामशाही, आदिलशाही अशा राजवटींमध्ये मोडी भाषेत त्यांचे दप्तर लिहीत. हा फारच महत्त्वाचा पण दुर्लक्षित भाग आहे. ते कागद अत्यंत जीर्ण झाले आहेत. त्या साऱ्यातून इतिहासावर अगदी वेगळा प्रकाशझोत पडू शकेल. त्यादृष्टीने मोडी लिपी अवगत आहे अशांची नेमणूक करून त्यांच्याकडून शासनाने काम पूर्ण करून घ्यावे.

**ग्रंथव्यवहार व वाचनसंस्कृतीसंबंधी शिफारशी:**

१) ग्रंथालये व ग्रंथपाल म्हणजे साहित्य आणि वाचक यातील दुवा आहे हे लक्षात ठेऊन राज्यभरातील ग्रंथालये सक्षम करणे, कार्यक्षम व जाणते ग्रंथपाल कसे तयार होतील याकडे लक्ष पुरवणे.

२) जिल्ह्यांमधील शासकीय ग्रंथालये ही मुख्य केंद्रे ठेऊन वाचनाची उत्सुकता जागृत होईल असे कार्यक्रम योजणे गरजेचे आहे. जिल्हानिहाय किंवा तालुकानिहाय असे उपक्रम आखल्यास अनेकांना सहभागी होता येईल. ग्रंथालये ही अशी छोटी संमेलने भरवू शकतील आणि तेथील साहित्यिकांशी संवाद साधू शकतील. अभ्यासक्रमात ज्यांच्या साहित्याचा अंतर्भाव् आहे अशा लेखकांच्या भेटी, त्यांच्या मुलाखती घडवून आणणे देखील उपयोगी यावर विशेष लक्ष द्यावे. तसेच ग्रंथालये आणि ग्रंथपाल म्हणजे साहित्य आणि वाचक यातील दुवा आहेत हे लक्षात ठेवावे. राज्यभरातील ग्रंथालयं सक्षम करायची असतील आणि पर्यायाने वाचन चळवळ जर सक्षम करायची असेल, तर ग्रंथपाल हे या चळवळीचे राजदूत आहेत हे विसरून चालणार नाही. त्यामुळे ग्रंथपालांसाठी दर काही काळाने प्रशिक्षण वर्ग आयोजित करणे, त्यांना प्रोत्साहित करण्यासाठी आदर्श ग्रंथपाल पुरस्कार आयोजित करणे यावर सरकारने विचार करायला हवा.

३) ग्रंथालय संचालनालय सध्या तंत्रशिक्षण मंत्रालयाधीन आहे ते मराठी भाषा विभागाला जोडले जावे.

४) शासकीय पातळीवर अनेक विभागांतून ग्रंथखरेदी होते. त्यात सुसूत्रता असावी. खरेदीचे निकष एखाद्या तज्ज्ञ समितीने ठरवावेत.

५) ग्रंथालय कर्मचाऱ्यांचा अनेक वर्षे प्रलंबित राहिलेला वेतनवाढीचा व नेमणूकांचा प्रश्न त्वरित सोडवावा.

६) ग्रंथ प्रकाशन व्यवसायात आवृत्ती आणि पुनर्मुद्रण या बाबत कमालीचा गोंधळ आहे. शिवाय आवृत्ती किती प्रतीची म्हणावी याबाबत काही संकेत वा एक धोरण निश्चित केले जावे.

७) शासकीय पातळीवर होणा-या ग्रंथखरेदीत पुस्तकांची गुणवत्ता आणि किंमत तसेच त्यांची बाजारातील प्रचलित किंमत यांचा काही संबंध असतोच, असे नाही. अशा सर्व खरेदीसाठी एखादी शासनमान्य सूची असावी ती प्रतिवर्षी संपादित करावी.

८) सर्व अनुदानित शाळांमध्ये ग्रंथपाल असतोच असे नाही. ते पदच मान्यताप्राप्त नसते व ग्रंथालयाची अधिकची जबाबदारी एखाद्या शिक्षकावर सोपवली जाते. अशी जबाबदारी घेणाऱ्या शिक्षकाला अतिरिक्त भत्ता मिळावा.

९) नवीन शैक्षणिक धोरणानुसार विशेषतः प्राथमिक शाळेत आता भाषा शिक्षणाला (आणि तेही मातृभाषा) महत्त्व आले आहे. प्रत्येक प्राथमिक असो वा माध्यमिक शाळेत आठवड्यातून किमान दोन तासिका वाचनासाठी असाव्यात.

१०) शासकीय स्तरावर प्रत्येक शाळेत डॉ. अब्दुल कलाम वाचनकट्टा सुरू झाला आहे. त्यात एक ग्रंथपेटी असते. या पेटीचे दर दोन वर्षानी पुनर्भरण करावे. त्यातील पुस्तके काळजीपूर्वक निवडणे आवश्यक आहे. आठवड्याला दोन शैक्षणिक तासिका वाचनासाठी असणे अपेक्षित आहे. त्या वेळात सर्व विद्यार्थ्यांना ही पुस्तके उपलब्ध व्हावीत. अशा उपक्रमात पालक संघटना, निवृत्त शिक्षक यांना सहभागी करून घेत येईल. मनुष्यबळ कमी पडले तर लोकसहभाग वाढवणे हाच उपाय आहे.

११) महत्त्वाचे साहित्यपुरस्कार मिळालेली पुस्तके प्रत्येक ग्रंथालयात पोचवावीत.

१२) राज्याच्या प्रत्येक जिल्ह्यात जिल्हाधिकाऱ्यांनी स्थानिक साहित्य संस्था, शिक्षण संस्था यांच्या सहकार्याने प्रत्येक वर्षी जिल्हा ग्रंथोत्सवाचे आयोजन करावे. त्यासाठी महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती-मंडळामार्फत जिल्हाधिकाऱ्यांना अनुदान मिळत असते, या अनुदानाचा विनियोग उत्तम होईल हे पहावे आणि या अनुदानात दरवर्षी आवश्यक ती वाढ होईल, हेदेखील पहावे.

**३.दृश्यकला:-**

धोरणात्मक आणि कार्यात्मक शिफारशी सुचवताना समितीने खालील विषयांच्या अनुषंगाने शिफारशी सुचवल्या आहेत:-

**१. कलाशिक्षण**

**२. प्रोत्साहन, प्रचार व प्रसार**

**३. महाराष्ट्राच्या कलावैभवाचे जतन, संवर्धन, संशोधन व संग्रहालये**

**४. महापुरुषांची स्मारके**

**५. दृश्कला क्षेत्रातील कलावंताना पुरस्कार**

**६. ज्येष्ठ कलावंतांना पुरस्कार आणि वयोवृद्ध व गरजू कलाकारांना पेन्शन.**

**१) कलाशिक्षण**

१) प्राथमिक व माध्यमिक चित्रकला विषयाच्या अभ्यासक्रमाचा कालसुसंगत व नवीन शैक्षणिक धोरण (NEP) प्रमाणे पुनर्रचना करण्यात यावी.

२) इयत्ता आठवी पर्यंत चित्रकला हा विषय अनिवार्य असावा. इयत्ता नववी व दहावी साठी चित्रकला हा विषय ऐच्छिक ठेवावा. तो निवडल्यास क्रीडा, या विषयाप्रमाणे अतिरिक्त गुण देण्याची व्यवस्था असावी.

३) चित्रकला विषय शिकवण्यासाठी प्रशिक्षित चित्रकला शिक्षकाची नेमणूक करणे अनिवार्य असावे आणि त्याचं शिक्षण हे ATD/GD ART DIPLOMA/ AM/ B.F.A / M.F.A पेंटिंग, स्कल्पचर किंवा उपयोजित कलेतील पदविका/ पदवीधारक असेल असं सरकारचं धोरण असावं.

४) महाविद्यालयीन कला शिक्षणात दृश्यकला व कारागिरी या विषयांचे शिक्षण देण्यासाठी संपूर्ण महाराष्ट्राचा विचार करता NEP नुसार एक स्वतंत्र "कला व कारागिरी विद्यापीठ" स्थापन करायला हवे. दृश्यकला व कारागिरी या विषया अंतर्गत कालानुरूप व NEP नुसार अभ्यासक्रम तज्ञांच्या समितीमार्फत तयार करून या नवीन विद्यापीठामार्फत संपूर्ण महाराष्ट्रभर राबवण्यात यावा. आणि या विद्यपीठाने पदवी, पदव्युत्तर आणि पीएचडी संशोधन इत्यादी अभ्यासक्रम राबवावेत. या स्वतंत्र विद्यापीठामुळे कला संचलनायची कला शिक्षणातील जबाबदारी संपेल.

५) महाराष्ट्र शासनातर्फे कला संचालनालयाला सल्ला देण्यासाठी, मार्गदर्शनासाठी १९६५ मधील स्थापने पासून आर्ट कौन्सील (कला सल्लागार मंडळ) नेमले जात असे. त्यात महाराष्ट्राच्या विविध भागातून ज्येष्ठ कलावंत व कलातज्ञांची नेमणूक होत असे. परंतु कला संचालनायालयाच्या गलथान कारभारात गेली अनेक वर्षे हे सल्लागार मंडळ नियुक्त करण्याचे टाळण्यात आले आहे. अशा सल्लागार मंडळाची नियुक्ती विनाविलंब करावी.

६) 'रंगावली' हा शालेय स्तरावर विषय असावा आणि त्यासाठी अभ्यासक्रम असावा.

**२. प्रोत्साहन, प्रचार व प्रसार:**

कोणत्याही कलेच्या बाबतीत बालवयापासून सातत्याने प्रोत्साहन मिळाल्यास कलावंताचा उत्साह वाढतो. त्यातून त्याच्या निर्मितीवर सकारात्मक परिणाम होतो. म्हणूनच विद्यार्थी दशेत तसेच त्या नंतरच्या काळातही तरुण व ज्येष्ठ कलावंतांना विविध प्रकारे प्रोत्साहित करण्याची गरज असते. त्यातून व ललित कला अकादमीच्या प्रादेशिक केंद्रासारख्या इतर काही योजना आखून कलेचा प्रचार व प्रसार करण्यासाठी शासनाने विशेष प्रयत्न करावेत.

१) मुंबईत जवाहर बाल भवन ही शासनाची संस्था १९५२ पासून कार्यरत आहे. ती पुनर्जीवित होणे आवश्यक आहे. या संस्थेच्या विभागीय शाखा निर्माण करून त्यांच्यातर्फे राज्य, जिल्हा व स्थानिक स्तरावरील बालचित्र कला स्पर्धांचे वर्षभरात किमान एक वेळा आयोजन करण्यात यावे त्यातील निवडक लहान मुलांना पारितोषिके व प्रमाणपत्रे देण्यात यावी.

२) कलाकारांसाठी चित्र - शिल्प कलेच्या कार्यशाळा देशातील इतर राज्ये नियमित घेत असतात. परंतु महाराष्ट्र राज्याच्या १९६० मधील स्थापनेपासून केवळ दोनच कार्यशाळा शासनातर्फे घेण्यात आल्या. अश्या कार्यशाळाचे प्रमाण वाढविण्याचे धोरण शासनाने ठेवणे आवश्यक आहे. अश्या कार्यशाळेतून निर्माण होणाऱ्या कलाकृती शासकीय इमारती सुशोभित करण्यासाठी उपयुक्त ठरतील.

३) महाराष्ट्रातील प्रत्येक महसुली विभागाच्या प्रमुख ठिकाणी दृश्यकलेसाठी कला केंद्र स्थापन करावे. या कलाकेंद्रातून दृश्यकला व हस्तकला कलावंतांना आपली कला व छंद जोपासण्याची संधी मिळेल. यातूनच लहान मुलामुलींमध्ये कलाविषयक ज्ञान वृद्धिंगत होईल.

४) महाविद्यालयीन विद्यार्थी विभागाच्या राज्य कला प्रदर्शनाचे महाराष्ट्र राज्यात विविध ठिकाणी आयोजन करण्यात यावे. त्यानिमित्ताने सचित्र व्याख्याने, प्रात्यक्षिके आणि कार्यशाळांचे आयोजन करण्यात यावे. बालभवन तर्फे ज्या ठिकाणी शासकीय अथवा खाजगी संग्रहालये असतील, त्या ठिकाणी आणि कलावंतांच्या स्टुडिओत, गणपती कारखान्यास विशेष नैपुण्यप्राप्त बालकलाकारांच्या भेटी आयोजित कराव्यात.

५) महाराष्ट्र राज्य शासनातर्फे आणि विविध महागरपालिका, नगरपालिका, जिल्हा परिषदंतर्फे स्मारक शिल्पे उभारणे इ सुशोभीकरणाची कामे करून घेतली जातात. ती देताना सध्या अशी कामे देताना स्थानिक कलाकार किंवा तिथल्या कलाशिक्षण संस्था ह्यांना प्राधान्य मिळेल असं धोरण असावं.

६) द बॉम्बे आर्ट सोसायटी, (स्थापना १८८८) आणि आर्ट सोसायटी ऑफ इंडिया, (स्थापना १९१८). या देशातील अत्यंत जुन्या व प्रतिष्ठित संस्थाना सरकारने भरघोस अनुदान द्यावं.

**३. महाराष्ट्रच्या कलावैभवाचे जतन, संवर्धन, संशोधन आणि संग्रहालये:**

महाराष्ट्र राज्याला कला व कारागिरीची क्षेत्रात फार मोठी परंपरा असून त्या संदर्भात योग्य प्रकारे दस्तऐवजीकरण न झाल्यामुळे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर आपल्या या कला परंपरेची दखल घेतली जात नाही.

१) महाराष्ट्रात शासनाचे पुरातत्त्व व संग्रहालय असे एकत्र संचालनालय आहे. वस्तुतः पुरातत्त्व व संग्रहालय या दोन स्वतंत्र ज्ञान शाखा आहेत. त्यामुळे या दोन्ही शाखांचे व्यवस्थापन व अंमलबजावणी योग्य प्रकारे व अधिक प्रभावीपणे होण्यासाठी याचे दोन स्वतंत्र विभाग करावेत जेणेकरून पुरातत्त्व आणि संग्रहालय या दोन्ही ज्ञानशाखांना न्याय मिळेल.

२) देशात अनेक राज्यात त्या त्या राज्यातील प्रागैतिहासिक काळापासून ते आजपर्यंतची वाटचाल, विकास व कला संस्कृतीचे दर्शन घडवणारी संग्रहालय तयार झाली आहेत. अशा प्रकारचे महाराष्ट्र राज्याचे संग्रहालय (State Museum) अद्यापपर्यंत अस्तित्वात आले नाही हे वास्तव आहे. तरी या महत्वकांक्षी संग्रहालयाची योजना तत्काळ आखून अमलात आणावी.

३) महाराष्ट्रात वाडे, मंदिरे, मठ अशा कलात्मक वास्तू प्रचंड प्रमाणात आढळतात. त्यात लाकडी व दगडी कोरीव कामांचे व भित्ति चित्रांचे उत्कृष्ठ  नमुने आहेत त्यांचं जतन करण्यासाठी आणि त्याचे निकष ठरवण्यासाठी समिती स्थापन केली जावी.

४) महाराष्ट्रातील विविध व कला व कारागिरीची दस्तवेजी करणासंदर्भात खास योजना आखावी. त्यातील ज्या विषयाबाबत काम झाले आहे त्याची यादी करून ते एकत्रित करावे. ज्या विषयांसंदर्भात काम झाले नसेल त्या विषयांची यादी करून त्या बाबतचे संशोधन व लेखनाची जबाबदारी योग्य व्यक्तीकडे सोपवावी. आणि या लेखनातून तयार झालेला दस्तावेज हा पुस्तक, संकेतस्थळं या स्वरूपात उपलब्ध करून द्यवा.

**४. महापुरुषांची स्मारके:**

१) महापुरुषांची स्मारके उभारणे हे शासनाचे आणि समाजाचे कर्तव्यच असते. परंतु असे करताना केवळ उंची किंवा आकार हा निकष असू नये. शिल्पाची कलात्मकता अधिक महत्त्वाची असते हे लक्षात घ्यावे.

२) महापुरुषांच्या शिल्पाच्या परीक्षणासाठी केवळ शासकीय कलाशिक्षण संस्थेतील शासकीय अधिकारी शिक्षक न ठेवता त्यासोबतच एखाद्या कलावंत तज्ञाची नेमणूक करण्यात यावी.

**५. दृश्यकला क्षेत्रातील कलावंताना पुरस्कार:**

१) दृश्यकलेच्या विविध शाखांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्यांसाठी दरवर्षी एका विशेष जीवनगौरव पुरस्कराची घोषणा करावी.

२) सध्या महाराष्ट्रात दृश्यकला क्षेत्रात महाविद्यालय पातळीवरील व शिक्षण पूर्ण झालेल्या तरुण कलावंतांना महाराष्ट्र शासनातर्फे शिष्यवृत्ती नाही.

**६. वयोवृद्ध व गरजू कलावंतांना पेन्शन:**

१. राज्यातील ज्येष्ठ पण गरजू चित्रशिल्पकारांसाठी पेन्शन योजना सुरु करावी. चित्र-शिल्पकलेसाठी पेन्शन देण्याचे अधिकार कलासंचनालयाला बहाल क

**४.गड-किल्ले-पुरातत्त्व:-**

१) महाराष्ट्राच्या ऐतिहासिक वारशाची ओळख सामान्य जनतेला व्हावी, यासाठी सूत्रबद्ध कार्यक्रम आखायला हवा. आणि त्यात दृक्श्राव्य माध्यमाचा योग्य वापर करावा. विविध वयोगटांसाठी वेगळा ऐतिहासिक दृक्श्राव्य माध्यमाचा मजकूर (कन्टेन्ट) तयार केल्यास त्याचा जागृती वाढीस लागण्यास निश्चित उपयोग होईल.

२) राज्यातील सर्व अभियांत्रिकी व वास्तुविशारदीय महाविद्यालयांशी समन्वय साधून जिल्हानिहाय त्या-त्या जिल्ह्यातील प्राचीन वास्तूंचे आरेखन, दस्तऐवजीकरण याबाबी अभ्यास क्रमाचा भाग/प्रकल्प म्हणुन राबविण्यासाठी प्रोत्साहन देऊन त्यासाठी समन्वयासाठी यंत्रणा उभी करण्यात यावी.

३) राज्यातील वारसा आणि संस्कृतीवर संशोधन करणाऱ्या संशोधकांसाठी राज्य पुरातत्त्व विभागाकडून शिष्यवृत्ती योजना राबविण्यात यावी.

४) महाराष्ट्रातील ऐतिहासिक वारसास्थळांच्या किंवा वस्तूंच्या प्रतिकृती करुन शैक्षणिक अथवा सामाजिक कार्यक्रमांमध्ये सन्मानित करते वेळी या प्रतिकृतींचा जास्तीत जास्त वापर करण्याचे धोरण असावे.

५) प्राचीन वास्तू, वस्तू व गड किल्ले याच्याबददल पर्यटकांना सत्य व अचूक माहिति मिळण्यासाठी प्रमाणपत्रधारक मार्गदर्शक (गाईड) तयार करण्यासाठी धोरण असावे. गाईडसाठी तीन महिन्यांचा अभ्यासक्रम पुरातत्त्व संचालनालयाद्वारे तयार करुन विद्यापीठ पातळीवर राबवण्यासाठी व्यवस्था तयार करण्यात यावी. या अभ्यासक्रमामध्ये उर्तीण होणा-या विदयार्थांना संचालनालयामार्फत गाईडचा परवाना ५ वर्षांसाठी देण्यात यावा आणि परवानानूतनीकरण करणासाठी दर ५ वर्षांनी उजळणी (रिफ्रेशर ) अभ्यासक्रम पूर्ण करण्याची अट ठेवण्यात यावी.

६) दुर्ग व इतर वारसास्थळे संवर्धनाकरिता इच्छुक असणाऱ्या संस्थांसाठीची मानक कार्यपध्दती (SOP) सुनिश्चित करुन त्यांच्यासाठीही वर्षातून पुरातत्त्व विषयाशी संबंधित असणाऱ्या विद्यापीठांमध्ये दोनदा कार्यशाळा आयोजित केल्या जाव्यात.

७) राज्यातील विविध कालखंडातील पुराभिलेख आणि नाणी काळाच्या ओघात नष्ट होत असल्याने त्यांचे संरक्षण करण्यासाठी डिजिटल दस्ताऐवजीकरणाचा प्रकल्प पुरातत्त्व विभागाच्या माध्यमातून राबविण्यात यावा.

८) पुरातत्त्वीय वारसा स्थळांचे, गड किल्यांचे संशोधनात्मक काम करणाऱ्या संस्थांना, व्यक्तिंना चलत चित्रण, छायचित्रण व आधुनिक भौगोलिक माहिती प्रणालीने (GIS Mapping )नकाशे तयार करण्याचे प्रशिक्षण द्यावे.

९) पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालय संचालनालय अधिक सक्षमपणे कार्यरत व्हावे यासाठी यांस स्वतंत्र विभागाचा दर्जा मिळायला हवा. संचालनालय ऐवजी पुरातत्त्व विभाग (Deparment of Archeaology) असा बदल करून इतर राज्यांप्रमाणे आयुक्त दर्जाच्या अधिकाऱ्याची नेमणूक करण्यात यावी.

१०) राज्याची सांस्कृतिक परंपरा दाखविणारे एकही भवन सद्यस्थितीत अस्तित्वात नाही. राज्यातील अनेक रितीरिवाज,परंपरा, वेशभूषा, खाद्यपदार्थ, प्राचीन स्थापत्य व राहणीमान अशा संस्कृतिशी निगडीत अनेक बाबींचं दर्शन घडवणारं एक महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक भवन उभारण्यात यावे.

११) राज्याच्या प्रत्येक जिल्ह्यात एक तरी जिल्हा संग्रहालय, पुरातत्त्व संग्रहालय असायला हवं. हवे. तसेच राज्यातील सर्व संग्रहालयांमधील ऐतिहासिक वस्तूंची शास्त्रशुध्द पध्दतीने नोंदणी करण्यासाठी आणि त्याच्या संरक्षणासाठी सद्यस्थितीत कायदा अस्तित्वात नसल्याने महाराष्ट्र राज्य वस्तुसंग्रहालय अधिनियम तयार करण्यात यावा.

१२) राज्याच्या विद्यमान सांस्कृतिक कार्य मंत्र्यांनी इंग्लंडहून जगदंबा तलवार आणण्यासाठी अविरत प्रयत्न करून, करार करून, ती तलवार लवकरच आणण्याची तजवीज केली, तशी देशाबाहेरचा आपला सांस्कृतिक ठेवा आहे, तो भारतात परत आणण्यासाठी एक शिखर संस्था म्हणून राज्य संग्रहालयाची निर्मिती करुन सांस्कृतिक कार्य विभाग अंतर्गत महासंचालक दर्जाच्या अधिकाऱ्याची नेमणूक करुन स्वतंत्र संचालनालय निर्माण करण्यात यावं.

१३) महाराष्ट्राचा ऐतिहासिक वारसा जतन सवंर्धन, संरक्षण करण्यासाठी सद्यस्थितीत महाराष्ट्र प्राचीन स्मारके व पुराणवस्तुशास्त्र विषयक स्थळे व अवशेष अधिनियम १९६० व त्याचे नियम उपलब्ध आहे. तथापी या अधिनियम व नियमातील काही तरतुदींमध्ये कालानुरुप बदल होणे अत्यंत आवश्यक असल्याने प्रस्तुत कायद्यामध्ये आवश्यक ते बदल व दुरुस्त्या करण्यासाठी समिती नेमावी.

१४) पुरातत्त्वीय ऐतिहासिक वारशाचे जतन व संवर्धन करण्यासाठी जतन व संवर्धन माहिती पुस्तिका (कन्झरव्हेशन मॅन्युअल) तयार करण्यात यावे.

१५) पुरातत्त्व विभागाच्या माध्यमातून केले जाणारे पुरातत्त्वीय सर्वेक्षण, उत्खनन, जतन व सवंर्धनाच्या कामांचा वार्षिक अहवाल प्रकाशित करण्यात यावा. तसंच महाराष्ट्रातील किल्ल्याच्या सदंर्भात स्थापत्य व वास्तुशास्त्र यांच्या माहितीसाठी देणारी एक पुस्तिका तयार करण्यात यावी.

१६) महाराष्ट्राचा ऐतिहासिक वारशाचा अभ्यास करण्यासाठी, जपण्यासाठी, संशोधन करण्यासाठी तसेच देशविदेशातील संशोधनांचा आढावा घेण्यासाठी एक राज्य पुरातत्त्वीय ग्रंथालय उभारण्यात यावे.

१७) केंद्र शासन, राज्य शासन व महानगरपालिकांच्या वारसा यादीतील वारसास्थळे आणि कोणत्याही शासकीय यंत्रणेद्वारे संरक्षित नसलेले परंतु ऐतिहासिक व पुरातत्त्वीय महत्व असणाऱ्या स्थळांचे जिल्हानिहाय गॅझेटियर तयार करण्यात यावे. हे गॅझेटियर ऑनलाईन पोर्टलच्याही स्वरुपात असेल. महाराष्ट्रातील गडकिल्ल्यांचे जिल्हानिहाय गॅझेटियर व दुर्ग-दर्शनिका प्रकल्प अग्रक्रमाने हाती घ्यावे.

१८) महाराष्ट्रातील दुर्गस्वच्छता व त्यासंबंधी जागृती आदि कार्यक्रम राबविणाऱ्या संस्थाच्या सहभागाची व समन्वयाची कायमस्वरुपी व्यवस्था करण्याच्या हेतूने पुरातत्त्व समन्वय समिती स्थापन करण्यात यावी. किल्ल्यांवरील व्यवस्थापन जसे घनकचरा व सुरक्षा व्यवस्थापन, पर्यटकांवर शिवसंस्कार, किल्ल्यांच्या माध्यमातून शिवचरित्र कथन, शाहिरीचे कार्यक्रम, शिक्षण प्रबोधन, किल्ल्यांवर मर्दानी खेळ व युध्द कला यांचे कायमस्वरुपी प्रदर्शन, न्याहारी व जेवण यांसाठी स्थानिकांशी समन्वय ही कामे संस्थांच्या सहभागाने सुनिश्चित करण्यात याव्यात.

१९) महाराष्ट्रातील वारसास्थळांचा समावेश वर्ल्ड हेरिटेज निकषांनुसार विकसित करण्यासाठी पुरातत्त्व विभाग, इतिहास संशोधक व अभ्यासक यांच्या मार्गदर्शनाखाली एक समिती स्थापन करण्यात यावी.

२०) अनेक किल्ले राज्य शासनानी संरक्षित घोषित केलेले असले तरी त्याचा ताबा वन विभागाकडे आहे. त्यामुळे गड-किल्ले संरक्षण, संवर्धन करताना अडचणी निर्माण होतात. त्यासाठी पुरातत्त्व विभाग व वन विभाग यांच्या अधिनियमात सुधारणा करण्यात यावी.

२१) युरोपमध्ये किल्ल्याची जपणूक 'इंग्लिश हेरिटेज' या स्वायत्त संस्थेद्वारे केली जाते. या धर्तीवर महाराष्ट्राच्या गड-किल्ले जतन व संवर्धनासाठी महामंडळ वा महावारसा अशा स्वायत्त संस्थाची स्थापना करावी.

२२) पुरातत्त्वीय वारसास्थळांना काही विशिष्ट महिन्यांमध्ये, तिथी, उत्सव किंवा सुट्टयांमुळे पर्यटकांची खूप गर्दी झाल्याचे पहायला मिळते. यासाठी वारसा स्थळांचा अभ्यास करुन त्यांच्या कॅरिंग कपॅसिटीचे निकष ठरवावेत. या किल्ल्यांवर सुरक्षा रक्षकांची नेमणूक करावी आणि सीसीटीव्ही देखील बसवावेत.

२३) अनेक स्वयंसेवी संस्था गड-किल्यांची स्वच्छता, वृक्षारोपण अशी अनेक महत्वाची कामं करत असतात. त्यांची नेमकी कामं काय आणि ती राबवताना काय गोष्टींची काळजी घ्यावी याची एक नियमावली आखावी आणि अशा काम करणाऱ्या सर्व संस्थांची रीतसर नोंद असावी.

२४) गड-किल्ल्याच्या मूळ रुपाला धक्का लागू न देता तेथील वास्तू, तटबंदी, बुरुज याची डागडुजी व्हावी आणि गड-किल्ले वास्तू वर्ल्ड हेरिटेज निकषानुसार विकसित करण्यासाठी तज्ज्ञ, अभ्यासकांची पूर्णवेळ समिती नेमावी.

२५) गड-किल्ल्यावर येणाऱ्या पर्यटकांसाठी एक नियमावली तयार करावी आणि यात या नियमांचा भंग करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई काय होईल याचा स्पष्ट उल्लेख असावा.

**५.लोककला:-**

**संवर्धन:**

१) राज्यातील लोककलांचे संवर्धन जतन करण्याच्या उद्देशाने, लोककलांचे आणि लोककलाकारांचे सर्वेक्षण करणे आवश्यक आहे.

२) लोप पावण्याच्या अवस्थेत असलेल्या लोककलांना उर्जितावस्था प्राप्त करून देण्यासाठी विशेष प्रयत्न केले जावेते. कर्नाटकच्या धर्तीवर महाराष्ट्रात देखील लोककलेसाठी एक वेगळं विद्यापीठ स्थापन व्हावे .

३) आदिवासी कला आणि विज्ञान यांचा अभ्यास होण्यासाठी आदिवासी जिल्ह्यांमध्ये लोककला संशोधन व संवर्धन केंद्र सुरु करण्यात यावे.

४) नंदुरबार जिल्हात होणारा होलिका महोत्सव, संपूर्ण कोकण आणि कोल्हापूर जिल्ह्यातील चंदगड व आजरा तालुक्यात साजरा होणारा शिमगोत्सव तसेच नाशिक, पालघर जिल्हा येथील बोहाडा महोत्सव (सोंगे

लोककलाप्रकार) यांच्या संवर्धनासाठी विशेष आर्थिक तरतूद करण्यात यावी. शिमगोत्सव आणि बोहाडा महोत्सव यांचे आयोजन करण्यात यावे.

५) लोककलेच्या संवर्धनाच्या उद्देशाने विविध लोककलाप्रकारांच्या छोट्या चित्रफिती तयार करून, प्रत्येक चित्रपटगृहात या चित्रफिती दाखवण्याची सक्ती करण्यात यावी. (उदा. वासुदेव, नंदीबैल यासारख्या लोककला) जेणेकरून नवीन पिढीला या लोककलांचा परिचय होईल.

६) महाराष्ट्र-कर्नाटक सीमाभागातील लोककलांच्या संवर्धनासाठी आणि आदिवासींच्या लोककलांच्या संवर्धनासाठी विशेष आर्थिक तरतूद करण्यात यावी.

७) महाराष्ट्रात सर्वप्रकाराच्या लोककलांचे व महाराष्ट्राच्या संस्कृतीचे दर्शन घडवणारे 'महाराष्ट्र लोककला दालन' उभारण्यात यावे. या दालनामध्ये राज्यातील कलापरंपरेची माहिती देणारे हे दालन असावे.

**लोकसाहित्य:**

१) लोकगीते, (विधीगीते, श्रमगीते, बडबडगीते, जात्यावरच्या ओव्या, भलारीगीते), इत्यादी लोककाव्ये हे काळानुसार लोप पावत आहेत. या लोकगीतांचे संकलन, संशोधन करून चित्रफिती आणि ग्रंथरूपाने प्रसिद्ध करण्यासाठी आर्थिक मदत देऊन प्रोत्साहन दयावे.

२) महाविद्यालय, विद्यापीठ स्तरांवर लोकसाहित्याचे (लोकगीतांच्या, लोकनाट्याच्या) संशोधन, लेखन संकलन, चर्चासत्र, कार्यशाळा यांचे आयोजन करावे.

३) विद्यापीठ स्तरावर लोकसाहित्य अध्यासनाचे स्वतंत्र संशोधन केंद्र स्थापना करण्यात यावे

**स्वतंत्र सांस्कृतिक महामंडळ आणि लोककला समिती:**

१) लोककला आणि कलावंत जर जिवंत ठेवायचा असेल तर एक स्वतंत्र महामंडळ स्थापन करण्यात यावे . याची रचना ही आदिवासी विभाग महामंडळ व सारथी महामंडळ ह्यांच्या धर्तीवर असावी . उदा . तमाशा , दशावतार, नौटंकी सारख्या काही कलांसाठी सुरुवातीस भांडवलाची गरज भासते. अशावेळेस या महामंडळाने विशिष्ट काळासाठी या कला सादर करणाऱ्या कंपन्यांना अल्प व्याजाने कर्जाऊ रक्कम द्यावी. तसंच राज्यभरातील कलाकारांची आणि लोककला संस्थांची नोंद या महामंडळाकडे असावी. ज्याचा फायदा कलाकारांना मानधन देताना होईल.

२) शासनाच्यावतीने तालुकास्तरावर, जिल्हास्तरावर लोककला समितीची स्थापना करण्यात यावी.

**लोककला केंद्र, अकादमी:**

१.लोककलावंत अकादमीची स्थापना, लोककलाकेंद्राची स्थापना करण्यात यावी. या अंतर्गत लोकसाहित्यावर संशोधन, अभ्यास व्हावा

२.अकादमी, लोककलाकेंद्राच्या वतीने शिबीरे कार्यशाळा , चर्चासत्रे आयोजन शाळा, महाविद्यालय, विद्यापीठ स्तरावर करण्यात यावे. जेणे करून विद्यार्थ्यांमध्ये लोककलेविषयी आवड निर्माण होईल.

लोककला अकादमीने महाराष्ट्रातील विद्यापीठ आणि महाविद्यालय स्तरावर लोककला महोत्सव आयोजित करण्याला प्रोत्साहन द्यावे.

**पुरस्कार आणि विशेष सुविधा:**

१) ज्येष्ठ कलावंत मानधन योजनेच्या लाभासाठी वयोमर्यादा ५० वर्षावरुन ४५ वर्ष अशी करण्यात यावी. आणि जिल्हा मानधन समिती मध्ये लोककलावंत, अभ्यासक ह्यांचा समावेश असावा आणि त्यांना आरोग्य विम्याचं कवच बहाल करावं.

२) लोककलावंत म्हणजे काय याची व्याख्या ठरवून त्यांना 'लोककलावंत' हा दर्जा द्यावा. लोककलावंत, अभ्यासक, लोककलावंत संस्था, यांना त्यांच्या कार्याची, कलेची दखल घेऊन राज्यस्तरीय, जिल्हास्तरीय, विद्यापीठस्तरीय दल विविध लोककला प्रकारासाठी दरवर्षी पुरस्काराचे देण्यात यावा.

३) दशावतार, कलगीतुरा, खडीगंमत, नमन, तमाशा, सोंगीभजन, प्रबोधनात्मक जलसे, आदिवासी नृत्य, या लोककलाप्रकारांसाठी विशेष पुरस्कार देण्यात यावे.

४) लोककलावंत संस्थाच्या वाहनासाठी परवाना करांमध्ये मध्ये सवलत देण्यात यावी.

**६.संगीत:-**

धोरणसूचना सुचवताना प्रामुख्याने खालील तीन घटकांना केंद्रस्थानी ठेवलं आहे:-

**१) संगीत शिक्षण**

**२) संगीत संवर्धन व प्रसार**

**३) संगीत क्षेत्रातील कलाकार**

**संगीत शिक्षण:**

१) शालेयस्तरापासून 'संगीत' हा विषय अभ्यासक्रमात असावा. याचा दोन बाजूंनी विचार करावा. उत्तम कलाकार घडवणे आणि त्याहून उत्तम श्रोते घडवणे. त्यासाठी प्रत्येक शाळेत संगीत शिक्षकांची नियुक्ती करावी व या नियुक्त्यांसाठी आवश्यक त्या निधीची तरतूद करावी. प्रत्येक शाळेत संगीत शिक्षक नेमता येत नसतील तर शाळांचे समूह (clusters) करून संगीत शिक्षक पुरवले जावे. महाविद्यालय आणि विद्यापीठाच्या संगीत विभागाकडे पण शिक्षकभरतीचा अभाव आहे. या भरतीकडे सरकारने गांभीर्याने बघावे.

२) घरंदाज, गुरु-शिष्य परंपरेच्या व पारंपरिक संगीत जोपासणाऱ्या एका मोठ्या वर्गाला आधुनिक तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण देण्याची तरतूद नव्या सांस्कृतिक धोरणात असावी. भारतीय संगीताच्या विकासाच्या दिशा आणि व्यवस्थापन सांभाळणारी एक स्वतंत्र यंत्रणा, आयआयटी सारख्या संस्थांच्या मदतीने उभी करावी. त्यामार्फत अलौकिक असे आपले भारतीय संगीत जागतिक बाजारपेठेसमोर आणून त्यातून व्यावसायिक संगीत रोजगार निर्मिती कशी होईल याचे प्रशिक्षण सुरू करावे. संगीत क्षेत्रातही एमबीए सारखे अभ्यासक्रम सुरू करता येतील का यावर विचार करावा. तसंच गुरू-शिष्य परंपरेच्या संवर्धनासाठी एक स्वतंत्र शिष्यवृत्ती योजना महाराष्ट्र शासनाच्या पातळीवर सुरू करावी ज्यामध्ये शिष्यवृत्तीचा एक अंश शिष्याला आणि मुख्य भाग गुरूला थेट मिळावा. पु.ल.देशपांडे कला अकादमीतर्फे सदर योजना सुरु करता येईल.

३) प्रगत दर्जाचं संगीत शिकण्यासाठी आणि व्यावसायिक संगीताचे आव्हान पेलण्यासाठी संगीत शिकणाऱ्या विविध घटकांसाठी पुढील कौशल्याधारीत प्रशिक्षण अभ्यासक्रमांची निर्मिती व्हावी; आवाज साधना, उच्चार साधना, ध्वनी तंत्रज्ञान, संगीत संयोजन, संगीत रचना, इत्यादि विषय त्यात यावे.

४) महाविद्यालयांमध्ये संगीत रसग्रहणाचे क्रेडिट अभ्यासक्रम असावे. आणि मराठी भावसंगीतासाठी स्वतंत्र अभ्यासक्रम तयार करण्यात यावा.

५) गांधर्व संगीत महाविद्यालय संस्थेचे काम किमान १ शतकापासून सुरु आहे, पण या संस्थेला शासकीय मान्यता नसल्यामुळे या संस्थेचे पदवीधर संधींपासून वंचित आहेत. त्यामुळे या आणि अशा खूप जुन्या पण आजदेखील उत्तम कामगिरी करणाऱ्या संस्थांना शासकीय मान्यता द्यावी.

**संगीत संवर्धन आणि प्रसार:**

१) महाराष्ट्राला शास्त्रीय संगीत, धृपद संगीत, लोकसंगीत, नाट्यसंगीत आणि इतर उपशास्त्रीय संगीत, तसेच सुगम अथवा भावसंगीत यांची एक समृद्ध परंपरा लाभली आहे. या समृद्ध वारशाचे जतन करणे हे अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने करावे.

२) पूर्वापार मंदिरे ही केवळ धार्मिक स्थळे नसून ती समाजाच्या सांस्कृतिक जीवनाच्या रक्तवाहिन्या होती. देवळांचा परिसर पुन्हा एकदा सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी खुला करून द्यावा.

३) महाराष्ट्राचे संगीत हे केवळ महाराष्ट्राचेच नसून याच्या सौंदर्याची ओळख संपूर्ण जगाला करून देणे गरजेचे आहे. भारतातील वेगवेगळ्या राज्यांमध्ये आणि जगातील महत्वाच्या देशांमध्ये, देशांतरित मराठी जनसमूहाच्या साहाय्याने, त्या त्या देशांमध्ये मराठी संगीताचे आणि महाराष्ट्रीय कलाकारांचे कार्यक्रम करण्यासाठी सरकारने पुढाकार घ्यावा.

४) भाषा, इतर कला आणि संगीत यांच्या समन्वयाविषयी अधिकाअधिक जागृतीची गरज आहे. या मिलाफाची सुरुवात लोकसंगीत आणि शब्दप्रधान भावसंगीत या दोन प्रकारांमध्ये आहे. भावसंगीत आणि लोकसंगीताचे विविध प्रकार जतन करून त्याचा संचय पुढच्या पिढ्यांच्या संदर्भासाठी तयार करावा. ध्वनिमुद्रणे, लोकसंगीताच्या विविध प्रकारांवर, महाराष्ट्रातील वाद्यांवर, थोर गीतकार आणि संगीत दिग्दर्शकांवर असलेले माहितीपट, हे नव्याने एका प्रमाणिकृत पद्धतीने करावेत.

५) नाट्यसंगीत हा संगीत प्रकार महाराष्ट्राची एकमेवाद्वितीय अशी संगीत परंपरा आहे. नाट्यसंगीताच्या जतनासाठी आणि संवर्धनासाठी स्वतंत्र निधी उपलब्ध करून द्यावा.

६) खास संगीताच्या मैफलींसाठी आणि कार्यक्रमांसाठी सुसज्ज अशा छोटेखानी सभागृहांची रचना प्रत्येक तालुक्यात, उपनगरात करावी. उत्तम ध्वनिव्यवस्था आणि सौंदर्यदृष्टीमूलक अशी ही सभागृह असावी. आणि या सभागृहांचा उपयोग फक्त संगीताशी संबंधित कार्यक्रमांसाठीच व्हावा.

**संगीत क्षेत्रातील कलावंतांसंबंधी धोरण**

१) संस्थांसाठी, कलाकारांसाठी अनेक कार्यक्रम, सवलती, अनुदाने, योजना वेळोवेळी शासन आपल्या विविध खात्यांतर्फे जाहीर करते, त्याची यथायोग्य माहिती भागधारकांपर्यंत पोहोचवण्याकरिता प्रत्येक जिल्ह्यात एक समन्वयक असावा. हा समन्वयक सांस्कृतिक कार्य विभागाने नियुक्त करावा.

२) महाराष्ट्रातील संगीत क्षेत्र हे अत्यंत असंघटित असे क्षेत्र आहे. या सगळ्या कलाकारांचे संघटन करणे अथवा महाराष्ट्रातल्या विविध स्तरांवर काम करणाऱ्या संगीत कलावंतांची नोंदणी करण्यात यावी.

**७.रंगभूमी:-**

१) नाटयगृहाची बांधणी, नियोजन,नाटयगृहाचे भाडे, इतर तांत्रिक मदत, इत्यादी बाबत सल्ला देण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग, नगर विकास विभाग, सांस्कृतिक कार्य विभागातील तसेच कला/नाटय क्षेत्रातील तज्ञांची संयुक्त नाटयगृह सल्लागार समिती असावी. महाराष्ट्र राज्यात नाटयगृह उभारणी अथवा

नाटयगृह दुरुस्ती यासाठी सदर समितीची संमत्ती अनिवार्य असावी. राज्यातील नाटयगृहाबाबत दुरुस्ती व देखभालीसाठी निधीची तरतूद असावी.

२) राज्यातील बंद असलेली सर्व नाटयगृहे दुरुस्ती करुन पुन्हा सुरु करावीत. तसंच नाट्यगृहाची स्वच्छता आणि त्याची देखरेख हे नीट होत आहे का हे पाहण्यासाठी निरीक्षक नेमावेत.

३) आमदार निधीत नाटयगृह विषयक निधी मिळण्याबाबत विचार व्हावा.

४) हौशी नाट्य कलाकांराना नाट्य तालीमीसाठी अनेक अडचणीना तोंड दयावे लागते. तालमीसाठी हॉलचे भाडे अतिशय जास्त असते त्यामुळे हौशी कलाकारांना शासनाने सार्वजनिक बांधकाम विभाग/ कामगार कल्याण विभाग/ नगर पालिका/ पंचायत समिती किंवा शासकीय शाळेतील हॉल कलाकारांना परवडतील अशा दरांने किंवा शक्य झाल्यास नि:शुल्क उपलब्ध करुन देण्याची सोय करावी.

५) राज्य नाटय स्पर्धेतील पारितोषिक विजेत्या नाटकांना नाटयगृह भाडयात सवलत मिळावी.

६) नाट्यगृह ही राजकीय पक्षांनी वापरू नये असे नाही, पण जर एखाद्या नाटकाचं बुकिंग झाले असेल तर कुठल्याही परिस्थितीत ते बुकिंग रद्द न करण्याचे धोरण आखलं
जावे.

७) 'द बॉक्स' सारखे नाटयगृह सर्व जिल्हयांत उपलब्ध करावे. आणि सर्व नाटयगृहात शनिवारी व रविवारी सकाळ सत्र हौशी नाटय संस्थाना देण्याबाबत नियमावली तयार करावी.

८) नाटक सादरकर्ती संस्था धर्मादाय आयुक्ताकडे नोंदणीकृत करणे अनिवार्य करावे.

**राज्यनाटय स्पर्धा सूचना:**

१) राज्य नाट्य स्पर्धेसाठी परीक्षक काम करणाऱ्या व्यक्तीच्या अनुभवाबद्दल ठोस धोरण यावं. स्पर्धेचा निकाल ठरवण्यासाठी मार्गदर्शक तत्व ठरवलेली असावी. परीक्षकांच्या नाट्यसंस्थांनी राज्य नाट्यस्पर्धेत भाग घ्यावा की नाही याचे निकष ठरवण्यात यावेत.

२) सांस्कृतिक कार्य संचालयाने स्पर्धेची घोषणा करताना, प्रवेशिका सादर करण्याचा तारखेपासून ते पारितोषिक वितरणाची तारीख याचा तपशील सुरुवातीलाच जाहीर करावा.

३) राज्य नाट्य महोत्सवाच्या आयोजनानंतर लवकरात लवकर पारितोषिक वितरण समारंभ व्हावा.

४) हौशी नाट्य कलाकारांना नाट्य तालमीसाठी सरकारी शाळांमधले हॉल हे परवडणाऱ्या दरात उपलब्ध करून द्यावेत. राज्य स्पर्धेत भाग घेतलेल्या संस्थांना झालेल्या खर्चाची प्रतिपूर्ती लवकरात लवकर मिळावी यासाठी धोरण आखावे.

५) राज्यस्पर्धेत नाटकांच्या सादरीकरणा पूर्वी संस्थेस नाटयनिर्मितीचा खर्च म्हणून मिळणा-या रक्कमेत वाढ करावी. तसंच स्पर्धेत भाग घेणा-या नाटकांतील कलावंता व्यतिरिक्त तंत्रज्ञाना (Technical Staff) प्रवास खर्च मिळावा.

६) प्राथमिक स्पर्धेतील पारितोषिक प्राप्त सर्व नाटय संस्थाचे संबंधित प्रादेशिक विभाग क्षेत्रात १० प्रयोग शासनामार्फत करण्यात यावेत.

७) राज्य नाटय स्पर्धेत हौशी ग्रामीण स्पर्धा आयोजित करावी.

**बालनाटय:**

१) बालनाटयातील सहभागासाठी वयाची अट नसावी.

२) बालनाट्याना नाट्यगृहाच्या तारखा प्राधान्याने मिळाव्यात यासाठी धोरण असावे.

३) राज्याच्या ६ प्रशासकीय मुख्यालयांत बालकांसाठी नाटय प्रशिक्षण शिबिरांचे आयोजन करण्यात यावे.

४) राज्य शासनामार्फत देण्यात येणारे नाटय अनुदान बालनाटयांनादेखील देण्यात यावे.

**नाटक अनुदान:**

१) सांस्कृतिक कार्य संचालनालयामार्फत राबविण्यात येणा-या नाटय अनुदान योजनेतील नाटय परिक्षणाच्या वेळी गणसंख्या ११ ऐवजी ६ करावी.

२) नाटक अनुदान योजनेची रक्कम वाढवावी.

३) नाटय अनुदान मंजुर झाल्यानंतर अनुदानाची रक्कम, तातडीने मिळण्यासाठी अंमलबजावणी व्हावी.

**इतर सूचना:**

१) नाटकांच्या सेटच्या वाहतुकीचा खर्च हा खूप मोठा आहे. त्यामुळे एसटी महामंडळाच्या वाहनांची तजवीज करण्याचा विचार करावा.

२) नॅशनल स्कूल ऑफ ड्रामा (NSD) या संस्थेचे एक केंद्र महाराष्ट्रात असावे. आणि नॅशनल स्कुल ऑफ ड्रामाच्या धर्तीवर महाराष्ट्र स्कुल ऑफ ड्रामा सुरु करावं.

३) विविध नाटय स्पर्धा महोत्सव यांची माहिती होण्यासाठी सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे एक स्वतंत्र पोर्टल असावे.

४) हौशी कलाकार, नाटयसंस्थाना प्रयोगाच्यासाठी मिळणारी रेल्वे सवलत सोपी आणि सहजपणे मिळावी.

५) सांस्कृतिक कार्य संचालनालयाकडून कलाकारांसाठी ज्या योजना आखल्या जातात, त्याची माहिती कलाकरांना असावी यासाठी पुस्तिका असायला हवी.

६) शालेय शिक्षणांत नाटय रंगभूमी हा विषय अंतर्भूत करावा.

७) जिल्हास्तरावर सांस्कृतिक अधिकारी असावा आणि कलाकार, नाट्यसंस्था आणि एकूणच रंगकर्मीच्या अडचणी सोडवणे हे काम या सांस्कृतिक अधिकाऱ्याची जबाबदारी असावी.

८) नाट्यक्षेत्रात काम करणाऱ्या दहा तरुण नाट्य दिग्दर्शकांना आणि लेखकांना किमान १ वर्षासाठी शिष्यवृत्ती मिळावी, जेणेकरून ते दर्जेदार नाट्यनिर्मितीच्या कामात स्वतःला गुंतवून घेऊ शकतील.

९) नृत्य, गायन, नाट्य या क्षेत्रांतील ज्येष्ठ कलावंताच्या कर्तृत्वाचे दृक्श्राव्य माध्यमातून चित्रीकरण करून त्याचे अनुबोधपट तयार करून घ्यावेत, जे पुढील पिढयांना मार्गदर्शक आणि प्रेरणादायी ठरतील.

**८.नृत्य:-**

१) प्राथमिक शालेय शिक्षणाच्या स्तरावरच नृत्य हा अभ्यासक्रमाचा अविभाज्य भाग असावा. या कलेचा अभ्यासक्रमात समावेश करताना ही कला आध्यात्मिक शिक्षणाचे देखील साधन होते, हे लक्षात ठेऊन अभ्यासक्रमाची रचना असावी.

२) सर्व अभ्यासमंडळाच्या (बोर्डाच्या) शाळांमध्ये शास्त्रीय नृत्याचा एक तास असायला हवा, जेणेकरून ज्यांना यात गती आणि आवड असेल त्यांच्या आवडीची जोपासना अगदी शाले स्तरावरच सुरु होईल.

३) नव्या राष्ट्रीय शिक्षण धोरणात रंगमंचीय कलाद्वारे शिक्षण प्रयोजनार्थ विचार केला गेला आहे परंतु स्वतंत्रपणे कलेचा विकास होण्यासाठी आणखी विचार करायला हवा.

शास्त्रीय नृत्याचे प्रशिक्षण 'शास्त्र-प्रयोग- परंपरा-अनुसंधान' या स्वरुपात देता येईल यासाठी अधिक प्रयत्न करायला हवेत. नृत्य शिक्षणाचे स्वरुप 'शास्त्र-प्रयोग- परंपरा-अनुसंधान' अशा प्रकारचे असणे आवश्यक आहे.

४) शैक्षणिक धोरणामध्ये राज्य सरकारने नृत्य शिक्षणास इतर विषय शिक्षणाप्रमाणेच किंवा किमान कौशल्य /व्यावसायिक प्रशिक्षणाप्रमाणेच गृहीत धरून नृत्य विषयासही प्राधान्य द्यावे.

५) नृत्य कलेमध्ये इतर अनेक कलांचा अंतर्भाव असतो. त्यात संगीत, नाट्य, चित्र, योग व शिल्प शास्त्राचा प्रामुख्याने समावेश आहे. त्यामुळे नृत्याचा अभ्यासक्रम तयार करताना या विषयांचाही अंतर्भाव असेल असे पहावे.

६) नृत्यासाठी जीवन अर्पिलेल्या व विशेष योगदान दिलेल्या ज्येष्ठ, वृद्ध तसेच दिवंगत नृत्यकलावंतांची ओळख नव्या पिढीला व्हावी या उद्देशाने अशा कलावंतांचे जीवन चरित्र अभ्यासक्रमात नोंदवले पाहिजे. जेणेकरून नव्या पिढीला ते जीवनचरित्र पूरक, मार्गदर्शक ठरेल

७) शैक्षणिक धोरणांतर्गत नृत्य विषय शिकवण्यासाठी नृत्य विषयातील अनुक्रमे पदविका, पदवी व डिप्लोमा प्रमाणपत्रप्राप्त किमान २ उमेदवारांची नृत्य विषय शिकवण्यासाठी योग्यता /पात्रते नुसार नियुक्ती असायलाच हवी, अशी तरतूद असावी.

८) दिग्गज कलाकारांच्या आणि गुरूंच्या कार्याचं, परंपरांचं दृक-श्राव्य दस्तावेजीकरण करण्यासाठी शासनाने विशेष प्रयत्न करायला हवेत. यासाठी नृत्याचं शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांच्या अभ्यासक्रमाचा भाग म्हणून, त्यांची मदत घ्यावी.

९) महाराष्ट्रातील वारसास्थळे नृत्य महोत्सवांसाठी व्यासपीठ म्हणून वापरण्यासाठी काही निकषांसह खुली करावीत.

१०) नृत्यसंबंधीचे सर्व प्राचीन संदर्भ ग्रंथ हे शासकीय ग्रंथालयांमध्ये किंवा शक्य झाल्यास एखाद्या संकेतस्थळावर पाहण्यास विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध असावेत.

११) नृत्य हा सादरीकरणाचा कलाप्रकार आहे. नर्तक व नर्तकी यांस वेशभूषा, केशभूषा, वस्त्र/पेहराव, या दृष्टीनेही तयारी करावी लागते आणि त्यासाठी साह्य देखील लागते. तसेच संगीतसाथ, वाद्य वादन आणि गायन साथ याची देखील आवश्यकता असते.

या सर्व विषयांचे अभ्यासक्रम तयार करावेत ज्यामुळे या क्षेत्रांत काम करू इच्छिणाऱ्या तरुण-तरुणींना मदत होईल.

**९.चित्रपटः-**

१) चित्रपट कला आणि तंत्र, तसेच चित्रपट क्षेत्राशी निगडित विविध अंगांचा अभ्यास करू पाहणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता कौशल्याधिष्ठित चित्रपट प्रशिक्षण विद्यापीठाची स्थापना व्हायला हवी.

२) राज्य चित्रपट महोत्सव, राष्ट्रीय चित्रपट महोत्सव, आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवांमध्ये गौरवलेल्या आणि पुरस्कार विजेत्या चित्रपटांचा एक चित्रपट महोत्सव दर वर्षी राज्याच्या प्रमुख शहरांमध्ये व्हायला हवा. तसंच याच्या जोडीला बालचित्रपट महोत्सवाचे आयोजन देखील करण्यात यावे.

३) टुरिंग टॉकिज व्यवसायाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी वार्षिक आर्थिक अनुदानाची तरतूद असावी.

४) महाराष्ट्रात एक पडदा चित्रपटगृह कमी होत चालली आहेत. मराठी सिनेमाच्या प्रसारात या एक पडदा चित्रपटगृहांचा खूप मोलाचा वाटा आहे. एक पडदा चित्रपटगृह संस्कृतीचे पुनरुज्जीवन होणे गरजेचे आहे, त्यासाठी या चित्रपटगृहाच्या बांधणीकरताच्या जाचक अटी, परवानग्या शिथिल कराव्यात.

५) महाराष्ट्रात चित्रीकरण करण्यासाठी राज्य शासनाची दादासाहेब फाळके चित्रनगरी आणि कोल्हापूर चित्रनगरी या दोन चित्रनगरी कार्यान्वित आहेत. त्याचबरोबर महाराष्ट्रात निसर्गसंपन्न स्थळे, ऐतिहासिक वास्तू विपुल प्रमाणात आहेत. इथे चित्रपटांचं, ओटीटी माध्यमांवरील सिरीज आणि सिनेमांचं चित्रीकरण अधिकाधिक व्हावं यासाठी विशेष प्रयत्न करावेत. अशा ठिकाणांवर होणारं चित्रीकरण हे स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना देते.

६) हिंदी आणि इतर भाषिक चित्रपटांना चित्रपटगृहांकडून वितरित होणारा नफा आणि मराठी चित्रपटांना वितरित होणारा नफा यांच्या दरात तफावत आहे. अन्य भाषांतील चित्रपटांच्या तुलनेत चित्रपटगृहांकडून मराठी चित्रपटांना मिळणाऱ्या नफ्याचा दर कमी आहे. त्यामुळे अन्य भाषिक चित्रपट आणि मराठी चित्रपट यांना चित्रपटगृहांकडून मिळणाऱ्या नफ्याच्या दरात सुसंगतता व समानता आणण्यासाठी शासनाने धोरण आखावे.

७) चित्रपटांच्या चित्रीकरणात अनेकदा प्राण्यांचा सहभाग घेतला जातो. त्यासाठी ‘पीपल फॉर दी एथिकल ट्रीटमेंट ऑफ ॲनिमल’ अर्थात ‘पेटा’ या संस्थेकडून परवानगी घेणे अनिवार्य असते. सध्याच्या घडीला हे कार्यालय चेन्नई येथे आहे. मुंबईतील चित्रपट चित्रीकरणाचे प्रमाण जास्त असल्याने मुंबई येथेही ‘पेटा’ संस्थेचे विभागीय कार्यालय उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करावेत.

८) राज्याच्या आणि देशाच्या आर्थिक वाढीत मनोरंजन विश्वाचाही मोठा वाटा आहे. चित्रपट निर्मितीसाठी विविध कौशल्यांवर आधारित श्रमाचे उपयोजन होते. हे ध्यानात घेऊन चित्रपट निर्मिती क्षेत्रास उद्योगाचा दर्जा द्यावा.

९) मराठी चित्रपट क्षेत्राला प्रदीर्घ आणि समृद्ध परंपरा आहे. या समृद्ध परंपरेची साक्ष देणारे चित्रपट संग्रहालय उभारण्यात यावे.

१०) दर्जेदार मराठी चित्रपट निर्मिती अर्थसहाय्य योजनेंतर्गत देण्यात येणाऱ्या अनुदानाचा लाभ न्याय्य पद्धतीने वितरित होण्याच्या दृष्टीने योजनेच्या अटी/नियमावलीत कालसुसंगत सुधारणा कराव्यात.

११) मराठी चित्रपट क्षेत्रात कार्यरत कलावंतांच्या व्यापक हितासाठी मराठी चित्रपट कलावंत कल्याण मंडळाची स्थापना करावी.

१२) मौजे मुंडेगाव (ता. इगतपुरी जि. नाशिक) येथे शासनाच्या १२७ एकर जागेवर दादासाहेब फाळके चित्रनगरी,गोरेगावच्या धर्तीवर भव्यदिव्य चित्रनगरी उभारण्याचा प्रस्ताव सन २००९ पासून शासनस्तरावर प्रलंबित आहे.मुंबई, ठाणे, पालघर, नाशिक, अहमदनगर या पाच जिल्ह्यांच्या सीमांलगत घोटी-इगतपुरी या ठिकाणी प्रस्तावित चित्रनगरी उभारली गेल्यास चित्रपट निर्मिती संस्थांना चित्रीकरणासाठी सुयोग्य जागा उपलब्ध होईल. हे ठिकाण पाच जिल्ह्यांसाठी मध्यवर्ती असल्याने चित्रीकरणासाठी आवश्यक सोयीसुविधा, दळणवळण व्यवस्था, पूर्व -निर्मिती (Pre-Production) व पश्चात- निर्मितीकरिता (Post-Production) आवश्यक बाबी येथे सुलभरीत्या उपलब्ध होतील. त्यामुळे मौजे मुंडेगाव (ता. इगतपुरी, जि. नाशिक) येथे चित्रनगरीची उभारणी करावी.

**१०.भक्तिसंस्कृती:-**

१) संतपीठाचा अभ्यासक्रम, तज्ञ प्राध्यापक, कुशल कर्मचारी वर्ग ही यंत्रणा अजून बळकट करणे आवश्यक आहे आणि यासाठी शासनाने पुरेशा निधीची तरतूद करावी.

२) विद्यार्थ्यांसाठी निवासी अभ्यासक्रम असावेत. संतपीठातील अभ्यासक्रम विद्यापीठांच्या संलग्न महाविद्यालयांमध्ये सुरु करावा आणि संतपीठातील अभ्यासक्रमांचे प्रमाणपत्र, पदवीस अधिकृत दर्जा देण्यात यावा आणि संतपीठातून देण्यात येणारी पदवी इतर विद्यापीठांच्या पदवीशी समकक्ष असावी.

३) संतपीठास स्वतंत्र विद्यापीठाचा दर्जा देण्यात यावा.

४) राज्यातील शाळा, महाविद्यालयांच्या अभ्यासक्रमात संतसाहित्याचा प्राधान्याने समावेश करण्यात यावा.

५) संत साहित्य दुर्मिळ असल्याने सदर ग्रंथांची छपाई राज्यशासनाने करावी.

६) संत साहित्य हे चित्रपट, सिरीज, नाटके, एकांकिका, लघु चित्रपट या माध्यमातून प्रसारीत करण्यासाठी प्रोत्साहन द्यावे व यासाठी सेन्सॉर बोर्डप्रमाणे संत साहित्य अभ्यासक, तज्ञांची समिती नेमावी.

७) संत साहित्याचे विविध प्रादेशिक भाषेत भाषांतर करण्यासाठी प्रोत्साहन देण्यात यावे.

८) पायी वारी पालख्या, विसावे, मुक्कामाची ठिकाणे यासाठी शासनाने कायमस्वरुपी जागा अधिग्रहीत करून आरक्षित करावी.

९) वारीमार्गांवर वृक्षारोपण करून ही वारी हरितवारी करण्यास प्राधान्य द्यावे.

१०) वारकरी शिक्षण संस्थांची स्वतंत्र नोंदणी करून त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी विशेष योजना राबविण्यात यावी. या सर्व संस्थांना संतपीठाशी संलग्न करण्यात यावे.

११) बस, बसस्थानके, रेल्वे, रेल्वेस्थानके, महामार्ग अशा विविध सार्वजनिक ठिकाणी संतांची वचने, अभंग प्रदर्शित करण्यात यावी.

१२) राज्यातील कीर्तनकार,प्रवचनकार, प्रबोधनकार, निरुपणकार, वारी संप्रदायातील फडकरी, यांच्यासाठी काही निकष ठरवून, मानधन योजना सुरु करावी.

१३) संस्कृत अकादमी स्थापन करण्यात यावी. त्याअंतर्गत संस्कृत साहित्य, वेद, वैदिक अभ्यासक्रमाच्या विविध योजना सुरु कराव्यात. वेदपाठशाळांना सहायक अनुदान देण्यात यावे.

१४) भक्तिच्या परंपरेतून सुरु झालेल्या यात्रा, जत्रा,उत्सव यांना प्रोत्साहन देण्यासाठी तसेच या रुढीपरंपरांचे जतन करण्यासाठी विशेष योजना राबविण्यात यावा.

१५) अदिवासी भक्तिपरंपरेचा प्रचार-प्रसार करणाऱ्या घटकांसाठी प्रोत्साहन योजना सुरु करण्यात यावी.

१ ६) राज्याच्या धार्मिक संस्कृतीचे चित्रण करणारे माहितीपट निर्मीत करुन प्रदर्शित करावे.

१७) प्रतिवर्षी कोजागिरी पौर्णिमेस नाशिक जिल्ह्यातील मुल्हेर येथे हजारो वर्षांची परंपरा असलेल्या महाभारतकालीन ‘रासउत्सव आणि सामाजिक समरसतेचे प्रतिक असलेला चक्रारोहण सोहळा शासनातर्फे मोठ्या प्रमाणात साजरा केला जावा व संपूर्ण महाराष्ट्रास परिचित व्हावा.

# प्रकरण ७



# अन्य महत्त्वाच्या शिफारशी

## प्रकरण ७

**अन्य महत्त्वाच्या शिफारशी:-**

संस्कृती या विषयाचा अवकाश खूप विस्तृत आहे, त्याचा कालपटहजारो वर्षांचा आहे आणि त्यातील सूक्ष्म विविधता अक्षरशः गणनेच्या पलीकडची आहे. त्यामुळे या विषयाच्या खोलात जेवढे जावे तेवढे कमीच अशी वास्तविक स्थिती आहे. असे असले तरी यापैकी पेहराव, खाणेपिणे, दागदागिने, इत्यादी विषय प्रत्येक समाजाला एक विशिष्ट ओळख मिळवून देतात. ही ओळख टिकली तरच तो समाज त्याच्या वैशिष्टपूर्णतेसह टिकून राहू शकतो. त्यातही पुन्हा आपली वस्त्रप्रावरणे, आपले खाद्यपदार्थ आणि आपले सणसमारंभ या सगळ्यांच्या मागे काही एक विचार आहे. ज्याप्रमाणे नुसतेच अंग झाकण्यासाठी आपण कपडे वापरत नाही त्याप्रमाणेच केवळ जगण्यासाठी आपण खात नाही. सुसंस्कृत जगातील आपला वावर त्या त्या समाजातील जीवनदृष्टीला अभिव्यक्त करत असतो. भारतीय संस्कृतीच्या बाबतीत हे प्रकर्षाने जाणवते. त्यामुळेच संस्कृतीच्या व्यापक परीघामध्ये येणाऱ्या काही विषयांबाबत महाराष्ट्रीय/मराठी समाज म्हणून आपली ओळख टिकून राहण्याच्या दृष्टीने काही मुद्दे विचारार्थ सूचना या स्वरुपात नमूद करत आहोत.

**कृत्रिम बुद्धिमत्ता:-**

कृत्रिम बुद्धिमत्तेसारख्या नव्या आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा अनेक क्षेत्रांवर परिणाम होऊ घातला आहे. सांस्कृतिक क्षेत्रही याला अपवाद नाही. हा विषय आत्ता जरी नवा वाटत असला तरी तंत्रज्ञानाच्या प्रगतीचा आणि ते सर्वसामान्यांपर्यंत पोहोचण्याचा वेग बघता, या परिणामांची आजच चिकित्सा करुन काही ठोस शिफारशी करणे आवश्यक आहे, असे मत समितीतील अनेक सदस्यांनी मांडले. त्यामुळे समितीने या नव्या तंत्रज्ञानांशी संबंधित मुद्द्यांचा आढावा घेऊन, थोडक्यात काही शिफारशी सुचविल्या आहेत. त्या पुढीलप्रमाणे:-.

१) चित्रकारांच्या कामाची नक्कल कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून, हुबेहूब वाटावीत अशी चित्रं निर्माण करून ग्राहकांना फसवणं आणि अर्थात कलाकारांचं नुकसान केलं जाऊ शकतं. ही शक्यता या आधी देखील घडत आहे पण कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून तर ते अधिकच सहज शक्य होणार आहे. त्यामुळे केंद्र सरकारच्या मदतीने या पायरसीला आळा बसेल आणि अशी पायरसी करणाऱ्यांना शोधण्यासाठी सरकारने कडक कायदे करावेत.

२) कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून संगीतकाराची ट्यून किंवा गायकाचा आवाज हुबेहूब वापरणं अगदी सहज शक्य झालं आहे. त्यामुळे गायकाला किंवा संगीतकाराला अगदी अंधारात ठेवून काम करणं शक्य झालं आहे. हा धोका अगदी उंबरठ्यावर येऊन थांबला आहे. त्यामुळे असा कन्टेन्ट कुठल्याही प्लॅटफॉर्मवर अपलोड होणार नाही किंवा तो कुठून केला गेला आहे याचा तातडीने शोध लागावा म्हणून शासनाने केंद्र सरकारशी पाठपुरावा करून संबधीत कंपन्यांना काही प्रणाली विकसित करण्यासाठी आग्रह धरावा.

३) साहित्यचौर्य हे तर आता अगदी सर्रास होत आहे. हे थांबवण्यासाठी कंपन्यांनी अशी काही प्रणाली विकसित केली पाहिजे, ज्यात चौर्य केलेलं साहित्य कुठल्याही समाजमाध्यमांवर किंवा एखाद्या संकेतस्थळावर अपलोड होतानाच त्यावर प्रतिबंध किंवा मूळ लेखकाचं स्वामित्व हक्क मान्य करूनच करता येईल.

या सर्व धोरण सूचना या केंद्राच्या सूचित येतात आणि त्यामुळे शासनाने या विषयावर केंद्र सरकारशी पाठपुरावा करणारी तज्ज्ञांची समिती नेमावी.

**पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीसह अन्य शासकीय संस्था आणि विद्यापीठांमधील कला विभागांमधील समन्वय व अकादमीला स्वायत्तता:-**

पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीसह जे. जे. स्कूल ऑफ आर्ट तसेच नव्याने स्थापन झालेले भारतरत्न लता मंगेशकर संगीत विद्यापीठ आणि राज्यातील विविध विद्यापीठांमध्ये कार्यरत असलेले संगीत, नाट्यशास्त्र आणि तत्सम विभागांमध्ये अधिक समन्वय घडून येण्याची आवश्यकता आहे. सांस्कृतिक क्षेत्रातील सर्व शासकीय संस्थांना अधिक प्रभावीपणे कार्य करण्यासाठी, आवश्यक ते अधिक आर्थिक सहाय्य देऊन, पुरेसे सक्षम करून आवश्यक त्या संस्थांना आवश्यक तिथे पुरेशी स्वायत्तता देण्याबाबत लवकरात लवकर निर्णय होणे आवश्यक आहे, जेणेकरून या संस्थांना पुढे शासनाच्या निधीवर अवलंबून न राहता स्वतंत्रपणे कलाक्षेत्रासाठी भरीव काम करता येईल. विद्यमान शासनाने पु. ल. देशपांडे कला अकादमीच्या नूतनीकरणासाठी प्रथमच अतिशय भरीव असा ९५ कोटींचा निधी उपलब्ध करून दिला, ही अभिनंदननीय बाब आहे. तथापि, अकादमीचे स्वतःचे भरीव उत्पन्न असतानाही, अकादमीला आर्थिक निर्णयांबाबत स्वायत्तता नसल्याने अनेक अडचणी निर्माण होतात ज्यावर शासनाने त्वरित ठोस उपाययोजना करणे आवश्यक आहे. आता अकादमीचे नूतनीकरण झाल्यानंतर, या संपूर्ण कायापालट झालेल्या जागेत विविध संस्कृतिक उपक्रम सुरू करून अकादमीला देशाच्या केंद्रस्थानी आणण्याची संधी उपलब्ध झाली आहे. यासाठी शासनाने अकादमीला लवकरात लवकर एक भरीव निधी व पुरेसा कर्मचारीवर्ग देऊन स्वायत्तता द्यावी, ही शिफारस करण्यात येत आहे.

**पेहेराव:-**

राज्याच्या अतिशय वैविध्यपूर्ण वैशिष्ट्यपूर्ण अशा पेहेराव संस्कृतीचे जतन संवर्धन होण्यासाठी या क्षेत्राशी निगडित असणाऱ्या सर्व प्रकारच्या घटकांना अर्थसाहाय्य देणे, कौशल्य विकास अंतर्गत प्रशिक्षण देणे, विशेष अभ्यासक्रम सुरू करणे, तयार झालेल्या मालाला बाजारपेठ मिळवून देणे, प्रदर्शने आयोजित करण्यासाठी सहकार्य करणे, या क्षेत्राला वित्तपुरवठा करणे, आयात व निर्यात होणार विशेष तरतूद करणे, कच्च्या मालाचा मुबलक पुरवठा करणे, जनतेमध्ये वस्त्र संस्कृती विषयक रसास्वादन कार्यशाळा आयोजित करणे, याक्षेत्राशी संबंधित असणाऱ्या संघटना, संस्था व व्यक्ती यांना आर्थिक व इतर प्रकारचे सहकार्य करणे, वस्त्र संस्कृतीशी निगडित दुर्मिळ घटकांचे जतन व संवर्धन करणे, लोप पावलेल्या घटकांचे दस्तऐवजीकरण करणे या व अशा प्रकारच्या उपायोजना सुचवण्यात येत आहेत.

**खाद्य:-**

खाद्य संस्कृतीतील एक महत्त्वाचा घटक म्हणजे रानभाज्या. रानभाज्यांचे प्रदर्शन घेऊन रानभाज्या उत्पादन व विक्रीला प्रोत्साहन देणे, वेगवेगळ्या ठिकाणी परंपरागत पाक कलाकृतींचे आयोजन करणे, पारंपरिक खाद्य प्रकार जपणाऱ्या हॉटेल्स, व्यक्ती, संस्था यांना प्रोत्साहन देणे, पारंपरिक खाद्य संस्कृती विषयीच्या स्पर्धांचे आयोजन करणे, पारंपरिक खाद्य संस्कृतीच्या शिक्षण आणि प्रशिक्षणास चालना देणे, खाद्य संस्कृतीशी निगडित असणाऱ्या विविध घटकांना आर्थिक सवलती देणे, पारंपारिक खाद्य विक्री करणाऱ्या व्यक्ती / संस्था / संघटना यांना बाजारपेठ व तत्सम सुविधा उपलब्ध करून देणे या व अशा प्रकारच्या सूचना या धोरणात सुचवण्यात येत आहेत.

**आभूषण संस्कृती:-**

राज्याची समृद्ध आभूषण संस्कृती टिकून राहावी व तिचे संवर्धन व्हावे, यासाठी वेगवेगळ्या कार्यशाळा, प्रदर्शने, चर्चासत्रे आयोजित करण्यात यावीत. परंपरागत आभूषण संस्कृतीशी निगडित असणारे उत्पादक, ग्राहक व विक्रेते, कारागीर, यांना आर्थिक व इतर सवलती देण्यात याव्यात. आभूषणांची संग्रहालये उभी करण्यात यावीत, या क्षेत्रात संशोधन करू इच्छिणाऱ्या संशोधकांना आर्थिक सहकार्य करावे, कच्च्या मालाचा पुरवठा व बाजारपेठ उपलब्ध करून द्याव्यात, उत्खननामध्ये सापडलेल्या आभूषणांचा संग्रह करावा.

**सण आणि उत्सव:-**

राज्यातील कृषी संस्कृतीशी निगडीत ईर्जिक, खळंजेवण, रानसितळाई, धावलोट,धाड बांधणी, वाफ धावणी, पांडव पूजन पाणी पूजन, नांगरपूजा, वेळा अमावस्या तसेच नागपंचमी, पोळा, पाडवा, दिवाळी, शिमगा, वटपौर्णिमा, घटस्थापना, भाकनूक, यासारख्या सण-उत्सवांचे दस्तऐवजीकरण करणे, वेगवेगळ्या कृषी प्रदर्शनांमधून या घटकांची माहिती देणे, याबाबतच्या कार्यशाळा आयोजत करणे, कृषी पर्यटन आणि ग्रामीण पर्यटनाला चालना देणे, कृषी संस्कृतीची ओळख असणाऱ्या विविध घटक, वस्तू, साहित्य यांचे संग्रहालय तयार करणे, कृषी विभागाच्या योजनांची सांगड या सण-उत्सावांशी घालणे, लोककलांच्या माध्यमातून या विषयांची माहिती देणे, ग्रामीण संस्कृती व कृषी संस्कृती विषयक विशेष शब्दकोश तयार करणे, शालेय विद्यार्थ्यांना कृषी संस्कृतीची माहिती देणारा अभ्यासक्रम अंतर्भूत करणे.

**मौखिक परंपरा:-**

मौखिक परंपरेतून जपल्या गेलेल्या कथा, कविता, कोडी, गाणी , विविध विधी, उत्सव, खेळ, कला, रूढी-परंपरा या बाबींचे जतन, वहन आणि संवर्धन करण्यासाठी मौखिक परंपरांचे दस्तऐवजीकरण करणे, मौखिक परंपरांवर काम करणाऱ्या संशोधकांना विशेष शिष्यवृत्ती जाहीर करणे, मौखिक परंपरावर साहित्य प्रकाशित करण्यास प्रोत्साहन देणे व आर्थिक मदत करणे, मौखिक परंपरा विषयी सांस्कृतिक घटकांचे सादरीकरण करणे व महोत्सव घेणे.

**संकीर्ण:-**

स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये संस्कृती व पर्यटन या विषयाची विषय समिती तयार करणे आणि त्यासाठी पुरेसा निधी राखीव ठेवणे.भारतातील ज्या ज्या ठिकाणी मराठी लोकसंख्या जास्त प्रमाणात आहे त्या ठिकाणच्या मराठी समुदाय व महाराष्ट्र यांच्यात सांस्कृतिक सेतुबंध निर्माण करण्यासाठी सांस्कृतिक कार्य विभागात एक विशेष कक्ष स्थापन करण्यात यावा. ज्या ठिकाणी मराठी लोकसंख्या आहे त्या ठिकाणी महाराष्ट्राच्या संस्कृतीचे दर्शन घडवणारे महोत्सव कार्यक्रम आयोजित करणे व त्या राज्यातील मराठी समुदायांचे कार्यक्रम महाराष्ट्रामध्ये आयोजित करणे.

जगामध्ये ज्या ठिकाणी मराठी लोकसंख्या मोठ्या प्रमाणात आहे तेथील समुदाय व सांस्कृतिक कार्य विभाग यांच्यामध्ये आंतरदेशीय सांस्कृतिक सेतुबंध निर्माण करणे व महोत्सवांच्याद्वारे संस्कृतीचे आदान प्रदान करण्यासाठी विशेष प्रयत्न करणे. महाराष्ट्रातील लोकवाद्यांचे संग्रहालय तयार करून दस्तऐवजीकरण करणे.नाटक विषयक साहित्य, संहिता प्रॉपर्टीज यांचे संग्रहालय तयार करणे, चित्रपट विषयक साहित्य, कॅमेरा तांत्रिक बाबी, संहिता यांचे संग्रहालय निर्माण करणे.

# प्रकरण ८



# उपसंहार

## **प्रकरण ८**

**उपसंहार:-**

संस्कृती म्हणजे जीवनशैली! समृद्ध जीवन जगण्याकरता ज्या-ज्या गोष्टी मानवी जीवनाशी संबंधित असतात, त्या सर्व गोष्टींचा समुच्चय म्हणजेच संस्कृती होय! इरावती कर्वे म्हणतात "मनुष्य व्यक्तिश: व समुदायश: जी जीवनपद्धती निर्माण करतो आणि जीवन साफल्यार्थ, स्वत:वर व बाह्य विश्वावर संस्कार करून जे आविष्कार करतो, ती पद्धती किंवा तो आविष्कार म्हणजे संस्कृती होय!"

संगीत, नृत्य, नाट्य, चित्रपट, लोककला, भक्ती, कारागिरी, भाषा, ग्रंथ व वाचन संस्कृती आणि दृश्य कला संस्कृती याबरोबरच खाद्य, पेहेराव, आभूषण, कृषी, लोकोत्सव, आदिम, वाद्य, मौखिक परंपरा, दुर्मिळ व लोप पावत चाललेले कलाप्रकार, नवमाध्यम संस्कृती, नवमनोरंजन संस्कृती, खेळ संस्कृती, आरोग्य संवर्धन संस्कृती यावं यासारख्या अशा कितीतरी संस्कृतींचे जतन संवर्धन आणि वाहन होणे आवश्यक आहे त्यासाठी ठोस उपाययोजना सुचवण्यात येत आहेत. संघटनात्मक, संस्थात्मक, शैक्षणिक, लोकसहभागात्मक, आर्थिक माध्यमातून या संस्कृतीचे जतन संवर्धन व वहन होईल अशी धारणा आहे.

# जोडपत्र



# १० उपसमित्यांच्या मूळ शिफारशी

## १. कारागिरी उपसमितीच्या मूळ शिफारशी

१. दर पाच वर्षांनी सांस्कृतिक आढावा घेण्यात यावा.
२. कारीगिरीचे कौशल्य शिक्षण देणे आवश्यक आहे. हे शिक्षण मोफत देण्यात यावे.
३. कारागिरांना कच्च्या मालाचा सवलतीच्या दरात पुरवठा होणे आवश्यक आहे.
४. समाजातील कारागिरांची स्वतंत्र ओळख निर्माण होणे गरजेचे आहे. जेणेकरुन अशा कारागिरांना शासकीय योजनांचा लाभ देता येईल.
५. कारागिरांकडून निर्मित पक्क्या मालास भाव मिळणे आवश्यक आहे.
६. कारागिरांना कारीगीरीची कला, कौशल्य जोपासता यावे याकरिता त्यांना सुविधा उपलब्ध करुन देण्यात याव्यात.
७. कारागिरांच्या आर्थिक उन्नतीकरिता त्यांना आर्थिक पाठबळ पुरविणे गरजेचे आहे.
८. आधुनिक वस्त्रनिर्मिती करण्यावर भर देण्याचे धोरण अवलंबवावे लागेल.
९. वनौषधी निर्मिती हा एक महत्वाचा भाग असून त्यावर भर देणे आवश्यक आहे.
१०. कारागिरांना व समाजातील इतर घटकांना कारीगीरी विषयक प्रशिक्षण देणे आवश्यक आहे.
११. कारागीर मेळाव्यासारख्या साधनांचा वापर करुन कारागीरी कलेस उत्तेजन देणे गरजेचे आहे.

**कृती आराखडा :**

१. राज्यातील सांस्कृतिक वारसा केवळ जतन करून चालणार नसून त्यात सुधारणा करणे आवश्यक आहे. त्यामुळे बेकारी नियंत्रणात येईल. यासाठी कारागिरांना कारीगीरी कौशल्याचे प्रशिक्षण देणाऱ्या विविध प्रकारच्या संस्था निर्माण करणे आवश्यक आहे. या संस्थामध्ये शिक्षण सर्वांना मोफत असले पाहीजे. तरी काही विशिष्ट उदयोग कौशल्य असणाऱ्या समाजासाठी प्रवेश आरक्षित असला पाहीजे. उदा. बांबूकाम कारीगीरीचे प्रशिक्षण देणाऱ्या संस्थेत बुरुड समाजासाठी जागा राखीव असणे आवश्यक आहे. परंपरागत ज्ञानाचा वापर करून बेकारी नियंत्रणात येईल. जसे की तांबट समाजच उदयोजक बनेल व इतर लोकांना सामावून घेवू शकेल व लघुउदयोजक वाढतील.

**२.** कारागिरांची सर्वात मोठी समस्या म्हणजे कच्च्या मालाची अनुप्लब्धता. याकरिता तालुका, जिल्ह्याच्या ठिकाणी रेशन दुकानासारखी कच्चा माल पुरवठा केंद्रे उभी करावीत. शासनाकडून दोन रुपये किलो दराने धान्य दिले जाते त्याच धर्तीवर या रेशन दुकानांमध्ये सवलतीच्या दरात कच्चा माल उपलब्ध व्हावा. यासाठी रेशनकार्ड सारखे कारागीरकार्ड तयार करुन त्यावर त्यांना बांबू, चामडे, सुत, तांबे, पितळ, पत्रा, माती, दगड इ. उपलब्ध करुन द्यावेत.

**३.** कारागिरांचे जनगणना करावी. या कारागिरांच्या जनगणनेतून तयार झालेल्या माहितीचा सखोल अभ्यास करुन त्यावरुन कारागिरांना वर उल्लेख केल्याप्रमाणे कारागीरकार्डे वितरीत करण्यात यावीत.

**४.** कारागिरांनी तयार केलेला पक्का माल विकण्याकरिता स्वतंत्र सरकारमान्य विक्री केंद्रे उभारण्यात यावीत. ही विक्री केंद्रे तालुका, जिल्ह्यांच्या ठिकाणी तसेच तिर्थक्षेत्रांच्या ठिकाणी उभारावीत. या केंद्रांसाठीची खरेदी सरकारने हमी भावाने करावी व त्याच्या विक्रीतून होणारा नफा त्या त्या कारागिरी करणाऱ्या समाजाच्या विकासासाठी वापरण्यात यावा.

**५.** कारागिरांनी तयार केलेला पक्का माल विदेशापर्यंत जाण्याच्या दृष्टीने उपाययोजना करण्यात याव्यात. कारागिरांच्या उत्थानाकरिता कारागीर संकुलांची उभारणी करावी. या संकुलांमध्ये कारागिरांना पूरक अशा सुविधा निर्माण कराव्यात. जसे की कारागिरांसाठी निवास व्यवस्था, त्यांना कारीगीरी करण्यासाठी आवश्यक त्या सोई व जागा. आधुनिक तंत्राचे प्रशिक्षण सदर कारागीरी वर्गांना देण्यात यावे. प्रत्येक मोठया कारागीरीचे संकुल प्रामुख्याने स्वंतत्र करण्यात यावे. तसेच छोटया कारागीराचे संकुल हे एकत्रित करता येऊ शकते. यामुळे कारीगीरीपासून दूर जाणारी कारागिरांची मुले कारीगीरीकडे वळतील. तसेच, सर्व समस्यांचे उत्तर एकत्रितपणे शोधणे सोपे होईल. महाराष्ट्रातील मुंबई शहरातील धारावी झोपडपटटी मध्ये असंख्यं प्रकारचे कारागीर कार्यरत असून व्यवसाय करीत आहेत.

६. कारागिरांसाठी आर्थिक विकासाचा आराखडा शासनाकडून तयार करण्यात यावा. शासनाने अभ्यास करून पाच किंवा दहा वर्षांसाठी आरखडा तयार करावा. प्रत्येकाचा विकास साधण्याची योजना असावी. तसेच कारागिरांना प्रोत्साहन देण्यात यावे.

**७.** कारागिरांच्या उन्नतीकरिता कारागीर घरकुल योजना राबवावी. या योजनेमध्ये कारागिराच्या कारीगीरी प्रकारानुसार घरकुल प्रकार असावा.

८. कोष्टी समाजाकडे कोणताही व्यवसाय राहीला नाही. त्यांना आधुनिक वस्त्रनिर्मितीकडे आकर्षित केले पाहीजे. कोष्टी समाजासाठी कापसाचे उत्पादन आरक्षीत करण्यात यावे व त्यांना याबाबत आधुनिक प्रशिक्षण देण्यात यावे.

**९.** वैदू समाजाच्या कारागिरास औषध निर्मितीसाठी शासनाने प्रोत्साहन दिले पाहीजे. याकरिता वनौषधी उद्योग योजना राबवावी. या माध्यमातून सांस्कृतिक वारसा मोठया प्रमाणात वाढेल.

१०. कला-कौशल्य-कारागीरी विश्वविद्यालयाची स्थापना करण्यात यावी. यामध्ये परंपरागत ज्ञानावर आधारीत शिक्षण तथा प्रशिक्षण देण्यात यावे. हे एक मुक्त विद्यापीठ असावे. या विश्वविद्यालयाचे उपकेंद्र प्रत्येक जिल्ह्यात व जेथे कारागीर वस्त्या आहेत अशा ठिकाणी असावे.

११. कारागिरांचे क्रयशक्ती वयानुसार कमी होते. यास्तव वय निवृत्तीनंतर कारागिरांना निवृत्तीवेतन देण्यात यावे.

१२. शासनातर्फे महाराष्ट्रात विभागवार कारागीर मेळावे आयोजित करण्यात यावेत. यामध्ये कारांगिरातर्फे निर्मित वस्तूंचे प्रदर्शन व विक्री व्हावी.

## २. भाषा,साहित्य आणि ग्रंथव्यवहार व वाचनसंस्कृती उपसमितीच्या मूळ शिफारशी

### धोरणसूचना

**मराठी भाषा**

भाषेमुळे ज्ञानाचे संचयन होते. भाषा स्थळ कालाच्या मर्यादा ओलांडून संक्रमित होते. ती एकीकडे व्याकरण तसेच लेखन पद्धतीचा मान राखते आणि दुसरीकडे काळाच्या ओघात त्या नियमांना वेगळे वळण देते, आशयाला ताजेपणा आणते.

महाराष्ट्राची निर्मिती ही भाषावार प्रांतरचनेच्या तत्वानुसार झाली आहे. त्यामुळे मराठी भाषेचे संवर्धन करणे हे शासनाचे व समाजाचेही कर्तव्य आहे. पूर्वीपासून समृद्ध असलेली मराठी भाषा आधुनिक काळाची आव्हाने पेलण्यासाठी सर्व अंगांनी विकसित व्हायला हवी.

आदिवासी जीवन, लोककला, चित्रपट, नाटक, चित्रकला, अभिनय, ऐतिहासिक वारसा वगैरे सर्वच सांस्कृतिक बाबींचा भाषेशी निकटचा संपर्क असतो कारण या साऱ्या क्षेत्रांशी संबंधित सर्व प्रकारचे लेखन शेवटी मराठी भाषेतच होत असते. त्या दृष्टीने एकूणच सर्व सांस्कृतिक क्षेत्राचा पाया भाषेशी निगडीत आहे, त्यामुळे तो पाया म्हणजेच मराठी भाषा अधिक संपन्न, समृद्ध आणि समावेशक ज्ञानभाषा व्हायला हवी. तिच्या वापरकर्त्यांना तिच्याद्वारे रोजगारही प्राप्त व्हायला हवा. त्याशिवाय भाषेचे अस्तित्वच धोक्यात येईल. ही काळाची गरज आहे.

- मराठी ही आपली राजभाषा आहे. तिला आपल्या राज्यात लोकव्यवहार, राज्यकारभार, न्याययंत्रणा अशा सर्व ठिकाणी अनिवार्य असे मानाचे स्थान मिळावे. त्यासाठी महाराष्ट्रात सर्व स्तरांवर व सर्व प्रसंगी मराठी भाषेचा व लेखनपद्धतीचा योग्य व अचूक वापर करणे व त्यासाठी आग्रह धरणे.
- मातृभाषेत शिक्षण ही नव्या युगाची नांदी आहे. ते नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणही आहे. त्यामुळे मराठी-हिंदी-इंग्रजी असे त्रिभाषासूत्र सर्व पातळ्यांवर लागू करणे. त्यासाठी मराठी भाषा विभागाला मनुष्यबळ आणि अधिकार देणे व ते धोरण कणखरपणे राबवणे.
- राज्यातील सर्व पातळीवरील विविध शैक्षणिक बोर्डांच्या, इंग्रजी वा अन्य कोणत्याही माध्यमाच्या, अनुदानित अथवा विनाअनुदानित अशा सर्व शाळांमध्ये मराठी शिक्षण किमान चार वर्षे सक्तीचे करावे. यात कोणतीही सवलत, सूट वा पळवाट ठेवू नये.
- क्रमिक पाठ्यपुस्तकांची रचना भाषेची, वाचनाची गोडी लागेल अशी असावी.
- बोली नामशेष होवू नयेत, त्यांचे संवर्धन व्हावे म्हणून सरकारने सर्वतोपरी प्रयत्न करावेत. मात्र त्याचबरोबर बोलीभाषांच्या आग्रहात दिसून येणाऱ्या स्थानिक अस्मिता आणि प्रमाणभाषेची आवश्यकता ह्यांच्यातील संतुलन सांभाळणेही अतिशय गरजेचे आहे.
- राज्यकर्ते आणि वरिष्ठ अधिकारी यांनी आवर्जून मराठीचाच वापर करावा. विशेषत: माध्यमांसमोर जाताना मराठीतच बोलावे. यातून जनतेला आणि प्रशासनाला योग्य तो संदेश मिळेल. ते आवश्यक आहे.

**साहित्य**

समाजाची सांस्कृतिक समृद्धी वाढावी यासाठी साहित्य हे एक प्रभावी माध्यम आहे. साहित्याच्या वाचनाने आपल्याला अवतीभवती सुरू असणाऱ्या घटनांचे आणि एकूण जगाचे एक व्यापक आकलन

होण्यास मदत होते. अशा साऱ्या घटनांना आपल्याकडून दिला जाणारा प्रतिसाद अर्थपूर्ण होतो. विविध कला, प्रवास, नाटक, चित्रपट या सगळ्याचा आपण अधिक छान आस्वाद घेऊ शकतो. एक सुजाण नागरिक घडण्यास तर साहित्याची मदत होतेच शिवाय आपले जगणे निश्चित अधिक आनंददायी होते.

- उत्तम साहित्यनिर्मितीसाठी सर्वतोपरी प्रयत्न करणे. मराठीतील साहित्य केवळ मराठी भाषिकांपुरते मर्यादित न ठेवता त्याचा इतर भारतीय भाषांमध्ये प्रसार करणे.
- एकाच साहित्य संमेलनांना भरघोस मदत करण्यापेक्षा विभागीय स्तरावर होणाऱ्या संमेलनाला आर्थिक मदत करावी.
- मराठी भाषा विभागांतर्गत चार संस्था काम करीत आहेत. त्यांच्यात सुसूत्रता आणणे आणि त्यांच्या कारभारात नोकरशाहीचा हस्तक्षेप कमीत कमी राहील हे पाहणे.
- शासकीय संस्थांनी प्रकाशित केलेली विविध पुस्तके, विश्वकोश, परिभाषा कोश, बोलीभाषा कोश असे सर्व साहित्य अधिकाधिक लोकांपर्यंत पोचेल असे पहावे. यातील काही प्रकल्प अपूर्ण असल्यास ते त्वरेने पूर्ण करावेत.
- सर्व प्रकारचे कोश शक्यतो पीडीएफ स्वरूपात प्रकाशित करून डाउनलोड स्वरूपात सर्वांना विनामूल्य उपलब्ध करावेत. संदर्भ ग्रंथ यापुढे छापील स्वरूपात प्रारंभी अगदी मोजक्या प्रती काढाव्यात. गरज असेल तेव्हा आणखी प्रती print on demand पद्धतीने आता कमी कालावधीत उपलब्ध करता येतात.

**ग्रंथव्यवहार व वाचनसंस्कृती**

- ग्रंथालये व ग्रंथपाल म्हणजे साहित्य आणि वाचक यातील दुवा आहे हे लक्षात ठेवून राज्यभर ग्रंथालये सक्षम करणे, कार्यक्षम व जाणते ग्रंथपाल कसे तयार होतील याकडे लक्ष पुरवणे.
- लेखकांना पुरस्कार दिले जातात तसे ग्रंथपालांना गौरवण्यात यावे. ग्रंथपालांच्या समस्यांवर संमेलनात चर्चा असावी. एका आदर्श ग्रंथपालाचा सत्कार तेथे व्हावा.
- ग्रंथालय संचालनालय सध्या तंत्रशिक्षण मंत्रालयाधीन आहे ते मराठी भाषा विभागाला जोडले जावे.
- महाराष्ट्रातील दूरदर्शन / आकाशवाणी अशा सर्व केंद्रावर मराठी अधिकारी असावेत. यासाठी राज्य सरकारने केंद्राकडे सतत पाठपुरावा करावा.
- नॅशनल बुक ट्रस्ट, राज्यसभा, संसद भवन, लोकसभा, राष्ट्रपति भवन येथील सचिवालयात मराठी संपादक, अनुवादक अशी पदे रिकामी राहणार नाहीत याकडे राज्य सरकारने लक्ष ठेवणे अतिशय आवश्यक आहे. राज्यशासनाची, राज्यभाषेची प्रतिमा केंद्रात ठसठशीत असावी यासाठी हे महत्वाचे आहे.
- शासकीय पातळीवर अनेक विभागातून ग्रंथखरेदी होते. त्यात सुसूत्रता असावी. खरेदीचे निकष एखाद्या तज्ज्ञ समितीने ठरवावेत.
- ग्रंथालय कर्मचाऱ्यांचा अनेक वर्षे प्रलंबित राहिलेला वेतनवाढीचा व नेमणुकांचा प्रश्न त्वरित सोडवावा.

## कृतिसूचना

**मराठी भाषा**

- शासकीय कामकाजात वापरले जाणारे मराठी फार अवघड आणि क्लिष्ट असते. शासकीय कामकाजात सोप्या मराठी भाषेचा वापर व्हावा. त्यासाठी काही नवीन संज्ञा, लेखनकोश तयार करावा. सामान्य जनता व अमराठी अधिकारी अशा मराठीला अधिकच बिचकतात, त्यांना मराठी न शिकण्याची एक सबबही मिळते. अमराठी लोकांचे मराठी भाषा शिकणे सुलभ व्हावे यासाठी साधने, कार्यशाळा, अभ्यासक्रम उपलब्ध करून देणे.
- शासकीय कर्मचाऱ्यांसाठी अचूक व चांगल्या मराठीच्या वापरासाठी एखादा प्रशिक्षण वर्ग असावा. तो केल्यास एखादी प्रोत्साहनपर वेतनवाढ त्यांना मिळावी. ह्याच धर्तीवर खाजगी उद्योगातून काम करणाऱ्या अमराठी कर्मचा-यांना प्रोत्साहन देण्यासाठी खाजगी क्षेत्राला शासनाने आवाहन करावे. ते प्रशिक्षण त्यांनाही उपलब्ध करून द्यावे.
- देशभरातील विविध विद्यापीठात, शाळात मराठी शिकवण्यासाठी शिक्षक मिळत नाहीत ही तक्रार दूर करता येईल. त्यासाठी प्रशिक्षित भाषा शिक्षक तयार करावे लागतील.
- इंग्रजी माध्यमातून शिकलेल्यांना, तसेच मराठी ज्यांची मातृभाषा नाही अशांना निदान प्राथमिक पातळीवरील मराठी शिकवणारा अभ्यासक्रम तयार करणे व तो राज्यभर जागोजागी व्यापक प्रमाणावर राबवणे.
- जुजबी व्यावहारिक मराठीची एक पुस्तिका प्रकाशित करावी. रेल्वे स्थानक, विमानतळ येथे त्याचे वितरण व्हावे. इंग्रजी माध्यमातून शिकलेल्यांना तसेच मराठी ज्यांची मातृभाषा नाही, अशांना निदान प्राथमिक पातळीवरील मराठी शिकवणारा अभ्यासक्रम तयार करणे.
- ही उपसमिती महाराष्ट्रातील विद्यापीठांच्या मराठी भाषा विभागांना भेटी देत असताना तिथे आपापल्या कार्यक्षेत्रात राहणाऱ्या आदिवासींच्या बोलींच्या संबंधाने संशोधन सुरू असल्याचे समितीच्या निदर्शनास आले. हे स्तुत्य आहे.
- जाहिराती तयार करताना जे अनुवादक म्हणून काम करतात, त्यांच्याकडून केले जाणारे चुकीचे शब्दप्रयोग वा चुकीच्या भाषेचा वापर घातक ठरतो आणि लोकमानसात चुकीचेच शब्द, वाक्यरचना रूढ होते. त्याचप्रमाणे वृत्तपत्रे आणि इलेक्ट्रॉनिक माध्यमे यांनी देखील याबाबतीत अधिक जागरूक राहणे आवश्यक आहे. रोजच्या व्यवहारात अलीकडे भाषेच्या वापरात लोक बेपर्वाई दाखवतात. त्यामुळे जाहिरातदारांबरोबरच माध्यमांनी मुद्रितशोधकांची नेमणूक करावी. यासाठी एखादी यंत्रणा उभारून तिला कार्यवाहीचे अधिकार द्यावेत. (इंग्रजीत स्पेलिंगच्या चुका कोणीच खपवून घेत नाही.पण मराठीत मात्र असे लक्ष दिले जात नाही.)
- मराठीत चांगले डीटीपी करणारे फार कमी आढळतात. त्यासाठी विशेष प्रशिक्षण वर्ग सुरू व्हायला हवेत. घरच्या घरीही करता येईल आणि त्यातून अर्थार्जन होऊ शकेल असा हा अभ्यासक्रम असेल. त्यासाठी जाहिरातसंस्थांशी साहित्यविषयक संस्थांनी जोडून घ्यायला हवे. या क्षेत्रात काम करणारे बऱ्यापैकी आर्थिक उत्पन्नदेखील मिळवू
  शकतात व त्यामुळे तरुणांना मराठी कॉपीरायटिंग करण्याचे शिक्षण द्यायला हवे.

- पूर्वप्राथमिक स्तरावर मुलांना जेव्हा अक्षरओळख होते, लेखनाचा सराव केला जातो, त्याचवेळी प्रमाणभाषेचे लेखन व शिक्षण देणे आवश्यक आहे. तेथील शिक्षक हे त्या दृष्टीने प्रशिक्षित असावेत अशी अट शासनाला ठेवणे शक्य आहे.
- संगणकांच्या उपयोगासाठी जे कळफलक (कीबोर्ड) वापरले जातात, त्यातही इंग्रजीतील स्पेलचेकसारखे साधन बसवावे. तसेच संगणकासाठी वापरसुलभ परिवर्तनीय (convertible) अक्षरवळण (font) प्रचलित करावे.
- परभाषांतून आलेले पण आता लोकांच्या बोलण्यात रुजलेले शब्दही समाविष्ट करणारा महाशब्दकोश तयार करावा. उदाहरणार्थ रिपोर्ट, स्टेशन, ट्रेन, टॅक्सी, बस, टेन्शन, सर्जरी किंवा मोबाइल यांसारखे शब्द. असा शब्दकोश एकदा करून पुरेसे नसते तर त्यात दर चार-पाच वर्षांनी भर घालावी लागते. त्यासाठी एखादी कायमस्वरूपी यंत्रणा उभारायला हवी. या बाबतीत ऑक्सफर्ड किंवा वेबस्टर यांचे उदाहरण अभ्यासावे.
- ज्यांना संस्कृतची पार्श्वभूमी नाही अशांची संख्या खूपच मोठी आणि वाढती आहे. त्यांना येणाऱ्या अडचणी समोर ठेवून व्याकरणाच्या नियमांचे आधुनिकीकरण आणि सुलभीकरण करणे. विशेषतः -हस्व-दीर्घ लिहिताना योग्य काय, चूक काय हे ठरवताना याचा खूप उपयोग होईल.
- महाराष्ट्र सरकार मराठी विद्यापीठ स्थापन करणार आहे. त्यासाठी बराच निधीदेखील उपलब्ध होईल. त्याचा योग्य तो वापर होऊन मराठीच्या संवर्धनासाठी हे विद्यापीठ विविध उपक्रम राबवू शकेल. या विद्यापीठाच्या उभारणीत मराठीतील तज्ज्ञ व साहित्यिकांचा सहभाग मिळवायला हवा.
- महत्त्वाच्या अशा बोलीभाषांसंबंधी अनेक उपक्रम आखले गेले. त्यांपैकी काही पूर्ण झाले आहेत, काहींचे काम अजून चालू आहे. या सर्वांमध्ये सुसूत्रीकरण करणे अगत्याचे आहे. अन्यथा मनुष्यबळ व आर्थिक बळ यांचा व्यय होत राहील. राज्य मराठी विकास संस्थेमार्फत महाराष्ट्रभरातील बोली भाषांचे, भाषातज्ज्ञांच्या मदतीने भाषाशास्त्रानुसार ध्वनिमुद्रण व माहिती संकलन झालेले आहे. त्यासंबंधीचा कोश लवकरच जनतेला उपलब्ध होईल. या कोशाची माहिती जनतेला देऊन, तिचे परीक्षण तज्ज्ञांमार्फत करून, त्यातील (असल्यास) दोष दूर करून त्याच्या पुढील टप्प्याचे काम चालू करणे आवश्यक आहे.
- उच्च शिक्षणाचा व त्यासाठी पुस्तकांचा विचार करायचा झाला तर चित्र दिसते ते असे की कुठल्याही ज्ञानशाखेत इंग्रजी क्रमिक पुस्तकांचा आधार घेतल्याशिवाय आज आपण उच्च शिक्षण घेऊ शकत नाही. कारण त्यासाठी आवश्यक त्या दर्जाची पुस्तकेच मराठीत पुरेशा प्रमाणात उपलब्ध नाहीत. त्यामुळे मराठीत उच्चशिक्षणास आवश्यक अशी क्रमिक पुस्तके लिहिण्याला जास्तीत जास्त प्रोत्साहन द्यायला हवे. हा दीर्घकाळ चालू राहणारा उपक्रम असेल आणि तो चिकाटीने सुरू ठेवावा लागेल. सर्व विषयांवर मराठीत उत्तम पुस्तके लिहिली गेली तरच एक ज्ञानभाषा म्हणून मराठी विकसित होऊ शकेल.

**साहित्य**

- आपल्याकडे एकूणच दस्तावेजीकरणाची आवश्यकता व महत्त्व याकडे अक्षम्य दुर्लक्ष होते. आज साहित्यदृष्ट्या महत्त्वाचे कागदपत्र, साहित्यिकांचा दुर्मिळ पत्रव्यवहार यांची अवस्था फारच वाईट

आहे. त्यामुळे त्यांचे जतन करण्याची कायमस्वरूपी व्यवस्था सांस्कृतिक समितीने करावी. तसेच महत्त्वाच्या लेखकांची, ज्ञानपीठ, साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त साहित्यिकांची हस्तलिखिते, टिपणे, त्यांचे साहित्य जतन करणे आवश्यक आहे.

- दर वर्षी निवडक शंभर उत्तम मराठी पुस्तकांचा निदान हिंदी आणि इंग्रजीत अनुवाद करून घेणे. त्यांपैकी पन्नास नवीन पुस्तके आणि पन्नास जुनी पुस्तके निवडावीत. त्यासाठी साहित्याच्या सर्व प्रकारांचा विचार केला जावा. अशी निवड करण्यासाठी खास समिती नेमावी. त्याशिवाय उत्तम अनुवादक तयार व्हावेत म्हणून विशेष प्रयत्न करावेत.
- ‘लोकराज्य’ हे मासिक गेली 75 वर्षे शासनातर्फे प्रकाशित आणि वितरित केले जाते. त्याच्या काही लाख प्रती दरमहा छापल्या जातात. पण साहित्यिक चर्चेत त्याचा उल्लेखही सहसा होत नाही. ते मासिक आणि इतरही अनेक शासकीय प्रकाशने अधिक लोकाभिमुख करून ती सर्वसामान्य लोकांपर्यंत पोचवणे. त्यातून साहित्यसृष्टी आणि समाज यांच्यातील अंतर कमी करता येईल.
- सर्व प्रकारच्या साहित्यिक उपक्रमांत लोकसहभाग वाढवणे. त्यासाठी शालेय आणि महाविद्यालयीन पातळीवरील सर्व अध्यापकांचा सहभाग मिळवणे. संमेलनांचा किंवा अन्य तत्सम उपक्रमांचा सर्वच्या सर्व खर्च शासकीय अनुदानातून भागवण्याऐवजी त्यासाठी शक्य तितका निधी, लोकवर्गणीतून उभारायला उत्तेजन देणे. सरकारने शक्यतो ‘मॅचिंग ग्रँट’ द्यावी, पण सर्व भार स्वतः उचलू नये. कुठलाही उपक्रम लोकांना आपलासा वाटायला हवा असेल तर त्यात जास्तीत जास्त लोकसहभाग असायला हवा.
- वर्तमान परिस्थितीत दूरदर्शनची ‘सह्याद्री’ वाहिनी अथवा आकाशवाणीची अस्मिता वाहिनी येथे एकूणच मराठी साहित्याधारित कार्यक्रम, साहित्यिक गप्पांसारख्या मुलाखती यांना वेळच दिला जात नाही. या केंद्रीय खात्यांमध्ये मराठी विभागाचा संचालकही मराठी नसतो. याबाबत शासकीय उदासीनता मोठी आहे. त्याबाबत फार तातडीने कारवाई होणे आवश्यक आहे.
- शाळांनी विद्यार्थ्यांसाठी भित्तीपत्रकांच्या स्वरूपात नियतकालिके सुरु करावीत. त्यामुळे विद्यार्थ्यांना भाषेद्वारे व्यक्त होण्याचा सराव होईल व त्यांना भविष्यात लेखक, कवी म्हणून घडणे सोपे जाईल.
- मोडी लिपीत लिहिलेले हजारो जुने कागद आहेत ज्यांचे मराठीकरण कधीच झालेले नाही. पूर्वी काही काम करून झाले आहे पण 90 टक्के काम अजून बाकी आहे. अशी लाखो कागदपत्रे पुणे, सातारा, कोल्हापूर, नागपूर, इंदूर, ग्वाल्हेर, तंजावर, हैद्राबाद येथे आणि भारतातील अनेक अन्य ठिकाणीही उपलब्ध आहेत. अनेक मुस्लिम राज्यकर्तेदेखील त्या काळी त्यांचे दप्तर मोडीत ठेवत. हा फारच महत्त्वाचा पण दुर्लक्षित भाग आहे. ते कागद अत्यंत जीर्ण झाले आहेत. त्या साऱ्यातून इतिहासावर अगदी वेगळा प्रकाशझोत पडू शकेल. त्यादृष्टीने मोडी लिपी अवगत आहे अशांची नेमणूक करावी आणि हे काम शासनाने पूर्ण करावे.

**ग्रंथव्यवहार व वाचनसंस्कृती**

- ग्रंथालयांचे सध्याचे स्वरूप आमूलाग्र बदलणे आवश्यक झाले आहे. ग्रंथालय हे केवळ पुस्तकांशी निगडीत न ठेवता ते त्या परिसरातील सांस्कृतिक केंद्र (समाजकेंद्र या अर्थाने) बनावे. वाचनसंस्कृती

वाढवताना मूल्यविचार अत्यंत महत्त्वाचा मानावा कारण नैतिक मूल्ये आणि संस्कृती यांचा निकटचा संबंध आहे व त्यादृष्टीने या गोष्टीची कार्यवाही करावी.

- जिल्ह्यांमधील शासकीय ग्रंथालये ही मुख्य केंद्रे ठेवून वाचनाची उत्सुकता जागृत होईल असे कार्यक्रम योजणे गरजेचे आहे. जिल्हानिहाय किंवा तालुकानिहाय असे उपक्रम आखल्यास अनेकांना सहभागी होता येईल. ग्रंथालये ही अशी छोटी संमेलने भरवू शकतील आणि तेथील साहित्यिकांशी संवाद साधू शकतील. अभ्यासक्रमात ज्यांच्या साहित्याचा अंतर्भाव आहे अशा लेखकांच्या भेटी, त्यांच्या मुलाखती घडवून आणणे देखील उपयोगी ठरेल.
- माध्यमिक शाळांमधील ग्रंथालये सक्षम करणे, तिथे उत्तम ग्रंथपाल नेमणे अतिशय आवश्यक आहे. कारण साधारण पाचवी, सहावी, सातवीत असतानाच मुलांना नैसर्गिकरीत्या वाचनाची आवड लागू शकते. त्यानंतर वाचनाची आवड निर्माण करणे खूपच अवघड आहे. प्रत्येक मोठ्या ग्रंथालयाला जोडून अभ्यासिका असावी.
- शालेय स्तरावर वाचनविषयक आवड रुजवण्याचे आटोकाट प्रयत्न करणे आवश्यक आहे. त्यासाठी केवळ एका दिवसाचा वाचक दिन किंवा तत्सम कार्यक्रमांचा उपयोग होत नाही. नेहमीसाठीचे, दीर्घकालीन उपाय योजायला हवेत. साहित्याची, काव्याची आवड ही लहान वयात समूहवाचनाने किंवा समूहगायनाने लागू शकते. त्यासाठी शालेय अभ्यासक्रमात वेळ राखावा. विद्यार्थ्यांची या बाबतीतील वर्षभराची प्रगती पाहून गुण, पुरस्कार दिले जावेत.
- ग्रंथालयांमध्ये पुस्तकांप्रमाणेच नियतकालिकेही उपलब्ध असायला हवीत. त्यांचीही नियमित खरेदी होत राहणे आवश्यक आहे. दिवाळी अंकांचाही यात समावेश असावा
- ग्रंथविक्री, ग्रंथप्रदर्शने, स्थानिक पातळीवर साहित्यचर्चा असे उपक्रम ग्रंथालयांमार्फत राबवावेत.
- भाषा आणि ग्रंथ व्यवहार या क्षेत्रात काम करणारे अनेक लोक / संस्था आहेत. ते विखुरलेले आहेत. अधूनमधून यांना एकत्र आणता आले तर पाहता येईल. या बाबतीत काही स्वयंसेवी संस्था, माजी शिक्षक, मुख्याध्यापक, सरकारी अधिकारी, पालक, ज्येष्ठ नागरिक अशा लोकांच्या संघटना आपल्याला मदत करतील.
- ग्रंथ प्रकाशन व्यवसायात आवृत्ती आणि पुनर्मुद्रण या बाबत कमालीचा गोंधळ आहे. शिवाय आवृत्ती किती प्रतींची म्हणावी याबाबत काही संकेत वा एक धोरण निश्चित केले जावे.
- शासकीय पातळीवर होणा-या ग्रंथखरेदीत पुस्तकांची गुणवत्ता आणि किंमत तसेच त्यांची बाजारातील प्रचलित किंमत यांचा काही संबंध असतोच असे नाही. अशा सर्व खरेदीसाठी एखादी शासनमान्य सूची असावी ती प्रतिवर्षी संपादित करावी.
- प्रत्येक तालुक्यात किमान दहा उत्तम ग्रंथालये निर्माण करावीत.
- ग्रंथालयाला नवीन सभासद मिळवून दिल्यास त्यांना अगदी अल्प का होईना काही लाभ द्यावा. जसे मुंबईत बेस्ट बसच्या वाहकाला प्रत्येक तिकीटामागे 5 पैसे बोनस मिळतो.
- सर्व अनुदानित शाळांमध्ये ग्रंथपाल असतोच असे नाही. ते पदच मान्यताप्राप्त नसते व ग्रंथालयाची अधिकची जबाबदारी एखाद्या शिक्षकावर सोपवली जाते. अशी जबाबदारी घेणाऱ्या शिक्षकाला काही वेतनवाढ मिळावी.

- नवीन शैक्षणिक धोरणानुसार विशेषतः प्राथमिक शाळेत आता भाषा शिक्षणाला (आणि तेही मातृभाषा) महत्व आले आहे. प्रत्येक शाळेत प्राथमिक असो वा माध्यमिक आठवड्यातून किमान दोन तासिका वाचनासाठी असाव्यात.
- शासकीय स्तरावर प्रत्येक शाळेत डॉ. अब्दुल कलाम वाचनकट्टा सुरू झाला आहे. त्यात एक ग्रंथपेटी असते. या पेटीचे दर दोन वर्षानी पुनर्भरण करावे. त्यातील पुस्तके काळजीपूर्वक निवडणे आवश्यक आहे. आठवड्याला दोन शैक्षणिक तासिका वाचनासाठी असणे अपेक्षित आहे. त्या वेळात सर्व विद्यार्थ्यांना ही पुस्तके उपलब्ध व्हावीत. अशा उपक्रमात पालक संघटना, निवृत्त शिक्षक यांना सहभागी करून घेत येईल. मनुष्यबळ कमी पडते तर लोकसहभाग वाढवणे हाच उपाय आहे.
- महत्त्वाचे साहित्यपुरस्कार मिळालेली पुस्तके प्रत्येक ग्रंथालयात पोचवावीत.
- ज्या पुस्तकांची मागणी गेल्या 7-8 वर्षात वाचकांनी केली नाही वा ती वाचली नाहीत. अशा पुस्तकांमुळे वाचनालयाची जागा अडवली जाते आहे. त्यांना बाद करण्याची परवानगी शासनाने ग्रंथालयांना द्यावी. त्यामुळे ती जागा इतर पुस्तकांना उपलब्ध होईल आणि वाचकांना साहित्यिकांचे नवीन, वेगळे साहित्य वाचायला मिळेल.
- महाराष्ट्र राज्याच्या प्रत्येक जिल्ह्यात जिल्हाधिकाऱ्यांनी स्थानिक साहित्य संस्था, शिक्षण संस्था यांच्या सहकार्याने प्रत्येक वर्षी जिल्हा ग्रंथोत्सवाचे आयोजन करावे. त्यासाठी महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती-मंडळा मार्फत जिल्हाधिकाऱ्यांना अनुदान मिळत असते. राज्य सरकारने प्रचलित अनुदानात भरीव वाढ करावी. ग्रंथोत्सवात स्थानिक लेखक,कवी, कलावंताचा सहभाग असावा. दोन दिवसीय ग्रंथोत्सवात जिल्ह्यातील लेखक / कवींच्या ग्रंथांच्या प्रदर्शनासाठी एखादा गाळा राखून ठेवण्यात यावा.
- पुस्तक विक्री प्रदर्शनासाठी येणाऱ्या वितरक / प्रकाशकांना जरूर तेवढे गाळे पुरवण्यात यावेत. त्यासाठी जिल्हा प्रशासनाने नाममात्र भाडे आकारावे. ग्रंथोत्सवामध्ये स्थानिकांचा सहभाग मिळवावा.
- सर्व सांस्कृतिक कार्यक्रम, शासकीय कार्यक्रम, सार्वजनिक सभा, संमेलने यात स्वागत करताना पुष्पगुच्छ, तुळशीचे रोप, फळांची करंडी अशा वस्तू न देता केवळ पुस्तकेच द्यावीत. मराठी भाषा विभाग आणि सांस्कृतिक खाते यांनी तसा आदेशच काढावा. तसेच शासनाच्या इतर विभागांना आणि राज्यातील सर्व शैक्षणिक, सामाजिक आणि सांस्कृतिक संस्थांना तसे आवाहन करावे.

**संकीर्ण**

- मराठीचे संवर्धन हे केवळ शासनाचेच नव्हे तर महाराष्ट्रात राहणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचेही कर्तव्य आहे. म्हणूनच सर्व शासकीय उपक्रमांत जास्तीत जास्त लोकांनी व्यक्तिगत पातळीवरदेखील सहभागी व्हावे यासाठी विशेष प्रयत्न व्हायला हवेत. प्रत्येक व्यक्तीने घरात आणि घराबाहेर आग्रहपूर्वक मराठी बोलणे हे साधे पाऊल उचलले तरी खूप फरक पडू शकेल. त्यादृष्टीने महाराष्ट्र शासनाने पुढील 20-25 वर्षांचे परिप्रेक्ष्य समोर ठेवून पाच- सात-दहा तज्ज्ञांचे एक 'मराठी भाषा आणि साहित्य संवर्धन महामंडळ' स्थापन करावे. सध्याच्या साहित्य संस्कृती मंडळ, राज्य मराठी विकास संस्था, भाषा संचालनालय, मराठी भाषा विभाग, विश्वकोश मंडळ, ग्रंथालय संचालनालय

वगैरे सहा-सात संदर्भित शासकीय संस्था तिच्याशी संलग्न कराव्यात. तिच्या सदस्यांनी हे पूर्णवेळचे काम मानावे आणि त्यासाठी आवश्यक ती आर्थिक आणि व्यवस्थापकीय तरतूद शासनाने करावी. त्यांची नेमणूक किमान पाच वर्षांसाठी असावी. समितीच्या शिफारशींवर जाहीर चर्चा व्हावी, आणि त्यातून वेगवेगळे कृतिगट तयार व्हावेत. सामान्यतः कुठलेही शासन दीर्घकाळासाठी धोरण न ठरवता पाच-एक वर्षांपुरताच विचार करते. त्यातही दोन-तीन वर्षे अहवाल तयार होण्यातच निघून जातात. एकूण कामात फारसे गांभीर्य राहात नाही. विशिष्ट कामासाठी नेमलेल्या अशा समितीच्या जेमतेम दोन-तीन बैठका होतात आणि त्यातून फारसे काही निष्पन्न होत नाही. घाईघाईने अहवाल सादर केला जातो आणि त्यावरही पुरेशी कार्यवाही होतेच असे नाही, असा पूर्वानुभव आहे. ह्या शिखरसमितीने जाणीवपूर्वक वेगळा पायंडा पाडावा. 'मराठीचे संवर्धन' हा एककलमी कार्यक्रम समोर ठेवून पुढील २०-२५ वर्षांत आपण प्रत्यक्षात काय करू हे या शिखरसमितीने ठरवावे, अशी आग्रहाची विनंती आहे.

- राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग, साहित्य संस्कृती मंडळ अशा एकूण चारपाच संस्था आहेत. मराठी भाषेचा उत्कर्ष हेच त्यांचे उद्दिष्ट दिसते. पण याबाबतीत आजपर्यंत नेमके त्या संस्थेने काय केले आहे आणि एकच काम दोन संस्था करत आहेत का हे तपासून या सर्व संस्थांची पुनर्रचना करावी. त्यांच्या कामात नोकरशाहीचा कमीत कमी सहभाग असावा. एकच काम वेगवेगळ्या ठिकाणी करण्याची गरज नाही. कामाची पुनरावृत्ती टाळावी.
- आकाशवाणी व दूरदर्शनचा मराठी विभाग यांच्याकडे नामवंत मराठी साहित्यिक, गायक, कलाकार यांच्या कार्यक्रमाच्या दुर्मिळ ध्वनिफिती व चित्रफिती आहेत. शासनाने त्यांचे दस्तावेजीकरण करायला हवे. हा अमूल्य ठेवा आज नष्ट होण्याच्या वाटेवर आहे. असे संग्रह अनेक खाजगी संग्राहकांकडेही आहेत. तेही मिळवण्यासाठी प्रयत्न करायला हवेत.
- आजची महाराष्ट्राची संस्कृती कशी आहे याचे दर्शन परप्रांतीयांना आणि परदेशातील लोकांना घडावे, यासाठी फिरती प्रदर्शने तयार करणे. लेणी आणि किल्ले तसेच लावणी आणि अभंग यांच्यापलीकडचे असे आधुनिक महाराष्ट्र संस्कृतीचे दर्शन त्यातून घडायला हवे. उदाहरणार्थ, महाराष्ट्रातील समाजसुधारणांची परंपरा किंवा महाराष्ट्रातील सहकारी चळवळ अशा अनेक गोष्टींचा त्यात समावेश करणे.
- आज आपल्यावर विशेषत: युवा पिढीवर साहित्य, संस्कृती, धर्म या कुठल्या विषयापेक्षा तंत्रज्ञानाचा अधिक प्रभाव आहे. त्यांचे जगणेच तंत्रज्ञान नियंत्रित करू लागले आहे. वाचन संस्कृती समोर हे मोठे आवाहन आहे. तंत्रज्ञानाचा सकारात्मक वापर करून साहित्य आणि वाचन संस्कृती या क्षेत्रात अनेक उपक्रम करता येतील. त्याचबरोबर त्याचे होणारे दुष्परिणाम टाळावे लागतील. तंत्रज्ञानाचा वाढता प्रभाव लक्षात घेऊन त्या संदर्भात त्या क्षेत्रातील जाणकार आणि साहित्यिक अशांची एक स्वतंत्र समिती नेमावी. ती समिती पुढील मुद्दे विचारात घेऊ शकेल.
- मोबाइल : त्यांचा गावोगावी झालेला प्रसार. त्याचे वाचनसंस्कृतीवर झालेले प्रचंड आक्रमण. फुकट वाचायची जवळजवळ सार्वत्रिक झालेली सवय. त्याचे लेखकाचे अर्थार्जन आणि प्रकाशन व्यवसाय

यांच्यावर होणारे दुष्परिणाम. याचा आरोग्यावर होणारा परिणामही खूप घातक आहे. डिजिटल ॲडिक्शन खूप गंभीर विषय आहे.

- प्रिंट ऑन डिमांड तंत्रज्ञान : अतिशय मर्यादित खप असणारी पुस्तकेच बव्हंशी प्रकाशित होणे. लेखकाने स्वतःच पुस्तके प्रकाशित करणे. त्यातील संपादकीय संस्कारांचा अभाव व त्यामुळे ढासळलेला दर्जा.
- आर्टिफिशियल इंटेलिजन्स : अनेक प्रकारच्या लेखनासाठी यामुळे आता लेखकांची गरजच उरणार नाही. ललितसाहित्यदेखील या तंत्रज्ञानामुळे प्रचंड प्रमाणावर निर्माण होईल. ते सगळे वाचायला वाचकाकडे वेळच उरणार नाही ही शक्यता लक्षात घेऊन त्यावर आधीच विचार करायसाठी त्यातील जाणकारांचा सल्ला घेणे.
- आधुनिक माध्यम व्यवहारात टीव्ही मालिकांसाठी लेखन, पटकथा लेखन, जिंगल्स बनवणे, मीम्स किंवा छोटे व्हिडिओ बनवणे, जाहिरातींचे लेखन (कॉपी रायटींग), विपणन किंवा प्रसार याच्यासाठी कंटेंट तयार करणे वगैरे अनेक मार्गांनी उत्तम अर्थार्जन करणे शक्य झाले आहे. अशा व्यक्तींची खूप गरजही आहे. निव्वळ मराठी शिकून रोजगार मिळणे आज कठीण आहे. पण अशा विविध अभ्यासक्रमांचा शिक्षणात समावेश केला तर त्यातून अनेक व्यावसायिक प्रशिक्षित होतील आणि त्यातून एकूणच भाषा आणि साहित्य यांना उत्तेजन मिळेल.
- सांस्कृतिक धोरणात काही प्रमाणात तरी राष्ट्रीय विचार व्हायला हवा. त्या दृष्टीने दर वर्षी एकातरी अन्य भाषेतील श्रेष्ठ साहित्यिकाला विशेष पुरस्कार द्यायची प्रथा पाडावी. अन्य राज्यांसाठीही हा एक उत्तम पायंडा ठरेल. त्यातून राष्ट्रीय एकात्मतादेखील वाढीस लागेल.

## ३. दृश्य कला उपसमितीच्या मूळ शिफारशी

१) **कलाशिक्षण**

शालेय कलाशिक्षण

धोरण - बालवयापासून दृश्यकलेची अभिरुची वाढावी यासाठी विशेष प्रयत्न करणे आवश्यक असते. असे प्रयत्न पूर्व प्राथमिक, प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षणात अंतर्भूत करणे आवश्यक असते या तत्वाला जागतिक मान्यता आहे. ते कसोशीने आचरणात आणण्यात येईल.

सूचना -

- प्राथमिक शिक्षणात चित्रकला शिक्षण देताना उस्फूर्तता, सहजता आणि बालसुलभ अभिव्यक्तीला प्राधान्य देण्यात यावे.
- माध्यमिक शिक्षणात निरीक्षण, अचूकता, कौशल्य, प्रमाणबद्धता आणि तर्क सुसंगत सृजनशील अभिव्यक्तीला प्राधान्य देण्यात यावे.
- इयत्ता आठवी पर्यंत चित्रकला हा विषय अनिवार्य असावा.
- इयत्ता नववी व दहावी साठी चित्रकला हा विषय ऐच्छिक ठेवावा. तो निवडल्यास क्रीडा, या विषयाप्रमाणे अतिरिक्त गुण देण्याची व्यवस्था असावी.

- चित्रकला विषय शिकवण्यासाठी प्रशिक्षित चित्रकला शिक्षकाची नेमणूक करणे अनिवार्य असावे (**ATD/GD ART DIPLOMA/ AM/ B.F.A / M.F.A** पेंटिंग, स्कल्पचर किंवा उपयोजित कलेतील पदविका/ पदवीधारक) अशा चित्रकला शिक्षकांच्या नेमणुका गेल्या कित्येक वर्षात केल्या गेल्या नाहीत, त्या तातडीने करण्यात याव्यात .
- प्राथमिक व माध्यमिक चित्रकला विषयाच्या अभ्यासक्रमाचा कालसुसंगत व नवीन शैक्षणिक धोरण (**NEP**) प्रमाणे पुनर्रचना करण्यात यावी.
- प्रत्येक शाळेत आदर्श व सुसज्ज चित्रकला वर्ग (ड्रॉईंग हॉल) असावा. त्यामध्ये विविध विषय व विविध शैलीतील मान्यवर चित्र शिल्पकारांची छापील चित्रे फ्रेम करून लावण्यात यावीत.
- या खास चित्रकला वर्गात चित्र शिल्प कलेवरील समृद्ध ग्रंथ संग्रह असावा व तो विद्यार्थ्यांना अभ्यासण्यासाठी उपलब्ध करावा.
- विद्यार्थ्यांना गोष्टी रूपाने व मनोरंजक पद्धतीने महाराष्ट्र व भारताच्या कला वैभवाची ओळख करून देण्यात यावी.

**<u>महाविद्यालयीन कलाशिक्षण</u>**

धोरण - शालेय शिक्षणानंतर विविध शारवांच्या शिक्षणास सुरवात होते. त्यात दृश्यकलेच्या शिक्षणाअंतर्गत विविध प्रकारचे अभ्यासक्रम राबविले जातात. त्यात कालानुरूप बदल, सुसूत्रता आणि नवीन अभ्यासक्रमास (**NEP**) अनुसरून बदल करण्यात येतील.

<u>सद्यस्थिती</u> - महाराष्ट्रात सध्या दृश्यकला शिक्षण क्षेत्रात गोंधळाची परिस्थिती आढळते. कारण त्यात सुसूत्रता, समन्वय आणि योग्य नियोजन अशा अत्यावश्यक गोष्टींचा अभाव आहे. सध्या महाराष्ट्रात शासकीय, शासनमान्यता प्राप्त, अनुदानित, विनाअनुदानित अशी अनेक प्रकारची कला महाविद्यालये कार्यरत आहेत. त्याद्वारे पुढील अभ्यासक्रम राबवले जातात.

१. चित्रकला
२. शिल्पकला
३. कला व कारागिरी
४.कलाशिक्षक प्रशिक्षण
५.उपयोजित कला
६. पदव्युत्तर पदवी

या अभ्यासक्रमांतर्गत पदविका, पदवी व पदव्युत्तर पदवी अशा शैक्षणिक अभ्यासक्रमांची सुविधा आहे.

त्यातील सर जेजे स्कूल ऑफ आर्ट च्या आवारातील तीनही संस्थांचे अभिमत विद्यापीठ सुरू होण्याची शासनमान्य प्रक्रिया सुरू झाली आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातील उर्वरित कलाशिक्षणात सुसंगतता आणण्यासाठी व गमावलेला दर्जा प्राप्त करण्यासाठी ही समिती पुढील निरीक्षणे नोंदवू इच्छिते.

महाराष्ट्रात **१९६५** मध्ये खास कला संचालनायालयाची स्थापना करण्यात आली. असे कला संचालनालय स्थापन करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य होते. तेव्हापासून कलाशिक्षण व दृश्यकलेला प्रोत्साहन, प्रचार, प्रसार आदि गोष्टी कला संचालनालया तर्फे केल्या जाव्यात अशी अपेक्षा होती.

- कला संचालनालया मार्फत राबविले जाणाऱ्या अभ्यासक्रमांना कोणत्याही अधिकृत शासनमान्य अभ्यासबोर्डाची मान्यता नाही. त्या मुळे **UGC, NCERT,** अश्या संस्थाकडे या अभ्यासक्रमांची नोंद नाही.त्यांची मान्यता मिळवणे अत्यंत आवश्यक आहे. ती नसल्यामुळे विविध प्रकारच्या शिष्यवृत्या, अनुदान व नोकरी मिळवण्यासाठी कला संचालनालयाच्या परीक्षा उतीर्ण झालेले विद्यार्थी पात्र ठरत नाहीत.
- कला संचालनालय अस्तित्वात येऊन 58 वर्ष उलटली असूनही महाराष्ट्र शासनाच्या वित्त विभागात कलाशिक्षण आणि कलासंचालनालयाकरीता स्वतंत्र पोर्टफोलिओ आणि आर्थिक तरतूद नाही.
- चित्रकला ग्रेड परीक्षांचे आयोजन, महाविद्यालयीन कलाशिक्षण आणि राज्य कलाप्रदर्शनाचे आयोजन या व्यतिरिक्त कला संचालनालयकडून कोणतेही विधायक कार्य केले जात नाही, हे वास्तव आहे.

या पार्श्वभूमीवर गेल्या काही वर्षात कला संचालनालयाचे व्यवस्थापन, दर्जा व लौकिक कमालीचा खालावत गेला आहे. हे या समितीने केलेल्या दौऱ्यामध्ये मिळालेल्या प्रतिक्रिया मधून निदर्शनास आले आहे. या परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी ही समिती पुढील सूचना करू इच्छिते.

सूचना -

- दृश्यकला व कारागिरी या विषयांचे शिक्षण देण्यासाठी संपूर्ण महाराष्ट्राचा विचार करता **NEP** नुसार एक स्वतंत्र “कला व कारागिरी विद्यापीठ” स्थापन करणे ही काळाची गरज आहे. दृश्यकला व कारागिरी या विषया अंतर्गत कालानुरूप व **NEP** नुसार अभ्यासक्रम तज्ञांच्या समितीमार्फत तयार करून या नवीन विद्यापीठामार्फत संपूर्ण महाराष्ट्रभर राबवण्यात यावा.
- सद्यस्थितीत महाराष्ट्रात अस्तित्वात असलेल्या शासकीय, शासनमान्य अनुदानित, शासनमान्य विनाअनुदानित महाविद्यालयांपैकी कला व कारागिरी विद्यापीठाचे निकष पूर्ण करणारी कला महाविद्यालये या विद्यापीठाचे अभ्यासक्रम अमलात राबवण्यास पात्र ठरतील.
- या प्रस्तावित कला व कारागिरी विद्यापीठातर्फे सर्टिफिकेट, पदविका, पदवी, पदव्युत्तर पदवी आणि पीएचडी चे संशोधन इत्यादी अभ्यासक्रम राबवले जावेत.
- महाराष्ट्रातील कला व कारागिरी प्रशिक्षण या विषयासाठी स्वतंत्र विद्यापीठ स्थापन करून कला संचालनालयाला कलाशिक्षण क्षेत्राच्या जबाबदारीतून मुक्त करणे योग्य ठरेल, अशा निर्णयाला ही समिती अनेकाची मते जाणून घेतल्या नंतर आली आहे.

- हा निर्णय घेतल्या नंतर कलासंचालनालयाने 1896 पासून घेण्यात येणाऱ्या एलिमेंटरी व इंटरमिजीएट या चित्रकला ग्रेड परीक्षा अधिक चांगल्या प्रकारे घ्याव्यात. या शिवाय कला संचालनालयाने महाराष्ट्रातील दृश्य कलेचा प्रचार व प्रसार याचे कार्य जोमाने करावे.

(सध्या राज्यकला प्रदर्शना व्यतिरिक्त कला संचालनायालया तर्फे दृश्यकलेच्या बाबतीत इतर काहीही कार्य गेले कित्येक वर्ष केले जात नाही, हे वास्तव खेदाने आणि नाईलाजाने नमूद करावे लागत आहे. अपेक्षा अशी आहे की सांस्कृतिक कार्य संचालनालया तर्फे लालीतकलेसंदर्भात ज्या प्रकारे प्रचार, प्रसार व स्पर्धात्मक उपक्रम राबविले जातात. तसे कला संचालनायालया तर्फे व्हावे, असे या समितीला वाटते.)

- महाराष्ट्र शासनातर्फे कला संचालनालयाला सल्ला देण्यासाठी, मार्गदर्शनासाठी **१९६५** मधील स्थापने पासून आर्ट कौन्सील (कला सल्लागार मंडळ) नेमले जात असे. त्यात महाराष्ट्राच्या विविध भागातून ज्येष्ठ कलावंत व कलातज्ञांची नेमणूक होत असे. परंतु कला संचालनायालयाच्या गलथान कारभारात गेली अनेक वर्षे हे सल्लागार मंडळ नियुक्त करण्याचे टाळण्यात आले आहे. अशा सल्लागार मंडळाची नियुक्ती विनाविलंब करावी.
- महाराष्ट्रातील दृश्यकला शिक्षणाच्या क्षेत्रात **१९७०** पासून नवीन अभ्यासक्रम शिकविला जातो. परंतु तो योग्य प्रकारे राबवण्यासाठी **५३** वर्ष उलटली असूनही पाठ्यपुस्तके, (कला इतिहास व सौंदर्यशास्त्र व आदी विषयांचे संदर्भग्रंथ) संदर्भ ग्रंथांची यादी निर्मितीच करण्यात आलेली नाही. ही त्रुटी शासनातर्फे दूर करण्यात यावी व स्वतंत्र कला व कारागिरी विद्यापीठ निर्माण होण्यापूर्वी अशा विषयाची पाठ्यपुस्तके तयार करावीत.
    - नव्याने निर्माण होणाऱ्या स्वतंत्र कला व कारागिरी विद्यापीठातर्फे आवश्यक त्या शिष्यवृत्ती, पाठ्यवृत्ती व संशोधन शिष्यवृत्ती (**RESEARCH SCHOLERSHIP**) सुरू करण्याची नितांत गरज असून त्यातूनच महाराष्ट्रातील दृश्यकला व कारागिरी संदर्भातील जागरूकता वाढेल.

२. **<u>प्रोत्साहन, प्रचार व प्रसार</u>**

धोरण- कोणत्याही कलेच्या बाबतीत बालवयापासून सातत्याने प्रोत्साहन मिळाल्यास कलावंताचा उत्साह वाढतो. त्यातून त्याच्या निर्मितीवर सकारात्मक परिणाम होतो. म्हणूनच विद्यार्थी दशेत तसेच त्या नंतरच्या काळातही तरुण व ज्येष्ठ कलावंतांना विविध प्रकारे प्रोत्साहित करण्याची गरज असते. त्यातून व ललित कला अकादमीच्या प्रादेशिक केंद्रासारख्या इतर काही योजना आखून कलेचा प्रचार व प्रसार करणे आणि त्या सोबतच शासनाने राज्यातील इतर कला शिक्षण संस्थांना कामाच्या संधी देणेही आवश्यक असते. या संदर्भात आवश्यक त्या विविध योजना आखून कारवाई केली जाईल.

<u>सूचना- शालेय व महाविद्यालयीन पातळीसाठी</u>

- मुंबईत जवाहर बाल भवन ही शासनाची संस्था **१९५२** पासून कार्यरत आहे. ती पुनर्जीवित होणे आवश्यक आहे. या संस्थेच्या विभागीय शाखा निर्माण करून त्यांच्यातर्फे राज्य, जिल्हा व

स्थानिक स्तरावरील बालचित्र कला स्पर्धांचे वर्षभरात किमान एक वेळा आयोजन करण्यात यावे त्यातील निवडक लहान मुलांना पारितोषिके व प्रमाणपत्रे देण्यात यावी.

- बालभवन तर्फे ज्या ठिकाणी शासकीय अथवा खाजगी संग्रहालये असतील, त्या ठिकाणी आणि कलावंतांच्या स्टुडिओत, गणपती कारखान्यास विशेष नैपुण्यप्राप्त बालकलाकारांच्या भेटी आयोजित कराव्यात.
- महाविद्यालयीन विद्यार्थी विभागाच्या राज्य कला प्रदर्शनाचे महाराष्ट्र राज्यात विविध ठिकाणी आयोजन करण्यात यावे. त्यानिमित्ताने सचित्र व्याख्याने, प्रात्यक्षिके आणि कार्यशाळांचे आयोजन करण्यात यावे. त्यातूनच शाळेतील बालकांची व महाविद्यालयीन पिढीची दृश्य कलेबद्दलची गोडी वाढीस लागून ती अभिरुची संपन्न होईल.

सूचना - व्यावसायिक कलावंतांसाठी कार्यशाळा

- कलाकारांसाठी चित्र - शिल्प कलेच्या कार्यशाळा देशातील इतर राज्ये नियमित घेत असतात. परंतु महाराष्ट्र राज्याच्या **१९६०** मधील स्थापनेपासून केवळ दोनच कार्यशाळा शासनातर्फे घेण्यात आल्या. अश्या कार्यशाळाचे प्रमाण वाढविण्याचे धोरण शासनाने ठेवणे आवश्यक आहे. अश्या कार्यशाळेतून निर्माण होणाऱ्या कलाकृती शासकीय इमारती सुशोभित करण्यासाठी उपयुक्त ठरतील.
- महाराष्ट्रातील प्रत्येक महसुली विभागाच्या प्रमुख ठिकाणी दृश्यकलेसाठी कला केंद्र स्थापन करावे. या कलाकेंद्रातून दृश्यकला व हस्तकला कलावंतांना आपली कला व छंद जोपासण्याची संधी मिळेल. यातूनच लहान मुलामुलींमध्ये कलाविषयक ज्ञान वृद्धिंगत होईल. तसेच समाजाचे मानसिक आरोग्य सुधारण्यास मदत होऊन, त्यांच्या कलागुणांना वाव मिळून, बौद्धिक विकास होण्यास मदत होईल. शिवाय विविध कला क्षेत्रातील कार्य करणाऱ्या कलाकारांना त्यातून व्यवसाय व नोकरीची संधी उपलब्ध होईल. प्रत्येक विभागामधील कलाकेंद्रांना त्या विभागामधील श्रेष्ठ व हयात नसलेल्या कलाकारांचे नाव देण्यात यावे. उदाहरणार्थ आबालाल रहिमान कला भवन, कोल्हापूर, चित्रकार वा.गो. कुलकर्णी कला भवन- नाशिक, गंगाराम चिंतामण नवगिरे तांबट कला भवन- पुणे, चंद्र वर्मा उर्फ भरमणप्पा कोट्याळकर कला भवन- सोलापूर. अशी कला केंद्रे त्या त्या भागातील कलाविषयक कार्य करणाऱ्या संस्थांच्या सहकार्याने चालवावीत .

सूचना- शासकीय कामाच्या संधी

महाराष्ट्र राज्य शासनातर्फे आणि विविध महागरपालिका, नगरपालिका, जिल्हा परिषदंतर्फे स्मारक शिल्पे उभारणे इ सुशोभीकरणाची कामे करून घेतली जातात. ती देताना सध्या अशी कामे करण्यास व त्याचे टेंडर भरण्यास विविध ठेकेदारच पात्र ठरतात. तसेच अश्या कामासाठी प्रामुख्याने सर जे.जे स्कूल ऑफ आर्ट सारख्या कला शिक्षण संस्थेचीच निवड केली जाते. यातून अनेक जेष्ठ व तरुण कलावंत आणि त्या त्या भागातील कला शिक्षण संस्था व त्यातील विद्यार्थी अश्या संधींना मुकतात.

केंद्र शासनातर्फे देशातील विविध शहरांच्या सुशोभीकरणाच्या योजना देशपातळीवर राबवली जात आहे. दुर्दैवाने त्याची कामे हि फक्त ठेकेदांकडूनच करून घेतली जात आहेत.

त्या बाबत गांभीर्याने विचार करून अशी कामे ठेकेदारांना न देता त्या त्या भागातील सक्षम कलाशिक्षण संस्था आणि तरुण  व जेष्ठ कलावंतानाच देण्यात यावीत.

- कलाविषयक कार्य करणाऱ्या जुन्या संस्थाबाबत.

द बॉम्बे आर्ट सोसायटी, (स्थापना **१८८८**) आणि आर्ट सोसायटी ऑफ इंडिया, (स्थापना **१९१८**). या देशातील अत्यंत जुन्या व प्रतिष्ठित संस्था महाराष्ट्रात असून त्या आजही उत्तम प्रकारे कार्य करत आहेत. सांस्कृतिक दृष्ट्या राज्याच्या व देशाच्या कलाविषयक वाटचालीत या दोन्ही संस्थांचे दृश्यकला क्षेत्रात मोलाचे योगदान आहे. हे लक्षात घेऊन बॉम्बे आर्ट सोसायटीला बांद्रा पूर्व येथे महाराष्ट्र सरकारतर्फे जागा देण्यात आली व त्या जागी बांधलेल्या इमारतीतून संस्थेचे कार्य सुरु आहे.

- द आर्ट सोसायटी ऑफ इंडिया **१९१८** पासून भाड्याच्या छोट्याशा जागेतून कार्य करत आहे. जागे अभावी या संस्थेला अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. त्यासाठी शासनाने तातडीने आर्ट सोसायटी ऑफ इंडियाला जागा देणे आवश्यक आहे. कारण द आर्ट सोसायटी ऑफ इंडिया तर्फे संस्थेच्या स्थापने पासून पुढील प्रकारचे कार्य सुरु  आहे.
- दृश्य कला व कलावंतांना व्यासपीठ
- दृश्य कलेचा प्रचार व प्रसार
- समाजाची अभिरुची वाढवणे
- चर्चासत्रे, प्रात्यक्षिके, व्याख्याने, अभ्यास, सहली आदींचे आयोजन,
- कोविड काळातील व  आर्थिक दृष्ट्या दुर्बळ असणाऱ्या कलावंतांना मदत परंतु या दोन्ही शासनातर्फे अद्यापही अनुदान देण्यात आलेले नाही. त्यामुळे या दोन्ही संस्थांना शासनाने तातडीने (साहित्य संमेलनासाठी दिले जाते तेवढे ) विभागून अनुदान द्यावे. त्यामुळे या दोन्ही संस्था त्यांचे वार्षिक प्रदशनासकट वर्षभर चालणारे अनेक उपक्रम अधिक जोमाने व उत्तम प्रकारे पार पाडू शकतील.
- महाराष्ट्रात पिंपरी चिंचवड येथे लालित कला अकॅडमीचे प्रादेशिक केंद्र सुरु झाल्यास केंद्र सरकारच्या पुढील उपक्रमांचा फायदा होऊ शकतो.
- कलाकारांना काम करण्यासाठी स्टुडिओ उपलब्ध होतील.
- देशाच्या विविध भागात ललित कला अकॅडमी तर्फे होणाऱ्या कार्यशाळांमध्ये महाराष्ट्रातील कलाकार आमंत्रित केले जातील.
- तरुण कलाकारांना शिष्यवृत्ती मिळतील.
- जेष्ठ कलाकारांना सन्मान होईल.

अनुदान-

महाराष्ट्रातील अत्यंत उत्तम दर्जाचे काम करणा-या तरुण चित्रकारांना राज्यात, देशात व देशाबाहेर प्रदर्शन करण्यासाठी ठराविक रक्कम राज्यशासनातर्फे देण्यात यावी. (देशातील काही राज्ये अश्या प्रकारे गेल्या अनेक वर्षांपासून अनुदान देत आहे.) अशा चित्र व शिल्पकारांची निवड तज्ञांची समिती नेमून करावी.

३. **महाराष्ट्रच्या कलावैभवाचे जतन, संवर्धन, संशोधन आणि संग्रहालये**

धोरण - महाराष्ट्र राज्याला कला व कारागिरीची क्षेत्रात फार मोठी परंपरा असून त्या संदर्भात योग्य प्रकारे दस्तऐवजीकरण न झाल्यामुळे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर आपल्या या कला परंपरेची दखल घेतली जात नाही. या संदर्भात योग्य त्या उपाय योजना करण्यास तातडीने प्रारंभ करण्यात येईल.

सूचना- जतन, संवर्धन , संशोधन

- महाराष्ट्रात वाडे, मंदिरे, मठ अशा कलात्मक वास्तू प्रचंड प्रमाणात आढळतात. त्यात लाकडी व दगडी कोरीव कामांचे व भित्ति चित्रांचे उत्कृष्ठ नमुने आहेत. त्यातील शक्य त्या वास्तूचे जतन संवर्धन करणे आवश्यक आहे.
- नाशिक जवळील चांदवड या गावी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या किल्लेवजा भव्य वाडा आहे. सदर वाडयाचे जतनीकण व संवर्धनाची प्रक्रिया सुरु असून त्यासाठी आर्थिक तरतूद करून हे काम तातडीने पूर्णत्वास न्यावे. तसेच या ठिकाणी अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रेरक जीवनावर आधारित संग्रहालयाची निर्मिती केल्यास ते एक फार मोठे आकर्षण ठरेल. असे संग्रहालय निर्माण करण्यासाठी अभ्यासक, चित्र- शिल्पकार व संग्रहालय तज्ज्ञांच्या मदतीने आर्टिस्ट कॅम्प घेऊन असे संग्रहालय कमी मुदतीत निर्माण करता येईल, याची नोंद घ्यावी.
- महाराष्ट्रातील विविध व कला व कारागिरीची दस्तवेजी करणासंदर्भात खास योजना आखावी. त्यातील ज्या विषयाबाबत काम झाले आहे त्याची यादी करून ते एकत्रित करावे. ज्या विषयांसंदर्भात काम झाले नसेल त्या विषयांची यादी करून त्या बाबतचे संशोधन व लेखनाची जबाबदारी योग्य व्यक्तीकडे सोपवावी.

  हे काम कालक्रमानुसार पूर्ण करून पुस्तक रूपाने छापावे व डिजिटल स्वरूपात उपलब्ध करून द्यावे. त्यातून महाराष्ट्राच्या कलावैभवाची उत्तम ओळख होऊ शकेल.

सूचना – संग्रहालये

- सद्या महाराष्ट्रात शासनाचे पुरातत्व व संग्रहालय असे एकत्र संचालनालय आहे. वस्तुतः पुरातत्व व संग्रहालय या दोन स्वतंत्र ज्ञान शाखा आहेत. त्यामुळे या दोन्ही शाखांचे व्यवस्थापन व अंमलबजावणी योग्य प्रकारे व अधिक प्रभावीपणे होण्यासाठी याचे दोन स्वतंत्र विभाग करणे ही काळाची गरज आहे. हे केल्यास पुरातत्व आणि संग्रहालय या दोन्ही शाखांना योग्य न्याय दिला जाईल .
- सन 1857 मध्ये सर जे जे स्कूल ऑफ आर्ट येथे 1887 पासूनच ऐतिहासिक दृष्ट्र्या महत्वाचा व अत्यंत मौल्यवान असा चित्र- शिल्प व कारागिरीच्या नमुन्याचा संग्रह आहे. या कला संग्रहाचे विनाविलंब सर जे जे स्कूल ऑफ आर्टच्या आवारात स्वतंत्र संग्रहालय तातडीने निर्माण करण्यात यावे.
- देशात अनेक राज्यात त्या त्या राज्यातील प्रागैतिहासिक काळापासून ते आजपर्यंतची वाटचाल, विकास व कला संस्कृतीचे दर्शन घडवणारी संग्रहालय तयार झाली आहेत.

अशा प्रकारचे महाराष्ट्र राज्याचे संग्रहालय **(State Museum)** अद्यापपर्यंत अस्तित्वात आले नाही हे वास्तव आहे. तरी या महत्वकांक्षी संग्रहालयाची योजना तत्काळ आखून अमलात आणावी.

- नागपूर, औंध, सातारा, कोल्हापूर, सांगली येथील शासकीय संग्रहालयत प्रामुख्याने 1960 पर्यंत आधुनिक काळातील चित्र शिल्पांचा संग्रह आहे त्यात जे महत्वाचे चित्र शिल्पकार नसतील त्यांची चित्रे शिल्पे मिळवून लावणे आवश्यक आहे. ह्या शिवाय 1960 ते 2000 या काळातील कलावंतांची एकही कलाकृती नसल्यामुळे तज्ज्ञांच्या समिती मार्फत त्या कलावंतांची निवड करून त्यांची चित्रे मिळवून लावणे ही शासनाची जबाबदारी आहे . ह्या संदर्भात या कलाकृतींच्या किंमतीचा विचार करता संबधीतांना आवाहन करून, ती योग्य तो मोबदला देऊन संग्रहित करणे व लावणे आवश्यक आहे.

**४. <u>महापुरुषांची स्मारके</u>**

धोरण- महापुरुषांची स्मारके उभारणे हे शासनाचे आणि समाजाचे कर्तव्यच असते. परंतु असे करताना केवळ उंची किंवा आकार हा निकष असू नये. शिल्पाची कलात्मकता अधिक महत्त्वाची असते हे लक्षात घ्यावे.

सूचना-

- शासनातर्फे परिसराचा विचार करता पुतळ्याची उंची किती असावी याबाबत काही नियम ठरवणे आवश्यक आहे. उंची पेक्षा कलात्मक दर्जा महत्वाचा असतो.
- अशा शिल्पाच्या कलात्मक दर्जा संदर्भात काही निकषही ठरवण्यात यावेत.
- तसेच शिल्पाच्या परीक्षणासाठी केवळ शासकीय कलाशिक्षण संस्थेतील शासकीय अधिकारी शिक्षक न ठेवता त्यासोबतच एखाद्या कलावंत तज्ञाची नेमणूक करण्यात यावी. या मंडळींना भ्रष्टाचार टाळण्यासाठी योग्य ते मानधन देण्यात यावे.
- अनेक ठिकाणी महापुरुषांच्या पुतळ्याला हार घालण्यासाठी लोखंडी कायमस्वरूपी लोखंडी शिड्या बसवण्यात आल्या आहेत, त्या महापुरुषांच्या पुतळ्याच्या सौंदर्यात बाधा आणतात, त्या काढून टाकण्यासाठी शासकीय आदेश काढण्यात यावे. संमंधीताना तसे करण्यास भाग पडावे.

**५. <u>दृश्कला क्षेत्रातील कलावंताना पुरस्कार</u>**

धोरण- दृश्यकलेच्या क्षेत्राच्या विविध शाखा असून त्या सर्व शाखांमध्ये उत्तम कर्तुत्व गाजवणा-या ज्येष्ठ व अनुभवी कालवंतांचा सन्मान करणे हे राज्याचे कर्तव्य आहे. तसेच दृश्यकलच्या क्षेत्रातील उत्कृष्ठ कामगिरी बजावत असतानाच सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या ज्येष्ठ चित्र-शिल्पकाराचा जीवनगौरव पुरस्कार देऊन गौरव केला जाईल.

सूचना -

- दृश्यकलेच्या क्षेत्रातील विविध शाखांमधील दृश्यकलेच्या क्षेत्रातील वय 50 ते 60 या वयो मर्यादेतील अनुभवी कलावंतांचा सन्मान करण्यात यावा. असे विविध शाखांमधील तीन कलावंत दरवर्षी निवडावेत.
- जीवनगौरव पुरस्काराची रक्कम सांस्कृतिक कार्य संचालनालया एवढीच ठेवावी.

असे पुरस्कार देताना कलावंत व कलातज्ञांची समिती नेमूनच निवड करण्यात यावी. केवळ शासकिय अधिकायां मार्फत अशी निवड करू नये.

महाविद्यालयीन पातळीवरील तसेच  दृश्यकला क्षेत्रातील तरुण कलावंतांना शिष्यवृत्ती

धोरण- महाविद्यालयीन पातळीवरील तसेच  दृश्यकला क्षेत्रातील तरुण कलावंतांना शिष्यवृत्ती देणे व राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर जाण्यासाठी सक्षम बनवणे आवश्यक आहे.

सूचना-

- सध्या महाराष्ट्रात दृश्यकला क्षेत्रात महाविद्यालय पातळीवरील व शिक्षण पूर्ण झालेल्या तरुण कलावंतांना महाराष्ट्र शासनातर्फे शिष्यवृत्ती नाही. (इतर राज्यात अशा शिष्यवृत्ती दिल्या जातात.)
- अशा योजना तातडीने  ठरवून, तज्ञांच्या निवड समिती मार्फत निवड करून शिष्यवृत्ती देण्यास सुरुवात करणे आवश्यक आहे.

**६. ज्येष्ठ कलावंतांना पुरस्कार आणि वयोवृद्ध व गरजू कलाकारांना पेन्शन**

धोरण - महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयामार्फत जेष्ठ कलावंतांना त्यांच्या कलेतील योगदानाबद्दल पुरस्कार दिले जातात. याशिवाय वयोवृद्ध व गरजू कलावंतांना दरमहा पेन्शनही दिले जाते. तसेच दरवर्षी एकादृश्यकला कलावंताला रुपये पाच लाखाचा वासुदेव गायतोंडे जीवन गौरव पुरस्कारही दिला जातो. अशाच प्रकारे दृश्यकाला क्षेत्रासाठी पुरस्कार आणि पेन्शन ही योजना राबवण्यात येईल अशा योजना राबविताना तज्ञांची समिती नेमून योग्य व्यक्तीची निवड केली जाईल.

सूचना पुरस्कार -

- दृश्यकलेच्या क्षेत्रात विविध शाखा असून त्या सर्व शाखांमध्ये उत्तम कर्तुत्व गाजवणाऱ्या कलावंतांचा सन्मान करणे हे राज्याचे कर्तव्य आहे. (गोव्यासारखे लहान राज्य ही रुपये एक लाख रुपयांचा पुरस्कार दृश्यकलेतील क्षेत्रातील कलावंतांना गेली अनेक वर्षे देत आहे.)
- असे सर्वच पुरस्कार देताना तज्ञांची समिती नेमून अशा पुरस्कारांचे निकष ठरवावे आणि पुरस्कारांसाठी योग्य व्यक्तीची निवड करताना ती केवळ शासकीय अध्यापन अध्यापन न करता योग्य व्यक्तींची समिती नेमूनच म्हणूनच करावी.

वयोवृद्ध व गरजू कलावंतांना पेन्शन

हे पेन्शन सांस्कृतिक कार्य संचालनालयातर्फे देण्यात येणार असले तरी निवड समिती दृश्यकला क्षेत्रातील व्यक्तींचा समावेश असावा.

धोरण - राज्यात अनेक वयोवृद्ध व गरजू चित्र- शित्यकार असून त्यांना महाराष्ट्र राज्यातर्फे पेन्शन देण्यात  येईल.

सूचना -

- सूचना सध्या असे पेन्शन चित्र-शिल्पकलेसाठी देण्यात येत नाही. कारण कला संचालनायाला ते अधिकार नाहीत. त्यामुळे चित्र-शिल्पकले संदर्भातल पेन्शन

सांस्कृतिक कार्य संचालनालयातर्फे देण्यात यावेत. अशा कलावंतांची निवड करताना त्या समितीत चित्र-शिलकला विषयाचा तज्ञ असावा.

- सध्या असले की पेन्शनची रक्कम अत्यंत तुरपुंजी असुन ती किमान रु.5000/- करण्यात यावी.

## ४. गड-किल्ले आणि पुरातत्त्व उपासमितीच्या मूळ शिफारशी

**धोरणात्मक शिफारसी**

### १. शिक्षण आणि संस्कृती

- महाराष्ट्राचा ऐतिहासिक वारसाची ओळख सर्वसामान्यांना होण्याकरीता विविध सूत्रबद्ध कार्यक्रम आखण्याची गरज असून यामध्ये दृकश्राव्य माध्यमांचा संच विशिष्ठ वयोगट व व्यक्ती विशेष (लहान मुले, शालेय विद्यार्थी महाविद्यालयीन विद्यार्थी संशोधक आणि सर्व सामान्य व्यक्ती) या प्रमाणे तयार करण्यात येईल.
- राज्यातील सर्व अभियांत्रिकी व वास्तुविशारदीय महाविद्यालयांशी समन्वय साधून जिल्हानिहाय त्या-त्या जिल्ह्यातील प्राचीन वास्तुंचे आरेखन, दस्ताऐवजीकरण याबाबी अभ्यास क्रमाचा भाग/प्रकल्प म्हणुन राबविण्यासाठी प्रोत्साहन देऊन त्यासाठी समन्वयासाठी यंत्रणा उभारण्यात येईल.
- महाराष्ट्रातील वारसा आणि संस्कृतीवर संशोधन करणाऱ्या संशोधकांसाठी राज्य पुरातत्त्व विभागाकडून शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येईल.
- महाराष्ट्रातील ऐतिहासिक वारसा स्थळांच्या किंवा वस्तुंच्या प्रतीकृती करुन शैक्षणिक अथवा सामाजिक कार्यक्रमांमध्ये सन्मानीत करते वेळी उपयोग करता येईल.
- प्राचीन वास्तू, वस्तू व गड किल्ले याच्याबददल पर्यटकांना सत्य व अचूक माहिती मिळण्यासाठी प्रमाणपत्र धारक गाईड (मार्गदर्शक) तयार करण्यात येतील. गाईडसाठी तीन महिन्याचा अभ्यासक्रम पुरातत्व संचालनालयाद्वारे तयार करुन विदयापीठ पातळीवर राबवण्यासाठी व्यवस्था तयार करण्यात येईल. या अभ्यासक्रमामध्ये उर्तीण होणा-या विदयार्थांना संचालनालया मार्फत गाईडचा परवाना 5 वर्षासाठी देण्यात येईल, परवाना नुतणीकरण करणासाठी दर 5 वर्षांनी रिफरेशर अभ्यासक्रम पूर्ण करण्याची अट ठेवण्यात येईल.

### २. अभ्यासात्मक कार्यशाळा

- शैक्षणिक संस्थामध्ये पुरातत्वीयदृष्ट्या दस्ताऐवजीकरण कसे करावे याबाबतच्या वार्षिक पुरातत्वीय संवर्धन कार्यशाळा पुरातत्व विभागाच्या सहकार्याने आयोजित करण्यात येतील.
- दुर्ग व इतर वारसा स्थळ संवर्धनाकरीता इच्छिुक असणाऱ्या संस्थासाठीची मानक कार्यपध्दती (SOP) सुनिश्चित करुन त्यांच्यासाठीही वर्षांतुन पुरातत्व विषयाशी संबंधित असणाऱ्या विद्यापीठांमध्ये दोनदा कार्यशाळा आयोजित केल्या जातील.

### ३. कारागिरांची कार्यशाळा

पारंपारिक कारीगिर व हस्तकला महाराष्ट्रात विकसित झालेल्या होत्या. परंतु विज्ञान व तंत्रज्ञानाच्या बदलेल्या स्वरुपामुळे या हस्तकला व पारंपरिक कारागिरी कौशल्य लोप पावत आहे.

हे पारंपारिक ज्ञान कोणत्या कार्यशाळेमार्फत अथवा शैक्षणिक संस्था मार्फत कौशल्य विकास म्हणुन पुढे आणता येईल काय याबाबत चाचपणी करुन या पारंपारिक कारागीरीचा कौशल्य शिक्षण म्हणुन शैक्षणिक अभ्यासक्रमात समावेश करण्याच्या हेतूने प्रयत्न करण्यात येतील. प्राचीन वास्तुंच्या संर्वधनाशी निगडीत कारागीर म्हणजे दगडांवरील शिल्पकला, पारंपारीक सुतारकामाचे ज्ञान, चुन्यातील बांधकाम, नक्षीकाम या कारागिरीत पारंगत असलेल्या लोकांचा समावेश करुन पुणे येथील डेक्कन कॉलेज मध्ये वारसा सवंर्धन हा स्वतंत्र विभाग उघडण्यात येईल.

**५. संशोधन कार्यक्रम**

- महाराष्ट्रामध्ये असणारे विविध कालखंडातील पुराभिलेख आणि नाणी काळाच्या ओघात नष्ट होत असल्याने त्यांचे संरक्षण करण्यासाठी डिजिटल दस्ताऐवजीकरणाचा प्रकल्प पुरातत्व विभागाच्या माध्यमातून राबविण्यात येईल.
- पुरातत्वीय वारसा स्थळांचे, गड किल्यांचे संशोधनात्मक काम करण्यासाठी डिजिटल दस्ताऐवजीकरण दृष्टीकोनातून काम करणाऱ्या संस्था व व्यक्तींना व्हिडीओ शुटिंग, फोटोग्राफी व आधूनिक जी आय एस मॅपिंग या शास्त्रीय पध्दतीचां वापर करुन पुरातत्व विभागाच्या प्रोत्साहनातून संशोधनात्मक अहवाल तयार केले जातील.

**६. पुरातत्वीय सर्वेक्षण व उत्खनन**

महाराष्ट्रात अनेक पुरातत्वीय स्थळांवर भारतीय पुरातत्व सर्वेक्षण व राज्य पुरातत्व विभाग आणि विविध विद्यापीठांनी अनेक उत्खनने केली आहेत त्याचप्रमाणे अजून काही पुरात्तवीय सर्वेक्षणे आणि उत्खनने महाराष्ट्राच्या विविध भागात केली जावीत यासाठी आवश्यक तो निधी उपलब्ध करुन देण्यात येईल.

**६. पुरातत्त्व विभागाची पुनर्रचना**

पुरातत्व व वस्तुसंग्रहालय संचालनालय अधिक सक्षमपणे कार्यरत व्हावे यासाठी यांस एका विभागाचा दर्जा मिळणे आवश्यक आहे. संचालनालय ऐवजी पुरातत्व विभाग (Deparment of Archeaology) असा बदल करून इतर राज्यांप्रमाणे आयुक्त दर्जाचा अधिकारीची नेमणूक करण्यात यावी. याविषयाची सविस्तर माहिती सोबत जोडण्यात आली आहे.

**७. संग्रहालय**

- **महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक भवन**- महाराष्ट्र राज्याची सांस्कृतिक परंपरा दाखविणारे एकही भवन सद्यस्थितीत अस्तित्वात नाही. महाराष्ट्रातील अनेक रिती-रिवाज परंपरा वेशभूषा, खाद्यपदार्थ, प्राचीन स्थापत्य व राहणीमान अशा संस्कृतिशी निगडीत असणाऱ्या अनेक गोष्टींचा ऱ्हास होत असल्याचे दिसुन येत आहे. यासाठी महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक भवन तयार करण्यात येईल.
- महाराष्ट्र राज्याचा वारसा सांगणारी जिल्हा संग्रहालये, पुरातत्वीय स्थळ संग्रहालये, फिरती संग्रहालये राज्य शासनातर्फे निमशासकीय संस्थाच्या माध्यमातून उभारण्यात येतील. प्रत्यके जिल्ह्यात कमीत- कमी एक संग्रहालय उभारण्याचा प्रयत्न केला जाईल.

- ऐतिहासिक दृष्ट्या महत्वाच्या असलेल्या परंतू सद्यस्थितीत बाहेर देशातील संग्रहालय व खाजगी मालकी असलेल्या वस्तु सामंजस्य करार करुन त्या वस्तु महाराष्ट्रात विविध संग्रहालयांमध्ये आणून प्रदर्शनात ठेवण्यात येतील. महाराष्ट्र राज्यात सद्यस्थितीत अस्तित्वात असणारी शासकीय, निमशासकीय व खाजगी संग्रहालये यांच्यात एक समन्वय साधणारी यंत्रणा उभी करण्यात येईल. त्यासाठी शिखर संस्था म्हणुन राज्य संग्रहालयाची निर्मिती करुन सांस्कृतिक कार्य विभाग अंतर्गत महानिदेशक दर्जाच्या अधिकाऱ्याची नेमणूक करुन स्वतंत्र संचालनालय निर्माण करण्यात येईल.
- **महाराष्ट्रातील सर्व संग्रहालयांमधील ऐतिहासिक वस्तूंची शास्त्रशुध्द पध्दतीने नोंदणी करण्यासाठी आणि त्याच्या संरक्षणासाठी सदयस्थितीत कायदा अस्तित्वात नसल्याने महाराष्ट्र राज्य वस्तुसंग्रहालय अधिनियम तयार करण्यात येईल**.

**८. जतन व संवर्धन**

- महाराष्ट्राचा ऐतिहासिक वारसा जतन सवंर्धन, संरक्षण करण्यासाठी सद्यस्थितीत महाराष्ट्र प्राचीन स्मारके व पुराणवस्तुशास्त्र विषयक स्थळे व अवशेष अधिनियम 1960 व त्याचे नियम 1962 उपलब्ध आहे. तथापि या अधिनियम व नियमातील काही तरतुदी मध्ये कालानुरुप बदल होणे अत्यंत आवश्यक असल्याने प्रस्तुत कायद्यामध्ये आवश्यक ते बदल वदुरुस्त्या करण्यात येतील.
- पुरातत्वीय ऐतिहासिक वारसाचे जतन व संवर्धन करण्यासाठी ‘कन्झरव्हेशन मॅन्यूवल’ तयार करण्यात येईल.

**९. माहितीचे दस्ताऐवजीकरण**

किल्ल्यांशी संबंधित ऐतिहासिक घटन व इतर सर्व माहिती यासाठी पुस्तक तयार करण्यात येईल. यामध्ये किल्ल्यांच्या स्वरुपात काळानुरुप व राजवटी नुसार झालेले बदलाची माहिती तयार करुन तिचे दस्ताऐवजीकरणाचा अंतर्भाव करून किल्ला परिसरातील शाळा व महाविद्यालये तसेच ग्रंथालयांमध्ये संबंधित किल्ल्याची माहिती असणारे पुस्तके उपलब्ध करण्यात येतील. मुळे गड किल्ले तथा वारसास्थळाबद्दल जागरुकता निर्माण होण्यास मदत होईल. महाराष्ट्रात असलेल्या डोंगरी किल्ल्यांची नोंद घेऊन तेथील पायवाटा दुरुस्त करण्यात याव्या.

**१०. प्रकाशन**

- पुरातत्व विभागाच्या माध्यमातून केले जाणारे पुरातत्वीय सर्वेक्षण, उत्खनन, जतन व सवंर्धनाच्या कामांचा वार्षिक अहवाल प्रकाशित करण्यात येतील.
- महाराष्ट्रातील किल्ल्याच्या सदंर्भात स्थापत्य व वास्तुशास्त्र यांच्या माहितीसाठी देणारी एक पुस्तिका तयार करण्यात येईल.

**११. ग्रंथालय**

महाराष्ट्राचा ऐतिहासीक वारसाचा अभ्यास करण्यासाठी, जपण्यासाठी, संशोधन करण्यासाठी तसेच देशविदेशातील संशोधनांचा आढावा घेण्यासाठी एक राज्य पुरातत्वीय ग्रंथालय मुंबई अथवा पुणे या ठिकाणी उभारण्यात येईल.

**१२. स्मारकांचे व प्राचीन स्थळांचे गॅझेटिअर**

केंद्र शासन, राज्य शासन व महानगरपालिकांच्या वारसा यादीतील वारसास्थळे आणि कोणत्याही शासकीय यंत्रणेद्वारे संरक्षित नसलेले परंतु ऐतिहासिक व पुरातात्वीक महत्व असणाऱ्या स्थळांचे जिल्हानिहाय गॅझेटियर तयार करण्यात येईल. हे गॅझेटियर ऑनलाईन पोर्टलच्याही स्वरुपात असेल. महाराष्ट्रातील गडकिल्ल्यांचे जिल्हानिहाय गॅझेटियर व दुर्ग दर्शनिका प्रकल्प अग्रक्रमाने हाती घेतला जाईल.

**१३. दुर्गसंवर्धन संस्था**

महाराष्ट्रातील दुर्गस्वच्छता व त्यासंबंधी जागृती आदि कार्यक्रम राबविणाऱ्या संस्थाच्या सहभागाची व समन्वयाची कायमस्वरुपी व्यवस्था करण्याच्या हेतूने पुरातत्व समन्वय समिती स्थापन करण्यात येईल. किल्ल्यांवरील व्यवस्थापन जसे घनकचरा व सुरक्षा व्यवस्थापन, पर्यटकांवर शिवसंस्कार, किल्ल्यांच्या माध्यमातुन शिवचरीत्र कथन, शाहीरीचे कार्यक्रम, शिक्षण प्रबोधन, किल्ल्यांवर मर्दानी खेळ व युध्द कला यांचे कायमस्वरुपी प्रदर्शन, न्याहरी व जेवण यांसाठी स्थानिकांशी समन्वय ही कामे संस्थांच्या सहभागाने सुनिश्चित करण्यात येतील. यामध्ये गावोगावी कार्यरत असणाऱ्या बचत गटांनाही सहभागी करुन घेण्यात येईल. प्रत्येक किल्ल्याच्या पायथ्याशी अथवा किल्ल्याच्या एखाद्या अस्तित्वात असतील वास्तूच्या मुळ स्वरुपाला धक्का न लावता तेथे सोव्हिनियर शॉप, शस्त्र संग्रहालय व माहिती अर्थबोधन केंद्र (Interpretation Centre) उभारण्यात येईल.

**१४. किल्लेनिहाय उत्सव**

प्रत्येक किल्ल्याशी निगडीत महत्वाच्या घटनांच्या तारखेला प्रत्येक किल्ल्यावर वर्षातुन एकदा किंवा दोनदा उत्सव आयोजित केले जावेत. त्यासाठी त्याचे वर्षभराचे कॅलेंडर विभाग तयार करेल. या आयोजनामध्ये Sound and Light Show सारखे कार्यक्रम विशेष रुपाने तसेच वर्षभरही होतील असे सुनिश्चित करता येईल.

**१५. राज्य सांस्कृतिक निधी**

सद्यस्थितीत असणारे राज्य सांस्कृतिक निधीचे धोरण बदलून त्या ऐवजी ज्या कामासाठी सांस्कृतिक निधी मिळाला आहे त्याच कामासाठी त्या निधीचा वापर व्हावा असे नवे धोरण सांस्कृतिक कार्य विभाग आखावे. या निधीच्या उभारणी व विनियोगासाठी मा. मंत्री, सांस्कृतिक कार्य यांच्या अध्यक्षतेखालील समितीत नामांकित कॉर्पोरटर्स कंपन्यांच्या सी.एस.आर निधी हाताळणाऱ्या प्रतिनिधींचा ही त्यात समावेश असावा.

**१६. पर्यावरण व जैवविविधता**

किल्ले हे ऐतिहासिक व सांस्कृतिक दृष्ट्या महत्वाचे आहेत. त्याचप्रमाणे किल्ल्यांचा परिसर हा पर्यावरण व जैवविविधतेच्या दृष्टीने अतिशय समृध्द व महत्वाचा आहे. या परिसराचे संवर्धन होणे अत्यंत आवश्यक आहे. सांस्कृतिक व ऐतिहासिक दृष्ट्या वैविध्यपूर्ण व वैशिष्ट्यपूर्ण असलेल्या ठिकाणांची डिरेक्टरी तयार करण्यात येईल.

**१७. समिती**

- महाराष्ट्रातील वारसा स्थळांचा समावेश वर्ल्ड हेरिटेज निकशानुसार विकसित करण्यासाठी पुरातत्व विभाग इतिहास संशोधक व अभ्यासक यांच्या मार्गदर्शना खाली एक समिती स्थापन करण्यात येईल.
- स्थानिक स्वराज्यं संस्था, स्वयसेवी संस्था व छोटया मोठया उदयोग संस्था वारसा स्थळे दत्तंक घेण्याची योजना शासनाच्या माध्यमातून राबवण्यात येतील.

**१८. सुरक्षितता**

पुरातत्वीय वारसा स्थळांनाएक विशिष्ट वातावरण, तिथी अथवा उत्सव यामुळे पर्यटकांची गर्दी झाल्याचे पहायला मिळते. यासाठी वारसा स्थळांचा अभ्यास करुन त्यांची कॅरिंग कर्पॅसिटी ठरवून पर्यटकांसाठी पास देण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात येईल. नैसर्गिक आपदा (दरडी कोसळणे, मधमशा) अथवा अपघात ही संकटे टाळण्यासाठी पर्यटकांमध्ये जागरुकता निर्माण करणे आवश्यक आहे. यासाठीस्थानिक प्रशिक्षण देवून त्यांना गाईड म्हणून शासनातर्फे मान्यता देण्यात येईल.

**१९. समाज माध्यमे**

विज्ञान व तंत्रज्ञानाच्या काळात उपलब्ध असणारी समाज माध्यमे यांवर पुराततत्त्व विभागासंदर्भात माहिती उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीकोनातुन प्रसारमाध्यमे, सामाजिक माध्यमे यावर वेळोवेळी माहिती प्रसारित व अद्ययावत करावी.

**२०. सहभाग**

विविध भागातील पारंपारिक सामाजिक उत्सवांना प्रोत्साहन देऊन त्यामधून सांस्कृतिक वारसा जपणूक करण्यात यावी. यामध्ये युवा पिढीचा सहभाग अग्रक्रमाने घेण्यात यावा. वारसा जपण्यासाठी इच्छूक संस्था व व्यक्ती गट यांच्यासाठी निश्चित नियमावली तयार करुन अटी व शर्तीसहीत मदत घेण्याचा विचार केला जावा.

**करणीय गोष्टी (काही सूचना)**

१. गडावरील जीर्ण झाडे काढताना व गडाचे सौंदर्यीकरण करताना ऐतिहासिक वास्तूला इजा पोचणार नाही याची काळजी घेण्यात यावी.

२. राज्याच्या प्रत्येक विभागातील (विदर्भ, मराठवाडा, कोकण इ.) एक गड-किल्ला मॉडेल म्हणून सर्व दृष्टीने विकसित करावा.

३. शासन व लोकसहभागातून शिवनेरीवर शिवजयंती, तोरणाकिल्ल्यावर संकल्प दिन, रायगडावर राज्याभिषेक दिन वप्रतापगडावर शौर्यदिन उत्साहाने साजरे केले जावेत.

४. वरील चार गडावर घडलेल्या घटनांशी संबंधीत आभाससृष्टी Light & sound अशा प्रयोगाची. त्याचसोबत वस्तूसंग्रहालय, शिवकालीन युद्ध (शस्त्रे) प्रात्यक्षिके इ.चे आयोजन करण्याची व्यवस्था केल्यास पर्यटांकाची संख्या मोठ्या प्रमाणात वाढू शकेल.

५. २०१० च्या सांस्कृतिक धोरणात शिफारस केलेल्या गड-किल्ले जोड़णी प्रकल्पाला गती देण्यात यावी जेणेकरून पर्यटनालाही प्रोत्साहन मिळेल.

६. काही प्राचीन स्मारकांचे नामविधान मध्ययुगीनवा उत्तर मध्ययुगीनकाळात बदले असून त्यास्माराकाचे प्राचीन नाव दर्शनिका (Gazzette) अधिसूचनाद्वारा पुर्नस्थापित करण्यात यावे.उदा. दौलताबाद किल्ला - देवगिरी, एलोर- वेरूळ.

७. ज्या किल्ल्यावर पर्यटक मोठ्या संख्येने येतात त्या गड किल्ल्यावर सी.सी.टी.व्ही कॅमेऱ्याची व्यवस्था करण्यात यावी. व संरक्षणाच्या दृष्टीने पगारी गडकरी सेवकाची कायम नियुक्ती करण्यात यावी.

८. युरोपमध्ये किल्ल्याची जपवणूक 'इंग्लिश हेरिटेज' या स्वायत्त संस्थेद्वारे केली जाते. या संस्थेत वास्तू विशारद महाविद्यालयाचा महत्त्वाचा सहभाग असतो. या धर्तीवर महाराष्ट्राच्या गड-किल्ले जतन व संवर्धनासाठी महामंडळ वा महावारसा अशा स्वायत्त संस्थाची स्थापना करावी.

९. अनेक किल्ले राज्य शासनानी संरक्षित घोषित केलेले असले तरी त्याचा ताबा वनविभागाकडे आहे. त्यामुळे गड-किल्ले संरक्षण संवर्धन करताना अडचणी निर्माण होतात. त्यासाठी पुरातत्त्व विभाग व वन विभाग यांच्या अधिनियमात सुधारणा करण्यात यावी.

१०. किल्ला परिसरांमधील गावांमध्ये आजही जुन्या पध्दतीच्या बांधकामातील वाडे, घरे आढळून येतात. तसेच यातील बरेच वाडे घरे मालकांच्या दुर्लक्षामुळे मोडकळीस आलेले दिसुन येतात. तसेच पर्यटकांना राहण्याच्या अनुकूल सोयीसुविधा नसल्यामुळे पर्यटनावर विपरीत परिणाम होतो. किल्ला परिसरात आढळणारे हे वाडे हेरीटेज होम स्टे ही संकल्पना राबवुन पर्यटकांसाठी राहण्यासाठी उपलब्ध करुन दिल्यास स्थानिकांना उत्पन्नाचे साधन होईल तसेच पर्यटकांची निवासाची व्यवस्था होईल.

११. वारसा स्थळांची स्वच्छता आणि सुविधा केंद्रानी युक्त होण्यासाठी जनभागीदारी वाढण्याच्या दृष्टीने शासन प्रयत्न करेल. वारसा स्थळांवर येणा-या पर्यटकांसाठी एक नियमावली तयार करुन नियमावतीचा फलक ठळक पणे दिसेल अशा ठिकाणी लावण्याची व्यवस्था केली जाईल. नियमांचे उल्लंघन करणा-यास कठोर दंडात्मक कारवाई केली जाईल.

१२. 'संस्कृती' शब्दामध्ये अंतर्भूत - महाराष्ट्रातील कला, लोककला संगीत, नाट्य, संतपरंपरा, मंदिरे, प्रसिद्ध धार्मिक स्थळे, लेणी, गड किल्ले व गौरवशाली इतिहास या सर्वांचं एकात्मिक दर्शन घडले अशा राज्य सांस्कृतिक भवनाची निर्मिती करण्यात यावी. ही सूचना धोरणात्मक भाग समजून राज्य सांस्कृतिक भवन निर्मिती प्रकल्प शासनाने हाती घेतल्यास २०35 मध्ये म्हणजे महाराष्ट्र राज्य स्थापनेला 75 वर्ष पूर्ण होतील त्या अमृतमहोत्सवी वर्षात भवनाचे लोकार्पण करता येईल.

१३. अनेक स्वयंसेवी संस्था गड-किल्यांची स्वच्छता, वृक्षारोपन द्वारे सौंदर्यीकरण अशी कामे करीत असतात. शासनाने त्यांनी नेमकी कार्ये व कशी करायची या संदर्भात एक नियमावली व मार्गदर्शक सुत्रे तयार करून ती त्या संस्थेला द्यावी. अशा संस्थांची नोंदही करण्यात यावी.

१४. रोप वे चा वापर टाळणे:- सद्यस्थितीत आधुनिकि करणासाठी गड किल्ल्यांवर रोप वे बनविण्याची घोषण केली जात आहे. दुर्ग हे दुर्गवतच रहावे यासाठी किल्ल्यांवर रोप वे ची व्यवस्था करण्यात येवू नये.

**इतर शिफारसी**

१ महाराष्ट्रातील सर्व गड-किल्ले, गढ्या यांचे व्हिडिओ शूटिंग, फोटोग्राफी व आधुनिक जी.पी.एस मॅपिंग या साधनाद्वारे शास्त्रीय पद्धतीने जिल्हा व तालुकानिहाय सर्वेक्षण करणे.

२ पुरातत्त्व विभाग व इतिहास संशोधक, अभ्यासक यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यातील महत्त्वाच्या गड-किल्ल्याची निवड करून ते गड-किल्ले वास्तू वर्ल्ड हेरिटेज निकषानुसार विकसित करणे.

३ गड-किल्ल्याच्या मूळ रुपाला धक्का लागू न देता तेथील वास्तू, तटबंदी, बुरुज याची डागडुजी करूनत्याचे संरक्षण करणे.

४ राज्यातील विदर्भ, मराठवाडा, पुणे, कोकण, कोल्हापूर या विभागात विभाग पातळीवर गड-किल्ले संरक्षण, संवर्धन व सौंदर्यकरणकरण्याच्या दृष्टीने पुरातत्व विभागाच्या मार्गदर्शनात एका समितीची स्थापना करण्यात यावी. ज्यात पुरातत्त्व विभाग, पर्यावरण, इतिहास अभ्यासक इ. चा समावेश असेल. या विभागीय समितील प्रत्येकी एक वा दोन सदस्य यांचा सहभाग असलेली राज्य स्तरीय समिती गठित करुन वर्षातून एक वा दोन वेळा आढावा बैठक व्हावी. समित्यांचा कालावधी शासन निश्चित करेल.

५ गड किल्ले कचरा मुक्त, सुलभ सुविधा केंद्रानी युक्त होण्यासाठी जनभागीदारी वाढण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणे.

६ गड-किल्ल्यावर येणाऱ्या पर्यटकासाठी एक नियमावलीतयार करून नियमावलीचा फलक ठळकपणे दिसेल अशाठिकाणी लावण्याची व्यवस्था करणे. मद्यपान, जुगार, अश्लीलचाळे करणाऱ्यावर कठोर दंडात्मक कारवाई करण्याचेप्रावधानही त्यात असेल.

७ गड-किल्ल्यावर उत्खनन परिसरात कोणत्याही प्रकारचे अतिक्रमण वा अवैध बांधकाम होणार नाही याची दखल घेतली जाईल व दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

८ गड-किल्ले परिसरातील, स्थानिक स्वराज्य संस्था, स्वयंसेवी संस्था अथवा त्या क्षेत्रातील उद्योग समुहाला गड-किल्ले दत्तक देऊन स्वच्छता व संरक्षण अशी जबाबदारी सोपविण्यासंबंधी विचार करणे.

९ गड-किल्ले, प्राचीन वास्तू याबद्दल पर्यटकांना सत्य व अचूक ऐतिहासिक माहिती मिळावी यासाठी प्रमाणपत्र धारक गाईड (मार्गदर्शक) तयार होतील असा प्रयत्न करण्यात यावा.

१० अधिकाधिक पर्यटक गड किल्ल्याला भेटी देण्याच्या दृष्टीने, सोबतच पर्यटण व पर्यावणासंबंधीत उद्योगाला चालना मिळण्याच्या दृष्टीने गड किल्याचा विकास संवर्धन व सौंदर्यीकरण करण्यात येईल पण त्याबरोबर गड किल्ले हे शिवसंस्कार करणारी तीर्थक्षेत्रे ही बनावित असा प्रयत्न केला जाईल.

## ५. लोककला उपसमितीच्या मूळ शिफारशी

**कला संवर्धन-**

१. महाराष्ट्र राज्यातील लोककलेचे संवर्धन, जतन करण्याच्या उद्देशाने सर्वेक्षण करणे आवश्यक आहे.

२. लोपपावण्याच्या अवस्थेत असलेल्या लोककलांना उर्जित अवस्था प्राप्त करून देण्यासाठी विशेष प्रयत्न केले जावेत. कर्नाटकच्या धर्तीवर महाराष्ट्रात देखील लोककलेसाठी एक डेडिकेटेड विद्यापीठ स्थापन व्हावे.

३. लोककला आणि त्यामागील विज्ञान समाज पर्यंत पोहचवणे आवश्यक आहे.

४. केवळ परंपरा किंवा लोककला म्हणून न बघता याकडे शारीरिक विज्ञान म्हणून पाहणे आवश्यक आहे.

५. आदिवासी कला आणि विज्ञान यांचा अभ्यास होण्यासाठी आदिवासी जिल्हा मध्ये लोककला संशोधन व संवर्धन केंद्र सुरु करण्यात यावे.

६. नंदूरबार जिल्हात होणार होलिका महोत्सव याकडे त्याभागाची संस्कृती आणि लोककला या भूमिकेतून बघण्यात यावे.

७ . संपूर्ण कोकण कोल्हापूर जिल्हातील चंदगड व आजरा तालुक्या येथे शिमगोत्सव ( सोंगे लोककला प्रकार) तसेच पालघर , नाशिक जिल्हा येथील बोहाडा महोत्सव (सोंगे लोककलाप्रकार) यांच्या संवर्धनासाठी विशेष तरतूद करण्यात यावी.

८. लोककलेच्या संवर्धनाच्या उद्देशाने विविध लोककला प्रकारांची चित्रफिती बनवून प्रत्येक थेटरमध्ये ही दोन तीन मिनिटांची चित्रफित दाखवण्याची सक्ती करण्यात यावी. (उदा. वासुदेव, नंदीबैल यांसारख्या लोककला) जेणेकरून नवीन पिढीला या लोककलांचा परिचय होईल.

लोकसाहित्य-

१. काळाच्या ओघात लोकगीते, (विधीगीते, श्रमगीते, बडबडगीते, जात्यावरच्या ओव्या, भलारीगीते) त्यादी लोककाव्य प्रादेशिक भाषानुसार वेगवेगळया आहेत. ही लोकगीते काळानुसार लोप पावत आहेत. या लोकगीताचे संकलन, संशोधन करून चित्रफिती आणि ग्रंथरूपाने प्रसिद्ध करण्यासाठी आर्थिक मदत देऊन प्रोत्साहन दयावे.

२. महाविद्यालय, विद्यापीठस्तरांवर लोकसाहित्याचे (लोकगीतांच्या लोकनाट्याच्या) संशोधन लेखन संकलन, चर्चासत्र, कार्यशाळा यांचे आयोजन करावे.

**स्वतंत्र सांस्कृतिक महामंडळ-**

लोककला आणि कलावंत जर जिवंत ठेवायचा असेल तर एक स्वतंत्र महामंडळ स्थापन करण्यात यावे . याची रचना हि आदिवासी विभाग महामंडळ व सारथी महामंडळ यांच्यातील काही बाबींचा समावेश असणारी असावे . उदा . तमाशा, दशावतार, नौटंकी सारख्या काही कलांसाठी सुरुवातीस भांडवलाची गरज भासते. अशांसाठी जर विशिष्ट काळासाठी बिनव्याजी अथवा ३ टक्के दाराने भांडवल दिले, तर ते सावकारांवर अथवा इतर लोकांच्या दयेवर अवलंबून राहणार नाही .

१. भांडवली कर्ज दोताना ‘कर्ज माफ’ ही संकल्पना ठेऊ नये .

२. कर्ज घेणारी व्यक्ती किंवा संस्था जर कर्ज परत फेड करू शकली नाही तर त्यास कर्ज देऊ नये.

३. त्या संस्थेतील सदस्यांना देखील महामंडळाकडून कर्ज देण्यात येऊ नये.

४. महामंडळाकडे कलावंताच्या नावांच्या नोंदी तालुका निहाय असाव्यात.

५. जेणे करून त्यास मानधन देताना त्याच्या कार्याची नोंद सहज तपासता येईल .

६ . कलावंतांस आरोग्य विमा देणे सुलभ होईल.

**लोककला संवर्धन-**

१. राज्यातील लोककलेचे संवर्धन जतन करण्याच्या उद्देशाने सर्वेक्षण करणे कर आवश्यक आहे.

२. लोपपावण्याच्या अवस्थेत असलेल्या लोककलांना उर्जित अवस्था प्राप्त करून देण्यासाठी विशेष प्रयत्न केले जावेत.

३. महाराष्ट्र-कर्नाटक सीमाभागातील लोककलेच्या संवर्धनासाठी आणि आदिवासीच्या लोककला संवर्धनासाठी विशेष आर्थिक तरतूद करण्यात यावी.

४._ संपूर्ण कोकण कोल्हापूर जिल्हातील चंदगड व आजरा तालुक्या येथे शिमगोत्सव (सोंगे लोककला प्रकार) तसेच पालघर जिल्हा मोखाडा येथील बोहाडा महोत्सव (सोंगे लोककलाप्रकार) यांच्या संवर्धनासाठी विशेष तरतूद करण्यात यावी.

**लोकसाहित्य-**

१. काळाच्या ओघात लोकगीते (विधीगीते, श्रमगीते, बडबडगीते, जात्यावरच्या ओव्या, भलारीगीते इत्यादी), लोककाव्य लोप पावत आहेत. या लोकगीतांचे संकलन, संशोधन करून ग्रंथरूपाने प्रसिद्ध करण्यासाठी आर्थिक मदत देऊन प्रोत्साहन दयावे.

२. महाविद्यालय, विद्यापीठस्तरावर लोकसाहित्याचे संशोधन लोखन संकलन, चर्चासत्र, कार्यशाळा आयोजन करावे.

३. विद्यापीठस्तरावर लोकसाहित्य अध्यासनाचे स्वतंत्र संशोधन केंद्र स्थापना करण्यात यावे.

**लोककला संस्था -**

१. महाराष्ट्रातील लोककला संस्थाची नोंदणी करून त्यांच्या कार्याची दखल घेऊन प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने या संस्थांच्या हिताच्या उद्देशाने विशेष योजना राबविण्यात यावी.

२. शासनाच्या वतीने तालुकास्तरावर, जिल्हास्तरावर लोककला समितीची स्थापना करण्यात यावी.

३. महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक विभागांतर्गत स्वतंत्र लोककला परिमंडळाची स्थापना करण्यात यावी.

**लोककलावंत मानधन-**

१. ज्येष्ठ कलावंत मानधन योजनेच्या लाभासाठी वयोमर्यादा ५० वर्ष / ४५ वर्ष अशी करण्यात यावी.

२. मानधनासाठी उत्पन्नाच्या दाखल्याची मर्यादा दोन लाख इतकी करण्यात यावी.

३. जिल्हा मानधन निवड समिती मध्ये लोककलावंत, अभ्यासक, शासकीय अधिकारी याचा समावेश असावा. (या समितीमध्ये राजकीय हस्तक्षेप नसावा.)

४. लोककलावंताना देण्यात येणार मासिक मानधन हजारब सात हजार रुपये व पाच हजार रुपये करण्यात यावे.

मानधन मिळणाऱ्या कलावंताने किमान आठवड्यातून एक दिवस आपली कला स्थानिक जिल्हा परिषदेच्या शाळेत जाऊन मुलांना आपल्या कलेचे ज्ञान द्यावे. जर एका गावात अधिक कलावंत असतील, तर बाजूच्या गावात किमान २ किलोमीटरच्या अंतरातील परिसरातील जिल्हा परिषदेच्या शाळेत जाऊन मुलांना आपल्या कलेचे ज्ञान द्यावे, जेणेकरून त्याची कला पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचेल.

**लोककला केंद्र,अकादमी-**

१. लोककलावंत अकादमीची स्थापना, लोककला केंद्राची स्थापना करण्यात यावी. या अंतर्गत लोकसाहित्य, कलोककलाच सकलन संशोधन,अभ्यास या करण्यात यावे.

२. अकादमी, लोककला केंद्राच्या वतीने शिबिरे, कार्यशाळा, चर्चासत्रे यांचे आयोजन शाळा, महाविद्यालय, विद्यापीठ स्तरावर करण्यात यावे, जेणेकरून विद्यार्थ्यांमध्ये लोककलेविषयी आवड निर्माण होईल.

**शिबिर, कार्यशाळा-**

लोकगीत, लोकनृत्य, लोकनाट्य, लोकसंगीत, यांचे शिबिर व कार्यशाळांचे आयोजन करावे. यामध्ये ज्येष्ठ लोककलावंताना संधी देण्यात यावी. जेणेकरून त्यांच्या ज्ञानाचा उपयोग्य नवीन पिढीला होईल.

**लोककला महोत्सव -**

१. शासनाच्या वतीने दरवर्षी राज्यस्तरीय, व जिल्हास्तरीय लोककला महोत्सवाचे आयोजन करण्यात यावे.

२. प्रादेशिक भागानुसार तेथील मोठ्या प्रमाणातील प्रसिद्ध लोककलेनुसार महोत्सवाचे आयोजन करावे.

४. महाराष्ट्रातील विद्यापीठ आणि महाविद्यालय स्तरावर महोत्सवाचे आयोजन करण्यात यावे, यामध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग असावा.

५. आदिवासी लोककला, लोकनृत्य, महोत्सवाचे आयोजन करण्यात यावे.

**पुरस्कार-**

१. लोककलावंत, अभ्यासक, लोककलावंत संस्था, यांना त्यांच्या कार्याची, कलेची दखल घेऊन राज्यस्तरीय, जिल्हास्तरीय, विद्यापीठस्तरीय दल विविध लोककला प्रकारासाठी दरवर्षी पुरस्काराचे देण्यात यावा.

२. दशावतार, कलगीतुरा, खडी गंमत, नमन, तमाशा, सोंगीभजन, चीन, सोने प्रबोधनात्मक जलले, आदिवासी नृत्य या लोककला प्रकारांसाठी विशेष पुरस्कार देण्यात यावे.

**लोककलावंताना विशेष सुविधा-**

१. ज्येष्ठ लोककलावंताना विमा सुविधा उपलब्ध करून द्यावा.

२. लोककलावंताच्या मुलांना शालेय आणि महाविद्यालमीत शिक्षणाच्या वेळी शिष्यवृती यात यावी.

३. लोककलावंत संस्थाच्या वाहनासाठी परवाना ट्रॅक्स मध्ये सवलत देण्यात यावी.

**महाराष्ट्र कलादालन-**

सर्वप्रकाराच्या लोककलांचे दर्शन व महाराष्ट्राच्या संस्कृतीचे दर्शन घडवणारे महाराष्ट्र लोककला दालन उभारण्यात यावे. महाराष्ट्रातील कलेची परंपरा आणि माहिती देणारे हे दालन असावे.

## ६. संगीत उपासमितीच्या मूळ शिफारशी

### धोरणात्मक शिफारसी

उत्क्रांतीच्या कालगणनेत आधी संगीत आले आणि नंतर भाषा आली असा सिद्धांत विख्यात निसर्गवादी आणि उत्क्रांती वैज्ञानिक चार्ल्स डार्विन यांनी मांडला आहे.[१] दुसरीकडे एका अमेरिकन महिलेला लिहिलेल्या पत्रात स्वामी विवेकानंद म्हणतात की “संगीत ही सर्वात उदात्त अशी कला आहे, आणि ज्यांना ती समजली, त्यांच्यासाठी सर्वात उदात्त आराधना.”[२] **तात्पर्य असे की संगीत हे संस्कृतीचा पायाही आहे आणि कळसही!**

---

[१] Charles Darwin, *The Descent of Man,* p. ५७२.

[२] Swami Vivekananda, *The Complete Works* /Volume ५/Epistles - First Series/LXXIII

समाजाच्या प्रगल्भतेची खोली मोजायची असेल तर त्या कुठल्या प्रकारच्या आणि काय दर्जाच्या संगीताला समाजात थारा मिळतो हे पहावे. आणि समाजाची प्रगल्भता वाढवायची असेल तर त्या समाजात संगीताचा दर्जा वाढवण्यावर जोर द्यावा.

यासाठी संगीतविषयक धोरण हे प्रामुख्याने दोन कलमी असावे असा या समितीचा विचार आहे.

1. हे धोरण रसिककेंद्री असावे. याचे कारण असे आहे की कलाकारापेक्षा रसिकाला या धोरणाचे केंद्रस्थान बनवले तर संगीताची परिस्थितिक व्यवस्था (ecosystem) ही यथावकाश स्वयंचलित, स्वावलंबी आणि स्वायत्त होऊ शकेल. कारण सकारात्मक रसिकता हीच कलेचे इंधन होय.
2. हे धोरण कलाकाराच्या प्रतिष्ठेची आणि आत्मसन्मानाची बूज राखणारे असावे. विशोभित वातावरणामध्ये आपली कला प्रस्तुत करावी लागणे ते निधीसाठी सतत सरकारकडे अथवा प्रायोजकांकडे खेटे घालावे लागणे, यापासून कलाकारांना मुक्ती मिळायला हवी असे या धोरणाचे इप्सित आहे.

यासाठी तीन घटक प्रामुख्याने या शिफारसींमध्ये नमूद केले आहेत.

संगीत शिक्षण 2) संगीत संवर्धन व प्रसार आणि 3) संगीत क्षेत्रातील कलाकार.

संगीतविषयक धोरणांची अंमलबजावणी चोख व्हायची असेल तर या समितीचा असा प्रस्ताव आहे की **महाराष्ट्रात संगीत संवर्धन आणि प्रसार या उद्दिष्टांना वाहिलेली एक *'महाराष्ट्र संगीत अकादमी'* अशी एक स्वायत्त संस्था असावी. या संस्थेच्या शाखा प्रत्येक जिल्ह्यात असाव्या. या संस्थेत एक *'संगीत सल्लागार मंडळ'* असे शिखर मंडळ असावे व संगीत शिक्षण, संगीत कार्यक्रम आणि प्रयोग, व संगीत कलाकार कल्याण या विषयांची धोरणे राबवणाऱ्या उपसमित्या असाव्या.**

**संगीत शिक्षण विषयक**

- शालेय स्तरापासून संगीत हा विषय अभ्यासक्रमात असावा. याचा दोन बाजूंनी विचार करावा. उत्तम कलाकार घडवणे आणि त्याहून उत्तम श्रोते घडवणे. त्यासाठी प्रत्येक शाळेत संगीत शिक्षकांची नियुक्ती करावी व या नियुक्त्यांसाठी आवश्यक त्या निधीची तरतूद करावी. प्रत्येक शाळेत संगीत शिक्षक नेमता येत नसतील तर शाळांचे समूह (clusters) करून संगीत शिक्षक पुरवले जावे.
- गांधर्व महाविद्यालयाशी वाटाघाटी करून त्यांच्या पदव्यांना शासनाची मान्यता तरी द्यावी अथवा या वाटाघाटींस अपयश आल्यास, गांधर्व महाविद्यालयाच्या धरतीवर परंतु अधिक व्यापक अशी स्वायत्त संगीत शिक्षण आणि प्रसार संस्थेची रचना आणि उभारणी करावी.
- महाविद्यालय आणि विद्यापीठाच्या संगीत विभागांकडे विद्यार्थ्यांचा ओघ आहे परंतु निधीचा आणि विशेषतः शिक्षकभरतीचा अभाव आहे. हा प्रश्न गंभीर असून त्याकडे तातडीने लक्ष देणे गरजेचे आहे.
- गुरू-शिष्य परंपरेला चालना देण्यात यावी.
- नवीन संगीत शिकू पाहणाऱ्या पिढीचा सांगीतिक विकास घडवून आणण्यासाठी क्रमबद्ध पायऱ्या असाव्या. खेडोपाडी संगीत शिक्षक नाहीत, शहरी संगीत शिक्षकांकडून दर्जा सांभाळला जात नाही. यावर उपाय म्हणून तज्ञांच्या देखरेखीखाली 'प्रत्येक घर संगीत साक्षर' या दृक्श्राव्य शिक्षणपद्धतीची निर्मिती व्हावी आणि हे प्राथमिक संगीत शिक्षण सगळ्यांना विनामूल्य मिळावे.
- आवड म्हणून सुरू झालेले संगीत शिक्षण त्यापुढे गोडीपर्यंत परिवर्तित व्हावे यासाठी शिक्षण मानसशास्त्राचा अभ्यास असणाऱ्या संगीत कला समुपदेशकांचा अंतर्भाव करावा.
- प्रगत व पारंपरिक संगीत शिकू इच्छिणाऱ्या घटकांमध्ये मुलभूत, शुद्ध व सौंदर्यवादी संगीतमूल्ये रुजविण्यासाठीची पूरक कौशल्ये, आवाजसाधना, धृपद साधना, आंतरपूरक विद्याशाखा, विद्वानांची चर्चासत्रे, कौशल्याधारीत कार्यशाळा, प्रशिक्षण वर्ग, रसिकांसाठी रसास्वादन कार्यक्रम, अभिरुची वृद्धीसाठी प्रयत्न असे उपक्रम राबवावेत.
- घरंदाज, गुरु-शिष्य परंपरेच्या व पारंपरिक संगीत जोपासणाऱ्या एका मोठ्या वर्गाला आधुनिक तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण देण्याची तरतूद नव्या सांस्कृतिक धोरणात असावी. भारतीय संगीताच्या विकासाच्या दिशा आणि व्यवस्थापन सांभाळणारी एक स्वतंत्र यंत्रणा, आयआयटी सारख्या संस्थांच्या मदतीने उभी करावी. त्यामार्फत

अलौकिक असे आपले भारतीय संगीत जागतिक बाजारपेठेसमोर आणून त्यातून व्यावसायिक संगीत रोजगार निर्मिती कशी होईल याचे प्रशिक्षण सुरू करावे. संगीत क्षेत्रातही एमबीए सारखे अभ्यासक्रम सुरू करता येतील का यावर विचार करावा.

- महाविद्यालयांमध्ये संगीत रसग्रहणाचे क्रेडिट अभ्यासक्रम असावे.
- मराठी भावसंगीतासाठी स्वतंत्र अभ्यासक्रम तयार करण्यात यावा.

**संगीत संवर्धन आणि प्रसार विषयक**

- खास संगीताच्या मैफलींसाठी आणि कार्यक्रमांसाठी सुसज्ज अशा छोटेखानी सभागृहांची रचना प्रत्येक तालुक्यात, उपनगरात करावी. उत्तम ध्वनिव्यवस्था आणि सौंदर्यदृष्टीमूलक अशी ही सभागृह असावी. यांचा उपयोग संगीत मैफली, संगीत रसग्रहण शिबिरे, संगीतसंबंधी चर्चा, संगीतावरील व्याख्याने, संगीत आणि इतर कलांमध्ये संवाद साधण्याच्या हेतूने आयोजित केलेले कार्यक्रम, प्रकल्प अथवा प्रदर्शने, संगीतावर आधारित पुस्तकांचे, ध्वनिमुद्रिकांचे प्रकाशन समारंभ, इत्यादि कारणांसाठी करण्यात यावा.
- संगीताची आवड सर्वांना असते परंतु या आवडीला रचनात्मक प्रोत्साहन न मिळाल्याने समाजात एकूण भारतीय संगीताबद्दल आणि मराठी भावसंगीताद्दल अनास्था आणि उदासीनता दिसते. ही उदासीनता प्रामुख्याने संगीताची जाणीव प्रगल्भ नसल्यामुळेच दिसून येते असे अभ्यासदौऱ्यातील विविध चर्चांमधून समितीला लक्षात आले. ही उदासीनता कमी करण्यासाठी निश्चित अशा कृती योजना तयार करावयास हव्या.
- महाराष्ट्राला शास्त्रीय संगीत, धृपद संगीत, लोकसंगीत, नाट्यसंगीत आणि इतर उपशास्त्रीय संगीत, तसेच सुगम अथवा भावसंगीत यांची एक समृद्ध परंपरा लाभली आहे. या समृद्ध वारशाचे जतन करणे हे महाराष्ट्राच्या सुदृढ संगीत पर्यावरणासाठी अत्यंत आवश्यक आहे. विविध संगीतप्रकारांचे जतन हे अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने करावे.
- महाराष्ट्राचे संगीत हे केवळ महाराष्ट्राचेच नसून याच्या सौंदर्याची ओळख संपूर्ण जगाला करून देणे गरजेचे आहे. भारतातील वेगवेगळ्या राज्यांमध्ये आणि संपूर्ण विश्वामध्ये देशांतरित मराठी जनसमूहाच्या साहाय्याने, त्या त्या देशांमध्ये मराठी संगीताचे आणि महाराष्ट्रीय कलाकारांचे कार्यक्रम आपल्या संगीताची ओळख करून देण्याच्या उद्देशाने आयोजित करावे. उदा. कोलकातामध्ये बंगाली भाषकांसाठी बांग्ला भाषेतील निवेदनाचा उपयोग करून, मराठी भावसंगीताची, अथवा लोकसंगीताची ओळख करून देणारे कार्यक्रम सादर व्हावे.
- पूर्वापार मंदिरे ही केवळ धार्मिक स्थळे नसून ती समाजाच्या सांस्कृतिक जीवनाच्या रक्तवाहिन्या होती. देवळांचा परिसर पुन्हा एकदा सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी खुला करून द्यावा. यामुळे कलेवरही अंकुश राहतो आणि शिव आणि सत्याला सौंदर्याची जोड मिळते.

**संगीत क्षेत्रातील कलावंत विषयक**

- महाराष्ट्रातील संगीत क्षेत्र हे अत्यंत असंघटित असे क्षेत्र आहे. या सगळ्या कलाकारांचे संघटन करणे अथवा महाराष्ट्रातल्या विविध स्तरांवर काम करणाऱ्या संगीत कलावंतांची नोंदणी करणे समितीला अत्यंत आवश्यक वाटते. शासनयोजना या क्षेत्रातील गरजू कलाकारांपर्यंत पोहोचण्याकरिता हे एक अनिवार्य पाऊल आहे.
- वयोवृद्ध अथवा इतर काही अघटित कारणांमुळे अक्षम झालेल्या कलाकारांसाठी पेन्शन आणि समूह विमा योजना सुरू करणे. ज्यांची उपजीविका पूर्णपणे आणि कायमस्वरूपी संगीतावर अवलंबून आहे अशा कलाकारांचा समावेश असावा.

**कृतियोजना**

- समाजातली संगीताविषयी उदासीनता कमी करायची असेल तर याबद्दलचे 'जाणीव प्रशिक्षण' (sensitivity training) हे शासकीय अधिकारी, शासकीय कर्मचारी आणि राजकारणी यांना देण्याची आत्यंतिक गरज आहे. या जाणिवेची धारा जेव्हा समाजातील या वरच्या स्तरातून वहावयास सुरुवात होईल तेव्हाच समाजाच्या तळागाळातही ती पाझरू शकेल. समितीचा असा दृष्टिकोन आहे की समाजात शेवटच्या माणसाच्या अभिरुचीचे संगीत होत राहणार परंतु ही अभिरुची अधिकाधिक संपन्न होत राहणे हेच एका जिवंत समाजाचे लक्षण आहे. ते तसे होण्याकरिता शासनाने समर्पक वातावरण तयार करण्यास हातभार लावावे हेच संगीतविषयक धोरणाचे उद्दिष्ट आहे.

- भाषा, इतर कला आणि संगीत यांच्या समन्वयाविषयी अधिकाअधिक जागृतीची गरज आहे. या मिलाफाची सुरुवात लोकसंगीत आणि शब्दप्रधान भावसंगीत या दोन प्रकारांमध्ये आहे. भावसंगीत आणि लोकसंगीताचे विविध प्रकार जतन करून त्याचा संचय पुढच्या पिढ्यांच्या संदर्भासाठी तयार करावा. ध्वनिमुद्रणे, लोकसंगीताच्या विविध प्रकारांवर, महाराष्ट्रातील वाद्यांवर, थोर गीतकार आणि संगीत दिग्दर्शकांवर असलेले माहितीपट, हे नव्याने एका प्रमाणिकृत पद्धतीने करावे.
- संस्थांसाठी, कलाकारांसाठी अनेक कार्यक्रम, सवलती, अनुदाने, योजना वेळोवेळी शासन आपल्या विविध खात्यांतर्फे जाहीर करते, त्याची यथायोग्य माहिती भागधारकांपर्यंत पोहोचवण्याकरिता प्रत्येक जिल्ह्यात एक समन्वयक असावा. हा समन्वयक कला संचालनालयाने नियुक्त केला तरी चालेल.
- प्रगत अवस्थेत जाऊन संगीत शिकण्यासाठी आणि व्यावसायिक संगीताचे आव्हान पेलण्यासाठी संगीत शिकणाऱ्या विविध घटकांसाठी पुढील कौशल्याधारीत प्रशिक्षण अभ्यासक्रमांची निर्मिती व्हावी. आवाज साधना, उच्चार साधना, ध्वनी तंत्रज्ञान, संगीत संयोजन, संगीत रचना, इत्यादि विषय त्यात यावे.
- शालेय संगीत शिक्षण रुक्ष न होता ते गुणवत्ताधारीत व्हावे यासाठी प्राथमिक संगीत शिकविणाऱ्या दहा संगीत शिक्षकांमागे, कलात्मक संगीत शिकविणारा एक संगीत कला गुरु अशी शैक्षणिक धोरणात तरतूद हवी. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे संगीत ही एक प्रयोगात्मक कला आहे, जोवर तिचा दर्जा शिकविणाऱ्याच्या प्रयोगातून समजत नाही तोवर ती प्रयोगात्मक आणि प्रवाही होणार नाही.
- संगीताचे आयोजन सातत्याने करणाऱ्या संस्थांना अनुदान रक्कम आणि संख्या वाढवावी.
- नाट्यसंगीत हा संगीत प्रकार महाराष्ट्राची एकमेवाद्वितीय अशी संगीत परंपरा आहे. नाट्यसंगीताच्या जतनासाठी आणि संवर्धनासाठी स्वतंत्र निधी उपलब्ध करून द्यावा आणि या निधीतून नाट्यसंगीत गाणाऱ्या विद्यार्थ्यांना तयार करावे.
- गुरू-शिष्य परंपरेच्या संवर्धनासाठी एक स्वतंत्र शिष्यवृत्ती योजना महाराष्ट्र शासनाच्या पातळीवर सुरू करावी ज्यामध्ये शिष्यवृत्तीचा एक अंश शिष्याला आणि मुख्य भाग गुरूला थेट मिळावा.
- एक सूर एक तालच्या धरतीवर सामाजिक संगीताचे उपक्रम शासनातर्फे राबवावे.

## ७. रंगभूमी उपासमितीच्या मूळ शिफारशी

| | | |
|---|---|---|
| नाटयगृह | १ | नाटयगृहाची बांधणी, नियोजन,नाटय गृहाचे भाडे, इतर तांत्रिक मदत, इत्यादी बाबत सल्ला देण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग, नगर विकास विभाग, सांस्कृतिक कार्य विभागातील तसेच कला/नाटय क्षेत्रातील तज्ञांची संयुक्त नाटयगृह सल्लागार समिती असावी. महाराष्ट्र राज्यात नाटयगृह उभारणी अथवा नाटयगृह दुरुस्ती यासाठी सदर समितीची संमत्ती अनिवार्य करणे. राज्यातील नाटयगृहाबाबत दुरुस्ती व देखभाल निधी असणे आवश्यक आहे. |
| | २ | महाराष्ट्र राज्यातील सर्व शासकीय/ निमशासकीय नाटयगृहाच्या सर्व समावेशक व्यवस्थापनासाठी, धोरण पत्रिका (Policy Paper), मास्टर प्लान तयार करणे, स्वच्छता व इतर सोई याबाबत सर्व समावेशक धोरण ठरविणे. |
| | ३ | राज्यातील बंद असलेली सर्व नाटयगृहे दुरुस्ती करुन पुन्हा सुरु करणे. |
| | ४ | मनपा आणि शासकीय नाटयगृह साठी स्वतंत्र यंत्रणा व नियमावली करावी. यासाठी एखादा अधिकारी नेमणूक करावा. |
| | ५ | आमदार खासदार निधीत नाटयगृह विषयक निधी मिळण्याबाबत विचार व्हावा. |
| | ६ | हौशी नाटय कलाकांराना नाटय तालीमीसाठी अनेक अडचणीना तोंड दयावे लागते. तालमीसाठी हॉलचे भाडे अतिशय जास्त असते त्यामुळे हौशी कलाकारांना शासनाने सार्वजनिक बांधकाम विभाग/ कामगार कल्याण विभाग/ नगर पालिका/ पंचायत समिती किंवा शासकीय शाळेतील हॉल कलाकारांना परवडतील अशा दरांने किंवा शक्य झाल्यास नि:शुल्क उपलब्ध करुन देण्याची सोय करावी. |

| | | |
|---|---|---|
| | ७ | राज्य नाटय स्पर्धेतील पारितोषिक विजेत्या नाटकांना नाटयगृह भाडयात सवलत मिळावी. |
| | ८ | हौशी कलाकांरासाठी मिनी थिएटर कमी / वाजवी भाडयात उपलब्ध करुन मिळणे. |
| | ९ | नाटय गृहात उपलब्ध असलेल्या कॅंटिन मध्ये कलाकारांना जेवण/ नाष्टा इत्यादीसाठी अतिरिक्त शुल्क आकारले जाते. त्याबाबत तसेच अत्यंत माफक दरात ही सुविधा उपलब्ध होईल. याबाबत शासन स्तरावरुन कार्यवाही व्हावी. |
| | १० | नाटय संस्थाना प्रयोगासाठी दिलेल्या तारखा ४/५ दिवस आधी राजकीय कार्यक्रमासाठी दबाव टाकून काढून घेतल्या जातात. अशा वेळी ऑनलाईन तिकिट विक्री झालेली असते. परिणामी नाटय निर्माता/ संस्थाना आर्थिक नुकसानीसह मनस्ताप सहन करावा लागतो याबाबत शासनाकडून उपाय योजना /नियोजन करण्यात यावे. |
| | ११ | द बॉक्स सारखे नाटयगृह सर्व जिल्हयांत उपलब्ध करावे. |
| | १२ | सर्व नाटयगृहात शनिवारी व रविवारी सकाळ सत्र हौशी नाटय संस्थाना देण्याबाबत नियमावली तयार करणे |
| | १३ | मनपा आणि शासकीय नाटयगृह साठी स्वतंत्र यंत्रणा व नियमावली करावी. यासाठी एखादा अधिकारी नेमणूक करावा. |
| | १४ | महाराष्ट्रातील महानगर पालिका व नगरपालिका यांच्याकडे असलेल्या नाटयगृहाची सुची तयार करुन ती वेबसाईटवर उपलब्ध करुन दयावी. |
| राज्यनाटय स्पर्धा | १ | नाटक सादरकर्ती संस्था धर्मादाय आयुक्ताकडे नोंदणीकृत असणे अनिवार्य करणे. |
| | २ | राज्य स्पर्धेसाठी परिक्षक म्हणून काम करणा-या व्यक्तीचा नाटय क्षेत्रातील अनुभव/दर्जा याबाबत तडजोड करु नये. परिक्षकांसाठी व स्पर्धेच्या समन्वयकांसाठी स्पर्धेपूर्वी या क्षेत्रातील तज्ञ मान्यवरांकडून प्रशिक्षण वजा चर्चासत्र आयोजित करणे अत्यंत आवश्यक आहे. परिक्षक/समन्वय यांच्या निवडीसाठी अडी व शर्ती यांचे धोरण सुनिश्चित करणे निकोप राज्यस्पर्धेसाठी अत्यंत आवश्यक आहे. |
| | ३ | विविध राज्य स्पर्धेच्या निकालाबाबत अनेक हस्तक्षेप उघड पणे दिसून येतात. अनेक परिक्षकांची संस्था स्पर्धेत असते.त्यामुळे अनेक वेळा बक्षीसे घोषित करताना सादर झालेल्या नाटकांचे विषय/ दर्जा/ कलात्मकता यांचा अजिबात विचार न करता केवळ प्रतिथयश व्यक्तीच्या नाटकांना बक्षिसे दिली जातात. यामुळे राज्यभरातील हौशी कलाकांरामध्ये भेदभावाची भावना/ संताप निर्माण होत आहे. |
| | ४ | राज्य नाटय महोत्सवाच्या एकूणच आयोजनात ( परिक्षक, समन्वयक नियुक्ती सह ) आमूलाग्र बदल होणे आवश्यक आहे. स्पर्धनंतर वर्ष सहा महिने पारितोषिक वितरण समारंभ होत नाहीत. याबाबत ठोस वेळापत्रक पाळण्यात यावे. |
| | ५ | अनुभव नसलेल्या नवशिक्या व्यक्तीची नाटय स्पर्धेचे परिक्षक म्हणून नियुक्ती करण्यात येवू नये. |
| | ६ | राज्य नाटय स्पर्धेत परिक्षक म्हणून जबाबदारी सांभाळणा-या व्यक्तीचे वेळोवेळी प्रशिक्षण व्हावे. |
| | ७ | राज्य नाटय स्पर्धासाठी परिक्षक नेमणुक / पात्रता/ याबाबत धोरण ठरविणे. |
| | ८ | नाटय स्पर्धेतील परिक्षकांचे मानधन, समन्वयकाला विहित वेळेत अग्रीम इत्यादी बाबत सुधारणा करण्यात यावी. |
| | ९ | नाटय प्रयोगा दरम्यान होणारा विजेचा वापर या मध्ये प्रमाणीकीकरण व पारदर्शकता असावी. नाटय प्रयोगासाठी वीज वापरामध्ये काही सवलत असावी. |

| | | |
|---|---|---|
| | १० | राज्य नाटय स्पर्धेनंतर परिक्षक व नाटय सादर करणारी संस्था /कलाकार यांच्यामध्ये चर्चा घडवून आणणे. (सदया बंद असलेली ही पध्दत पून्हा सुरु करणे, कारण त्यामुळे सादरीकरणातील त्रुटी कळतात) |
| | ११ | सांस्कृतिक कार्य संचालनालयाने स्पर्धेची घोषणा केल्यानंतर, प्रवेशिका सादर करावयाच्या दिंनाकानंतर स्पर्धेच्या अंदाजीत तारखा ठरवून तसे राज्यातील सर्व समन्वयकांना कळविणे आवश्यक आहे. जेणे करुन समन्वयकांना स्पर्धेसाठी हॉल आरक्षित करणे सोईचे होईल. |
| | १२ | शासनाच्या हिंदी भाषेच्या नाटय स्पर्धा मुंबई, नागपूर, पुणे अशा ठिकाणी एकाच वेळी आयोजित करणे. |
| | १३ | राज्य नाटय स्पर्धेत प्राथमिक फेरीसाठी पार्श्वसंगीत, वेशभुषा इत्यादी साठी बक्षीस ठेवणे. |
| | १४ | हौशी नाटय कलाकांराना नाटय तालीमीसाठी अनेक अडचणीना तोंड दयावे लागते. तालमीसाठी हॉलचे भाडे अतिशय जास्त असते त्यामुळे हौशी कलाकारांना शासनाने सार्वजनिक बांधकाम विभाग/ कामगार कल्याण विभाग/ नगर पालिका/ पंचायत समिति किंवा शासकीय शाळेतील हॉल कलाकारांना परवडतील अशा दरांने किंवा शक्य झाल्यास नि:शुल्क उपलब्ध करुन देण्याच्या सोय करावी. |
| | १५ | राज्य स्पर्धेत भाग घेतलेल्या संस्थांना झालेल्या खर्चाची प्रतिपुर्ती मिळण्यासाठी ५ ते ६ महिन्यांचा विलंब होतो. त्यामुळे स्पर्धेत भाग घेणा-या हौशी कलाकरांना अनेक अडचणीना सामोरे जावे लागते. |
| | १६ | राज्य नाटय महोत्सवाच्या एकूणच आयोजनात ( परिक्षक, समन्वयक नियुक्ती सह ) आमूलाग्र बदल होणे आवश्यक आहे. स्पर्धनंतर वर्ष सहा महिने पारितोषिक वितरण समारंभ होत नाहीत. याबाबत ठोस वेळापत्रक पाळण्यात यावे. |
| | १७ | राज्य नाटय स्पर्धेला व्यवसायाचे स्वरुप आले आहे. परिक्षकांशी संगनम्मत करुन केवळ रक्कमेवर डोंळा ठेवून हौशी प्रतिभावान कलावतांना दूर ठेवू नये. |
| | १८ | नाटकाच्या सादरीकरणासाठी संस्थेस मिळणा-या नाटयनिर्मितीच्या खर्चात वाढ करणे |
| | १९ | स्पर्धेतील विजेचा वापर, विजेचा दर, अतिरिक्त स्पॉट लाईट्स, इतर साहित्यांचे दर, यामध्ये होणारी आर्थिक पिळवणूक थांबवावी. |
| | २० | हौशी स्पर्धेतील सर्व केंद्रावरील पहिल्या व दुस-या क्रमांकाची सर्व नाटके पुढील दोन वर्षासाठी बाद करावीत. |
| | २१ | राज्य भरातील नाटयगृहांत प्रयोगासाठी संघ आलेला असताना नाटय प्रशासन वेळेचा धाक दाखवून नाटयगृह खुले करत नाहीत. त्यामुळे संपूर्ण संघाला बाहेरच तिष्ठत बसावे लागते यासंदर्भात नाटयगृह प्रशासनाला राज्य शासनाच्या स्तरावरुन सक्त सूचना देण्यात याव्यात. |
| | २२ | राज्य शासनामार्फत घेण्यात येणा-या विविध स्पर्धेपूर्वी कार्यशाळा घेण्यात याव्यात. |
| | २३ | स्पर्धेत भाग घेणा-या नाटकांतील कलावंता व्यतिरिक्त अजून किमान १२ ते १४ तंत्रज्ञाना (Technical Staff) प्रवास खर्च मिळावा. |
| | २४ | राज्यस्पर्धेत नाटकांच्या सादरीकरणा पूर्वी संस्थेस नाटयनिर्मितीचा खर्च म्हणून मिळणा-या रक्कमेत वाढ करणे |
| | २५ | प्रयोग सादरीकरण झाल्यानंतर तातडीने अनामत रक्कम व नाटय निर्मिती खर्च रोख किंवा धनादेश स्वरुपात अदा |

| | | |
|---|---|---|
| | | करण्यात यावी व प्रवास खर्च आणि भोजन खर्च संस्थेच्या खात्यात लवकरात लवकर जमा करण्यात यावा |
| | २६ | राज्यनाटय स्पर्धेत एका कलावंतास आणि तंत्रज्ञास प्राथमिक फेरीत आणि अंतिम फेरीत कोणत्याही एकाच केंद्रावर एकाच नाटकात सहभाग घेता येईल. |
| | २७ | हौशी स्पर्धेतील व्यावसायिक कलावंताच्या व्याख्येत स्पष्टता येणे गरजेचे आहे. ही स्पर्धा निखळ हौशी कलावंतांची असावी. अनेक व्यावसायिक आणि धंदेवाईक लोक हात मारतात. त्यामुळे हौशी कलावंत मागेच राहतो. |
| | २८ | स्पर्धेतील सर्व सहभागी संघाना, कलावंत, तंत्रज्ञ यांना स्पर्धेतील सहभागाबद्दल सहभागपत्र देण्यात यावे. |
| | २९ | प्राथमिक फेरी आणि अंतिम फेरी साठी तिकिट दर या वर्षापासून रुपये ५० व रुपये ३० प्रमाणे आकारण्यात यावा. जेणेकरुन नाटय संस्थेस थोडा आर्थिक हातभार लागेल. |
| | ३० | हौशी नाटकर्मीना तालमीसाठी शहरात मुख्यमंत्री निधीतून निर्माण केलेल्या समाज भवन, सभागृह महानगर पालिका शाळा, मुक्त स्वरुपात विशिष्ट वेळेत किमान ३ तासासाठी मुक्त दयावे. अल्पदरात जागा मिळविणे अत्यंत कठीण होऊन बसले आहे. भाडयाने हॉल घेणे, किंवा मंगलकार्यालयात तालमी करणे आर्थिकदृष्टया शक्य नाही. त्यामुळे कित्येक नाटय संस्था उघडया मैदानात घरी गच्चावर किंवा अत्यंत लहान जागेत तालीम करतात. यासर्व अडचणीसाठी तालीम हॉल किंवा महानगरपालिका शाळेतील एक हॉल उपलब्ध होणे गरजेचे आहे. |
| | ३१ | या संपूर्ण नाटय स्पर्धेत अखिल भारतीय नाटय परिषदेचा, स्थानिक पदाधिकारी, अध्यक्ष व अन्य यांचा कोणताही संबंध नसावा. त्यांना स्पर्धेच्या उदघाटन किंवा समारोप प्रसंगी प्रमुख म्हणून आमंत्रित करण्यात येऊ नये. |
| | ३२ | प्राथमिक स्पर्धेतील पारितोषिक प्राप्त सर्व नाटय संस्थाचे संबंधित प्रादेशिक विभाग क्षेत्रात १० प्रयोग शासनामार्फत करण्यात यावेत. |
| | ३३ | रंगकर्मीना तालमीसाठी नगर पंचायत/ जिल्हा पंचायत/महानगर पालिका, यांच्या शाळा तसेच इतर सामाजिक संस्थाना दिलेल्या जागा विनामुल्य उपलब्ध करुन देणे. |
| | ३४ | राज्यभर तसेच देशभर आयोजित होणारे नाटय महोत्सवाची अचुक माहिती एकाच ठिकाणी मिळावी याबाबत पर्यन्तं करणे. |
| | ३५ | राज्यात कुठले. महोत्सव कुठे आयोजित होतात याबाबत पोर्टल तयार करावे. |
| | ३६ | विविध राज्य नाटय स्पर्धांचे आयोजन करताना त्याचे सुसुत्रीकरण/ प्रचार/ प्रसिध्दी करणे. |
| | ३७ | संस्कृत नाटयासाठी ट्रान्सलेटर ( दुभाषी) असावा. |
| | ३८ | संस्कृत राज्य नाटय स्पर्धेत संस्कृत नाटकांचे प्रयोग एकाच नाटय गृहात ठेवावेत. |
| | ३९ | विविध राज्य नाटय स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक आलेल्या नाटय संस्थाना सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यासाठी प्राधान्य देण्यात यावे. |
| | ४० | संगीत राज्य नाटय स्पर्धेत वेशभूषा, या प्रकारात बक्षीस नाही. त्याबाबत तरतुद करण्यात यावी |
| | ४१ | संस्कृत नाटय स्पर्धेत म्युझिक,/ उच्चारण या प्रकारासाठी पारितोषिक असायला हवे याबाबत निर्णय घेणे. |
| | ४२ | विविध राज्य नाटय स्पर्धेसाठी अर्ज करण्याकरिता सांस्कृतिक कार्य संचालनालयांचे एक स्वतंत्र पोर्टल/ ॲप्लिकेशन लिंक / QR. Code इत्यादी सुविधा असावी. |

| | | |
|---|---|---|
| | ४३ | a) राज्य नाटय स्पर्धेत हौशी ग्रामीण स्पर्धा आयोजित करणे गरजेचे आहे.<br>b) ग्रामीण कलाकारांना प्रशिक्षण देण्याची सोय व्हावी. |
| | ४४ | राज्य नाटय स्पर्धा -स्पर्धेला प्राधान्य देण्याच्या हेतूने स्पर्धेची वेळ फक्त सायंकाळी ठेवणे आवश्यक आहे. जेणे करुन अधिक प्रेक्षक वर्ग उपस्थित राहिल. यामध्ये स्पर्धेचे यश अवलंबून असते. |
| | ४५ | सांस्कृतिक कार्य संचालनालयाकडून एखादे नाटक अंतिम स्पर्धेसाठी पात्र झाल्यास लेखकांची पुन्हा परवानगी मागितली जाते. अशा वेळी लेखक पुन्हा अनुदानाची मागणी करतात. त्यामुळे स्पर्धेत भाग घेतलेल्या कलाकांराना आर्थिक नुकसान होते. यामुळे संचालनालयांने स्पर्धेत प्रवेश घेताना लेखकांची मान्यता असणे ही अट एकदाच ठेवावी. |
| | ४६ | परिक्षक नियुक्ती बाबत समिती स्थापन करावी. त्यासाठी निकष ठरविणे |
| बालनाटय | १ | बालनाटयातील सहभागासाठी वयाची अट नसावी. |
| | २ | प्रौढ रंगभूमी वरील विषय लहान मुलांच्या नाटकांत असून नये. |
| | ३ | बालनाटय स्पर्धेपूर्वी मार्गदर्शन शिबिरे घेण्यात यावी. |
| | ४ | बालनाटय करताना तारखा न मिळणे/ बालनाटयाला दुजाभाव दिला जातो या विषयी उपाययोजना करणे. |
| | ५ | बालनाटय किंवा इतर नाटय स्पर्धा सणां दिवशी घेऊ नये. |
| | ६ | राज्याच्या ६ प्रशासकीय मुख्यालयात बालकांसाठी नाटय प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात यावे. |
| | ७ | राज्य शासनामार्फत देण्यात येणारे नाटय अनुदान बालनाटयांना ही देण्यात यावे. |
| वृध्द /जेष्ठ कलावंत पेन्शन योजना/ | १ | सर्व प्रथम कलावंत, कलाकार म्हणजे कोण या विषयी धोरण निश्चित करावे. |
| | २ | कलाकाराची यादी करणे व त्यांना ओळखपत्र देणे |
| | ३ | वयोवृध्द कलाकार निवड समिती बाबत निर्णय |
| | ४ | वृध्द कलावंत योजना- या योजनेचा लाभ ही, उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे या प्रक्रियेमध्ये राजकीय हस्तक्षेप/कलावंत म्हणून अपात्र असलेल्या व्यक्ती इत्यादीना या योजनेचा लाभ मिळत असून अनेक पात्र व गरजू वृध्द कलावंत या योजनेपासून वंचित आहेत. या योजनेच्या प्रक्रियेमध्ये / तपासणी मध्ये तातडीने आमुलाग्र बदल करणे आवश्यक आहे. |
| | ५ | राज्य शासनाच्या वृध्द कलांवत मानधन योजनेत नाटय क्षेत्रातील तंत्रज्ञ, व इतर बॅक स्टेज कलाकारांचा समावेश व्हावा. |
| नाटक अनुदान समिती | १ | सांस्कृतिक कार्य संचालनालयामार्फत राबविण्यात येणा-या नाटय अनुदान योजनेतील नाटय परिक्षणाच्या वेळी गणसंख्या ११ ऐवजी ६ करणे. |
| | २ | नाटक अनुदान समिती- परिक्षण करताना ११ सदस्यांनी एकाच वेळी परिक्षण करणे तसेच सदर अनुदानाच्या मागणीचा अर्ज भरण्याची पध्दतीत सुलभीकरण करणे. |
| | ३ | नाटक अनुदान योजनेची रक्कम वाढविणे |
| | ४ | नाटय संस्था अनुदान - नाटय संस्थाना अनुदान देताना राबविण्यात येणा-या प्रक्रियेमध्ये अनेक हस्तक्षेप, अनियमितत्ता,होत असल्यामुळे अनेक नामवंत संस्थांना अनुदान न मिळता इतर अपात्र पण कागदी व्यवहार पूर्ण करणा-या संस्थाना यांचा लाभ मिळत आहे. यामुळे नाटय संस्थांना अनुदान देण्याच्या प्रक्रियेमध्ये मोठा बदल करणे आवश्यक आहे. |

| | | |
|---|---|---|
| | ५ | नाटय अनुदान मंजुर झाल्यानंतर अनुदानाची रक्कम, तातडीने मिळण्यासाठी अंमलबजावणी व्हावी. |
| | ६ | नाटय अनुदान समितीसाठी संस्थाचे पुरेसे अर्ज येत नाहीत. याबाबत. प्रसिध्दी/ मदत करणे. |
| नाटय कामगार पेन्शन योजना | १ | वृध्द/ जेष्ठ कलावंतप्रमाणे रंगमंच कामगाकरांना पेन्शन सुरु करणे. |
| कलाकार/ नाटय कामगार वैदयकिय विमा योजना | १ | पडदयामागील कलाकार/ कामगार अनेक आर्थिक व वैदयकिय अडचणीमध्ये असतो. त्यात कुंटुंबामध्ये काही वैदयकिय समस्या निर्माण झाल्यास अनेक अडचणी निर्माण होतात. यास्तव कलाकार /नाटय कामगाराना वैदयकिय दृष्टीने विमा संरक्षण योजना सुरु करणे. |
| | २ | पडदयामागील कलाकारांसाठी आरोग्य विमा योजनेची सुविधा उपलब्ध करुन देणे. |
| इतर | १ | मुंबई पोर्ट ट्रस्ट विभागाच्या शिवडी, मुंबई परिसरात महाराष्ट्रातील नाटय निर्माता संघासाठी गोदाम निर्मिती साठी जागा उपलब्ध करुन देणे. |
| | २ | नाटकांचा Set ची वाहतुक करताना येणा-या वाहन अनुपलब्धता/ अवाजवी भाडे या विषयी धोरणात तजवीज करणे. एस टी महामंडळाची वाहन काही प्रमाणात Set वाहतुकीसाठी उपलब्ध करता येतील का ते पहाणे. (एकंदरीत नाटय क्षेत्रातील Logistic बाबत सर्वकष विचार करणे) |
| | ३ | नॅशनल स्कूल ऑफ ड्रामा (NSD) या संस्थेचे १ केंद्र महाराष्ट्रात असावे. |
| | ४ | केंद्र सरकारच्या नॅशनल स्कूल ऑफ ड्रामा (NSD) प्रमाणे महाराष्ट्रात महाराष्ट्र स्कूल ऑफ ड्रामा (MSD) सारखी संस्था सुरु करणे. |
| | ५ | भारत सरकारच्या सांस्कृतिक खात्यामार्फत NSD व संगीत नाटक अकादमी अशा संस्थाना अनुदान दिले जाते. त्याच<br>धरतीवर अखील भारतीय मराठी नाटय परिषदेला वार्षिक अनुदान केंद्र शासनामार्फत देण्यात यावे. |
| | ६ | इतर राज्यामध्ये नाटय पथक जाताना भराव्या लागणा-या Entry Tax बाबत सुट/ किंवा माफ करणे |
| | ७ | शालेय/ विद्यालय शिक्षणांत सर्व प्रकारच्या कलाकांराना (तंत्रज्ञ, टिप-या इत्यादी ) Technical Courses/ पदवी मिळेल अशी सोय उपलब्ध करुन देणे. सदर पदवीचे इतर शैक्षणिक शाखेप्रमाणे Accreditation असावे. |
| | ८ | सांस्कृतिक कार्य विभाग आणि महाराष्ट्रातील कलाकार यांच्यात सांस्कृतिक देवाण -घेवाण जलद होण्यासाठी Tweeter तसेच इतर सोशल मिडियाच्या जास्तीत जास्त सोई उपलब्ध होतील असे प्रयोजन करावे. |

| | | |
|---|---|---|
| | ९ | विविध नाटय स्पर्धा महोत्सव यांची माहिती होण्यासाठी सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे एक स्वतंत्र पोर्टल असावे. |
| | १० | हौशी कलाकार, नाटय संस्था, यांना मिळणा-या रेल्वे सवलती मधील अडचणी तात्काळ दुर करुन त्यामध्ये सुधारणा करणे |
| | ११ | रंगभूमी प्रयोग परिनिरीक्षण मंडळाकडून नाटय संहितेचे पूर्व परिक्षण करताना नवीन विषयाकडे बदलत्या सामाजिक संबंधांचा / सादरीकरणांचा व्यापक विचार व्हावा. अभिव्यक्तीचा बदलत्या काळानुसार विचार व्हावा. |
| | १२ | कलाकारांना - नोकरी मध्ये आरक्षण |
| | १३ | सांस्कृतिक कार्य संचालनालयाकडून विविध कलाकार यांच्या साठी असलेल्या योजना, संचालनालयाकडून राबविण्यात येणा-या स्पर्धा, त्याचे वार्षिक नियोजन (स्पर्धेच्या संभाव्य तारखा) इत्यादी बाबत सविस्तर माहिती असलेली पुस्तिका प्रकाशित करणे.1 |
| | १४ | विविध लोक कलांचा अभ्यास करणा-या विदयार्थासाठी स्कॉलरशिप योजना तयार करणे. |
| | १५ | केंद्र शासनाकडून सांस्कृतिक योजनासाठी राज्य सरकारकडे किती अनुदान येते याबाबत. माहिती उपलब्ध असावी. |
| | १६ | इतर राज्यातील सी.बी.एस.सी. किंवा राज्य बोर्ड च्या अभ्यासक्रमांत असलेल्या नाटय विषयाचा अभ्यासक्रमाप्रमाणे महाराष्ट्रात शालेय अभ्यासक्रमांत नाटय विषयाचा समावेश करणे |
| | १७ | पारंपारिक कला ( झाडा झडती, दशावतार इत्यादी.) यांचे प्रशिक्षण तसेच रंगभूषा, व इतर नाटय तंत्रज्ञ यांचे साठी प्रशिक्षण वर्ग सुरु करणे. |
| | १८ | बॅक स्टेज कलागार/कामगारासाठी त्यांच्या गुणवत्तेनुसार आय.टी. आय सारख्या संस्थेकडून प्रशिक्षणासह प्रमाणपत्र देवून त्यांना नाटय प्रयोग कालावधीनंतर उर्वरित वेळेत रोजगारांच्या संधी ( रोजगार हमी योजनेतुन किंवा इतर योजनेतुन) उपलब्ध होतील अशी सोय करणे. तसेच राज्य शासनाच्या विविध योजनेमध्ये त्याच्या गुणवत्तेनुसार रोजगाराची संधी देणे. अनिवार्य करणे. |
| | १९ | महाराष्ट्र राज्यात होणा-या विविध नाटय स्पर्धाचे वेळापत्रक तयार करुन अनेक स्पर्धा ऐकाच कालावधीत येणार नाहीत याबाबत नियोजन करणे. |
| | २० | नाटय संस्थाना प्रयोगासाठी दिलेल्या तारखा ४/५ दिवस आधी राजकीय कार्यक्रमासाठी दबाव टाकून काढून घेतल्या जातात. अशा वेळी ऑनलाईन तिकिट विक्री झालेली असते. परिणामी नाटय निर्माता/ संस्थाना आर्थिक नुकसानीसह मनस्ताप सहन करावा लागतो याबाबत शासनाकडून उपाया योजना करण्यात यावी. |
| | २१ | शालेय शिक्षणांत नाटय रंगभूमी हा विषय सामिल करणे. |

**धोरणात्मक शिफारशी**

- सांस्कृतिक धोरणातील समन्वय - इतर खात्याशी संबंधित बाबी जसे वाहतुक, पर्यटन, शिक्षण नागरी विकास
- महानगरपालिका आणि खाजगी संस्थांची नाटयगृहे त्यांचे नियम अथवा मार्गदर्शक तत्वे.
- नाटकांची माहिती शासनाच्या पोर्टल वर यावी.

- प्रायोगिक थिएटर चे अर्थकारण विचित्र आहे. राज्य नाटय स्पर्धेतील नाटकांना मोठी बक्षिसे देण्याऐवजी प्रयोगाचा खर्च देणे आवश्यक आहे.
- अनुदान धोरण
- थिएटर खर्च धोरण
- शासन कलाक्षेत्राविषयी अत्यंत उदास आहे. त्यामुळे सतत तेच मुद्दे येत राहतात. यावर ठोस उपायांची गरज आहे.
- अनुदान देणे हा कलाक्षेत्र बळकट करण्याचा मार्ग नाही. अनुदान धोरणात आमूलाग्र बदलाची आवश्यकता आहे. अनुदाना पेक्षा प्रयोग खर्च मदत मोलाची
- सांस्कृतिक क्षेत्रासाठी एक खिडकी सारखी योजना नाही त्यामुळे कलावंतांना आपल्या कामांसाठी सगळीकडे फिरत राहावे लागते
- जिल्हा स्तरावर सांस्कृतिक अधिकारी अपरिहार्य आहे. त्यामुळे धोरणाची अंमल बजावणी प्रभावीपणे होऊ शकते.
- राज्यातील रंगकर्मीची सूची आणि प्रत्येकाला एक आयडी देणे अत्यावश्यक आहे
- रंगकर्मीसाठी समग्र  विमा योजनेची गरज किंवा केंद्राच्या विमा योजनांशी संलग्न करणे आवश्यक
- रंगभूमी वरील बॅक- स्टेज कलावंतांना कामगार दर्जा आणि कौशल्य विद्यापीठाशी जोडणे अत्यंत गरजेचे आहे
- आमदार निधित नाटकाच्या मदतीसाठी तरतूद नाही
- ठिकठिकाणची समाज मंदिरे खाजगी मालमत्ता झाल्याने रंगकर्मीना तालमींसाठी स्वस्त जागाच नाही
- वृद्ध कलावंत पेन्शन योजना पुनर्विचार आणि सुलभ धोरण
- देशात सहा दशकापासून राज्य नाट्य स्पर्धा घेणारे एकमेव राज्य असले तरी त्यातील नियमावली आणि इतर बाबी बाबत मागील पानांवरून पुढे , असेच स्वरूप रेटल्याने, त्यातून राज्यासाठी अपेक्षित सांस्कृतिक संचित तयार होत नाही
- बाल रंगभूमी केवळ सतत खस्ता खाणाऱ्या काही रंगकर्मी च्या बळावर उभी आहे.  तिची व्याप्ती मोठी आणि काम मूलभूत महत्वाचे असूनही सरकारचे त्याविषयी काहीही ठोस धोरण नाही.
- शालेय अभ्यासक्रमात नाटक हा विषयच नाही. नवीन शैक्षणिक धोरणात तशी तरतूद आहे पण त्याबद्दल लोकात अजून आवश्यक जागृती नाही.  नवे शैक्षणिक धोरण आणि सांस्कृतिक कार्य यांचा मेळ घालणारी श्वेत पत्रिका आवश्यक
- सदर धोरणात नाटय गृहाचे भाडे, महागाईच्या दरानुसार वाढणारे भाडे, भाडयाव्यतिरिक्त

    नाटगृहाच्या उपलब्‍ध्ा अन्य जागेचा वापर करुन उत्पन्न वाढविणे. आधुनिक तंत्रज्ञानाचा व माहिती

    तंत्रज्ञानाचा योग्य वापर करुन  स्वच्छतेपासून सुरक्षेते पर्यंतच्या बाबीचे ऑटोमेशन करणे.

    नाटयगृहाचा स्थिर खर्च (फिक्सड कॉस्ट- नाटयगृह सुरु नसले तरी होणारा मुलभूत खर्च-

    सुरक्षा,पाणीपट्टी, मालमत्ता कर, इ. ) शासन अनुदानातुन किंवा अन्य मार्गाने कसा भरुन काढता येईल. आणि बदलता खर्च (व्हेरिएबल कॉस्ट- प्रयोग वाढले की लाईट बिल वाढणार) भाडयाच्या खर्चातून कसा वळती करुन घेता येईल. याचा विचार करणे तसेच उत्पन्न आणि खर्च याचा ताळमेळ घालण्यासाठी  सूत्र ठरविणे.

- शासकीय व निमशासकीय विभाग/संस्थांनी नाटयगृहाचे व्यवस्थापन करु नये केवळ, सरंचनात्मक सोई, उपलब्ध करुन दयाव्यात.
- संपूर्ण राज्यभर मनपा आणि पालिका थिएटर्स ची भाडी याबद्दल निश्चित नियमावली आणि धोरण हवे. प्रयोगखर्च आणि मिळणारे अनुदान एकमेकांशी विपरीत आहे.
- नाट्य संमेलने आणि त्यासाठी दिले जाणारे शासकीय अनुदान सर्व प्रकारच्या रंगभूमीला मिळत नाही त्याचे एक धोरण ठरवले पाहिजे.

## ८. नृत्य उपासमितीच्या मूळ शिफारशी

**धोरणात्मक शिफारसी**

- शास्त्रीय भारतीय नृत्य हा प्राचीन भारताच्या मोठ्या सांस्कृतिक आणि आध्यात्मिक वातावरणाचा एक भाग आहे. यात संगीता त्राया आणि त्याचे संरचित स्वरूप, धार्मिक/आध्यात्मिक सामग्री आणि अनेक पातळ्यांवर सखोल सौंदर्याचा अनुभव समाविष्ट आहे. हा अभ्यासक्रम शास्त्रीय भारतीय नृत्याच्या या सर्व पैलूंबद्दल संवेदनशील असला पाहिजे आणि विशेषत: या प्रकारांना जन्म देणाऱ्या योगिक जागतिक दृष्टिकोनावर भर दिला पाहिजे.
- जरी काही मुले कलाकार बनू शकतात, परंतु या कलांची प्रामुख्याने निर्मिती ज्या अध्यात्मिक मूल्यांसाठी केली गेली आहे त्यावर भर दिला पाहिजे. प्राचीन भारतीय कला ही आध्यात्मिक शिक्षणाची साधने होती आणि आजही मुलांच्या शिक्षणात तीच भूमिका बजावत राहतील याची खात्री अभ्यासक्रमाने केली पाहिजे. प्रबळ अध्यात्मिक मूल्यांशिवाय केवळ रूपांचे शिक्षण ज्याने त्याला जन्म दिला तो केवळ मनोरंजनाचा प्रकार बनवेल.
- शास्त्रीय नृत्यांचा प्रसार आणि लोक/शिक्षकांच्या विस्तृत श्रेणीसाठी प्रथम संवेदना, लोकसंख्याशास्त्राचा अभ्यास आणि टप्प्याटप्प्याने शिक्षण मॉड्यूल तयार करणे आवश्यक आहे ज्यासाठी संकल्पना, उद्दीष्ट, सामग्री आणि कार्यपद्धती यावर चर्चा आणि रचना करणे आवश्यक आहे.
- नवशिक्याच्या स्तरावरील शिकणाऱ्यांना नृत्य प्रकारातील फॉर्म बनविण्याचे पैलू समजून घेण्यासाठी आणि ते दृश्य कला, भौतिकशास्त्र आणि इतर प्रवाहांशी कसे जोडलेले आहे हे पाहण्यासाठी मार्गदर्शन केले पाहिजे.
- प्राथमिक शालेय स्तरापासून शारीरिक तंदुरुस्तीच्या महत्त्वावर जोर देऊन नृत्य शिकवले पाहिजे, मग ते लहान मुले असो किंवा प्रौढ, कोविड नंतर, बरीच मुले कमी सक्रिय झाली आहेत, लठ्ठ झाली आहेत, जे धोकादायक आहे. शक्य तितक्या जास्त शारीरिक क्रिया केल्या पाहिजेत, विशेषत: नृत्य हा प्राणी साम्राज्य, गणित आणि विशेषत: प्राथमिक विभागात विषय शिकवण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या अनेक नाविन्यपूर्ण मार्गांचे स्पष्टीकरण देण्यासाठी मुहावरा म्हणून वापरला जाऊ शकतो.
- माध्यमिक विभागातून हा एक महत्त्वाचा विषय असावा आणि कोणत्याही बालकाला प्रकृती किंवा इतर कारणांमुळे शारीरिकदृष्ट्या सक्षम नसल्यास नृत्यप्रवाहाच्या विविध पैलूंची ओळख करून द्यावी. जसे की थिअरी प्रोजेक्ट, डान्स फोटोग्राफी, लेख/अहवाल लेखन, इव्हेंट मॅनेजमेंट, कॉस्च्युम डिझाईन आणि मेकअप जेणेकरून मुल कॉलेज किंवा युनिव्हर्सिटीमध्ये जाते तेव्हा त्याला नृत्याचे ज्ञान चांगले असते जे आपला सांस्कृतिक वारसा आहे आणि ते करू शकतात. त्यांच्या इतर करिअरसह एक अतिरिक्त व्यवसाय देखील आहे.
- जर आपण शाळेच्या आउटरीच प्रोग्रामसह सुरुवात केली तर ते चांगले होईल, जिथे नोंदणीकृत कलाकारांना काही सत्रांसाठी त्यांना शिकवण्याची संधी दिली जाईल.

- हा पोहोच कार्यक्रम आम्हाला शालेय स्तरावर आमच्या शास्त्रीय नृत्याचा प्रचार आणि प्रसार करण्यास मदत करेल जेणेकरून मुलांना कला प्रकार किती सुंदर आहे याची कल्पना येईल.
- सर्व बोर्डांवरील प्रत्येक शाळेने शाळेत शास्त्रीय नृत्याचा कालावधी सुरू केला पाहिजे जेणेकरून विद्यार्थ्यांना पुढील निवड करण्यासाठी आणि स्वारस्य असल्यास तज्ञांना एक्सपोजर मिळेल.
- शास्त्रीय नृत्य क्षेत्रातील दिग्गजांची समिती स्थापन करता येईल. ते एकत्रितपणे अभ्यासक्रम ठरवू शकतात.
- शालेय पातळीवर शास्त्रीय नृत्यातील भवितव्य या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून त्यातील रुची वाढवून शास्त्रीय नृत्याचा अभ्यासक्रम निश्चित करावा.
- शालेय शिक्षणात शास्त्रीय नृत्याच्या अभ्यासक्रमाला अन्य विषया प्रमाणे महत्व दिले गेले पाहिजे. या विषयाची योग्य पद्धतीने परीक्षा घेतल्या जावी , गुणदान असावे व त्याचा परिणाम गुण पत्रिकेत देखील असावा.
- जसे चित्रकलेचे व संगीताचे तास मुलांना असतात, तसेच आठवड्यातून शास्त्रीय नृत्याचे देखील दोन तास वेळा पत्रकात असावेत.
- शास्त्रीय नृत्य कला हे फक्त नृत्य नसून यात अनेक कलांचा अंतर्भाव आहे. उदा. चित्रकला, संगीत कला , नाट्य कला , शिल्प कला इत्यादी.
- भारतीय शास्त्रीय संगीत व नृत्य कलांमध्ये सुसंस्कृत माणूस घडविण्याची क्षमता आहे.
- त्या अनुषंगाने शालेय शिक्षणात या विषयाला महत्व द्यावे.
- शास्त्रीय नृत्याचा अभ्यासक्रम सहज,सोपा व आनंदयुक्त आत्मसात करण्याजोगा असावा
- NEP च्या अंतर्गत रंगमंचीय कला द्वारे शिक्षण प्रयोजनार्थ विचार केला गेला आहे परंतु स्वतंत्रपणे कलेचा विकास होण्यासाठी आणखी विचार करायला हवा.
- शास्त्रीय नृत्याचे प्रशिक्षण 'शास्त्र-प्रयोग- परंपरा-अनुसंधान' या स्वरुपात देता येतील या साठी अधिक प्रयत्न करायला हवेत. नृत्य शिक्षणाचे स्वरुप 'शास्त्र-प्रयोग- परंपरा-अनुसंधान' अशा प्रकारचे असणे आवश्यक आहे. कारण या स्वरुपात मी स्वतः देखील नृत्य शिकत आहे. या स्वरुपात नृत्य शिकताना त्याच्या अष्टपैलूंचा खोलवर अभ्यास करण्याची संधी मिळते व परिणामत: तो विद्यार्थी कलेच्या विकासासाठी देखील प्रेरित होतो.
- नृत्याचा अभ्यासक्रम काही स्तरां मध्ये विभाजित केला जावा जसे, प्राथमिक,मध्य,उच्च
- प्राथमिक : या मध्ये शास्त्रीय नृत्याचा परिचय, प्राथमिक प्रात्यक्षिक पाठ व सिद्धांत, कला विषयक जागृती
- मध्य : प्राथमिक पाठ नंतर नृत्यामधील क्लिष्टता पूर्वक विषय शिकवले जावेत तसेच त्यातील अभिजातता ,सौंदर्यानुभव यांच्या सिद्धांतांचा देखील परिचय करून द्यावा व नृत्य शिकण्यासाठी आवश्यक व त्यास पोषक विषयांचे ज्ञान देखील द्यावे जसे, गायन,वादन,संस्कृत भाषा,शिल्पकला,चित्रकला इत्यादि. रंगमंच प्रस्तुती ची महत्ता व त्याचा आदर विषयी योग्य मार्गदर्शन देत रंगमंच प्रस्तुती ची संधी द्यावी.
- भारतीय ज्ञान परंपरे विषयी सांगितले जावे व नृत्य जगता मधील दिग्गज कलाकारांच्या योगदानाबद्दल संवेदना व कृतज्ञ भाव निर्माण करणे आवश्यक आहे.
- उच्च : या स्तरावरील अभ्यासक्रमा मध्ये नृत्य कलेचा अभ्यास शास्त्र-प्रयोग- परंपरा-अनुसंधान या स्वरुपात व्हावा जेणे करून एक भावी कलाकार जेव्हा या अभ्यासक्रमा द्वारे निर्माण होईल तेव्हा तो पुढे त्या नृत्य कलेचा प्रचार- प्रसार जबाबदारीने करण्याचा प्रयत्न करेल.
- सर्वसमावेशक संस्था व व्यक्तींना सहभाग

- सांस्कृतिक स्त्रोत एवं प्रशिक्षण केंद्र चे ( CCRT ) विभागीय स्तरावर निवड ( स्थानिक परिस्थीती, प्रशिक्षणाचा स्तर आणि आर्थिक स्तर लक्ष्यात घेऊन निवड स्थानिक पातळीवर करण्यात यावी ) त्याच बरोबर विद्यार्थ्यांची वाढती संख्या लक्ष्यात घेता CCRT शिष्यवृत्ती संख्ये मधे वाढ करावी.
- ग्रामीण व नागरी भागात उच्च शिक्षणासाठी मोठ्या शहरांमध्ये स्थलांतर केले जाते ज्यामुळे विद्यार्थ्यांच्या (कला उपासक विद्यार्थ्यांच्या) कला शिक्षणात खंड पडतो. त्यासाठी पालकांमध्ये कला विषयक जाणीव, जागृती आणि प्रबोधन करणे आवश्यक आहे.
- विशेष विद्यार्थांसाठी शासनाच्या माध्यमातून नि:शुल्क विविध सेवा वस्त्यांमध्ये सांस्कृतिक उपक्रम.
- सर्व संस्थांचा अभ्यासक्रम सारखा असावा असे वाटते. काही करणा सत्व विद्यार्थी एका गावाहून गावाला गेला तरी त्याला त्या पुढील वर्गात प्रवेश मिळावा. म्हणजे त्या विद्यार्थ्याचे नुकसान होणार नाही.
- शैक्षणिक धोरणामध्ये राज्य सरकारने नृत्य शिक्षणास इतर विषय शिक्षणा प्रमाणेच किंवा किमान कौशल्य /व्यावसायिक प्रशिक्षणा प्रमाणेच गृहीत धरून नृत्य विषयासही प्राधान्य द्यावे.
- इयत्ता १ली पासून ते पदवीका अभ्यासक्रमा मध्ये शास्त्रीय नृत्य शिक्षणाचा अंतर्भाव व्हावा.
- राज्यातील प्रत्येक विद्यालय / महाविद्यालय यांना नृत्य विषय शिकवणे अनिवार्य करावे.
- नृत्य कलेमध्ये इतर अनेक कलांचा अंतर्भाव असतो. त्यात संगीत, नाट्य, चित्र, योग व शिल्प शास्त्रा चा विशेष समावेश आहे. त्यामुळे नृत्याचा अभ्यासक्रम तयार करताना या विषयाचाही अंतर्भाव त्यात असणे गरजेचे व अनिवार्य आहे.
    - अनुक्रमे आपले गाव, शहर, तालुका, जिल्हा, विभाग, राज्य व देश या अंतर्गत असलेल्या लेण्या, पुराण वास्तु व मंदिरा वरील नृत्यकला समाजापर्यंत व विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचण्यासाठी त्या वस्तूंची फोटो सहित योग्य माहिती अभ्यासक्रमामध्ये नमूद करणे गरजेचे आहे.
    - नृत्यासाठी जीवन अर्पिलेल्या व विशेष योगदान दिलेल्या ज्येष्ठ, वृद्ध तसेच दिवंगत नृत्यकलावंतांची ओळख नव्या पिढीला व्हावी या उद्देशाने अशा कलावंतांचे जीवन चरित्र अभ्यासक्रमात नोंदवले पाहिजे. जेणेकरून नव्या पिढीला ते जीवन चरित्र पूरक मार्गदर्शक ठरेल.
- सिद्धांत अभ्यासक्रमात शास्त्र आणि सध्याच्या लेखनातील संकल्पना, भारतीय तत्त्वज्ञान, इतिहास, साहित्य, प्राचीन वास्तुकला आणि संस्कृत आणि निवडलेल्या नृत्य परंपरेशी संबंधित भाषांवरील मूलभूत संकल्पना समाविष्ट केल्या पाहिजेत.
- प्रॅक्टिकममध्ये पारंपारिक रचना आणि विद्यार्थ्यांनी मार्गदर्शकांच्या हाताखाली तयार केलेल्या नवीन तुकड्या, त्यांच्या नृत्य आणि इतर कला प्रकारातील कलाकारांसह मैफिली आणि कार्यशाळा/मास्टर क्लासचे निरीक्षण आणि चर्चा यांचा समावेश असावा.
- खाजगी वर्गातील विद्यार्थ्यांच्या क्षमतेनुसार वेग अधिक असू शकतो.
- भारतीय शास्त्रीय नृत्याचा अभ्यासक्रमात एक विषय म्हणून समावेश.
- गुरुंसाठी राज्यव्यापी बेंचमार्क तयार करणे जसे की गुरू, ज्येष्ठता, प्राप्त केलेली प्रमाणपत्रे आणि कार्यप्रदर्शन (काही) हे सुनिश्चित करेल की पालक आणि विद्यार्थी, ज्यांना स्वारस्य आहे, त्यांना गुरुंची वस्तुनिष्ठ यादी सापडेल जी ते शिकू शकतील. तसेच, आम्ही शिकवण्याचे एक मानक राखण्यास सक्षम आहोत ज्यामुळे नृत्य प्रकार कमी होणार नाही याची खात्री होईल.
- शाळांमध्ये ठराविक वयोगटासाठी सार्वत्रिक अभ्यासक्रम असायला हवा, जेणेकरुन मुलाने दुसऱ्या राज्यात त्याच नृत्याची परीक्षा दिली तर त्यांनीही तोच अभ्यासक्रम पाळावा. यामुळे अभ्यासक्रमात एकसमानता येण्यास मदत होईल.

- हे प्रशिक्षण गुरु शिष्य परंपरा द्वारे केले जाते, आणि जर महाराष्ट्रासाठी एक समान अभ्यासक्रम सुरू केला गेला आणि एक समान प्रमाणपत्र/परीक्षा घेतली गेली तर आम्ही खूप आभारी राहू.
- शाळा आणि महाविद्यालयांमध्ये परफॉर्मिंग आर्ट्सच्या इतिहासासाठी किमान दोन सत्रे, जेणेकरून आपल्या प्राचीन परंतु अतिशय दोलायमान शास्त्रीय कलांच्या महानतेची आणि सौंदर्याची थोडीशी समज होईल. यात शाळांमध्ये कला कौतुकाचा परिचय आणि कला आणि गणित, कला आणि तत्त्वज्ञान, इतिहास, कला आणि समाजशास्त्र आणि यासारख्या आंतर-विषय ज्ञानाचा परिचय देखील समाविष्ट असू शकतो.

**शिक्षकांच्या नियुक्त्या**

- शैक्षणिक धोरण अंतर्गत नृत्य विषय शिकवण्यासाठी नृत्य विषयातील अनुक्रमे पदविका, पदवी व डिप्लोमा प्रमाणपत्र प्राप्त किमान २ उमेदवारांची नृत्य विषय शिकवण्यासाठी योग्यता /पात्रते नुसार नियुक्त प्रत्येक विद्यालयात व महाविद्यालयत करावी.
- प्रमाणपत्र /डिग्री नसलेले अनेक ज्येष्ठ नृत्य कलावंत नृत्य शिकवणी वर्ग घेऊन तुटपुंजा मिळकतीवर आपली उपजीविका करतात. यातून ते विद्यार्थ्यांना नृत्याची गोडी निर्माण करत असतात. हे त्यांचे योगदान लक्षात घेऊन अशा कलावंतांना अथवा गुरूंना किमान तासिका तत्त्वावरती शिकवण्याची संधी प्राप्त करून देण्याबाबतही विचार केला पाहिजे. तसेच अशा गुरूंच्या नृत्य शिकवणीस नृत्य बालवर्गाचा दर्जा देऊन यांच्या कार्यास प्रोत्साहन द्यावे
- जे ज्येष्ठ कलाकार यापुढे सराव करू शकत नाहीत किंवा परफॉर्म करू शकत नाहीत आणि त्यांना आर्थिक स्थैर्य नाही त्यांना सेवानिवृत्ती लाभ निधी.
- शाळा आणि महाविद्यालयांमध्ये नृत्य शिक्षक म्हणून नोकरीच्या संधी.
- फील्ड वर्क / डॉक्युमेंटेशन
- उच्च स्तरावरील अभ्यास क्रमात field work करता येतील असे विविध प्रकल्पांची योजना केली जावी, सांस्कृतिक वारसा व दिग्गज कलाकार/ गुरु यांच्या कार्याचे documentation कसे करावे हे शिकविले जावे, तसेच परंपरा मधील लुप्त रचना शिकता येऊ शकतील अशा प्रकल्पांचे नियोजन करण्यात यायला हवे.
- हेरिटेज ठिकाणांना भेटी, विविध कलाप्रकारांच्या अभ्यासकांशी संवाद, भक्ती आणि लोक परंपरा आणि संगीत आणि काही वाद्य समजून घेण्याचा किंवा शिकण्याचा प्रयत्न.
- परिसंवाद, सभा, परिषदा, कार्यशाळा, व्याख्यान प्रात्यक्षिक इ
- युवा पिढीचे कला विद्यार्थी, कलाकार, शिक्षक कलाक्षेत्राच्या विकासाकरिता उत्साह पूर्वक योगदान देऊ शकतात यासाठी काही पर्याय निर्माण झाले पाहिजेत. जसे, स्थानीय कला संस्था जसे, गुरुकुल सारख्या संस्थेशी संलग्न होऊन विविध चर्चा सत्र,बैठक, व्याख्यान सारखे आयोजन रसिक,जिज्ञासु कला साधक, नृत्य शिक्षण या सर्वांच्या विकासासाठी करण्यात यायला हवे.
- डान्स थिअरी, प्रॅक्टिकम आणि परफॉर्मन्स पैलूंवरील आशय सुधारण्यासाठी सेमिनार किंवा मीटिंग महत्त्वाची आहे ज्यासाठी तज्ज्ञांना आमंत्रित केले जाऊ शकते आणि त्यात सहभागी होऊ शकते.
- सुरुवातीला, शास्त्रीय परफॉर्मिंग आर्ट्समध्ये विद्यार्थ्यांची आवड निर्माण करण्यासाठी शाळांमध्ये लाइव्ह नृत्य प्रशंसा कार्यशाळा/सत्र नियमितपणे आयोजित करणे आवश्यक आहे. त्याच बरोबर, भारतीय संस्कृतीची लांबी आणि श्वास मुलांना परिचित करण्यासाठी खास तयार केलेले किंवा सध्याचे यूट्यूब व्हिडिओ नियमितपणे पाहणे आवश्यक आहे.
- शैक्षणिकदृष्ट्या संशोधनाकडे कल असलेल्या नर्तकांसाठी आणि पीएच.डी. असलेल्या ज्येष्ठ नर्तकांसाठी कला आणि संस्कृती या विषयावर वार्षिक राज्यव्यापी परिषदा आणि परिसंवाद.

- शाळा आणि महाविद्यालये विद्यार्थ्यांना मैफिली आणि व्याख्यान प्रात्यक्षिकांना उपस्थित राहण्यासाठी प्रोत्साहित करतात आणि व्यवस्था करतात.
- कलाकारांची नोंदणी
- एक स्वतंत्र मंच स्थापन केला जाऊ शकतो जिथे सर्व कलाकार समाजासाठी योगदान देण्यासाठी आणि सेवा करण्यासाठी स्वतःची नोंदणी करतात.

**शासनाकडून प्रमाणपत्र**

- स्वतंत्र परीक्षा देणाऱ्या आमच्यासारख्या संस्थांना प्रमाणित निकषांची पूर्तता केल्यास सरकारकडून मान्यताप्राप्त प्रमाणपत्र मिळू शकते का?
- ऑडिटोरियम / प्रॅक्टिस हॉलची उपलब्धता
- शास्त्रीय नृत्य आयोजक आणि कलाकारांसाठी प्राधान्य आणि सवलतीसह ऑडिटोरियम स्लॉटची उपलब्धता.
- आमच्याकडे विविध केंद्रे आहेत जिथे आम्ही वर्गासाठी शाळेची जागा भाड्याने देतो, आमच्या शिक्षकांसाठी वेगवेगळ्या केंद्रांमधून आर्टिस्ट कार्ड जारी केले जाऊ शकते की ते फक्त संस्थेसाठी आहे?
- तसेच, वर्ग आयोजित करण्यासाठी चांगल्या स्वच्छतेच्या जागेसाठी भाड्यात सवलत मिळण्यासाठी काही तरतुदी करता येतील का?
- सांस्कृतिक मंत्रालयातर्फे राज्यस्तरीय महोत्सव / मैफिली
- जर आपण एक मंच तयार करू शकलो तर, सांस्कृतिक मंत्रालयाकडून एक राज्यस्तरीय महोत्सव आयोजित केला जाऊ शकतो ज्यामध्ये तरुण आणि नवोदित कलाकारांना सादरीकरण करण्याची संधी मिळेल.
- स्थानिक संस्था, स्वयंसेवी संस्था आणि विद्यापीठांच्या मदतीने उदयोन्मुख, प्रस्थापित आणि दिग्गज कलाकारांच्या नियतकालिक मैफिली आयोजित केल्या पाहिजेत. यामुळे स्थानिक कलागुणांना प्रोत्साहन मिळेल, पारंपारिक नृत्यासाठी प्रेक्षक तयार होतील आणि नृत्य शिकवण्याचीही तयारी होईल.
- अनौपचारिक कार्यक्रम आणि कला महोत्सव ग्रामीण भागात आयोजित केले जावेत जेणेकरून शहरी आणि ग्रामीण यांच्यातील दरी कमी होईल. त्यासाठी शासनाने निधी मंजूर करावा.
- महाराष्ट्रातील वारसा स्थळे खुली करून नृत्य महोत्सवांसाठी व्यासपीठ म्हणून वापरणे आवश्यक आहे.
- स्थानिक पातळीवर शासनाच्या विविध कला विषयक उपक्रम, सांस्कृतिक कार्यक्रमात सर्व समावेशक सहभाग आवश्यक आहे. (सर्व स्तरीय कलावंत, कला प्रशिक्षण देणाऱ्या संस्था, विविध गुरू आणि संबंधीत याचा सहभाग)
- कला विषयक जन जागृती आणि प्रबोधन विषयी ग्रामीण व नागरी पातळीवर विविध कला उपक्रमांचे स्थानिक संस्था, कलावंत आणि गुरूंच्या माध्यमांतून सातत्य पूर्ण आयोजन.
- हेरिटेज स्ट्रक्चर्समधील कामगिरीच्या संदर्भात, मी विचारू इच्छितो
- महाराष्ट्रातील सरकारी सणांची यादी आणि सुलभ प्रवेशासाठी या उत्सवांसाठी अर्ज करण्याची स्पष्ट प्रक्रिया.
- राज्य सरकारच्या अखत्यारीतील वारसा वास्तूंची यादी, ज्यामध्ये मंदिरे, किल्ले इत्यादींचा समावेश आहे, परंतु त्यापुरते मर्यादित नाही, जेथे व्हिडिओ रेकॉर्डिंग, टॉक शो आणि परफॉर्मन्स यासारख्या नृत्याच्या प्रचाराशी संबंधित सर्व क्रियाकलापांना परवानगी आहे. त्यासाठी अर्जाच्या प्रक्रियेबाबतही आम्हाला स्पष्टता हवी आहे.

- तरुण नर्तकांसाठी तसेच वरिष्ठ नर्तकांसाठी नियमित कामगिरीच्या संधी.
- शास्त्रीय कला ग्रामीण भागात घेऊन जाणे आणि तेथील विद्यार्थ्यांना ते पाहण्याची आणि शिकण्याची संधी देणे,उत्सव आयोजित करण्यासाठी अनुदान,हेरिटेज साइट्सवर कामगिरीसाठी संधी.
- पुस्तके, संदर्भ पुस्तके: सूचना एवढीच करावीशी वाटते की विद्यार्थिनींना शास्त्र अभ्यासाकरिता विविध प्राचीन शास्त्रीय ग्रंथ सहज उपलब्ध होत नाहीत तर शासनातर्फे हे प्राचीन शास्त्रीय ग्रंथ सर्वांना विनामूल्य आणि ऑनलाईन उपलब्ध करून देता आले, तर लोकांना ते सहज उपलब्ध होऊन त्याच्याविषयीचा अभ्यास करणे सोपे जाईल.
- शासन, योजना, शिष्यवृत्ती: शासनाच्या ज्या विविध शिष्यवृत्ती, कार्यक्रम, कार्यशाळा, किंवा विविध योजना असतात, या सर्वसामान्यांपर्यंत नेहमी १००% पोहोचत नाहीत. त्यामुळे त्या योजनांचा लाभ घेता येत नाही. त्यामुळे ही माहिती किंवा आता आपण तयार करणारे धोरण, जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी जास्तीत जास्त पब्लिसिटी आणि एडवर्टीजमेंट याच्यावर भर कसा दिला जाईल याचा आपण जरूर विचार करावा असे मला वाटते.
- शिक्षक/प्रशिक्षण/रिफ्रेशर कोर्सेससाठी मार्गदर्शन: NEP द्वारे अशा शिक्षकांना योग्य मार्गदर्शन देण्यात यावे. नृत्य प्रशिक्षण विविध संस्थांमध्ये राबविण्यासाठी, शिक्षकांना सामान्य समज आणि कार्यपद्धती यासाठी रिफ्रेशर कार्यक्रम तयार करणे महत्त्वाचे ठरेल. असे अनेक नृत्य विद्यार्थी आहेत ज्यांनी काही काळ नृत्य प्रशिक्षण घेतले परंतु काही कारणांमुळे प्रशिक्षण सोडले. NEP ची ओळख करून, असे नृत्य विद्यार्थी नृत्य शिक्षकाचे जीवन चालू ठेवण्यास सक्षम होण्यासाठी रीफ्रेशर कार्यक्रम किंवा गुरू अंतर्गत पुढील शिक्षण घेऊ शकतात.
- कलाकार आणि संभाव्य शिक्षकांना ओळखण्यासाठी, प्रशिक्षण देण्यासाठी आणि अध्यापनाचे नियमन करण्यासाठी, असे सुचवले जाते की नोडल केंद्रे किंवा प्रतिनिधी निवडले जावे जे मानक मार्गदर्शक तत्त्वांनुसार उपक्रम राबवू शकतील. नियतकालिक मूल्यांकन आणि अभिप्राय मानक राखण्यासाठी उपयुक्त ठरतील.
- स्वावलंबी होण्यासाठी नृत्य आणि संगीत संबंधित कौशल्ये शिकवली पाहिजेत आणि त्यांचा सराव केला पाहिजे. प्रशिक्षणादरम्यान ही कौशल्ये शिकल्यानंतर मैफिलीसाठी संगीत वाद्यवृंद, बॅकस्टेज मदत, प्रकाश डिझाइन, फोटोग्राफी इ. आयोजित करून इतर कोणत्याही नृत्यांगना किंवा विद्यार्थ्याला सहाय्य आणि समर्थन प्रदान करा.
- जर शालेय मुलांना परीक्षेच्या आधारे प्रमाणपत्र दिले जाणार असेल, तर कठोर शिक्षक प्रशिक्षण अभ्यासक्रम आयोजित करणे अत्यंत आवश्यक आहे. शिक्षकांची वरिष्ठ गुरूंकडून तपासणी झाली पाहिजे, तरच ते शाळांमध्ये शिकवू शकतील. अभ्यासक्रमाचे मूल्य शिक्षकांच्या क्षमता आणि गुणवत्तेवर अवलंबून असेल.
- या सर्व बाबींची अंमलबजावणी करणे शिक्षकांच्या हातात आहे आणि त्यामुळे शिक्षकांच्या प्रशिक्षणाकडे विशेष लक्ष देणे आवश्यक आहे.

**गुणवत्ता नियंत्रण**

- नृत्य वर्गातील विद्यार्थ्यांची संख्या मर्यादित असणे आवश्यक आहे आणि कठोर गुणवत्ता नियंत्रणाचा आग्रह धरला पाहिजे.

## ९. चित्रपट उपासमितीच्या मूळ शिफारशी

**धोरणात्मक शिफारशी** :-

**(१)चित्रपट प्रशिक्षण विद्यापीठाची स्थापना करणे :**

चित्रपट कला आणि तंत्र, तसेच चित्रपट क्षेत्राशी निगडित विविध अंगांचा अभ्यास करू पाहणाऱ्या राज्यातील गरजू, गुणवंत, होतकरू विद्यार्थ्यांकरिता कौशल्याधिष्ठित चित्रपट प्रशिक्षण विद्यापीठाची निर्मिती करणे. या विद्यापीठामध्ये चित्रपट क्षेत्राशी निगडित विविध घटकांचा कौशल्याभिमुख अभ्यासक्रम तयार करून अध्ययन सुरू करणे.

**(२) प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी लघु चित्रपटगृहांची निर्मिती करणे :**

मराठी चित्रपटांची वितरण व्याप्ती (बॉक्स कलेक्शन) वाढविण्यासाठी तालुकास्तरावर, उदाहरणार्थ-एसटी बसस्थानक आदी ठिकाणी साधारण १०० आसनी क्षमतेच्या चित्रपटगृहांची (थिएटर) बांधणी करणे. या माध्यमातून मराठी चित्रपटांसाठी राज्यभर चित्रपटगृहांचे जाळे निर्माण करणे.

**(३) मराठी चित्रपट महोत्सवांचे आयोजन करणे :**

मराठी चित्रपटांना प्रोत्साहन देण्यासाठी, मराठी चित्रपटांची प्रेक्षक व्याप्ती वाढविण्यासाठी मराठी चित्रपट महोत्सवांचे आयोजन करणे. राज्य चित्रपट महोत्सव, राष्ट्रीय चित्रपट महोत्सव, तसेच नामांकित आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवांमध्ये गौरविलेले व पुरस्कार प्राप्त मराठी चित्रपटांचा या महोत्सवांमध्ये समावेश करणे.

**(४) चित्रपट पुरस्कार परीक्षण समितीत कालानुरूप बदल करणे :**

राज्य चित्रपट पुरस्कार तसेच शासनाचे भविष्यातील चित्रपटविषयक अन्य पुरस्कार यांच्या परीक्षण समितीमध्ये इतर भाषक परीक्षकांचाही समावेश केल्यास पुरस्कार निवड समितीमध्ये पारदर्शकता येईल. त्याद्वारे सांस्कृतिक आणि भाषिक आदानप्रदान प्रक्रियाही पार पाडली जाईल. तसेच आवश्यकतेप्रमाणे चित्रपट परीक्षण प्रक्रियेसाठी आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने समिती सदस्यांना सोयी-सुविधा पुरवून ही परीक्षण प्रक्रिया गतिमान आणि पारदर्शक करणे.

**(५) फिल्म सोसायटींना बळ देणे :**

जागतिक सिनेमा तसेच विविध देशी-विदेशी भाषांतील सिनेमा महाराष्ट्रातील चित्रपट रसिकांपर्यंत पोहोचवण्याच्या दृष्टीने गेल्या पाच दशकांत फिल्म सोसायटींनी अमूल्य योगदान दिले आहे. सर्वसामान्यांमध्ये चित्रपट साक्षरता वाढावी यासाठी राज्यात सुमारे २५ फिल्म सोसायटी सध्या कार्यरत आहेत. अशा फिल्म सोसायटींना आर्थिक पाठबळासह शासनाचे सहकार्य देऊन चित्रपट रसास्वाद संस्कृती वृध्दिंगत करणे.

**(६) निर्माते / कलावंत / दिग्दर्शक / तंत्रज्ञ यांच्यासाठी कार्यशाळा आयोजित करणे :**

चित्रपट कला व तंत्रात झपाट्याने बदल होत आहेत. आधुनिक तंत्रज्ञानामुळे तसेच काळानुसार उभी ठाकलेली आव्हाने, निर्माण झालेल्या शक्यता व संधी समजून घेण्यासाठी मार्गदर्शनपर कार्यशाळांचे आयोजन करणे.

**(७) टुरिंग टॉकिजला चालना देणे :**

अ. समस्या- टुरिंग टॉकीज उभारणीसाठी मोक्याची जागा उपलब्ध न होणे, बदलत्या नवतंत्रज्ञानाबरोबर टुरिंग टॉकिजच्या रचनेमध्ये न झालेला बदल, चित्रपटांच्या वितरणातील असमतोल, आसनव्यवस्थेत असलेला स्वच्छतेचा अभाव, परिणामी रोडावलेली प्रेक्षकसंख्या अशा समस्या टुरिंग टॉकिज यंत्रणेपुढे आहेत.

ब. उपाययोजना- राज्यात जत्रा-यात्रांमध्ये टुरिंग टॉकिज उभारणीसाठी स्थानिक प्रशासनाने प्रेक्षक येतील अशी मोक्याची जागा उपलब्ध करून देणे, टुरिंग टॉकिज मालकांनी नवतंत्रज्ञानाची कास धरून टॉकिज उभारणे, आसनव्यवस्था व स्वच्छतेबाबत विशेष काळजी घेणे.

क. धोरणात्मक बाब- टुरिंग टॉकिज व्यवसायाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी वार्षिक आर्थिक अनुदानाची तरतूद करणे. टुरिंग टॉकिजला चालना देण्यासाठी जिल्हास्तरावर प्रशासकीय यंत्रणेने कार्यवाही करणे.

**(८)एक पडदा चित्रपटगृहांचे पुनरुज्जीवन करणे** :

अ. समस्या- मल्टीप्लेक्सचा वेगाने होणारा उदय, एक पडदा चित्रपगृहांची देखभाल-दुरुस्तीबाबतची अनास्था, मल्टीप्लेक्सच्या तुलनेत एक पडदा चित्रपटगृहात प्रेक्षकांना सेवांबाबत व त्यांच्या दर्जाबाबत असणारी असमानता, एक पडदा चित्रपटगृह बांधणीकरिता आवश्यक कठोर परवानग्या.

ब. उपाययोजना- एक पडदा चित्रपटगृह बांधणीकरिता असणाऱ्या परवानगी अटी शिथील करणे, सेवा व दर्जामध्ये सुधारणा करून गुणवत्ता आणणे, दर्जेदार चित्रपट प्रदर्शित करून प्रेक्षकवर्ग वाढविण्यावर भर देणे.

क. धोरणात्मक बाब- मराठी चित्रपट कमी खर्चात जास्तीत जास्त प्रेक्षकांपर्यंत पोहोचविण्यासाठी एक पडदा चित्रपटगृहांचे पुनरुज्जीवन करणे.

**(९)मोबाइल फिल्म व्हॅन (थिएटर ऑन व्हील) निर्मिती करणे :**

मराठी चित्रपटांचा, तसेच चित्रपट कलेचा प्रचार-प्रसार बदलत्या तंत्रज्ञानाच्या उपयोजनातून होणे गरजेचे आहे. त्यादृष्टीने 'थिएटर ऑन व्हील' या संकल्पनेच्या धर्तीवर 'मोबाइल फिल्म व्हॅन' अर्थात 'फिरत्या चित्रपट प्रदर्शनी'च्या निर्मिती व प्रसार होण्यासाठी प्रयत्न करणे.

**(१०)महाराष्ट्रातील खाजगी चित्रीकरण स्थळांची शासनस्तरावरून प्रसिद्धी करणे :**

महाराष्ट्रात चित्रीकरण करण्यासाठी राज्य शासनाची दादासाहेब फाळके चित्रनगरी आणि कोल्हापूर चित्रनगरीकार्यान्वित आहेत. त्याचबरोबर महाराष्ट्रात निसर्गसंपन्न स्थळे, ऐतिहासिक वास्तू विपुल प्रमाणात आहेत.तेथील स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना देण्याच्या उद्देशाने आणि अशा स्थळांचे महत्त्व व्यापक स्तरावर अधोरेखित होण्याकरिता राज्यातील अशा स्थळांवर चित्रपटांचे चित्रीकरण होण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणे.

**(११) मराठी चित्रपटांना चित्रपटगृहांकडून मिळणाऱ्या नफा वाटप दरात सुसंगतता आणणे :**

हिंदी आणि इतर भाषिक चित्रपटांना चित्रपटगृहांकडून वितरित होणारा नफा आणि मराठी चित्रपटांना वितरित होणारा नफा यांच्या दरात तफावत आहे. अन्य भाषांतील चित्रपटांच्या तुलनेत चित्रपटगृहांकडून मराठी चित्रपटांना मिळणाऱ्या नफ्याचा दर कमी आहे. त्यामुळे अन्य भाषिक चित्रपट आणि मराठी चित्रपट यांना चित्रपटगृहांकडून मिळणाऱ्या नफ्याच्या दरात सुसंगतता व समानता आणणे.

**(१२) 'पेटा'चे एक कार्यालय मुंबई येथे उपलब्ध करून देणे :**

चित्रपटांच्या चित्रीकरणात अनेकदा प्राण्यांचा सहभाग घेतला जातो. त्यासाठी 'पीपल फॉर दी एथिकल ट्रीटमेंट ऑफ अँनिमल' अर्थात 'पेटा' या संस्थेकडून परवानगी घेणे अनिवार्य असते. सध्याच्या घडीला हे कार्यालय चेन्नई येथे आहे. मुंबईतील चित्रपट चित्रीकरणाचे प्रमाण जास्त असल्याने मुंबई येथेही 'पेटा' संस्थेचे विभागीय कार्यालय उपलब्ध करून देण्यास सहकार्य करणे.

**(१३) अन्य राज्यांमध्ये मराठी चित्रपट पोहचविण्यासाठी प्रोत्साहन देणे :**

अलीकडच्या काही वर्षांमध्ये भारतीय भाषांतील, विशेषत: दक्षिण भारतीय भाषांतील चित्रपटांचा प्रेक्षकवर्ग देशभर विस्तारला आहे, तसेच आर्थिक अंगानेही तेथील सिनेक्षेत्राचा प्रभाव वाढला आहे. त्याच धर्तीवर मराठीचित्रपटांचाही देशातील अन्य राज्यांमध्ये प्रेक्षकवर्ग वाढावा, मराठी सिनेमा अन्य राज्यांमध्येही जावा यादृष्टीने प्रोत्साहनपर प्रयत्न करणे.

**(१४) चित्रपट क्षेत्रास उद्योगाचा दर्जा देणे :**

राज्याच्या आणि देशाच्या आर्थिक वाढीत मनोरंजन विश्वाचाही मोठा वाटा आहे. चित्रपट निर्मितीसाठी विविध कौशल्यांवर आधारित श्रमाचे उपयोजन होते. हे ध्यानात घेऊन चित्रपट निर्मिती क्षेत्रास उद्योगाचा दर्जा देणे.

**(१५) मराठी चित्रपटांशी संबंधित विदासंच (डेटाबेस) तयार करणे :**

मराठी चित्रपट क्षेत्राशी संबंधित कार्यरत कलावंत, तंत्रज्ञ, दिग्दर्शक, निर्माते यांची सविस्तर नोंद शासनस्तरावर असण्याकरिता एकात्मिक संस्थळ (इंटिग्रेटेड वेबपोर्टल) तयार करून विदासंच (डेटाबेस) तयार करणे.

**(१६) मराठी चित्रपट संग्रहालयाची उभारणी करणे :**

मराठी चित्रपट क्षेत्राला ११० वर्षांची समृद्ध परंपरा आहे. या काळात निर्मिती आणि प्रदर्शित झालेल्या चित्रपटांचे जतन, संवर्धन करण्यासाठी आणि मराठी चित्रपटसृष्टीच्या ११० वर्षांच्या वाटचालीची ओळख करून देण्याकरिता अत्याधुनिक मराठी चित्रपट संग्रहालयाची उभारणी करणे.

**(१७) बाल चित्रपट महोत्सव आयोजित करणे :**

राज्यभर बालवर्गातही चित्रपटांविषयी आस्था निर्माण करण्याच्या दृष्टीने आणि बालवर्गाशी संबंधित चित्रपटांचा प्रसार होण्याच्या दृष्टीने राज्यभर बाल चित्रपट महोत्सवांचे आयोजन करणे.

**(१८) लघुचित्रपट स्पर्धेचे आयोजन करणे :**

मराठी लघुचित्रपटांच्या निर्मितीला प्रोत्साहन देण्यासाठी लघुचित्रपट स्पर्धेचे आयोजन करणे.

**(१९) महिला दिग्दर्शकांना पारितोषिक देणे :**

राष्ट्रीय / आंतरराष्ट्रीय स्तरावर पारितोषिक प्राप्त मराठी चित्रपटांचे दिग्दर्शन महिलांनी केलेले असेल, अशा चित्रपटांच्या महिला दिग्दर्शिकेस राज्य शासनाने विशेष बाब म्हणून स्वतंत्र पारितोषिक देणे.

**(२०) बहुपडदा चित्रपटगृहांमध्ये (मल्टीप्लेक्समध्ये) मराठी चित्रपटांना प्राधान्य देणे :**

प्रचलित हिंदी व अन्य भाषिक चित्रपटांमुळे अनेकदा मराठी चित्रपटांना बहुपडदा चित्रपटगृहांमध्ये अर्थात मल्टीप्लेक्समध्ये कमी प्रमाणात संधी मिळते. याचा परिणाम मराठी चित्रपट व्यवसायावर होतो. त्यामुळे मल्टीप्लेक्समध्ये मराठी चित्रपट प्राधान्याने दाखविण्याबाबत धोरण आखणे.

**(२१) दर्जेदार मराठी चित्रपट निर्मितीस अर्थसहाय्य योजनेच्या अनुदानात सुधारणा करणे :**

दर्जेदार मराठी चित्रपट निर्मिती अर्थसहाय्य योजनेंतर्गत देण्यात येणाऱ्या अनुदानाचा लाभ न्याय्य पद्धतीने वितरित होण्याच्या दृष्टीने योजनेच्या अटी/नियमावलीत कालसुसंगत सुधारणा करणे.

**(२२) मराठी चित्रपट कलावंत कल्याण मंडळ स्थापन करणे :**

मराठी चित्रपट क्षेत्रात कार्यरत कलावंतांच्या व्यापक हितासाठी मराठी चित्रपट कलावंत कल्याण मंडळाची स्थापना करणे.

**(२३) मराठी चित्रपट कलाकार / तंत्रज्ञ यांच्यासाठी विमा योजना राबवणे :**

मराठी चित्रपट क्षेत्रातील कलाकार, तंत्रज्ञ यांच्यासाठी शासनाकडून विमा योजना राबवणे.

**(२४) नाशिक चित्रनगरीचा विकास करणे :**

मौजे मुंडेगाव (ता. इगतपुरी जि. नाशिक) येथे शासनाच्या १२७ एकर जागेवर दादासाहेब फाळके चित्रनगरी,गोरेगावच्या धर्तीवर भव्यदिव्य चित्रनगरी उभारण्याचा प्रस्ताव सन २००९ पासून शासनस्तरावर प्रलंबित आहे.मुंबई, ठाणे, पालघर, नाशिक, अहमदनगर या पाच जिल्ह्यांच्या सीमांलगत घोटी-इगतपुरी या ठिकाणी प्रस्तावित चित्रनगरी उभारली गेल्यास चित्रपट निर्मिती संस्थांना चित्रीकरणासाठी सुयोग्य जागा उपलब्ध होईल.सदरील ठिकाण हे पाच जिल्ह्यांसाठी मध्यवर्ती असल्याने चित्रीकरणासाठी आवश्यक सोयीसुविधा, दळणवळण व्यवस्था, पूर्वनिर्मिती व पश्चात निर्मितीकरिता आवश्यक बाबी येथे सुलभरीत्या उपलब्ध होतील. त्यामुळे मौजे मुंडेगाव (ता. इगतपुरी, जि. नाशिक) येथे चित्रनगरीची उभारणी करणे.

**(२५) दादासाहेब फाळके चित्रनगरीचा विकास करणे** :

महाराष्ट्र शासनाने २६ सप्टेंबर, १९७७ रोजी महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास

महामंडळाची १९५६ च्या कंपनी कायद्यान्वये स्थापना केली. महामंडळाच्या अखत्यारित मुंबईतील गोरेगाव येथे चित्रनगरी उभारण्यात आली. सन २००१ मध्ये ठराव करून या चित्रनगरीला भारतीय चित्रपटसृष्टीचे जनक गोविंद धुंडिराम ऊर्फ दादासाहेब फाळके यांचे नाव देण्यात आले. ही चित्रनगरी चित्रपटांच्याचित्रीकरणासाठी आवश्यक असणाऱ्या सुविधांनी युक्त असे कलागार संकुल (स्टुडिओ कॉम्प्लेक्स)आहे. सुमारे ५२१ एकर क्षेत्रात ही चित्रनगरी वसलेली आहे. ७० हून अधिक बाह्यचित्रीकरण स्थळे आणि १६ वातानुकूलित कलागारांच्या माध्यमातून आजवर हजारो चित्रपट, मालिका, जाहिरातींचे चित्रीकरण येथे झाले आहे. तसेच महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ मागील दहा वर्षांहून अधिक काळ आर्थिकदृष्ट्या नफ्यात कार्यरत आहे. मात्र, बदलत्या काळ आणि तंत्रज्ञानानुसार दादासाहेब फाळके चित्रनगरीत अत्याधुनिक पायाभूत सुविधा निर्माण करण्याची गरज आहे. त्यादृष्टीने दादासाहेब फाळके चित्रनगरीचा पुनर्विकास करणे.

## १०. भक्तिसंस्कृती उपसमितीच्या मूळ शिफारशी

- **संतपीठ : -**
  - संतपीठाचा अभ्यासक्रम, तज्ञ प्राध्यापक, कुशल कर्मचारी वर्ग ही यंत्रणा अजून बळकट करणे आवश्यक आहे.
  - विद्यार्थ्यांसाठी निवासी अभ्यासक्रम असावेत. संतपीठातील अभ्यासक्रम विद्यापीठांच्या संलग्न महाविद्यालयांमध्ये सुरु करावा.
  - अध्यात्मिक व तांत्रिक शिक्षण देण्यात यावे.
  - संतपीठातील अध्यापन आणि व्यवस्थापनासाठी शासनाने पुरेश्या निधीची तरतूद करावी.
  - संतपीठातील अभ्यासक्रमांचे प्रमाणपत्र, पदवीस अधिकृत दर्जा देण्यात यावा.
  - संतपीठातून देण्यात येणारी पदवी इतर विद्यापीठांच्या पदवीशी समकक्ष असावी.
  - संतपीठास स्वतंत्र विद्यापीठाचा दर्जा देण्यात यावा.
- **तीर्थक्षेत्रांच्या पायाभूत सुविधा विकास कामांसाठी निधी उपलब्धता**
  - सर्व तिर्थक्षेत्रांच्या पायाभूत सुविधांवर अधिक भर देण्यात यावा.

- राज्यातील प्रमुख ज्योतिर्लिंग, साडेतीन शक्ती पीठे, पंढरपूर आदि तीर्थक्षेत्रांचा जागतिक दर्जाचा विकास व्हावा.
- राज्यातील सर्व संतांची जन्मभुमी, कर्मभुमी तसेच समाधीस्थानांचा तीर्थक्षेत्र म्हणून विकास व्हावा.
- सर्व तीर्थक्षेत्रांच्या स्वच्छतेसाठी प्रभावी उपाययोजना करावी.
- सर्व पंथांच्या स्थळांना मुलभूत सोयीसुविधांसाठी आर्थिक मदत करावी.

➢ **संतसाहित्य**

- राज्यातील शाळा, महाविद्यालयांच्या अभ्यासक्रमात संतसाहित्याचा प्राधान्याने समावेश करण्यात यावा.
- संत साहित्य दुर्मिळ असल्याने सदर ग्रंथांची छपाई राज्यशासनाने करावी.
- स्त्री संतांचे साहित्य संकलीत करून सकल स्त्री संत गाथा प्रकाशित करावी.
- संत चरित्रे, शुरविरांचे चरित्रे प्रकाशित करावीत.
- संत साहित्य हे चित्रपट, सिरीज, नाटके, एकांकिका, लघु चित्रपट या माध्यमातून प्रसारीत करण्यासाठी प्रोत्साहन द्यावे व यासाठी सेन्सॉर बोर्डप्रमाणे संत साहित्य अभ्यासक, तज्ञांची समिती नेमावी.
- संत साहित्याचे विविध प्रादेशिक भाषेत भाषांतर करण्यासाठी प्रोत्साहन देण्यात यावे.
- भक्ती परंपरा वृध्दीसाठी संत साहित्यावर आधारीत स्पर्धा, चिंतन,भजन, वक्तृत्व अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यासाठी योजना असावी.
- गावांचा स्वयंपुर्ण विकास करण्यासाठी शासनाने ग्रामगीता प्रचार- प्रसाराच्या कार्यास गती द्यावी.

➢ **वारी**

- वारीच्या सुयोग्य नियोजनासाठी व सोईसुविधांसाठी मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली समन्वय समिती गठित करण्यात यावी. या समितीमार्फत वाहतूक, सुरक्षा, आरोग्य सुविधा, पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहे, इ. महत्वाच्या बाबींवर निर्णय घेण्यात यावेत.
- पायी वारी पालख्या, विसावे, मुक्कामाची ठिकाणे यासाठी शासनाने कायमस्वरुपी जागा अधिग्रहीत करून आरक्षित करावी.
- वारीमार्गांवर वृक्षारोपण करून हरीतवारीस प्राधान्य देण्यात यावे.
- पंढरपूर ते फलटण प्रलंबित रेल्वेमार्गाचे काम पुर्ण करण्यात यावे.

➢ **वारकरी शिक्षण संस्था**

- वारकरी शिक्षण संस्थांची स्वतंत्र नोंदणी करून त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी विशेष योजना राबविण्यात यावी. या सर्व संस्थांना संतपीठाशी संलग्न करण्यात यावे.

➢ **पुरस्कार**

- राज्यात होऊन गेलेल्या संतांच्या नावे पुरस्कार सुरु करण्यात यावे.
- सेवेकरी संस्थांसाठी पुरस्कार सुरु करण्यात यावे.

➢ **बस, रेल्वे वर संतवचने लिहावीत.**

- बस, बसस्थानके, रेल्वे, रेल्वेस्टेशन्स, महामार्ग अशा विविध सार्वजनिक ठिकाणी संतांची वचने, अभंग प्रदर्शित करण्यात यावी.

➢ **वारकरी सदन**

- देशातील प्रमुख तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी महाराष्ट्र शासनाचे भक्ती सदन बांधण्यासाठी योजना असावी.
- राज्यातील तिर्थक्षेत्रांवर शासनाने वारकऱ्यांच्या निवासासाठी भवन बांधावे.

➢ **मानधन योजना**

- राज्यातील किर्तनकार,प्रवचनकार, प्रबोधनकार, निरुपणकार यांच्यासाठी निकष लावून मानधन योजना सुरु करावी.
- वारी संप्रदायातील फडकरींसाठी आर्थिक मदतीची योजना सुरू करावी.

➢ **संस्कृत अकादमी**

- संस्कृत अकादमी स्थापन करण्यात यावी. त्याअंतर्गत संस्कृत साहित्य, वेद, वैदिक
- अभ्यासक्रमाच्या विविध योजना सुरु कराव्यात.
- वेद पाठशाळांना सहायक अनुदान देण्यात यावे.

➢ **इतर / स्थानिक प्रश्न**

- मंदिराच्या सुयोग्य व्यवस्थापनासाठी विश्वस्त मंडळाच्या नियुक्तीसाठी स्वतंत्र नियमावली तयार करण्यात यावी. व तिचे बहुतांश अधिकार हे अध्यात्मिक क्षेत्रातील व्यक्तींना असावेत.
- नदी स्वच्छता मोहीम राबवावी व किनारे सुशोभित करावेत.
- तिर्थक्षेत्रांच्या ठिकाणी मद्य-मांस विक्रीस बंदी करण्यात यावी.
- भक्तीच्या परंपरेतून सुरु झालेल्या यात्रा, जत्रा,उत्सव यांना प्रोत्साहन देण्यासाठी तसेच या रुढीपरंपरांचे जतन करण्यासाठी विशेष योजना राबविण्यात यावा.
- ग्रामदैवत, पुरातन मंदिरांचा जिर्णोध्दार करण्यासाठी विशेष आर्थिक सहाय्याची योजना राबविण्यात यावी.
- अदिवासी भक्तीपरंपरेचा प्रचार-प्रसार करणाऱ्या घटकांसाठी प्रोत्साहन योजना सुरु करण्यात यावी.
- नाशिक-त्र्यंबकेश्वर क्षेत्री दर १२ वर्षांनी होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी कायमस्वरुपी जागा अधिग्रहीत करून आरक्षित करावी तसेच कुंभ मेळ्याच्या नियोजनासाठी शासकीय समिती गठित करण्यात यावी.
- संस्थांच्या जमिनीवर फक्त संस्थांची मालकी हक्क असावा यासाठी शासनाने कडक कायदा करावा.
- डोंगर, गड, किल्ले, वनपरीसर अदि ठिकाणी असलेल्या धार्मिक स्थळांच्या पर्यटनीय दृष्टीने विकास होण्यासाठी शासनाच्या संबंधित विभागांनी विकासात्मक उपाययोजना राबवाव्यात.
- सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी कुंभमेळा प्राधिकरण निर्माण करावे.
- राज्याच्या धार्मिक संस्कृतीचे चित्रण करणारे माहीतीपट निर्मीती करुन प्रदर्शित करावे.

- मठ मंदिर व्यवस्थापन आयोग स्थापन करण्यात यावा.
- धार्मिक स्थळांजवळील नद्या, विहीरी व अन्य पाण्याचे स्रोत नेहमी स्वच्छ ठेवण्याबाबत शासनाने यंत्रणा कार्यरत करावी.
- राज्यातील जवळपासच्या धार्मिक तिर्थक्षेत्रांना जोडून धार्मिक टुरीझम सर्किट करण्याबाबत उपाययोजना आखाव्यात.
- प्रतिवर्षी कोजागिरी पौर्णिमेस नाशिक जिल्ह्यातील मुल्हेर येथे हजारो वर्षांची परंपरा असलेल्या महाभारतकालीन ‘रासउत्सव आणि सामाजिक समरसतेचे प्रतिक असलेला चक्रारोहण सोहळा शासनातर्फे मोठ्या प्रमाणात साजरा केला जावा व संपूर्ण महाराष्ट्रास परिचित व्हावा.

*****